PRGI NO-MAHMAR/2023/86554

आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष


समतावादी

# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

मार्च २०२६ वर्ष तिसरे : अंक ७



# THE STUDY ROOM

## LEARN | GROW | SUCCEED

**SHARDA SHIKSHAN SEVA SAMITI'S**

**(SHASHIKANT PAWAR EDUCATIONAL CENTRE)**

The Jewel, Ground Floor, Beside Pancharatna Building, Opera House, Mumbai - 400 004.

**022 35406840 / 022 35406881**  **+91 91 360 565 27**

shardastudyroom_charniroad  www.shardastudyroom.com

## Helping Students Focus, One Seat at a Time.











**Scan QR Code**

And get 1 day

**FREE ENTRY** on enrollment

## The Study Room Facilities

- Free WiFi
- Natural White Lighting
- Private Desks
- Plug Points
- Silence Zone
- Fully Air Conditioned

**Flexible and Affordable Plans**

Choose from hourly, daily, weekly, or monthly.

**प्रकाशक, संपादक**
डॉ. विवेक कोरडे

**कार्यकारी संपादक**
शेखर देशमुख

**सल्लागार संपादक मंडळ**
सुलक्षणा महाजन, डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे, राजेंद्र साठे, सुजय शास्त्री, सायली परांजपे

**संपादकीय साहाय्य**
सुमेधा कुवळेकर

**व्यवस्थापन सल्लागार**
विकास नाईक

**शीर्षनाम आरेखन**
विजय नार्वेकर

**मुखपृष्ठ**
अमेरिकी शिल्पकार थॉमस रिग्वे गाउल्ड यांच्या सृजन सामर्थ्याचे दर्शन घडविणारे 'द वेस्ट विंड' (सन १८७४) हे शिल्प नि त्याचे समिपचित्र.

**अंकातील छायाचित्रे**
इंटरनेटवरून साभार

**अंक मांडणी, सजावट**
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)

**व्यवस्थापक**
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

**विनामूल्य वितरणासाठी**
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde
E mail Id- smsp.mumbai@gmail.com
(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग




✶ उपजत स्त्रीवादाचे आदिस्थान
– सुमित्रा वसावे; आमंत्रित संपादकीय २
✶ भारतीय गणराज्याच्या निर्मात्या
– श्रीरंजन आवटे ५
✶ पहाडाची 'विशेष' हाक!
– राधिका कुंटे ९
✶ मुक्तीचे जीवनगाणे
– सायली परांजपे १५
✶ ढासळत्या पौरुषत्वाचा आकांत
– योगेश पवार २०
✶ हिंदूशाहीची वाटचाल आणि राहुल गांधी नावाचा अडथळा
– राजेंद्र साठे २४
✶ शतकी सातत्य न्यूनगंडाचे
– डॉ. विवेक कोरडे २८
✶ आपले घर, आपला किल्ला!
– रवि आमले ३२
✶ इंडो–युरोप: विकासाच्या दोन भिन्न वाटा एकमेंकात मिसळताना
– हितेश पोतदार ३६
✶ एक बर्फाळ जमिनीचा तुकडा, जगाचा संसार मोडणार?
– डॉ. मोहन द्रविड ४२
✶ क्रीडाकेंद्री विद्यापीठांचे भव्यदिव्य चिनी धडे
– गजानन जोशी ४८
✶ ये इश्क़ मैं कैसे छोड़ दूँ, मेरी उम्र भर की तलाश है!
– प्रा.श्रीनिवास हेमाडे ५४
✶ सीतेच्या शोधात दाहिदिशा
– राजा पटवर्धन ५८
✶ बौद्ध तत्त्वज्ञानाचा उत्कर्ष
– जगदीश काबरे ६३
✶ फुल रही सरसों सकल बन
– आशय गुणे ६७
✶ लिओनार्दोची अजरामर मोनालिसा
– डॉ. आनंद जोशी ७२
✶ मूल्यभान देणाऱ्या झाडांचं जगणं नि गाणं टिपणारी काव्यलिपी
– डॉ. नेहा सावंत ७८
✶ ...तेव्हा नादावतात नादस्वर
– गणेश मनोहर कुलकर्णी ८४
✶ दाम्पत्य स्वप्न
मूळ कथा : वनफूल; अनुवाद : सुमती जोशी ८९
✶ औषधेतर चिकित्सा योजना हेच आयुर्वेदाचे बलस्थान
– डॉ. श्रीराम सावरीकर ९२

# उपजत स्त्रीवादाचे आदिस्थान

**आमंत्रित संपादकीय**



**सुमित्रा वसावे**

**आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष**



*प्रातिनिधिक छायाचित्रे*

**स्त्री ही परंपरेने लादलेल्या दास्यातून, जाचातून बाहेर पडावी, यासाठी भारतात सुरू झालेल्या स्त्री मुक्ती चळवळींनी अर्धशतकी वाटचाल पूर्ण केली आहे. या वाटचालीत शहरी–निमशहरी संवेदनांना हात घालण्यास या चळवळी निश्चितच यशस्वी ठरल्या आहेत. मुख्यत्वे त्यातून शहरी स्त्री वर्गामध्ये 'स्व'चे भान येत गेले. ही चळवळीची जमेची बाजू असली तरीही, या चळवळींनी आदिवासी स्त्रियांपर्यंत पोहोचण्यास कितीसे प्रयत्न केले किंवा आदिवासी संस्कृतीत पिढ्यांपासून रुजलेल्या स्त्रीवादाची शहरी स्त्रीवादी चळवळीने कितपत दखल घेतली, या आणि अशा काही टोकदार प्रश्नांना प्रतिसाद देणारे हे आमंत्रित संपादकीय...**

आज जगभर स्त्रीवादाबद्दलच्या नवनव्या कल्पना– संकल्पना पुढे येत आहेत. समाज माध्यमांपासून ते संसद भवनापर्यंत 'स्त्री–पुरुष समानता' आणि 'मी टू' यांसारख्या संज्ञांचा आवर्जून उल्लेख होतोय. एकूणच शहरी विचार–वर्तुळांत स्त्री मुक्तीचे नवनवे अन्वयार्थ लावले जात असताना या सगळ्या चर्चांपासून दूर, दुर्गम अशा डोंगरदऱ्यांत एक जग असं आहे, जिथे 'फेमिनिझम' हा शब्द कधी पोहोचलाच नाही आणि कदाचित, तिथे त्याची फारशी गरजही नाही. कारण, महाराष्ट्राच्या मेळघाट, गडचिरोली, नंदुरबार किंवा पालघर

या भागात जगणाऱ्या आदिवासी स्त्रियांचा लढा हा स्त्रीवादाच्या पुस्तकी व्याख्या ओलांडणारा आहे, हे सर्वप्रथम नमूद केले पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे, जिला 'स्त्रीवाद' या शब्दाचा अर्थ माहीत नाही, ती बाई 'स्त्रीवादी' असू शकत नाही का? की उलट, शहरातल्या तथाकथित आधुनिक स्त्रीपेक्षा ही रानवाटेवरची बाई आपल्या कृतीतून अधिक प्रगल्भ स्त्रीवाद जगत आली आहे का? या दोन प्रश्नांचीही चिकित्सा होणे, इतिहासाच्या या टप्प्यावर आता अत्यंत गरजेचे आहे.

आदिवासी संस्कृतीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, ऐतिहासिकदृष्ट्या आदिवासी समाज हा मुख्य प्रवाहातील हिंदू समाजापेक्षा अधिक समतावादी राहिला आहे. अनेक आदिवासी जमातींमध्ये हुंडा पद्धत नाही, उलट वधुमूल्य म्हणजेच देज देण्याची इथे परंपरा रुजलेली आहे. विधवा विवाहाला मान्यता आहे आणि घटस्फोट घेण्याचा अधिकारही आदिवासी स्त्रियांना आहे. म्हणजेच, एकंदर निर्णय प्रक्रियेत आदिवासी स्त्रियांचा सहभाग उर्वरित वर्गातल्या स्त्रियांच्या तुलनेत अधिक आहे.

आधुनिक स्त्रीवादात 'My Body, My Choice' ही एक नवीन संकल्पना पुढे आली आहे. पण आदिवासी समाजात डोकवून पाहिले, तर लक्षात येते की, तिथे शारीरिक स्वायत्तता ही निव्वळ घोषणा नव्हती, एक उदारमतवादी परंपरा होती. माडिया समाजातील घोटुलसारखी व्यवस्था असो किंवा अनेक आदिवासी जमातींमधील जोडीदार निवडीचे असलेले स्वातंत्र्य असो, तिथे स्त्रीला स्वतःचा जोडीदार निवडण्याचा, आवडला नाही तर नाकारण्याचा आणि घटस्फोट घेऊन पुन्हा नव्याने संसार थाटण्याचा अधिकार परंपरेनेच दिला आहे. ही परंपरा धर्माने बोट दाखवलेल्या पारलौकिक जगातल्या सुखाकडे डोळे लावून निर्णय घेण्यापेक्षा ऐहिक जगातले प्रश्न ऐहिक दृष्टिकोनातूनच सोडवण्यावर भर देणारी राहिली आहे.

म्हणूनच जिथे तथाकथित सुसंस्कृत समाजात विधवा विवाह किंवा घटस्फोट आजही निषिद्ध मानला जातो, तिथे आदिवासी बाई स्वतःच्या हिमतीवर अतिशय धीरोदात्तपणे यातून मार्ग काढते. कारण, तिच्या संस्कृतीनेच तिला शिकवलेले असते की, जोडीदार निवडणे हा तिचा नैसर्गिक हक्क आहे. मुख्य प्रवाहातील स्त्रीवाद अजूनही ज्या अधिकारांसाठी झगडतोय, ते अधिकार आदिवासी स्त्रिया कित्येक पिढ्यांपासून उपभोगत आहेत. पण दुर्दैवाने, सुधारणावादी म्हणवणारा समाज त्यांना मागास ठरवून मोकळे होतो.

एकीकडे शहरी स्त्रीवाद आज समान वेतनासाठी लढत आहे. पण आदिवासी अर्थव्यवस्थेचा कणाच मुळात स्त्री आहे. जंगलात जाऊन मोहाची फुले वेचणे, तेंदूपत्ता जमा करण्यापासून ते बाजारात जाऊन विकण्यापर्यंत ही सारी कामे स्त्रिया करतात. घरात बसून राहणे किंवा पुरुषाने कमावून आणलेल्या पैशावर गुजराण करणे वा अवलंबून राहणे, ही पद्धत आदिवासी समाजात तशी दुर्मिळच आहे. येथे ती पुरुषाच्या बरोबरीने नव्हे, तर अनेकदा पुरुषापेक्षा अधिकचे श्रम करते आणि त्यातूनच आपले अर्थार्जन करते.

गडचिरोली असो वा नंदुरबार, जेव्हा एखादी आदिवासी स्त्री बाजारात वनउपज विकायला बसते, तेव्हा तिला आर्थिक स्वावलंबनाचे धडे गिरवण्याची गरज पडत नाही. तिचा हा आर्थिक वावर इतका सहज आहे की, तिला स्वतःलाही आपण काहीतरी आगळेवेगळे करत आहोत असे वाटत नाही. तिच्या आयुष्यातला व्यापून असलेला हाच खरा सहजपणे आलेला स्त्रीवाद आहे.

'पेसा' कायदा कागदावर नंतर आला, पण त्याआधीपासूनच आदिवासी पाड्यांवर स्त्रियांचे मत महत्त्वाचे मानले जात होते. आज गडचिरोलीत दारूबंदीसाठी सर्वात मोठा लढा कुणी उभारला असेल, तर तो तिथल्या स्त्रियांनी. तिथे, आम्ही अबला आहोत, अशी असहाय्यता न दर्शवता त्यांनी याविरोधात यशस्वी लढा दिला.

मुख्य प्रवाहातील स्त्रीवादी संघटनांमध्ये अनेकदा प्रतीकात्मक लढाई लढली जाते. विशिष्ट घटनेबाबतचा रोष फक्त समाज माध्यमांपुरताच मर्यादित ठेवला जातो. पण आदिवासी स्त्रीचा लढा हा थेट असतो. सुरजागडच्या खाणींविरोधात आंदोलन असो की नर्मदा बचाव आंदोलन आदिवासी स्त्रियांनी नेहमीच थेट लढा दिल्याचे इतिहास सांगतो. देशाच्या प्रथम नागरिक म्हणून एक आदिवासी महिला रायसिना हिल्सवर विराजमान आहेत. पण त्या सर्वोच्च पदस्थ असल्या तरी त्यांना ''तुम्ही आमच्यातल्या आहात, तरीही आमची मुले कुपोषणाने का मरत आहेत?'' असा थेट नि संतप्त प्रश्न विचारायला मेळघाटच्या आदिवासी भागातील सरपंच मागेपुढे पाहत नाही. एकीकडे कुपोषणाच्या जटील समस्येला सामोरं जाणं आणि दुसरीकडे त्याचा नायनाट करण्यासाठी या महिला करत असलेले प्रयत्न मुख्य प्रवाहातील स्त्रीवादी व्यक्ती-संस्थांना लाजवणारे आहेत.

आदिवासी स्त्री ही केवळ गृहिणी नाही, ती निसर्गाची सर्वात पहिली रक्षक आणि संवर्धक आहे. मुख्य प्रवाहातील स्त्रीवादाच्या

व्याख्येत समान वेतन आणि समान हक्क यावर भर दिला जातो, पण आदिवासी स्त्रीवादाचे मूळ हे तिच्या अस्तित्वाच्या लढ्यात आहे. तिचे जगणे जल, जंगल आणि जमीन या त्रिसूत्रीवर आधारलेले आहे. जेव्हा एक जंगल तोडले जाते, तेव्हा केवळ झाडे जमीनदोस्त होत नाहीत, तर त्या आदिवासी स्त्रीच्या स्वयंपाकघरापासून ते औषधोपचारापर्यंतची संपूर्ण यंत्रणा कोलमडते. इंधन गोळा करणे, गुरांसाठी चारा आणणे आणि कुटुंबासाठी रानभाज्या–कंदमुळे शोधणे ही कामे प्रामुख्याने स्त्रिया करतात. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो, तेव्हा त्याचा पहिला आणि सर्वात मोठा फटका आदिवासी स्त्रीला बसत असतो. पर्यावरणाच्या ऱ्हासात तिचे कामाचे तास वाढतात, तिची पायपीट वाढते आणि तिचे आरोग्य खालावते. दुर्दैवाने, इको–फेमिनिझम म्हणजेच पर्यावरणवादी स्त्रीवादाच्या संकल्पनेत या संघर्षाचा अजूनही अंतर्भाव नाही.

अर्थात, एका बाजूला वरकरणी हा आदिवासी समाज हा लिंगभेदापासून मुक्त वाटत असला, तरी वास्तवात तिथेही विषमतेचे पदर गडद आहेत. नंदुरबारसारख्या आदिवासी बहुल भागात आजही स्त्रियांना अनेक धार्मिक स्थळांवर आणि यात्रांमध्ये प्रवेश नाकारला जात आहे. निसर्गपूजक असलेल्या आदिवासी संस्कृतीतला हा विरोधाभास उघड आहे. काहीसा खुपणाराही आहे. पण असे तरीही या परंपरांच्या विरोधात, त्याचबरोबर डाकीण प्रथेसारख्या अघोरी प्रकारात स्त्रियाच स्त्रियांच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या दिसताहेत. हे चित्र बदलण्यासाठी आता अनेक आदिवासी महिला स्वतःहून पुढाकार घेत आहेत. डोक्यावरचा पदर, जो एकप्रकारे बंधनाचे प्रतीक होता, तो झुगारून देऊन त्या माणूस म्हणून जगण्याचा हक्क मागत आहेत. त्यांना फेमिनिझम या शब्दाचा गंधही नसेल, पण अन्यायाविरुद्ध आणि विषमतेविरुद्ध त्यांनी उचललेले हे पाऊल, हीच खरी स्त्रीमुक्तीची नांदी असणार आहे.

परंतु आजच्या घडीला कळीचा मुद्दा हा आहे, की शहरी स्त्रीवादी चळवळीने आदिवासी स्त्रियांच्या प्रश्नांना (असाच प्रश्न याआधी दलित स्त्रियांच्यासंदर्भानेही विचारला गेला आहे.) आजवर किती जागा दिली आहे? दुर्दैवाने, याचे उत्तर फारसे उत्साहवर्धक नाही. अनेकदा शहरी स्त्रीवाद हा मध्यमवर्गीय जाणिवांभोवती फिरताना दिसतो आहे. तिथे आदिवासी स्त्रीचे प्रश्न हे केवळ 'ट्रायबल इश्यू' म्हणून बाजूला सारले जाताहेत. मुळात, तिचे शोषण हे केवळ ती स्त्री आहे म्हणून होत नाही, तर ती आदिवासी आणि गरीब आहे म्हणूनही होत आहे. यालाच समाजशास्त्रात आंतरछेदी शोषण असेही म्हटले गेले आहे. अशा प्रसंगी जोपर्यंत मुख्य प्रवाहातील स्त्रीवादी चळवळी आदिवासी स्त्रियांच्या जमिनीच्या लढ्याला, त्यांच्या भाषेच्या लढ्याला आणि त्यांच्या अस्मितेच्या लढ्याला आपला लढा मानणार नाहीत, तोपर्यंत भारतीय स्त्रीवाद अपूर्णच राहणार आहे.

वर्तमानाच्या संदर्भाने आदिवासी स्त्रिया आणि स्त्रीवाद यांचा संबंध शोधताना आपल्याला स्त्रीवादाच्या अनुषंगाने झालेल्या पाश्चात्य व्याख्या बाजूला ठेवाव्या लागतील. आदिवासी स्त्रीला पाश्चात्य स्त्रीवाद्यांमधील 'स्युडो फेमिनिस्ट' म्हणजेच पुरुषासारखे छद्म स्त्रीवादी व्हायचे नाहीये, तर तिला तिचे जंगल, तिची संस्कृती आणि तिचे माणूसपण टिकवायचे आहे. तिचा लढा हा पितृसत्तेविरोधात जेवढा आहे, त्याहून अधिक तो इथली राज्यसत्ता आणि भांडवलशाही विरोधातला आहे.

तिच्या डोक्यावरचा मोळीचा भार हलका होणे, तिच्या मुलांना हक्काचे शिक्षण मिळणे, तिच्या जमिनीवर तिचा मालकी हक्क असणे आणि कोणत्याही भय–दडपणाशिवाय तिला जगता येणे, हाच खरा आदिवासी स्त्रीचा सन्मान असणार आहे आणि याच सन्मानात तिचा स्त्रीवादही अनुस्यूत आहे. जेव्हा आपण शहरी संवेदनांसह स्त्रीशक्तीचा जागर करतो, तेव्हा त्यामध्ये जंगलाच्या कुशीत वसलेल्या अंधाऱ्या झोपडीत दिवा लावून भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या त्या मातेचा, त्या भगिनीचा समावेश असायला हवा आहे. कारण, जोपर्यंत रानवाटांवरची स्त्री सुरक्षित आणि सक्षम होत नाही, तोपर्यंत भारताचा विकास आणि भारताचा स्त्रीवाद दोन्हीही पोकळच राहणार आहे.

**(शब्दांकन – शंतनू खुजे)**

**सुमित्रा वसावे या 'बाईमाणूस मीडिया हाऊस'च्या नंदूरबार येथील प्रतिनिधी आहेत. भिल्ल–पावरा आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सुमित्रा यांना प्रतिष्ठित 'लाडली मीडिया' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सातपुड्यामधील आदिवासी महिलांच्या सामाजिक–राजकीय–सांस्कृतिक प्रश्नांना त्या वाचा फोडत असतात. त्यातही डाकीण प्रथेविरोधातल्या जनजागृती मोहिमेत त्या सक्रिय असतात. संपर्क : ९३०७३०९२७२**

# भारतीय गणराज्याच्या निर्मात्या



श्रीरंजन आवटे





*मिळून साऱ्याजणींचे योगदान*

**ज**गभरातल्या अनेक देशांमध्ये महिलांना मतदानाचा हक्कही नव्हता, त्या काळात भारतातील महिला आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करत होत्या, याला कारण नेहरुंची आधुनिक नि प्रागतिक दृष्टी. किंबहुना, स्त्रियांच्या सहभागाविषयी म. गांधी आणि नेहरु कमालीचे आग्रही होते. बाबासाहेबांचं तर सुप्रसिद्ध विधान आहे; एखाद्या देशाच्या प्रगतीचं मोजमाप करायचं असेल, तर त्या देशातील महिलांच्या प्रगतीचा निकष वापरायला हवा. त्यामुळे स्त्रिया संविधानसभेत आणि एकूणात राजकीय जीवनात सक्रिय असण्याविषयी अनुकूल प्रतिपादन करणाऱ्या गांधी, नेहरु आणि आंबेडकर यांचेही योगदान महत्त्वाचे आहे...

‘‘**मी** आज इथे उभी आहे आणि मी स्वप्नात हरवले आहे. मला आठवतं, विद्यार्थी असताना मी वाचलं होतं. अमेरिकेच्या संविधान निर्मितीमध्ये हॅमिल्टन, जेफरसन यांनी निर्णायक भूमिका बजावली. मी विचार करायचे की अमेरिकेप्रमाणे गुलामीची अवस्था जाऊन भारताचे स्वतंत्र संविधान लिहिण्याची वेळ केव्हा येईल? मला वाटायचं, संविधान निर्मिती करण्याइतपत आपण सक्षम आहोत का? आत्मस्तुती वाटू शकते ही अध्यक्ष महोदय, मात्र मी संविधान निर्मितीत भूमिका बजावू शकले, याचा मला सार्थ अभिमान वाटतो.’’ दुर्गाबाई देशमुख यांचे १ फेब्रुवारी १९५०चे संसदेच्या पहिल्या अधिवेशनातील हे भाषण. संविधान सभेतल्या आपल्या भूमिकेला ऐतिहासिक महत्त्व आहे, याचे दुर्गाबाईंसारख्या महिला सदस्यांना भान होते. त्यांच्यासह १५ महिलांनी संविधान सभेच्या निर्णय प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावली.

आंध्रच्या दुर्गाबाई देशमुख, बडोद्याच्या हंसा मेहता, केरळच्या पालघाट जिल्ह्यातील अम्मू स्वामीनाथन, कोचिनच्या दाक्षायनी वेलायुधन, पंजाबच्या मलेरकोटला येथील बेगम ऐजाज रसूल, लखनौच्या कमला चौधरी आणि राजकुमारी अमृत कौर, आसाममधील गोलपाडाच्या लीला रॉय, पूर्व बंगालातील म्हणजे (आजच्या बांग्लादेशातील) मालती चौधरी, अलाहाबादच्या पूर्णिमा बॅनर्जी आणि विजयालक्ष्मी पंडित, पश्चिम बंगालच्या मालद्यामधील रेणुका रे, हैदराबादच्या सरोजिनी नायडू, हरयाणाच्या अंबाला येथील सुचेता कृपलानी, केरळच्या तिरुवअनंतपुरम येथील ॲनी मस्कारे अशा या पंधरा महिला सदस्य. पितृसत्ताक समाजात आणि संविधानसभेत आपली भूमिका ठामपणे मांडणे सोपे नव्हते. मात्र या महिलांनी आपली जबाबदारी चोख पार पाडली.

***सशक्त आवाज***

स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा सहभाग वाढावा यासाठी महात्मा गांधींनी प्रयत्न केले. त्यामुळे स्त्रियांचा सहभाग वाढलाही, मात्र एकूणात हे प्रमाण कमी होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे संविधान सभेत केवळ १५ स्त्रिया होत्या. त्यापैकी एक महत्त्वाच्या सदस्य होत्या, दाक्षायनी वेलायुधन. संविधान सभेतील या सर्वात तरुण आणि एकमेव दलित महिला. मद्रास प्रांतातील पुलाया जातसमूहात दाक्षायनी यांचा जन्म झाला. या जातसमूहाला वर्षानुवर्षे अत्यंत हीन वागणूक दिली जात होती. त्याचे चटके दाक्षायनी यांनी सोसले. रसायनशास्त्रासारखा विषय शिकत असताना अस्पृश्यतेची वागणूक त्यांना दिली गेली. प्रयोगशाळेत इतर विद्यार्थी-प्राध्यापकांपासून काही अंतर दूर उभे राहून त्या रसायनशास्त्र शिकल्या आणि पुढे शिक्षक म्हणून काम करू लागल्या. महात्मा गांधींचा त्यांच्यावर प्रभाव होता, मात्र गांधींच्या ‘हरिजन’ संबोधण्यावर त्यांनी टीकाही केली होती. १९४०ला दाक्षायनी यांचे लग्न वर्ध्याच्या आश्रमात महात्मा गांधी, कस्तुरबा गांधींच्या उपस्थित झाले होते. स्वातंत्र्य आंदोलनात दाक्षायनी यांचा सक्रिय सहभाग होता.

त्या कोची मतदारसंघातून १९४५ साली निवडून आल्या आणि पुढे १९४६ ला संविधान सभेच्या सदस्य झाल्या. दाक्षायनी यांना संविधान सभेत प्रवेश करू देऊ नये, याकरता पं. नेहरु आणि सरदार पटेल यांना पत्रं पाठवण्यात आली होती. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनमधल्या काही दलितांचा तर काँग्रेसमधल्या काही कर्मठ नेत्यांचा त्यांना विरोध होता. काँग्रेस मात्र ठामपणे दाक्षायनी वेलायुधन यांच्या पाठीशी उभी राहिली.

***जमातवादाच्या धोक्याकडे निर्देश***

संविधान सभेमध्ये सामील झाल्यानंतर नेहरुंनी उद्देशिकेचा प्रस्ताव मांडताच, दाक्षायनी यांनी आपला सहभाग नोंदवला. जमातवादाचा धोका त्यांनी सांगितला आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही ‘फॅसिस्ट’ संघटना असल्याचे संबोधत जमातवाद आणि साम्राज्यवाद या दोन्हींचे धोके त्यांनी मांडले. स्वतः दलित असूनही विभक्त मतदारसंघांना त्यांनी ठामपणे विरोध केला. या भूमिकेमुळे शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागले. याआधीही दाक्षायनी यांना दलितांकडून विरोध झाला होता. कॅबिनेट मिशनला विरोध करायचा म्हणून मुस्लिम लीग आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशनने ‘प्रत्यक्ष कृती दिवस’ साजरा करण्याचे आवाहन केले, तेव्हा या आवाहनालाही दाक्षायनी यांनी विरोध केला होता. प्रसंगी त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांवरही टीका केली.

***बाणेदार नेतृत्व***

भारताच्या संघराज्यवादाच्या रचनेत प्रांतांपेक्षा केंद्राला अधिक प्राधान्य दिले होते. यातून केंद्र अधिक वर्चस्वशाली होईल, अशी भीती व्यक्त करत अधिकाधिक विकेंद्रीकरण केले, तर भारताची एकता शाबूत राहील, असे त्यांचे मत होते. संविधान सभेत त्यांनी हे आग्रहाने मांडले होते. दाक्षायनी यांनी अस्पृश्यतेचे विदारक अनुभव सोसले होते. त्यामुळे

अस्पृश्यतेवर बंदी आणणाऱ्या अनुच्छेद १७ विषयी चर्चा सुरू असताना त्या म्हणाल्या होत्या की, अस्पृश्यता निर्मूलनासाठी केवळ शिक्षा उपयोगाची नाही, तर राज्यसंस्थेने त्यासाठी सक्रिय पुढाकार घेतला पाहिजे, त्यासाठी मोहीम राबवली पाहिजे. संविधान लागू झाल्यानंतरही दाक्षायनी सार्वजनिक जीवनात सक्रिय राहिल्या. गांधी इरा पब्लिकेशन्स, जय भीम या प्रकाशनांचे संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले. महिला जागृती परिषदेची स्थापना केली. रा. स्व. संघ असो वा मुस्लिम लीग, म. गांधी असोत वा डॉ. आंबेडकर, काँग्रेस असो की शेड्युल्ड कास्ट फेडरेशन अशा चिकित्सा करत दाक्षायनी वेलायुधन यांच्यासारख्या स्वतंत्र विचारांच्या बाणेदार स्त्रीने संविधान सभेत नेतृत्व केले. कधी काळी तिचा स्पर्श झाला तर विटाळ मानला जात असेल; मात्र भारतीय संविधानाला दाक्षायनी यांच्या स्पर्शाने मानवी चेहरा प्राप्त झाला. हा खरा काव्यात्म न्याय होता! जणू सावित्रीबाई फुलेंचा वारसाच दाक्षायनी यांनी पुढे चालवला.

***नो सर, नो राजकुमारी...***

मुळात दाक्षायनी असोत वा दुर्गाबाई देशमुख, या सर्व महिलांचे प्रतिनिधित्व केवळ नाममात्र नव्हते, तर त्यांनी मौलिक सूचना करत भरीव काम केले. उदाहरणार्थ, रेणुका रे यांनी संपत्तीच्या हक्कांविषयी आक्षेप नोंदवला, तेव्हा संविधान सभेतल्या पुरुषांनी त्यांची एकप्रकारे कुचेष्टा करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी ठामपणे आपले मुद्दे मांडले. अगदी दाक्षायनी वेलायुधन यांनी जसा दलित असून दलितांकरता स्वतंत्र मतदारसंघांना विरोध केला, त्याच प्रमाणे संविधान सभेतील बेगम ऐजाज रसूल यांनीही मुस्लिम लीगच्या प्रतिनिधी असूनही मुस्लिमांकरता स्वतंत्र मतदारसंघ असू नयेत, अशी भूमिका मांडली.

अम्मू स्वामीनाथन यांनी स्वातंत्र्य आंदोलनात आणि संविधान सभेतही भरीव योगदान दिले. पुढे त्यांचा गौरव १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्षात 'मदर ऑफ द इयर' या किताबाने झाला. याशिवाय राजकुमारी अमृत कौर यांच्याबाबत संविधानसभेत घडलेला प्रसंग विशेष नोंदवण्याजोगा आहे. त्यांना 'राजकुमारी' असं का संबोधायचे, असा प्रश्न उपस्थित केला गेला. अमृत कौर या राजघराण्यातील असल्याने त्यांना 'राजकुमारी' म्हटले जात असे. त्या तत्काळ म्हणाल्या, इथून पुढे मला केवळ 'अमृत कौर' म्हणा. या चर्चेत सामील असलेले सर बी.एन.राव तत्काळ म्हणाले की, इथून पुढे मलाही 'सर' म्हणू नका. 'सर' हा किताब त्यांना ब्रिटिशांकडून मिळालेला. त्यामुळे वंशपरंपरेने




*प. नेहरु, डॉ. आंबेडकर यासारखे वैश्विक भान असलेले द्रष्टे होते, म्हणून समतेचे आणि समानतेचे प्रतिबिंब केवळ कागदावर न राहता, संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेतही उमटले...*

असलेले 'राजकुमारी' ही नाकारले आणि ब्रिटिश वसाहतवादी मानसिकतेतून आलेले 'सर' ही नाकारले गेले, तेव्हा संविधानातील अठरावा अनुच्छेद आकाराला आला.

या अनुच्छेदाने असे सर्व किताब रद्दबातल ठरवले. अमृत कौर यांनी मतदानाचा हक्क सर्वांना असायला हवा, अशी आग्रही मागणी केली, भाषा-शिक्षण या मुद्द्यावर त्यांनी सूचना केल्या, तर पुढे आरोग्याच्या क्षेत्रात पायाभूत बदलही त्यांनी केले. देशाच्या पहिल्या आरोग्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले. 'भारताची नाइटिंगेल' असे ज्यांना संबोधले गेले त्या सरोजिनी नायडू यांनी स्त्रीवादी जाणीव विकसित व्हावी म्हणून प्रयत्न केले. काँग्रेसच्या १९२५ च्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. संविधान सभेतही त्यांनी स्त्रियांच्या, वंचितांच्या हक्कांसाठी युक्तिवाद केले. विशेषतः भारतीय राष्ट्रध्वज स्वीकारताना त्यांनी केलेली मांडणी लक्षवेधक ठरली.

***मेन नव्हे, ह्युमन बिइंग***

हंसा मेहता या देखील एक प्रभावी नेत्या. मुंबईच्या विधिमंडळात त्या १९३७ साली निवडून आल्या होत्या. सामाजिक राजकीय जीवनात त्या अतिशय सक्रिय होत्या. १९४५-४६ या वर्षात अखिल भारतीय महिला सभेच्या त्या अध्यक्षा होत्या. या अखिल भारतीय महिला सभेने स्त्रियांमध्ये नवी राजकीय जाणीव निर्माण केली. हंसा मेहता यांनी या महिला सभेच्या माध्यमातून महिलांसाठीच्या हक्कांची सनद तयार केली. त्यानंतर अवघ्या वर्षभरात हंसा मेहता यांचा संविधानसभेत प्रवेश झाला. संविधानसभेत स्त्रियांच्या नागरी, राजकीय आणि संपत्तीविषयक हक्कांच्या चर्चांमध्ये मेहतांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेली महिला हक्क सनद उपयोगी पडली. पुढे संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या परिषदेसाठी




*इंग्लंड-अमेरिकेत महिलांना मतदानाच्या हक्कासाठी झगडावे लागले होते, त्या काळात भारतात महिलांना संविधाननिर्मिती प्रक्रियेत सहभागी करून घेतले गेले, मतदानाचा हक्कही मिळाला... अच्युत चेतन यांनी, पुस्तकाच्या शीर्षकाद्वारे त्यांचा 'फाउंडिंग मदर्स' असा सार्थ गौरव केला...*

भारताच्या प्रतिनिधी म्हणून गेल्या. संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील पहिले कलम होते, 'ऑल मेन आर बॉर्न फ्री अॅण्ड इक्वल'. हंसा मेहता यांच्यामुळे 'मेन' शब्दाऐवजी 'ह्युमन बिइंग' असे शब्द वापरले गेले. सर्वांना सामावून घेणाऱ्या या दुरुस्तीचे श्रेय हंसा मेहता यांचे आहे.

जगभरातल्या अनेक देशांमध्ये महिलांना मतदानाचा हक्कही नव्हता, त्या काळात भारतातील महिला आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करत होत्या, याला कारण नेहरुंची आधुनिक नि प्रागतिक दृष्टी. किंबहुना, स्त्रियांच्या सहभागाविषयी म. गांधी आणि नेहरु कमालीचे आग्रही होते. बाबासाहेबांचं तर सुप्रसिद्ध विधान आहेः एखाद्या देशाच्या प्रगतीचं मोजमाप करायचं असेल, तर त्या देशातील महिलांच्या प्रगतीचा निकष वापरायला हवा. त्यामुळे स्त्रिया संविधानसभेत आणि एकूणात राजकीय जीवनात सक्रिय असण्याविषयी अनुकूल प्रतिपादन करणाऱ्या गांधी, नेहरु आणि आंबेडकर यांचेही योगदान महत्त्वाचे आहे.

'फाउंडिंग मदर्स ऑफ द इंडियन रिपब्लिक' (२०२३) या अच्युत चेतन यांच्या पुस्तकात महिला सदस्यांनी संविधान सभेत बजावलेल्या भूमिकेचे विश्लेषण आहे. महिला सदस्यांच्या संविधान निर्मितीतील कार्याची यथोचित नोंद जरुरीची आहे. अनेक देशांमध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क मान्य करण्यासाठीही आंदोलनं करावी लागली, असा इतिहास असताना भारतात मात्र संविधानसभेत (अल्प प्रमाणात का असेना) महिला नेतृत्व करत होत्या, ही बाब विशेष आहे. भारतात स्वातंत्र्यानंतर आणि संविधान लागू झाल्यानंतर स्त्रियांना मतदानाच्या हक्कासाठी आंदोलन करावे लागले नाही, कारण कोणत्याही अटीशर्तीशिवाय सर्व स्त्रियांना मतदानाचा हक्क मान्य करण्यात आला. भारताच्या यशोगाथेत हा एक महत्त्वाचा अध्याय आहे. दुर्दैवाने स्त्रियांच्या योगदानाकडे आजवर पुरेसे लक्ष दिले गेले नाही. या पार्श्वभूमीवर महिलांच्या योगदानाकडे केवळ उत्सवी किंवा फक्त नाममात्र उल्लेखाच्या पलीकडे लक्ष देण्याची गरज आहे, कारण या स्त्रिया भारतीय गणराज्याच्या निर्मात्या आहेत!

**श्रीरंजन आवटे कवी, लेखक आहेत. ते सध्या बँकॉक येथील सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकपदी (राज्यशास्त्र) कार्यरत आहेत. राही श्रु. ग. यांच्यासोबत त्यांनी लिहिलेले 'आपलं आयकार्ड' हे संविधानाधारित पुस्तक वाचकप्रिय ठरले आहे.**

**संपर्क** : poetshriranjan@gmail.com

## आमचे पाठीराखे

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी-सुमती जोशी, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, गणेश मनोहर कुलकर्णी, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, प्रशांत पवार, डॉ.मंदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार, चंद्रकांत पाटणकर, सुधीर साठे.**

# पहाडाची ‘विशेष’ हाक!



**राधिका कुंटे**

आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष




*डॉ. श्रुती मोरे–भारद्वाज... आंतरिक उर्मीतून दिव्यांगांचे जगणे सुंदर करणारा प्रवास...*

**स**हवेदनेचा धागा खूप मजबूत होता... प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत जगण्याची उमेद देणाऱ्या पहाडी समूहाशी नातं जोडण्याची आंतरिक ओढ विलक्षण होती... आणि अर्थातच अकल्पित आव्हानांना तोंड देण्याची जबर मानसिक तयारीही होती... या बळावर मुंबईतली एक मुलगी हिमाचल प्रदेशातल्या कुलुमध्ये रुजली... ऑक्युपेशनल थेरपिस्ट या संबंधाने असलेल्या कौशल्याचा वापर करून आव्हानात्मक पहाडी जगण्याला सुंदर बनवण्याचा आटोकाट प्रयत्न करत राहिली... आणि एक दिवस सांफिया फाउंडेशन या संस्थेची संस्थापिका म्हणून देशाच्या राष्ट्रपतींच्या हस्ते तिने पुरस्कारही स्वीकारला... मुंबईशी असलेलं नातं कायम ठेवत कुलुमध्ये राहून दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील लक्षवेधी कामगिरी करणाऱ्या तरुण पिढीच्या शिलेदार डॉ. श्रुती मोरे–भारद्वाज यांच्याशी झालेल्या संवादावर आधारित हा लेख...

अजूनही तिला आठवताहेत ते दिवस... मुंबईतल्या केईएम अर्थात सेठ जी. एस. मेडिकल कॉलेजमधले ऑक्युपेशनल थेरपी शिकतानाचे दिवस... रुग्णाचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करणारी ही थेरपी तिला फार भावली होती. मेडिकल कॉलेजमध्ये तिला रोज दिसत होते, वास्तवातले जगणे. तोपर्यंत तिने गंभीर वळणावरच्या केसेस जवळून पाहिल्या नव्हत्या. पण त्या बघितल्यावर आयुष्याचा हाही एक अपरिहार्य भाग आहे, हे आकळले.

युथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडियाने आयोजलेल्या कुलु ते खारडुंगला ही मोहीम श्रुतीने ८६ मुलींसह यशस्वीपणे पूर्ण केली. एका टप्प्यावर प्रतिकूल हवामानामुळे कुलुच्या बेस कॅम्पमध्ये थांबावे लागले होते. तेव्हा संध्याकाळी मार्केटमध्ये फिरताना पहिल्यांदा तिला ते सेंटर ओझरते दिसले. दुसऱ्या दिवशी ते तिने आत जाऊन पाहिले. नंतर सायकलिंग करताना एका घरातल्या सेरेब्रल पाल्सी झालेल्या मुलीला पाहून त्या सेंटरची आवश्यकता लक्षात आली... प्रवास पूर्ण झाला, तरी सेंटरचा विषय डोक्यात होताच. कालांतराने सायकलिंग निमित्ताने श्रीनगरमधल्या डोंगरदऱ्यांच्या सहवासात ती रमली. निसर्गाच्या सहवासात आपण आपल्याला खरेखुरे सापडतो. एरवी आपल्याला अनेकदा मुखवटे घालून जगावे लागते. निसर्ग सान्निध्यात चांगले-वाईट अशा सीमारेषा नसतातच. त्या महिन्याभराच्या प्रवासात श्रुतीची निसर्गाशी एकतानता साधली गेली.

सायकलिंग करून परतल्यावर तिने सेंटरचा विषय घरी बोलून दाखवला. तिची त्या वेळी अमेरिकेला जाऊन मास्टर्स करण्याच्या इराद्याने अर्जाची प्रक्रिया सुरू होती. तिने सेंटरच्या डॉमनिक डुफायूला अभिनंदनपर ईमेल पाठवला. तिचा रिप्लाय आला. दरम्यान, एंट्रन्सशिप, बाइक-ट्रेकिंगचे प्लॅनिंग, सह्याद्रीतले ट्रेकिंग सुरूच होते. दोन महिन्यांनी डॉमनिकच्या ईमेलमध्ये जॉबविषयी कळले. तिकडे जायचा निर्णय मनाशी पक्का झाल्यावर, श्रुतीने तिची ऑक्युपेशनल थेरपीची पार्श्वभूमी सांगितली. जॉबबद्दल घरी उलटसुलट चर्चा होऊन, अमेरिकेतल्या श्रुतीच्या भावाने कळकळीने समजावल्यावर घरचे तयार झाले. केईएममधली तिची सहा महिन्यांची एंट्रन्सशिप सुरुच होती. ती संपल्यावर जाऊन बघू नि ठरवू, असे ठरले. कुलुमधल्या परिचितांशी संपर्क साधून राहण्याची व्यवस्था केली. दरम्यान, डॉमनिकच्या ईमेलमुळं तो जॉब दुसऱ्यालाच दिला गेल्याचे कळले, तेव्हा ब्रम्हांड आठवले. मात्र, दोन महिन्यांनी डॉमनिकचा श्रुतीला जॉब ऑफर करणारा ईमेल आला. पुन्हा घरच्यांची मनधरणी केली. सुरुवातीला सहा महिन्यांसाठी जाते, असे म्हणताना, आता कुलुला जाऊन जवळपास १४ वर्षं झाली आहेत.

***मन में है विश्वास...***

डॉमनिकने २००९ मध्ये संस्था स्थापन केल्यानंतर हळूहळू सगळा संच जमला. श्रुती ऑक्युपेशनल थेरपिस्ट आणि युनिट इनचार्ज बनली. ती सांगते, ''सुरुवातीला पालक मुलांना घेऊन यायचे. नंतर कम्युनिटी सेंटर सुरू झाले. ठिकठिकाणी अवेअरनेस कॅम्प सुरू केले. निवडक स्थानिक महिलांना प्रशिक्षण दिल्याने त्या महिला सेंटरमध्ये येऊ न शकणाऱ्या मुलांना घरी जाऊन थेरपी देऊ लागल्या. मनालीमधल्या एका शाळेच्या साहाय्याने संस्थेने इंटिग्रेटेड शाळा सुरू केली. तिथे विशेष मुलांना प्रशिक्षण सुरू झाले. जोडीला व्होकेशनल ट्रेनिंगचा प्रकल्पही आकारास येऊ लागला. विशेष मुलांच्या मानसिकतेविषयी स्थानिकांना फारशी माहिती नसल्याने त्याविषयी जागृती करून, त्यांच्या पुनर्वसनाचा विचार करावा लागतो. सुरुवातीला याबाबतीत मुलगे-मुलींमध्ये फरक केला जायचा, आता खूप सकारात्मक बदल होत आहेत.''

द हिमाचल प्रोजेक्ट या संस्थेचे मुख्य सेंटर कुलुमध्ये असल्याने श्रुती दीड वर्षे तिथे राहिली. नंतर लाकडी घरात, पहाडांच्या कुशीत राहण्याचे तिचे स्वप्न मनालीतल्या अलिओ गावातल्या घरामुळे पूर्ण झाले. सुरुवातीला ती पेइंगगेस्ट म्हणून राहिली. पहिले काही आठवडे तिचे आई-वडिलही तिच्यासोबत राहिले. तिला मध्येच अस्वस्थ वाटे, घरची आठवण येई. तेव्हा भाऊ धीर देई. ती हळूहळू सावरु लागे.

दरम्यान, श्रुतीला द अमेरिकन ॲकेडमी ऑफ सेरेब्रल पाल्सी अँड डेव्हलपमेंट मेडिसिनतर्फे आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाल्याने टेक्सासमधल्या परिषदेला हजर राहता आले. ती सांगते, ''एका सत्रामध्ये आम्ही ॲडाप्टेड डिझाइन्सबद्दल बोलत होतो. काहींचे हायटेक डिव्हाइसेसविषयी बोलणे ऐकल्यावर मी विकसनशील देशांमधल्या या संदर्भातल्या परिस्थितीचा मुद्दा मांडला. त्यानंतर एका प्राध्यापकांनी तू या विषयावर पुढच्या वर्षीच्या कॉन्फरन्समध्ये मत मांड असे आवर्जून सांगितले. ही गोष्ट इथेच संपली नाही. माझ्या स्कॉलरशिप मेंटॉरने स्वतःहून पुढाकार घेतला. आम्ही त्या

प्रेझेंटेशनसाठी प्रपोजल पाठवले; ते मंजूरही झाले.''

संस्थेत श्रुतीने आठ वर्ष काम केले. या संस्थेला परदेशी संस्था आणि लोकांचे पाठबळ होते. वैद्यकीय कामापेक्षा प्रशासकीय काम आणखी कसे चांगले करता येईल, याकडे ती लक्ष पुरवत होती. कुलुमधले काही मान्यवर आणि संस्थेने मिळून या संस्थेची अधिकृत नोंदणी केली. त्यामुळे आर्थिक पाठबळ आणखी काही वर्षे मिळणार होते. संस्थेचे काम चांगले चालले होते. श्रुती सांगते की, ''दरम्यान, काही स्थानिक कंपन्यांचे संस्थेच्या कामाकडे लक्ष गेले आणि त्यांच्याशी बोलणी सुरू झाली. मात्र संस्थेच्या कार्यकारणीवर आलेल्या काही नवीन सभासदांनी माझ्यावर दोषारोप केले. माझे वय, अनुभव, स्थानिक नसणे वगैरे मुद्दे मांडले. मग स्थानिक कार्यकारणीने मला संस्थेच्या कामकाजातले लक्ष काढून घेऊन पुन्हा ऑक्युपेशनल थेरपीकडे वळायला सांगितले. माझ्या मनाला ते फारच लागले. या साऱ्यात सहा महिने गेले. माझ्या रोजच्या कामावर याचा परिणाम व्हायला लागला. काम हीच माझी प्रेरणा असल्याने परिस्थिती फारच बिकट झाली. अशात समोर होते, दोन पर्याय. पहिला, ही संस्था सोडून मुंबईला परतून पुनश्च हरी ओम म्हणत सुरूवात करायची. दुसरा होता, कुलुमध्ये राहून स्वतःची संस्था सुरू करायची. मी दुसरा पर्याय निवडला.''

***नवी क्षितिजे***

श्रुतीने गुरूजन, कुटुंबीय, मित्रमंडळी, सहकाऱ्यांशी सल्लामसलत केली. त्या संस्थेत राजीनामा देऊन १ एप्रिल २०१९ रोजी स्वतःची संस्था सुरू केली. आधीच्या संस्थेतले चारजण तिच्यासोबत होते. डॉ. रेखा ठाकूर सहसंस्थापक झाल्या. स्वतःजवळची पुंजी वापरून श्रीगणेशा केला गेला. आधीच्या संस्था मालकांनी त्यांची उरलेली जागा नव्या संस्थेला दिली. आवश्यक उपकरणे आणि वस्तू घेण्यासाठी भोवतालच्या मित्रमंडळींनी पैसै उभे केले. नव्या संस्थेचे नाव स्थानिकांना आपलेसे वाटेल असे द्यायचे ठरले. सांफिया फाऊंडेशन या नावावर शिक्कामोर्तब झाले. सांफिया म्हणजे क्षमता. विशेष मुलांच्या जीवनाला आकार देण्याचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवले.

सांफियामध्ये पहिल्या दिवशी चार मुले आली नि नंतर आणखी येत राहिली. २०२०मध्ये कोविडचे संकट आले. ती सांगते की, ''आधीच्या संस्थेत डोंगरदऱ्यांतील मुलांच्या घरी मी आणि सहकारी डॉक्टर स्थानिक बसने खेळणी आणि वैद्यकीय उपकरणांचे ओझे घेऊन जायचो. तेव्हा डोक्यात आले की, संस्थेची एक बस असती तर... सहकारी म्हणाला की, 'आपण बसमध्येच उपचार देऊ शकतो. अमेरिका-कॅनडामध्ये अशा थेरपी बसेस आहेत.' तेव्हा ती गोष्ट प्रत्यक्षात आली नाही, पण मनात घर करून होती. पहिली संस्था नोंदणीकृत झाल्यावर मी बसच्या डिझाइनचे काम सुरू केले होते. माझ्या मित्राच्या ओळखीमुळे एका कंपनीतील अधिकाऱ्यांची ओळख होऊन सीएसआर फंडाविषयी (सामाजिक उत्तरदायित्व निधी) बोलणे झाले होते. बसची संकल्पना त्यांना आवडल्याने मदत करायचे आश्वासन दिले. ते पूर्णही केले. आमचा प्रस्ताव मान्य झाला. बसमध्ये थेरपी करणे शक्य झाले. सेंटर मध्यवर्ती ठिकाणी असले तरी लांब राहणाऱ्या मुलांसाठी या बस उपयोगी ठरतात. केवळ डोंगराळ भागात जन्म झाला म्हणून मुलांनी आरोग्यसेवेला मुकू नये. त्यांच्या तब्येतीची हेळसांड व्हायला नको, असे आमचे मत आहे.''

सीएसआर फंड देऊ करणाऱ्या कंपनीच्या अति वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संस्थेला भेट दिली. पुढल्या टप्प्यांत अजून दोन बस मिळू शकतील, अशी तजवीज करण्यात आली. तेव्हा दोन बसची व्यवस्था बघण्याइतके बळ सांफियाकडे नव्हते. मग २०२१मध्ये आणखी बस मिळाली. केंद्र सरकारच्या उपक्रमानुसार प्रत्येक जिल्ह्यात एक पुनर्वसन केंद्र असायला पाहिजे. कुलुमध्ये तसे केंद्र असूनही त्यात डॉक्टर्स आणि साधनांचा अभाव होता. महाराष्ट्र, उत्तराखंड आदींमध्ये स्वयंसेवी संस्था आणि सरकारी पुनर्वसन केंद्रांनी एकत्र येऊन हे काम सुरू केले आहे.

योगायोगाने एका वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांपर्यंत समाजमाध्यमाव्दारे संस्थेचे काम पोहोचले. त्यांनी संपर्क साधल्याने संस्थेने जिल्ह्यातील पुनर्वसन केंद्रात सहभागी व्हायचा प्रस्ताव दिला. तो मान्य होऊन जिल्हा रुग्णालयामध्ये चांगला सेटअप करून दिला गेला. २०२२मध्ये सांफियाची टीम तिथे कामाला लागली. या कामात सर्व स्तरांवरील अधिकाऱ्यांचे चांगले सहकार्य लाभले. मूळ संकल्पना आणि ध्येयाचा विचार करून अधिकाऱ्यांनी हा उपक्रम राबवायला मदत केली. शिवाय सांफियाच्या टीमने नेहमीसारखे मन लावून काम केले आणि करत आहे. तिसऱ्या वर्षी केंद्राचे उद्घाटन केले गेले. या केंद्रामुळे कामाचा परीघ विस्तारला. कुलुमध्ये

बव्हंशी लोक सरकारी मदतीवर अवलंबून आहेत. स्थानिकांचा स्वयंसेवी संस्था किंवा खाजगी हॉस्पिटल्सवर तुलनेने कमी विश्वास आहे. मात्र, हॉस्पिटलमध्ये बाळंतपण झाल्यावर लगेच मूल तपासले जात असल्याने फरक पडत आहे. सुरुवातीपासून मुलांवर उपचार करण्यासोबत पालक आणि समाज–व्यवस्थेसह काम करायचे, हे संस्थेने ठरवले होते.

***काळाचे आव्हान मोठे***

श्रुती सांगते की, ''गेल्या १४ वर्षांत लोकांचा दृष्टिकोन बदलतो आहे. पण सगळ्यांमध्ये सजगता आली आहे, असे ठोसपणे म्हणता येणार नाही. एखाद्या कुटुंबात विशेष मूल जन्माला आले, तर सहवेदना असण्यासोबत सजगताही असायला हवी, असे वाटते. हा विशेषपणा कधी अनुवंशिक तर कधी पर्यावरणीय बदलांमुळे होऊ शकतो. तो ठराविक ठिकाणी नव्हे अनेक ठिकाणी आढळत असून, ही संख्या वाढती आहे. इथे, बाळंतपण आणि बालसंगोपनातले काही मुद्दे ठळक जाणवतात. एके काळी दाई बाळंतपण करायची. आता लांबच्या हॉस्पिटलमध्ये बाळंतपणासाठी जावे लागते. त्यामुळे काही वेळा बाळंतपणातली गुंतागुंत वाढते. आता–आतापर्यंत सेरेब्रेल पाल्सी आणि फिजिकल डिसॲबिलिटी असणारी मुले जास्त येत होती. पण गेल्या ४–५ वर्षांत– कोविडनंतर इंटलेक्च्युअल डिसॲबिलिटीज–ऑटिझम, अटेंशन डेफिसिट डिसऑर्डर/हायपर ॲक्टिव्हिटी डिसऑर्डर आदींचे प्रमाण वाढत आहे. मुलांचा आहार, जीवनशैली, स्क्रिन टाइम हे मुद्देही या सगळ्याला हातभार लावत आहेत. मुलांची वाढ मंदावते आहे. या त्रुटींवर सहाव्या वर्षापर्यंत उपाय योजले नाहीत, तर त्याचे मुलाच्या जीवनावर दूरगामी परिणाम होऊ शकतात.''

ऑटिझम आणि हायपर ॲक्टिव्ह डिसऑर्डरच्या केसेसमधले रुग्ण चटकन ओळखू येत नाहीत. पण वैद्यकीय निरीक्षणांती त्यांची मंदावलेली वाढ जाणवते. तिने अशा अनेक मुलांना बघितले आहे. त्यापैकी एकाला ऑटिझम होता. तिने त्याच्यावर चार वर्षे उपचार केले होते. त्याची आणि तिची भावनिक नाळ जोडली गेली. तो सर्वसाधारण मुलांच्या शाळेत जाऊ लागला. त्याच्यात सुधारणा होत गेली आणि तो थेरपीला कमी यायला लागला आणि एक दिवस यायचा थांबला. श्रुती सांगते की, ''वर्षभराने त्याच्या शाळेत आमचा दुसरा एक कार्यक्रम होता. मी त्याला आणि त्याच्या आईला पाहिले. आमची भावनिक नाळ जोडली गेलेली तिला आवडत

### पहाडी महिलांचे स्वातंत्र्य : दृश्य आणि अदृश्य

**पहाडी महिलांकडे बाहेरून पाहिलं, तर त्या खूप सशक्त, कष्टाळू आणि सक्षम वाटतात. शेती, घर, मुलं, पाळीव जनावरं, समाज अशा सगळ्या जबाबदाऱ्या त्या सहज सांभाळतात. पण स्वातंत्र्याचा प्रश्न आला, की तो थोडा गुंतागुंतीचा दिसतो. आर्थिक आणि शारीरिक कष्टात त्या स्वतंत्र वाटतात, पण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अजूनही कुटुंब आणि समाजाच्या चौकटींमध्ये राहावं लागतं. म्हणजेच त्यांचं 'functional independence' जास्त आहे, पण 'decision-making autonomy' अजून वाढण्याची गरज आहे.**

### स्त्री चळवळींकडे बघण्याची दृष्टी

**शहरी स्त्रीवादी विमर्श आणि पहाडी महिलांचा दृष्टिकोन यात खूप फरक जाणवतो. इथे स्त्री चळवळी आक्रमक किंवा घोषणाबाजी स्वरूपात दिसत नाहीत. उलट, चिकाटी आणि जिद्दीने समुदायात सहकार्याचा पूल बांधण्याची आणि शांतपणे बदल घडवून आणण्याची ताकद दिसते. निश्चितच पहाडी महिलांनी आपली जागा निर्माण केली आहे, पण ते संघर्षापेक्षा (bonforntation) पेक्षा सहकार्याच्या (bollaboration) माध्यमातून जास्त घडताना दिसतं.**

### पहाडी महिलांचे 'स्व' चे भान

**माझ्या अनुभवात, पहाडी महिलांचं 'स्व' त्यांच्या भूमिकांशी जोडलेलं असतं, आई, पत्नी, शेतकरी, समुदायातील सदस्य आदी. परंतु वैयक्तिक स्वप्नं आणि स्व–अभिव्यक्तीच्या संदर्भाने त्या कधी कधी मागे पडतात. पण जेव्हा त्यांना सुरक्षित जागा, संवाद किंवा कौशल्य विकासाची संधी मिळते, तेव्हा त्यांच्यातील आत्मविश्वास आणि स्वतःचं भान खूप सुंदरपणे पुढे येतं. विशेषतः विशेष गरजा असलेल्या मुलांच्या आयांमध्ये मी प्रचंड सहनशक्ती आणि भावनिक बुद्धिमत्ता पाहिली आहे. सांफिया फाउंडेशनमध्ये काम करताना एक महिला शिलेदार आणि दिव्यांग मुलांची आई म्हणून मला जाणवतं, की एम्पॉवर्नमेंट म्हणजे फक्त बाहेरून मदत देणं नाही, तर महिलांना स्वतःची ताकद ओळखायला मदत करणं आहे. पहाडात महिलांकडे चिकाटी आधीच आहे– गरज आहे ती, ओळख, म्हणणं आणि स्व–मूल्य वाढवण्याची.**

**माझ्यादृष्टीने पहाडी महिलांनी शिकवलेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे, Strength is often Silent. त्या मोठ्या घोषणांशिवाय रोज बदल घडवताना मला दिसतात.**

**मी मुंबईत वाढले. जिथे शिक्षण, करीअर, स्वातंत्र्य आणि महिला नेतृत्वाची अनेक उदाहरणं दिसतात. पण कुलुमध्ये राहायला आणि काम करायला आल्यानंतर मला एक वेगळेच वास्तव दिसले. ते म्हणजे, इथल्या स्थानिक समुदायांमध्ये उच्च शिक्षित,**

निर्णय घेणाऱ्या पदांवर असलेल्या किंवा संस्थात्मक नेतृत्वात दिसणाऱ्या महिला रोल मॉडेल्स तुलनेने फार कमी आहेत. त्यामुळे अनेक महिलांसाठी 'मीही करू शकते' ही कल्पना अजूनही थोडी दूरची वाटते.

मुळात, पहाडी महिला अत्यंत सक्षम आहेत. त्या शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूप मजबूतही आहेत. पण त्यांनी आयुष्यभर भूमिका निभावल्या आहेत, निवडी केलेल्या नाहीत. माझ्यासारखी बाहेरून आलेली महिला, जी संस्था चालवते, निर्णय घेते आणि स्वतःची ओळख जपते, हे त्यांच्यासाठी नवीन मॉडेल ठरतं.

### 'स्व' चं भान–शोध सुरू आहे

अनेक महिलांची स्व–ओळख अजूनही कुटुंबाशी जोडलेली आहे. पण जेव्हा त्या सांफिया मध्ये येतात, ट्रेनिंग थेरपी सेशन्स किंवा किंवा पेरेंट्स सपोर्ट ग्रुपमध्ये मिसळतात, तेव्हा त्या स्वतःला वेगळ्या नजरेने पाहायला लागतात. त्यांना कळायला लागतं, की त्या फक्त केअर गिव्हर नाहीत, तर डिसिजन मेकर्स, लर्नर्स आणि लीडर देखील होऊ शकतात.

### स्त्री चळवळींकडे पाहण्याची दृष्टी

इथे फेमिनिस्ट मुव्हमेंट ही शब्दांत नाही, तर कृतीत दिसते. इथल्या महिलांनी आवाज चढवण्यापेक्षा शांतपणे काम करून बदल घडवण्याची पद्धत स्वीकारली आहे. त्यामुळे लिडरशीप म्हणजे संघर्ष नाही, तर समुदायाला सोबत घेऊन जाणं आहे, हे मला इथल्या महिलांकडून शिकायला मिळालं आहे.

### महिला शिलेदार म्हणून माझा अनुभव

मुंबईतून आलेली, शिक्षित आणि संस्था उभारणारी महिला म्हणून मला जाणवतं की, माझं अस्तित्वच हेच इथे एक स्टेटमेंट–विधान आहे. अनेकदा स्थानिक महिलांना पहिल्यांदा अशी महिला दिसते, जी स्वतःचा आवाज वापरते, मोठी स्वप्नं पाहते आणि व्यावसायिक अवकाशामध्ये आत्मविश्वासाने उभी राहते. त्यामुळे लीडरशीप म्हणजे फक्त संस्था चालवणं नाही, तर इतर महिलांना त्यांच्या क्षमता नि शक्यता दिसायला मदत करणं आहे. माझ्यासाठी पहाडी महिलांबरोबर काम करणं म्हणजे त्यांचं सशक्तीकरण करणं नाही, तर त्यांच्या आत आधीपासून असलेल्या शक्तीला ओळख देणं आहे. इथे रोल मॉडेल होणं, म्हणजे इतरांना वाट सापडत राहावी यासाठी ध्येय उराशी बाळगत पुढे चालत राहणं आहे...

नव्हते... हे मला कळले होते. तेव्हा आम्ही एकमेकींना अभिवादन केले. मला तर त्याला उचलून घ्यायचे होते. मायेने डोक्यावर हात फिरवायचा होता. पण मी स्वतःला थांबवले. पण त्याच्या आईला माझ्या भावना कळल्या असाव्यात. आई–मुलांनी एकत्र नृत्य करावे, अशी घोषणा झाली. त्याची आई म्हणाली, 'आप को अपने लडके को लेके स्टेज पे नहीं जाना क्या...' मी तिला एक मिठी मारली. पटकन त्याला उचलून घेऊन गेले.

ऑटिस्टिक मुलांना मानवी भावना समजायला कठीण जातात. या मुलाचे अभिनय कौशल्य त्याच्या वडिलांनी ओळखले होते. त्यांनी त्याच्या पॅशनला वाव दिला. आनंदाची गोष्ट म्हणजे, त्याने सनी देओलच्या पल पल दिल के पास या चित्रपटात सनीच्या बालपणीची चांगली भूमिका साकारली आहे. आता तो आठवीत आहे. अधूनमधून मला भेटतो. योग्य उपचार, पालकांची भूमिका आणि सामाजिक स्वीकारामुळे रूग्णांच्या जीवनाला कशी ऊर्जा मिळते, याचे हे एक चांगले उदाहरण आहे. आता माझे ज्युनिअर्सही त्यांच्या रूग्णांसह अटॅच होताना पाहते आहे.''

सध्या सांफियामध्ये ३२१ उपचार घेणारी रूग्ण मुले दाखल असून एकूण १४०० मुलांची नोंद झाली आहे. हा कामाचा आवाका पाहता राष्ट्रीय पुरस्कारासाठी पात्र ठरू, असे संस्थेतील सगळ्यांना मनोमन वाटत होते. वेगळ्या बाजाच्या संशोधनासाठी राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये एक कॅटॅगरी असते. म्हणून श्रुती थेरपी ऑन व्हिल्स बससाठी गेल्या चार वर्षांपासून अर्ज करते आहे. मात्र संस्थेच्या कामाची ओळख असलेल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांने बेस्ट रिहॅबिलिटेशन प्रोफेशनल इंडिव्हिज्युअल कॅटॅगिरीमध्ये अर्ज भरण्यासाठी खूप आग्रह केला. ते म्हणाले की, 'संस्था किंवा बसला हा पुरस्कार पुन्हा कधीही मिळू शकतो, पण तू वैयक्तिक पुरस्कारासाठी अर्ज करच. तुझा आदर्श ठेवून, प्रेरणा घेऊन पुढचे डॉक्टर्स तयार होतील.' तिला ते मनापासून पटले नव्हते. पण शेवटी सारासार विचार करून तिने अर्ज केला.

***क्षण आला सन्मानाचा...***

आणि श्रुतीची निवड झाल्याची बातमी कळली... काही क्षण विश्वास बसला नव्हता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मान होणे ही मोठी गोष्ट होती. ती सांगते की, ''मी बससाठी अर्ज करायचे, तेव्हा मनात काहीएक कल्पना करायचे. आधीच्या पुरस्कारांचे व्हिडिओ बघायचे. त्यातही २०१८च्या




*दिव्यांगांनी आपल्यापर्यंत पोहोचण्याऐवजी आपण त्यांच्यापर्यंत पोहोचून दिलासा द्यावा, या उद्देशाने 'सांफिया'चे सुसज्ज वाहनातून सुयोग्य मार्गदर्शन सुरु झाले... या उपक्रमाची दखल राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देऊन घेतली गेली...*

कार्यक्रमाचे निवेदन मला खूप आवडायचे. कोशिश करनेवालों की हार नहीं होती, या ओळींनी २०१८मधल्या त्या कार्यक्रमाची सुरुवात झाली होती. यंदाचे पुरस्कार मिळण्याआधी नेहमीप्रमाणे तालीम घेतली गेल्याने प्रत्यक्षात एक सेकंदही कुणाला उशीर झाला नाही. एकदम परफेक्शन होते. आमच्या कार्यक्रमात योगायोगाने त्याच निवेदिका होत्या. त्याही एके काळी ऑक्युपेशनल थेरपिस्ट होत्या. त्यांनी २०१८चीच संहिता २०२५साठी निवडली होती. त्यांचे निवेदन ऐकताना मी स्वप्नात तर नाही ना, असे वाटून गेले. मी पहिल्यांदा इतक्या मोठ्या कार्यक्रमात सहभागी होत होते. अधिकाऱ्यांनी ३२ पुरस्कारार्थी आणि त्यांच्या कुटुंबाचे खूप बारीकसारीक तपशील लक्षात ठेवले होते. अतिशय प्रेमादर मी तेव्हा अनुभवला. टिपिकल सरकारी कारभार पुष्कळच बदललेला दिसला. अशा प्रकारच्या दक्ष आणि कर्तव्यकठोर अधिकाऱ्यांमुळे आपला प्रशासनिक कारभार सुरळीत सुरू आहे. आम्हा पुरस्कारार्थींची एकमेकांशी तोंडओळख झाली. विविध क्षेत्रांतल्या या मान्यवरांचा एक व्हॉट्सॲप ग्रुप असून त्यावर विचारांची देवघेव सुरू असते.''

श्रुती सांगते की, ''पुरस्कार मिळाल्यानंतर कुलुपासून ते महाराष्ट्रातल्या माझ्या गावापर्यंत अनेक ठिकाणी माझे सत्कार झाले आणि अजूनही होत आहेत. केईएममध्ये एका विभागाचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले. तिथे काही नव्याने ओळखी झाल्या. त्यांचाही मदतीचा हात पुढे येऊ घातला आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पर्सन्स विथ फिजिकल डिसॲबिलिटीजचे विद्यार्थी सांफियामध्ये प्रशिक्षणासाठी यायला लागले आहेत. माझ्या आणि सांफियाच्या वाटचालीतला हा एक टप्पा आहे. इथून पुढे खूप मोठी मजल गाठायची आहे. कुलुखेरीज जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश वगैरे ठिकाणी काम करायचे आहे. त्यासाठी चांगली टीम बांधणी, नेतृत्व गुण वाढवणे, सांफियाचा प्रशासनिक कारभार अधिक सुरळीत करणे, सह्याद्रीच्या कडेकपारीतील लोकांसाठी काही काम करता येईल का, अशा अनेक मुद्द्यांवर विचारमंथन सुरू आहे. अर्थात, आयुष्य कधीच सोप्पे नसते. तरीही कोशिश करनेवालों की हार नहीं होती... हे आम्हाला पक्के माहिती आहे.''

**राधिका कुंटे या मुंबईस्थित स्वतंत्र पत्रकार आहेत. समाज, संस्कृती आणि कला हे त्यांच्या अभ्यासाचे विषय आहेत. संपर्क: ९८२०० ८९३७६**

**जिज्ञासूंसाठी डॉ. श्रुती मोरे-भारद्वाज यांचा संपर्क तपशील पुढीलप्रमाणे : आश चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटर, रामबाग, आखाडा बाजार, कुलु- हिमाचल प्रदेश, पिन कोड नंबर- १७५१०१, संपर्क: ८६२६९ ८०७७६**

# मुक्तीचे जीवनगाणे



सायली परांजपे

आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष



*ब्रिजेट बार्दो*



*डॉ. रुथ लॉरेन्स*

**डॉ.** रुथ लॉरेन्स आणि ब्रिजेट बार्दो. जागतिक पटलावर आपापल्या क्षेत्रांत ठसा उमटवणाऱ्या या दोन कर्तृत्ववान स्त्रिया. अलीकडेच काळाच्या पडद्याआड गेल्या. भिन्न स्वभाव प्रकृतीच्या असलेल्या या दोघींपैकी एकीने क्षमता आणि ताकदीच्या बळावर ग्लॅमरच्या जगात धुमाकूळ घातला, दुसरीने स्तनपानाचं महत्त्व पाश्चात्य जगाला समजावून सांगण्यासाठी अथक परिश्रम घेतले. स्त्रीवादी विचारांच्या चौकटीत त्यांनी रुढार्थाने आपल्या आयुष्याला दिशा दिली नाही, तरीही विचारांनी, कृतीने मुक्त असलेली एक स्त्री व्यवस्थेच्या विरोधात जाऊन जगात काय बदल घडवू शकते, याचा वस्तुपाठ मात्र नक्कीच घालून दिला. त्यांच्या बहुरंगी आयुष्याचा आलेख मांडणारा हा दुपेडी लेख…

**२०२५** सालच्या अखेरच्या दोन महिन्यात जगभरातल्या माध्यमांना दोन स्त्रियांना श्रद्धांजली वाहणारे लेख प्रसिद्ध करावे लागले. त्यातल्या एक होत्या, स्तनपानाच्या खंद्या समर्थक प्रख्यात बालरोगतज्ज्ञ डॉ. रुथ लॉरेन्स. रुथ यांनी वयाची शंभरी पार करून २०२५ मधल्या ऑक्टोबर महिन्यात या जगाचा निरोप घेतला, तर सुरुवातीच्या काळात सेक्स सिम्बॉल म्हणून पण नंतरच्या आयुष्यात प्राणीहक्कांसाठी केलेल्या कामामुळे प्रसिद्धीस पावलेल्या जगप्रसिद्ध फ्रेंच मॉडेल-अभिनेत्री ब्रिजेट बार्दो २८ डिसेंबरला वयाच्या ९१व्या वर्षी काळाच्या पडद्याआड गेल्या.

या दोघीही पाश्चिमात्य जगतातल्या असल्या तरी देश आणि खंडही वेगवेगळे. एक अमेरिकन, तर दुसरी फ्रेंच. त्यांची आयुष्यं वरकरणी दोन ध्रुवांवरची भासत असली तरी आपापल्या परीने मुक्त स्त्रीचे जीवनगाणे रचण्यातले त्यांच्यातले साम्य त्यांना जोडणारे ठरले. रुथ आणि ब्रिजेट या दोघींच्या वयात सुमारे नऊ वर्षांचं अंतर असलं आणि कार्याचं स्वरुप भिन्न असली, तरी दोघींची कारकीर्द सुरू होण्याचा कालखंड एकच होता. रुथ यांनी १९४९ मध्ये वैद्यकीय पदवी प्राप्त केली, तर ब्रिजेट यांनी याच वर्षी एल आणि ले जार्दी दे मोद्स या मासिकांसाठी 'ज्युनियर मॉडेल' म्हणून काम सुरू केलं.

रुथ यांचा जन्म १९२५ साली न्यूयॉर्कमध्ये झाला. त्यांची आई लॉरेटा अँडरसन यांनी बाळंत झाल्यानंतर रुथ यांना तर दूध पाजलंच, शिवाय हॉस्पिटलमधल्या पुरेसं दूध न येणाऱ्या मातांच्या बाळांनाही दूध पाजलं होतं. नवजात अर्भकासाठी स्तनपानाच्या महत्त्वाचं बाळकडू रुथ यांना तिथूनच मिळालं असावं. रुथ दहा वर्षांच्या असताना त्यांच्या वडलांचा कार अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या बालपणाबद्दल फार काही वाचायला मिळत नसलं, तरी ते अगदी सुरळीत नसणार हे नक्की. या उलट ब्रिजेट बार्दो यांचं बालपण वैभवात गेलं. वडील इंजिनिअर होते, पॅरिसमध्ये त्यांचे अनेक कारखाने होते. घरातलं वातावरण कडक शिस्तीचं होतं. अगदी घरातही शिष्टाचारांचं काटेकोर पालन करण्याबाबत वडील आग्रही होते, ब्रिजेट आणि त्यांच्या धाकट्या बहिणीचे मित्रमैत्रिणी कसे असावेत, याबद्दल आईदेखील चिकित्सक होती. त्यामुळेच ब्रिजेट यांना लहानपणी फारशा मित्रमैत्रिणी नव्हत्या. ब्रिजेट आणि त्यांच्या बहिणीने लहानपणी खेळताखेळता आईवडिलांची आवडती फुलदाणी फोडली म्हणून, वडलांनी दोघींना वीस-वीस फटके मारल्याच्या दुखऱ्या आठवणीचा सल ब्रिजेट यांच्या मनात दीर्घकाळ होता. एवढंच नाही, तर शिक्षा म्हणून आईवडलांनी दोघींना पुढचे काही दिवस अनोळखी व्यक्तीप्रमाणे वागवलं होतं, 'वुज' हे फ्रेंच भाषेत अपरिचितांसाठी वापरलं जाणारं आदरार्थी संबोधन त्यांनी आईवडलांना वापरावं असं फर्मावलं होतं. ब्रिजेट यांच्या पुढच्या आयुष्यातल्या बंडखोरीची बिजं बहुदा या काळातच पेरली गेली होती.

***संशोधन आणि 'स्व'च्या शोधातली भरारी***

डॉ. रुथ लॉरेन्स यांचं अॅकॅडेमिक करिअर असामान्य होतं. येल युनिव्हर्सिटीने इंटर्नशिप दिलेल्या रुथ या पहिल्या स्त्री. नंतर तिथेच पेडिॲट्रिक्समध्ये रेसिडेन्सी पूर्ण केल्यानंतर १९५२ मध्ये न्यूयॉर्कमधल्या युनिव्हर्सिटी ऑफ रॉचेस्टर मेडिकल सेंटरमध्ये अध्यापनासाठी निवड झालेल्या पहिल्या काही स्त्रियांपैकी त्या एक होत्या. रुथ यांनी त्यांची सात दशकांची दीर्घ कारकीर्द इथेच घडवली. विषचिकित्सा (टॉक्सिकोलॉजी) आणि स्तनपान वैद्यक (लॅक्टेशन मेडिसिन) या दोन विषयांत त्यांनी सखोल संशोधन केलं.

दुसरं महायुद्ध पेटलेलं असताना रुथ कॉलेजमध्ये शिकत होत्या, तर ब्रिजेट शाळेत. ब्रिजेट यांच्या फ्रान्सचा ताबा नाझी जर्मनीने घेतल्याच्या काळात घराबाहेर पडण्यावर निर्बंध असल्याने ब्रिजेट यांना घरात रेकॉर्ड्सवर नृत्य करण्याचा छंद लागला. बॅले नृत्यात कारकीर्द घडवण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचा शोध त्यांच्या आईला याच काळात लागला. नंतर घराजवळच्या खासगी कॅथलिक शाळेत शिकत असतानाच ब्रिजेट स्थानिक स्टुडियोत नृत्याचे धडेही घेत होत्या. मासिकांसाठी मॉडेलिंग करण्याला मात्र आईवडलांचा ठाम विरोध होता. अर्थात ब्रिजेट यांनी तो जुमानला नाही. १९५०मध्ये एला मासिकाच्या मुखपृष्ठावर ब्रिजेट यांचा फोटो झळकल्यानंतर अभिनयाचे प्रस्तावही येऊ लागले आणि त्यांची अभिनय कारकीर्द सुरू झाली.

वैद्यकीय शिक्षणातले सहाध्यायी बॉब लॉरेन्स यांच्याशी रुथ यांनी १९५० मध्ये लग्नगाठ बांधली. हे नातं तब्बल ५५ वर्षांनी संपुष्टात आलं, ते बॉब यांच्या मृत्यूमुळे. ब्रिजेट यांनी १९५२ मध्ये वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी त्या काळात सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करणाऱ्या रॉजर वादीम यांच्याशी लग्न केलं. हे लग्न फार काळ टिकलं नाही आणि त्यानंतरची ब्रिजेट

यांची आणखी दोन लग्नंही अल्पायुषीच ठरली. याउपर आपली सतरा प्रेमप्रकरणं झाल्याचं त्यांनी स्वत:च एका मुलाखतीत नमूद केलं होतं. ब्रिजेट यांच्या मते, जगण्यात उत्कटता खूप महत्त्वाची होती. उत्कटता संपली म्हणजे त्यांना नात्यातून बाहेर पडण्याची इच्छा व्हायची. या इच्छेकडे त्यांनी दुर्लक्ष केलं नाही. अर्थात १९९२ साली केलेलं चौथं लग्न दीर्घकाळ टिकलं. त्यापूर्वी दुसरे पती जॅकस शॅरिअर यांच्यापासून ब्रिजेट यांना निकोलस नावाचा एक मुलगा झाला होता.

***चौकटी मोडणाऱ्या दोघी***

येल युनिव्हर्सिटीत इंटर्नशिप आणि नंतर रेसिडेन्सी करत असताना रुथ यांना पेडिॲट्रिक क्षेत्रातल्या अनेक तज्ज्ञांचं मार्गदर्शन लाभलं. या काळातच रुथ यांना 'रूमिंग–इन' अर्थात बाळ जन्मल्यानंतर नवमातेला आणि बाळाला एकाच खोलीत ठेवून स्तनपान देण्याच्या संकल्पनेविषयी अधिक जाणून घेण्याची संधी मिळाली. त्या काळात नवजात अर्भकांना फॉर्म्युला अर्थात दुधाला पर्याय असणारं मिश्रण पाजणं अत्यंत लोकप्रिय आणि रुढ झालेलं असूनही, न्यू हेवनमधल्या रुग्णालयांमध्ये 'रूमिंग–इन' पद्धत वापरली जात होती. रेसिडेन्सी करत असतानाच स्वत:च्या पहिल्या मुलाला स्तनपान करणाऱ्या रुथ यांनी स्वानुभवातून यातली आव्हानं समजून घेतली आणि पुढे रोचेस्टरमध्ये गेल्यानंतरही त्या लॅक्टेशन मेडिसिन या विषयावर संशोधन करत राहिल्या.

मातेचं दूध हे निसर्गाने नवजाताला दिलेलं संरक्षण आहे, त्यापासून त्याला वंचित ठेवलं जाऊ नये, या भूमिकेतून त्या कार्यरत राहिल्या. नवजात अर्भकाला आईसोबत ठेवणं किंवा फॉर्म्युलाऐवजी स्तनपानाला प्राधान्य देणं यात वेगळं काय आहे, असा प्रश्न भारतात विचारला जाऊ शकतो. मात्र, रुथ यांचं काम केवळ स्तनपानाच्या प्रसारापुरतं मर्यादित नव्हतं. मुळात आईने बाळाला दूध पाजण्यात डॉक्टरचा सहभाग आवश्यक आहे, ही संकल्पनाच त्या काळात अमेरिकेत नवीन होती. बाळाने स्तनपान करण्यात (किंवा न करण्यात) डॉक्टरांचा किंवा औषधांचा सहभाग शून्य होता. स्तनपान सहज होत असेल तर करायचं, पण ते होत नसेल तर फॉर्म्युलाचा पर्याय आहेच अशी एकंदर धारणा होती. अनेकदा स्तनपानासाठी घ्यावे लागणारे कष्ट टाळण्यासाठीही फॉर्म्युलाचा पर्याय स्वीकारला जात होता. या पार्श्वभूमीवर, स्तनपानात आव्हानं येत असतील तर त्यावर मात करण्यात डॉक्टर, औषधं मदत करू शकतात, या नवीन विचाराचा पाया रुथ यांच्या कामाने घातला गेला.

***कारकीर्दीला बहर***

नवजातासाठी स्तनपान किती महत्त्वाचं आहे, हे जगाला दाखवून देण्याचा प्रयत्न रूथ करत होत्या, त्याच काळात ब्रिजेट अभिनय क्षेत्रात पाय रोवत होत्या. मासिकांसाठी मॉडेलिंग आणि काही चित्रपटांत छोट्या भूमिका केल्यानंतर ब्रिजेट यांच्या वाट्याला प्रमुख भूमिका आली, ती १९५४ मध्ये. इटालियन, फ्रेंच भाषांतल्या चित्रपटांत अभिनय केल्यानंतर त्यांना इंग्रजी चित्रपटांतूनही भूमिका मिळाल्या होत्या, काही हॉलिवूडपटांतही त्या चमकल्या होत्या. १९५६ साली प्रदर्शित झालेल्या 'अँड गॉड क्रिएटेड वुमन' या चित्रपटाने ब्रिजेट यांना केवळ फ्रान्समध्येच नव्हे, तर जगभरात ओळख मिळवून दिली. या चित्रपटातल्या कामुक व्यक्तिरेखेमुळे ब्रिजेट यांच्या नावापुढे 'सेक्स किट्न' ही काहीशी बदनामीकारक उपाधी चिकटली खरी, पण त्यांना 'स्टारडम' प्राप्त झाले तेही याच चित्रपटामुळे. पुढे १९५८ मध्ये त्या फ्रान्समधल्या सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्रीही ठरल्या. ब्रिजेट यांनी पुढे काही विनोदी चित्रपटांतही भूमिका केल्या. त्यातला 'बेबे गोज टू वॉर' हा दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरचा विनोदी चित्रपट खूपच गाजला. 'द ट्रुथ' हा कोर्टरूम ड्रामाही यशस्वी ठरला. ब्रिजेट यांना याच चित्रपटासाठी डेव्हिड दी दोनातेलो पुरस्कारही प्राप्त झाला. फ्रेंच चित्रपटांपुरतं मर्यादित न राहता त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपटांमध्येही भूमिका केल्या. अभिनयाच्या क्षेत्रात यशाची शिखरं पार करत असतानाच ब्रिजेट यांना संगीताचं क्षेत्रही खुणावत होतं. १९६० आणि १९७०च्या दशकात त्यांनी गायलेली अनेक गाणी तुफान लोकप्रिय ठरली. उत्कटता (पॅशन) हा ब्रिजेट यांच्या जगण्याचा पाया असल्यामुळे असेल कदाचित, पण अभिनयात उत्कटता वाटेनाशी झाली, तेव्हा निवृत्ती घेण्याचं त्यांनी ठरवलं. त्यानुसार १९७३ मध्ये त्यांनी अभिनयाला रामराम ठोकला. मात्र त्यांच्या स्वभावातली बंडखोरी लोपली नाही. अभिनय सोडल्याच्या पुढल्याच वर्षी त्यांनी प्लेबॉय मासिकासाठी 'न्यूड फोटोशूट' करून चाळिसावा वाढदिवस साजरा केला.

***ध्येयनिष्ठ वाटचाल***

ब्रिजेट मॉडेलिंग, अभिनय, गायन आदी विविध कलांच्या क्षेत्रात स्वत:ला आजमावत असतानाच्या काळात रुथ यांनी




*रुथ लॉरेन्स आणि बार्दो यांच्या आयुष्याच्या मिळकतीचा लेखाजोखा मांडणारी ही मार्गदर्शक पुस्तके...*

स्तनपानावरच्या संशोधनावर लक्ष केंद्रित केलं होतं. अनेक वर्षांचं संशोधन, अभ्यास, अध्ययन आणि आई म्हणून घेतलेले प्रत्यक्ष अनुभव यांचा परिपाक म्हणून १९७९ साली 'ब्रेस्टफीडिंग: अ गाइड फॉर द मेडिकल प्रोफेशन' हे त्यांचं पुस्तक प्रकाशित झालं. हे पुस्तक आजही डॉक्टरांसाठी स्तनपान या विषयावरच्या संदर्भग्रंथाची मोलाची भूमिका बजावत आहे. या पुस्तकाची नववी आवृत्ती सध्या बाजारात आहे, अनेक भाषांमध्ये या पुस्तकाचं भाषांतर झालं आहे. स्तनपान या विषयावर रुथ यांनी दोनशेंहून अधिक शोधनिबंध लिहिले आहे. १९८५ मध्ये त्यांनी रोचेस्टर युनिव्हर्सिटीत ब्रेस्टफीडिंग अँड ह्युमन लॅक्टेशन स्टडी सेंटर स्थापन केलं आणि त्याच्या संचालक म्हणून त्या काम करू लागल्या. रॉचेस्टरमधले पहिले काही नवजात अर्भक आणि बाल अतिदक्षता विभाग सुरू करण्यात रूथ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेतही त्या सातत्याने सल्लागार म्हणून काम करत होत्या. नवजात अर्भकांच्या पोषणाबाबत राष्ट्रीय स्तरावर तयार होणाऱ्या धोरणांमध्ये त्यांचा सल्ला घेतला जात होता. अकॅडेमी ऑफ ब्रेस्टफीडिंग मेडिसिनच्या स्थापनेसाठी रुथ यांनी १९९६-९७ मध्ये पुढाकार घेतला, नंतर २००५ मध्ये यासंदर्भातलं मासिक काढण्यातही त्यांनी हातभार लावला. २०१४ साली सुरू करण्यात आलेल्या लॅक्टेशन मेडिसिन क्षेत्रातल्या फेलोशिप कार्यक्रमासाठी त्यांनी सहाय्य केलं होतं. त्या २०२० साली एमेरिटा प्रोफेसर ऑफ पेडिॲट्रिक्स या पदावरून निवृत्त झाल्या होत्या. मात्र पायाला भिंगरी लागल्यागत व्याख्यानं देण्यासाठी ठिकठिकाणी जात राहिल्या.

अभिनय, मॉडेलिंग, गायन यांसारखी वलयांकित क्षेत्रं गाजवल्यानंतर ब्रिजेट यांनी एका वेगळ्याच क्षेत्रात प्रवेश केला. ते क्षेत्र होतं प्राणीहक्क संरक्षणाचं. ग्लॅमरस क्षेत्रांत कमावलेलं नाव ब्रिजेट यांनी प्राणीहक्कांबाबत जागरूकता वाढवण्याच्या कामासाठी उपयोगात आणलं. सी शेफर्ड कंझर्वेशन सोसायटी स्थापन करणारे कॅनेडिअन-अमेरिकी पर्यावरणवादी पॉल वॉटसन यांच्या संपर्कात ब्रिजेट आल्या. कॅनडातल्या सील शिकारीविरोधात वॉटसन यांनी सुरू केलेल्या चळवळीत ब्रिजेट सहभागी झाल्या. पुढे १९८६ मध्ये त्यांनी स्वत: प्राण्यांच्या कल्याणासाठी तसंच संरक्षणासाठी ब्रिजेट बार्दो फाउंडेशनची स्थापना केली. त्या स्वत: पूर्णपणे शाकाहारी झाल्या. या फाउंडेशनचा खर्च चालवण्यासाठी त्यांनी दागिने आणि स्वत:च्या वस्तूंचा लिलाव करून तीस लाख फ्रँक एवढी रक्कम उभी केली. घोड्याचे मांस कुणीही खाऊ नये असं आवाहन टीव्हीवरून केल्यामुळे ब्रिजेट यांना ठार मारण्याच्या धमक्याही आल्या, पण त्या मागे हटल्या नाहीत. फ्रान्ससोबतच चीन, डेन्मार्क आदी देशांतील प्राणीहत्यांचा निषेध त्यांनी त्या त्या देशांतल्या राष्ट्रप्रमुखांना पत्रं लिहून केला. रोमानियात भटक्या कुत्र्यांची हत्या होऊ नये म्हणून, त्यांनी मोठ्या देणग्या दिल्या. भारतातल्या बोधगया इथल्या प्राण्यांच्या कल्याणाची जबाबदारी ब्रिजेट यांनी अनेक वर्षं घेतली होती. ऑस्ट्रेलियातले राजकीय नेते ग्रेग हण्ट यांच्या २० लाख मांजरी मारून टाकण्याच्या योजनेचा निषेध ब्रिजेट यांनी २०१५ मध्ये पत्राद्वारे केला होता. या शिरकाणामुळे मांजरींच्या काही प्रजाती नामशेष होण्याचा धोका होता.

रुथ यांनी स्वत:च्या नऊ मुलांना स्तनपान तर केलंच, शिवाय त्यांच्या सगळ्या जबाबदाऱ्या निभावल्या. मुलांचे केस विंचरून देण्यापासून शाळेतल्या पालकसभांना उपस्थित राहण्यापर्यंत सगळं काही केलं. दुसऱ्या बाजूला ब्रिजेट यांनी मात्र आपल्या एकुलत्या मुलाला अंगावर पाजायला नकार दिला. हा मुलगा म्हणजे अवघड जागचं दुखणं आहे, यापेक्षा कुत्र्याला जन्म दिला असता, तर बरं झालं असतं असं त्या म्हणायच्या. परिणामी मुलगा कायमचा दुरावला. रुथ यांच्या तुलनेतली वर्तन ही विसंगती, लक्ष वेधून घेणारी असली तरीही, दीर्घायुष्यं आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत कार्यरत राहणं हा या दोघींच्या आयुष्यातला समान धागा म्हणता येईल.

***संगती–विसंगती***

रुथ यांनी नऊ मुलं सांभाळून स्तनपान वैद्यकाच्या क्षेत्रात खोलवर जाऊन अभ्यास केला, तरी त्यांच्या घरातलं वातावरण पुराणमतवादी वळणाचं होतं. ‘जोवर घरं नीटनेटकी आहेत, मुलांच्या अंगावर चांगले कपडे आहेत अन् ती शाळेत जात आहेत आणि टेबलावर जेवण वाढलेलं आहे, तोवर तुला जे हवं ते कर’ असं सशर्त स्वातंत्र्य बॉब यांनी रुथ यांना दिलं होतं. त्याबद्दल त्यांची काही तक्रार नव्हती. रुथ यांनी स्तनपानाकडे कायम बाळाच्या पोषणासाठी आवश्यक नैसर्गिक घटक म्हणून बघितलं. या नवजात बाळाला दूध पाजणं, हे आईचं कर्तव्यच आहे किंवा आधुनिक स्त्रिया स्तनपानाच्या त्रासातून सुटका मिळवण्यासाठी फॉर्म्युला फीडिंगचा पर्याय स्वीकारत आहेत, असे अतिरेकी विचार त्यांनी कधीच मांडले नाहीत. तरीही स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वर्तणुकीबाबत त्यांची काही तक्रार नसावी. व्हेटिकनचे पोप जॉन पॉल यांचं भाषण ऐकायला रुथ गेल्या असताना, भाषणानंतर पोप यांनी रुथ यांचे पती बॉब (ते भूलतज्ज्ञ होते) यांचे स्तनपानासंदर्भात केलेल्या कामाबद्दल आभार मानले आणि नंतर रुथ यांच्याशी केवळ हस्तांदोलन केलं. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरची रेषही हलली नाही अशी आठवण त्यांची मुलगी सांगते.

मुलीच्या मते, श्रेय कुणाला मिळतं हे तिच्यासाठी महत्त्वाचं नव्हतंच, स्तनपानाचं महत्त्व जागतिक स्तरावर पोहोचल्याचाच आनंद तिला जास्त होता. स्त्रीवादावरच्या वादात त्या कधीच पडल्या नाहीत, पण एक स्त्री काय करू शकते, हे त्यांनी दाखवून दिल्याचं त्यांच्या मुलाने एका मुलाखतीत आवर्जून नमूद केलं आहे. ब्रिजेट त्यांच्या सुरुवातीच्या काळात लैंगिक स्वातंत्र्याचं प्रतीक समजल्या जात होत्या. बंडखोरी त्यांच्या व्यक्तिमत्वात होती आणि व्यक्तिरेखांमध्येही होतीच. दोन्ही खांदे उघडे ठेवणाऱ्या नेकलाइनला आजही बोर्दो नेकलाइन म्हणून ओळखलं जातं. बिकिनी लोकप्रिय करणारी अभिनेत्री अशीही त्यांची ओळख सुरुवातीच्या काळात होती. तरीही विचारसरणीच्या बाबतीत त्यांनी पुराणमतवादी, उजव्या नेत्यांनाच समर्थन दिलं होतं. आंतरवांशिक विवाह होऊ नयेत, असं मत त्यांनी व्यक्त केलं होतं. स्थलांतर, स्त्रियांचा राजकारणातला सहभाग, इस्लाम या सगळ्या विषयांवरची त्यांची मतं प्रतिगामी म्हणावीत अशीच होती. तरीही पर्यावरण, प्राणीहक्क या विषयांप्रती त्यांची बांधिलकीही ठाम होती.

एकूणच डॉ. रुथ लॉरेन्स आणि ब्रिजेट बार्दो या दोन स्त्रियांनी नव्वद वर्षांहून अधिक कालखंड बघितला. त्यांच्या जगण्यात विसंगती–विरोधाभास असतीलही पण त्या दोघीही रुढ धारणांना छेद देणाऱ्या, चौकटी मोडणाऱ्या आणि आपापल्या क्षेत्रांवर न पुसला जाणारा ठसा उमटवणाऱ्या स्त्रिया होत्या, हा सारांश त्यांच्या आयुष्यांमधून नक्कीच निघतो. त्या दोघींचं वेगळेपण आणि मोठेपण या सारांशातच सामावलेलं आहे, असंही सहजपणे म्हणता येतं.

**प्रस्तुत लेख दी इकॉनॉमिस्ट (२९ डिसेंबर २०२५) आणि दी लॅन्सेट (१० जानेवारी २०२६) या नियतकालिकांत प्रकाशित स्मरणलेखांवर आधारित आहे. लेखिका, अनुवादिका असलेल्या सायली परांजपे यांची ‘राया’ (अनुवादित), ‘शहीद भगतसिंग’, ‘क्रांतिज्योती सावित्राबाई फुले’, ‘सम्राट अशोक’, ही लघुचरित्रपर पुस्तके प्रकाशित आहेत. सायली या ‘समतावादी मुक्त संवाद पत्रिके’च्या सल्लागार संपादक मंडळाच्या सदस्या आहेत.**

**संपर्क** : sayalee.paranjape@gmail.com

## मुखपृष्ठाविषयी...

**थॉमस गाउल्ड हा अमेरिकी शिल्पकार. ‘द वेस्ट विंड’ हे त्याचे सगळ्यात गाजलेले शिल्प. कवी पर्सी शेलीची ‘ओडे टु द वेस्ट विंड’ ही कविता आणि १८६९ मध्ये सुरू झालेला आंतरखंडीय रेल्वेमार्ग आणि त्याद्वारे खुले झालेले जग ही या शिल्पामागची प्रेरणा. शेलीने उद्धृत केलेले वेस्ट विंड हे शब्द कूस बदलणाऱ्या, क्रांतिकारी जगाचे प्रतीक. त्याला अनुसरून गाउल्डने उज्ज्वल भविष्याकडे झेपावण्यास उत्सुक तरुणीचे, वाऱ्यावर उडणाऱ्या फ्रॉकच्या चुण्यादेखील दिसतील इतक्या बारकाईने शिल्प साकारले. ते इतके गाजले, त्याच्या ६ प्रतिकृती गाउल्डने तयार केल्या. सध्या हे शिल्प मिसुरी इथल्या सेंट लुईस मर्कन्टाइल असोसिएशन लायब्ररीच्या संग्रहालयात विराजमान आहे.**

# ढासळत्या पौरुषत्वाचा आकांत



**योगेश पवार**

**आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष**




**गेल्या शतकातले साठ–सत्तरचे दशक अमेरिकी समाजजीवनात सर्वार्थाने खळबळ माजवणारे ठरले होते. याच दशकात अमेरिकी शासनसत्तेने व्हिएतनामविरोधात युद्ध पुकारले होते. दरदिवशी अमेरिकी सैनिकांचे मृतदेह बॅगांमध्ये भरून परत पाठवले जात होते, तरीही अमेरिकी सत्ताधाऱ्यांची युद्धखोरी सुरूच होती. याचमुळे विवेक शाबूत असलेल्या अमेरिकी समाजाचा धीर खचत चालला होता. युद्धविरोधी वातावरण तयार होऊ लागले होते, कॉलेज कॅम्पस आणि विद्यापीठांच्या आवारात युद्धविरोधी घोषणा घुमू लागल्या होत्या. महंमद अलीसारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त बॉक्सर सैन्यात सामील होण्यास नकार देत होते. याच घुसळणीतून एकीकडे काऊंटर कल्चर मुव्हमेंट मूळ धरू लागली होती आणि दुसरीकडे युद्धातून पराभूत होऊन समाजात परतलेले पुरुष आपले पौरुषत्व सिद्ध करू पाहत होते. यंदाच्या फेब्रुवारीत प्रदर्शनाचे ५०वे वर्ष पूर्ण केलेल्या स्कॉर्सेसीच्या 'टॅक्सी ड्रायव्हर'ची ही पार्श्वभूमी होती. पण या 'टॅक्सी ड्रायव्हर'चा आणि त्यातल्या एखाद्या पदकासारखे पौरुषत्व मिरवणाऱ्या ट्रॅव्हिस बिकलचा आजच्या जगाशी काय संबंध आहे?**

‘टॅक्सी ड्रायव्हर’ हा तो चित्रपट. १९८९ मध्ये मी पहिल्यांदा पाहिला, तेव्हा तो मला छिन्नविच्छिन्न झालेल्या पुरुषी एकाकीपणाचे गडद चित्रण वाटला होता. मात्र गेल्या आठवड्यात तो नेटफ्लिक्सवर पुन्हा पाहताना, सर्वदूर फोफावत चाललेली लैंगिकदृष्ट्या कुपोषितांची स्त्रीद्वेष्टी (इन्सेल) संस्कृती, यांत्रिक चालीवर वाढत चाललेली कट्टरता आणि हळूहळू लोकशाहीची जागा घेऊ पाहत असलेली विशेषाधिकारसंपन्न मूठभरांची अधिकारशाही अशा आजच्या जगाच्या पार्श्वभूमीवर मला जाणवले, की ‘टॅक्सी ड्रायव्हर’ हा चित्रपट एकाकीपणातून उद्‌भवणाऱ्या गुंत्याहून कितीतरी अधिक धोकादायक आणि भविष्यसूचक आहे. विखारी पुरुषत्व कसे घडवले जाते, त्या विखारी पुरुषत्वाला कसे पवित्र ठरवले जाते आणि अखेरीस त्याचे विध्वंसक शस्त्रात रूपांतर कसे होते, याचा तो सखोल नि ठोस असा अभ्यास आहे.

***पुरुषी असंतोषाचे सामाजिकीकरण***

मुळात, टॅक्सी ड्रायव्हर हा चित्रपट केवळ एकटेपणाविषयी किंवा एकटेपणातून येणाऱ्या मानसिक-भावनिक तुटलेपणा-विषयीचा नाही, तर पुरुषांच्या मनात दडलेल्या असंतोषाचे सामाजिकीकरण कसे होते, याची ती अस्वस्थ कहाणी आहे. पुरुषामध्ये असलेली लैंगिक असुरक्षितता, आर्थिक स्तरावर वाट्याला येणारी सततची निराशा आणि अहंकार ठेचणारी अदृश्यतेची भावना, या सगळ्याचे हळूहळू संतापात, हक्क भावनेत आणि ‘शुद्धीकरणा’च्या हिंसक कल्पनांत रूपांतर कसे होते, याचा पट हा ‘टॅक्सी ड्रायव्हर’ उलगडून दाखवतो. एक प्रकारे ‘टॅक्सी ड्रायव्हर’हा ‘इन्सेल’ कल्पनाविश्वाचा आद्यग्रंथच आहे. किंबहुना, इन्सेल हा शब्द अस्तित्वात येण्याच्या वा प्रचलित होण्याच्या कित्येक वर्षांपूर्वीचा आहे. त्यातला, टोकाचे क्रौर्य जगापुढे आणणाऱ्या व्हिएतनाम युद्धातून परतलेला ट्रॅव्हिस बिकल हा माजी अमेरिकी सैनिक असंगत घटक नाही; तर तो या संदर्भातला एक पक्का प्रारुपीय नमुना आहे.

***पुरुषसत्तेची नशा आणि उन्मादी हिंसा***

‘टॅक्सी ड्रायव्हर’ प्रदर्शित झाला, त्याला या वर्षी ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. जवळपास पन्नास वर्षांनंतर शहर बदलले आहे, मात्र पुरुषी मानसिकता बदललेली नाही. १९७०च्या न्यूयॉर्कच्या (किंवा मुंबईच्या, त्या वेळच्या बॉम्बेच्या खरं तर) रस्त्यांची जागा आता डिजिटल आक्रस्ताळेपणा आणि असंतोषाच्या झोपडपट्ट्यांनी घेतली आहे. प्रतिष्ठा आणि भविष्य गमावत चाललेल्या तरण्याबांड पुरुषांच्या ठिकठिकाणच्या झुंडींना दरदिवशी पुरुषसत्तेची नशा आणि राष्ट्रवादी मिथकांचा डोस दिला जात आहे. त्यातून दिला जाणारा संदेश कायम आहे. तो म्हणजे, तुझे दु:ख वैयक्तिक नाही, ते राजकीय आहे; तुझे अपयश संरचनात्मक नाही, ते आतल्या आणि बाहेरच्या शत्रूंमुळे आहे आणि तुझी हिंसा ही क्रौर्य नसून फार मोठे धैर्य आहे.

दिग्दर्शक (आणि जोडीला क्षणिक पण चमकदार भूमिका साकारणाऱ्या) स्कॉर्सेसीमधला खरा प्रतिभावंत इथे दिसतो. तो फॅसिझमला लष्करी वा निमलष्करी गणवेशांत किंवा गगनभेदी घोषणांत नाही; तर अति नाजूक पुरुषी अहंकारात शोधतो. चित्रपटात मायकेल चॅपमनची छायाचित्रणशैली न्यूयॉर्कला जणू जखमी पुरुषी मन:स्थितीत रूपांतरित करते. शहर घाम गाळते, रक्तबंबाळ होते, धगधगते आणि सडतेही. मॅनहोलमधून उसळणारी वाफ दडपून राहिलेल्या संतापासारखी भासते. निऑन प्रकाशाची उमटणारी प्रतिबिंबे चिखलभरल्या पाण्यात उघड्या जखमांसारखी दिसतात. अशात आकाशातून कोसळणारा पाऊस स्वच्छता करत नाही; तो संसर्ग पसरवतो. सारे शहर रोगट बनवतो.

चॅपमनचा कॅमेरा अनेकदा टॅक्सीच्या आत बसलेला असतो आणि मळक्या काचेतून जग निरखत असतो. ट्रॅव्हिस समोर येणारे वास्तव थेट पाहत नाही; तर दूषित झालेल्या नजरेतून तो जगाला भिडू पाहतो. म्हणून त्याच्यापर्यंत पोहोचण्याआधीच सगळे काही ‘भ्रष्ट’ ठरलेले असते. मनात साचलेल्या कावलेपणाचा, तो परिणाम असतो. याच मुळे तो आधी जगाचा निकाल लावतो आणि नंतर स्वतःला बरोबर ठरवण्यासाठी पुरावे शोधतो.

हळुवार, सातत्य राखत पुढे सरकणारी दृश्ये शहराला स्वप्नवत, नशेसमान आणि संमोहित करणारे बनवतात. ही टोकाच्या विचारांकडे झुकण्याची तंद्रा आहे. त्यानंतर अर्थातच हिंसा येते. तुटक आणि क्रूर वारांमधून… कल्पनेच्या फुग्यावर झालेल्या घावांसारखी. लाल रंग संपूर्ण चित्रपट व्यापून टाकतो… निऑन, गाड्यांचे ब्रेक लाइट्स आणि रक्त. लैंगिक आकांक्षा आणि हत्येचा उन्माद यांना जोडणारा तो लाल रंग सौंदर्यलक्ष्यी दुवा बनतो. इथे, इच्छा आणि विध्वंस एकरूप होताना दिसतात.

चित्रपटाच्या शेवटाला पडद्यावर दिसणाऱ्या हत्याकांडातला वरून घेतलेला शॉट, जिथे कॅमेरा देवासारखा निर्लिप्तपणे रक्तपातावर तरंगत असतो. त्या वेळी तो शेवट वाटत नाही, तर एकप्रकारचा राज्याभिषेक वाटतो. ट्रॅव्हिस आता मिथकात प्रवेश करतो. सूडाने पेटलेला एकटा पुरुष आपली दीक्षा पूर्ण करतो. इथे




*ऊरबडव्या आणि स्त्रीद्वेष्ट्या पुरुषी मानसिकतेचा उभा आडवा छेद घेणारा ५० वर्षांपूर्वीचा 'टॅक्सी ड्रायव्हर' आज अधिकच कालसुसंगत ठरतो आहे...*

जोकर (२०१९) चित्रपटामधील शेवटच्या दृश्याची हटकून आठवण होते. त्यातला आर्थर पोलिसांच्या गाडीवर उभा राहून बघ्यांनी पिटलेल्या टाळ्यांवर नाचतो. चेहऱ्यावर रक्त पसरवून हसतो.

***प्रच्छन्न पौरुषत्व***

खरे पाहता, ट्रॅव्हिस बिकल हा पौरुषत्वाच्या पूर्णत्वासाठी सततचा सराव करणारा माणूस आहे. तो आपले पौरुषत्व केवळ जगत नाही; तर ते प्रच्छन्नपणे सादर करतो. ते पाहताना जाणवते, रॉबर्ट डी नीरोचा अभिनय भावनिक निरक्षरतेचा उत्कृष्ट नमुना आहे. गंमत म्हणजे, ट्रॅव्हिस हा शक्तिशाली नाही; तो शक्तीची तालीम करणारा आहे. उदाहरणादाखल 'You talkin' to me?' हा प्रसंग मिजास नसून एक प्रकारचे प्रशिक्षण आहे. आपल्याला हे लक्षातही येत नाही, समाज ज्या पुरुषत्वाची शिकवण देतो, ते सहज मिळत नाही; ते शिकवले जाते, घडवले जाते आणि लष्करी शिस्तीसारखे अंतर्मनात पक्के रुजवले जाते.

हेच विषारी नि विखारी पुरुषत्वाचे सर्वात उघडेवाघडे रूप आहे. ही पुरुषी शक्तीतून जन्मलेली आक्रमकता नव्हे, तर कमजोरीतून जन्मलेली आक्रमकता आहे. ट्रॅव्हिस लैंगिक-दृष्ट्या प्रचंड गोंधळलेला आहे, भावनिकदृष्ट्या झिडकारला गेलेला, टाकून दिलेला आहे, आर्थिकदृष्ट्या परीघाकडे ढकलला गेलेला आहे आणि सामाजिकदृष्ट्या अदृश्य, गायब आहे. त्यावर त्याला नेमके उपचार-उत्तर मिळत नाहीत; त्याला काय मिळते, तर मिथक. हे मिथक काय सांगते, तर, मुळूमुळूपणा सोडून दे, 'पुरुष हो, नियंत्रण मिळव, जग शुद्ध कर.'

आजची लैंगिकदृष्ट्या कुशोषित स्त्रीद्वेष्ट्यांची 'इन्सेल' विचारसरणी नेमकी अशीच तर काम करते. ती अपमानाचे नियतीत रूपांतर करते. एकटेपणाला नैतिक श्रेष्ठत्व देते. नकारालाच प्रबोधनाचा पुरावा बनवते.

***निव्वळ प्रतीकचिन्हे***

स्कॉर्सेसीच्या 'टॅक्सी ड्रायव्हर'मधील स्त्रिया हाडामांसाची माणसे नसून केवळ प्रतीकचिन्हे आहेत. सायबिल शेफर्डची बेट्सी आणि जोडी फॉस्टरची आयरिस-ट्रॅव्हिसच्या विश्वात त्यांना पूर्ण व्यक्तिमत्त्व मिळतच नाही. बेट्सी ही एक 'पवित्र', दूरस्थ मॅडोनासम व्यक्तित्व आहे. जे अप्राप्य, ओजस्वी, पुरुषत्वाची खात्री देणारे एक बक्षीस आहे. तर आयरिस हा 'दूषित', पतित देह आहे-जिचा उद्धार किंवा नाश अपेक्षित आहे.

बेट्सी आणि आयरिसमध्ये घडवून आणले गेलेले हे द्विभाजनच पितृसत्ताक हिंसेचा पाया आहे. इथे स्त्रिया या स्त्रिया नसतात; त्या पुरुषी ओळख ठसवण्यासाठीची रणभूमी असतात. इथे प्रेमाची जागा जिंकल्याची भावना घेते, काळजीची जागी नियंत्रणाची भावना घेते आणि उद्धार केलेल्या स्त्रीवर मालकीची भावना सांगितली जाते.

इन्सेल संस्कृतीत ही तर्कशृंखला कधी न नियंत्रणात येणाऱ्या एखाद्या कर्करोगासारखी पसरली आहे. या संस्कृतीत स्त्रिया एकतर लैंगिकपरांङ्मुख, लैंगिक सुख न देणाऱ्या देवी ठरतात किंवा हक्क नाकारणाऱ्या राक्षशीण तरी. दोन्ही परिस्थितीत दोष त्यांचाच असतो.

चित्रपटातला हार्वे काइटेलचा 'मॅथ्यू स्पोर्ट' हा वेश्या वस्तीतला दलाल विलक्षण भयावह वाटतो, कारण तो अगदी सामान्य आहे. तो राक्षसी नाही, मोठा खलनायक नाही. तो हळू बोलतो. सहज हसतो आणि इतरांना आरामात हाताळतो. पितृसत्ता नेहमी गुरगुरत नाही; ती भुरळ घालते. अनेकदा ती 'सामान्य' पुरुषत्वासारखीच दिसते फक्त किंचित मोठ्या आवाजात.

शोषण असेच टिकून राहते ओळखीमुळे.

तोच रस्ता, तेच मार्ग आणि तेच आवाज... काळाची अशी पुनरावृत्ती करणारे संचित आधुनिक डिजिटल आयुष्याच्या प्रतिध्वनी-कक्षांसारखे आहे. टोकाची विचारसरणी स्फोटक

नसते; ती एकसुरी असते. हळूहळू विधीवत फोफावत जाते. घटित पूर्वग्रहाला अंतर्दृष्टीचे रूप दिले जाते.

***कुरुप, विस्कळीत नि वीरत्वहीन***

अंतिम भागात सगळे तुटून पडते. शेवटी, हिंसा ही जात्याच कुरूप, विस्कळीत आणि वीरत्वहीन असते. रंग फिके पडतात आणि रक्तपातातून भ्रम वाहून जातो. हा विजय नसून सडणे वा कुजणे आहे. तरीही समाज त्याला बक्षीस देतो.

'उपयोगी' हिंसेचे राजकारण हा टॅक्सी ड्रायव्हर चित्रपटाचा सर्वात भयावह निष्कर्ष आहे. राजकीय हत्या अपयशी ठरते म्हणून तो निंदनीय ठरतो; सतर्कतेच्या नावाखालील हत्या यशस्वी ठरते म्हणून तो पूजनीय ठरतो. फरक केवळ कथनाच्या सोयीचा असतो. समाज हिंसा नाकारत नाही; तो तिची निवड करतो.

आजची मूठभर विशेषाधिकारसंपन्नांची अधिकारशाही नेमकी अशीच कार्यरत आहे. यात काही राग वैध ठरवले जाताहेत, काही देह टाकाऊ ठरवले जाताहेत आणि काही पुरुष हे नायक प्रसंगी महानायक ठरवले जाताहेत. कारण स्पष्टच आहे, ते सुव्यवस्था, शुद्धता आणि पुरुषी अधिकार यांची मिथके वाचवताहेत.

चित्रपटातले बर्नार्ड हर्मनचे भरीव रोमँटिक संगीत (त्यांच्या मृत्यूपूर्वी काही तास आधी दिलेले) विध्वंसकेंद्री रोमान्सचा क्रूर विनोद ठरते. कोमलता नष्ट झालेल्या जगात ते जवळिकीचे स्वप्न दाखवते. प्रेमाऐवजी मालकी आलेल्या संस्कृतीत ते प्रेमाची आस धरते. संगीतातले सॅक्सोफोनचे सूर आपला सांगाती शोधू पाहतात; प्रतिमा मात्र संहाराकडे जातात.

खरे तर पौरुषत्वाची हीच सर्वात भीषण शोकांतिका आहे. जे स्त्रीची जवळीक हवी म्हणून पढवले जाते, पण प्रत्यक्षात प्रशिक्षण दिले जाते, ते केवळ पुरुषी वर्चस्वाचे. 'टॅक्सी ड्रायव्हर'मधला हा ट्रॅव्हिस बिकल आजच्या इंटरनेटवर नक्कीच मोकाट उधळला असता. तो असंतोष स्क्रोल करत बसला असता. त्याला त्याचा राग वैध ठरवणारे समुदाय मिळाले असते. त्याला सांगितले गेले असते,तू तुटलेला नाहीस; जग तुटलेले आहे.

***पुरुषी राजकारणाची धग***

या साऱ्या पार्श्वभूमीवर विचार केल्यास काय जाणवते, इन्सेल संस्कृती म्हणजे काय तर स्कॉर्सेसीचा 'टॅक्सी ड्रायव्हर' अधिक आजचे वाय-फाय तंत्रज्ञान. म्हणजेच अपयशी पुरुषांचे राजकारण धगधगवणारे संयुग. हे असे राजकारण आहे, जे



*आज भारताचे कोणा देशाविरोधात थेट युद्ध सुरू नसले, तरीही देशांतर्गत युद्धसदृश वातावरण कायम झाले आहे. अशा वातावरणात स्कॉर्सेसीचा 'टॅक्सी ड्रायव्हर' प्रत्येक गावा-शहरांत नजरेस पडू लागलाय...*

यशस्वी अत्याचाऱ्यांनी शस्त्र म्हणून उपयोगात आणले आहे. जगाला भेडसावणारे हवामान संकट, बेरोजगारी आणि लोकशाहीचा ऱ्हास यांना सामोरे जाणाऱ्या तरुणांना दिलेले एक नशेसारखे गिफ्ट आहे: ते देऊन सुचवायचे काय आहे, तर कुणाला तरी दोष द्या आणि द्वेष करण्याची परवानगी घ्या!

'टॅक्सी ड्रायव्हर'प्रत्येक वेळी पाहताना मला अधिकच घाबरवतो. कारण, तो अपवाद दाखवत नाही; तो पक्के प्रारुप दाखवतो. तो हे सांगतो, की फॅसिझमची सुरुवात जखमी पुरुषत्वात होते. सोबतच समाज खुनी कसे घडवतो आणि मग त्यांनाच तारणहार म्हणून कसे मिरवतो, हेही तो स्पष्टपणे सांगतो.

आज वेगळेच संदर्भ घेऊन येणारा स्कॉर्सेसीचा 'टॅक्सी ड्रायव्हर' हा कुणा एका माणसाविषयीचा इशारा नाही. एकाकीपणाला टोकाच्या विचारसरणीत कुजण्याची मुभा दिली, तर काय होते, याविषयीचा तो कडक इशारा आहे. विशेषतः जेव्हा हे एकाकीपण राष्ट्रभक्तीच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या राष्ट्रीय प्रकल्पाचे रूप घेते, तेव्हा ते अधिकाधिक विध्वंसक होत जाते, हा यातला सगळ्यात अस्वस्थ करणारा भाग आहे.

आणि 'टॅक्सी ड्रायव्हर'च्या संदर्भाने कदाचित सर्वात असह्य सत्य हेच आहे, ते म्हणजे, हा चित्रपट एकदाही विचारत नाही की, ट्रॅव्हिस राक्षसी पुरुषी मनोवृत्तीचा आहे की नाही?

न पेक्षा, तो हा प्रश्न विचारतो की, आपण असे जग पुनःपुन्हा का उभारत राहतो, ज्याला ट्रॅव्हिसची गरज भासते आहे...


**योगेश पवार हे ज्येष्ठ स्वतंत्र संवादमाध्यम व्यावसायिक आहेत. राजकारण, समाजकारण हे अभ्यासाचे तसेच संगीत, चित्रपट, नाटक हे त्यांचे आस्वादनाचे विषय आहेत.**
**संपर्क :** ९८२०० ७८९७६

# हिंदूशाहीची वाटचाल आणि राहुल गांधी नावाचा अडथळा



राजेंद्र साठे






**मो**दींचा भाजप फासिस्ट, हुकूमशाहीवादी आहे अशी टीका अनेकदा होते. पण तो नेमके काय करतो आहे, याबाबत अनेकांना स्पष्टता नसते. राहुल गांधी हे न घाबरता मोदींवर थेट टीका करतात म्हणून किंवा ते गांधी घराण्याचे वारस आहेत म्हणून भाजप त्यांचा द्वेष करतो, असे अनेकांना वाटते. विरोधकांचे तर सोडाच, पण राहुल यांच्या अंगावर भुंकत जाणाऱ्या भाजपच्या अनेक नेत्यांनाही आपली हीच भूमिका आहे असे वाटत असण्याची शक्यता आहे...

**१९५७** च्या निवडणुकीत अटलबिहारी वाजपेयी पहिल्यांदा खासदार म्हणून निवडून आले. लालकृष्ण अडवानी आधी संघाचे व नंतर जनसंघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते होते. अडवानींना वाजपेयी यांचे सहायक म्हणून नियुक्त करण्यात आले. १९६० मध्ये अडवानी 'ऑर्गनायझर' या संघाच्या नियतकालिकामध्ये चित्रपट परीक्षणे लिहू लागले. त्यांना दिल्लीत राहायला घर नव्हते. पण तेव्हाच्या नेहरु सरकारने ज्येष्ठ पत्रकारांसाठी घरे देण्याची योजना काढली होती. त्यात अडवानींना आरकेपुरम भागात घर मिळाले. या काळात जनसंघ हा नेहरुंचा प्रखर टीकाकार होता. चीन युद्धामुळे तर जनसंघाला मोठेच निमित्त मिळाले होते. तरीही अडवानी यांचे घर सरकारने कधी काढून वगैरे घेतले नाही. वाजपेयी आंतरराष्ट्रीय संबंधांबाबत चांगली भाषणे करीत. त्यामुळे ख्रुश्चेव्ह भारत–भेटीवर आला असताना त्याच्या पार्टीत नेहरुंनी वाजपेयींना मुद्दाम निमंत्रित केले होते, हा किस्सा तर प्रसिद्धच आहे.

***लोकशाही मूल्यांचा चुराडा***

फेब्रुवारीच्या सुरुवातीला राहुल यांच्यावरून संसदेत रणकंदन झाले. चीनचे रणगाडे चालून येत असताना जनरल मनोज नरवणे यांना 'जो उचित समझो, वो करो–तुम्हाला योग्य वाटेल ते करा,' असे सांगून नरेंद्र मोदी यांनी निर्णय घेण्यापासून पळ काढला, असा हल्लाबोल राहुल यांनी केला. दुसऱ्या दिवशी एपस्टिन फाइल्सचा विषय निघाला. या भानगडीत नाव असल्यानेच मोदींनी ट्रम्प यांच्यापुढे शरणागती पत्करली, असा थेट आरोप त्यांनी केला. यामुळे भाजपची चांगलीच कोंडी झाली. पण त्याने याबाबत स्पष्ट खुलासा केला नाही. उलट, नेहरु व इंदिरा गांधी यांच्या तथाकथित खासगी भानगडींची चर्चा करून काँग्रेसवरच टीका केली. नंतर आणखी कहर केला. राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करावी आणि त्यांना निवडणुकीला आजन्म बंदी घालावी, असा ठराव लोकसभा अध्यक्षांकडे सादर केला. आता याबाबत मार्च महिन्यात चर्चा होणार असून, त्यावेळी पुन्हा नव्याने हंगामा होईल.

नेहरू–इंदिरा–राजीव यांच्या काँग्रेसच्या कारभाराबाबत पन्नास इतर आक्षेप घेता येतील. पण लोकशाहीतील विरोध आणि विरोधक यांचे सन्मान राखण्याचे मूल्य काँग्रेसने मान्य केले होते. नेत्यांच्या स्वभावानुसार त्यात कमीअधिक झाले असेल. पण व्यापक लोकशाही चौकट काँग्रेसने कायम मान्य केली, इथे प्रस्थापित केली व देशातील जनतेलाही त्या चौकटीची सवय लावली हे कोणीही नाकारू शकत नाही. अडवानींच्या वर दिलेल्या उदाहरणावरून तेच दिसते. (आणीबाणी हा एक अपघात व अपवाद होता व त्याबाबतही काँग्रेस नेत्यांनी पुरेशी दिलगिरी व्यक्त केलेली आहे.) पूर्वी जनसंघ व नंतर भाजप म्हणून संघ परिवाराने या मूल्यांचा पुरेपूर फायदा घेतला आणि आज त्यांचे सध्याचे सत्तेतले कारभारी तीच मूल्ये नष्ट करीत आहेत.

**हिंदूशाहीचे वळण**

मोदींचा भाजप फासिस्ट, हुकूमशाहीवादी आहे अशी टीका अनेकदा होते. पण तो नेमके काय करतो आहे, याबाबत अनेकांना स्पष्टता नसते. राहुल गांधी हे न घाबरता मोदींवर थेट टीका करतात म्हणून किंवा ते गांधी घराण्याचे वारस आहेत म्हणून भाजप त्यांचा द्वेष करतो, असे अनेकांना वाटते. विरोधकांचे तर सोडाच, पण राहुल यांच्या अंगावर कुत्र्यांप्रमाणे भुंकत जाणाऱ्या भाजपच्या अनेक नेत्यांनाही आपली हीच भूमिका आहे, असे वाटत असण्याची शक्यता आहे.

प्रत्यक्षात भाजपला खास भारतीय पद्धतीची फासिस्ट हिंदूशाही लागू करायची आहे. या हिंदूशाहीमध्ये लोकशाहीचा बाह्य सांगाडा कायम राहील. एकीकडे निवडणूक, न्यायदान वगैरेसारख्या प्रक्रिया चालू आहेत, असा आभास चालू ठेवायचा, दुसरीकडे या प्रक्रियांवरचा लोकांचा विश्वास उडेल याची काळजी घ्यायची, असे यातले प्रयत्न आहेत. बाकी सर्व पक्ष असहाय, अनैतिक आहेत, अशा स्थितीत भाजप या एकमेव तारणहाराच्या मदतीने वाटचाल केली तरच खरी लोकशाही चालू राहील अशी विचित्र श्रध्दा जनतेमध्ये रुजवायची अशी ही खटपट आहे. भाजप नावाच्या ताकदवान व नैतिक सत्ताधीशांना मदत करणे हे न्यायालयांचे कर्तव्यच आहे असे जणू लोकांना वाटू लागले आहे. यातून भारतातील राज्यव्यवस्थेला या हिंदूशाहीकडे नेण्यात भाजप जवळपास यशस्वी झाला आहे.

***भाजपचा स्लो मोशन उपक्रम***

हे सर्व कसे चालू आहे याची आपल्या महाराष्ट्रातली काही उदाहरणे पाहू. लोकसभेच्या २०२४ च्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीला मोठे यश मिळाले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला आठ तर अजित पवार यांच्या पक्षाला केवळ एक जागा मिळाली. त्यावेळी विरोधकांमध्ये उत्साह संचारला. काही काळाने अजितदादांचे नेते व कार्यकर्ते शरद पवारांकडे




*संसदेत सत्ताधाऱ्यांची कोंडी करणारे विरोधक जोवर रस्त्यावर उतरून योग्य मुद्द्यावर,योग्य वेळी हालचाल करणार नाहीत, तोवर जनमताची साथ शक्य नाही...*

परत येतील, अशी भाकिते बहुसंख्य नेते व पत्रकार करू लागले. पण विधानसभेला अक्षरशः जादू झाली. महाविकास आघाडीचा पालापाचोळा झाला. अजित पवार गटाला ४१ तर शरद पवार गटाला अवघ्या १० जागा मिळाल्या.

त्यानंतर क्रमाक्रमाने शरद पवार गटाचे अवसान खलास झाले. महाविकास आघाडीचे चाणक्य म्हणून आपण महाराष्ट्रात काहीही उलटफेर करू शकतो हा शरद पवारांचा आत्मविश्वास खतम झाला. त्यांच्याकडचे आमदार व खासदार डळमळीत झाले. त्याचाच परिणाम म्हणून अजित पवार असतानाच महापालिका निवडणुकीत एकत्र निवडणुका लढल्या गेल्या. अजित पवार यांच्या अचानक जाण्याने तर शरद पवारांसह सगळे जण सैरभैर झाले व विलीनीकरणाचा जोराने आग्रह धरू लागले. विशेष म्हणजे, भाजपने मात्र याला आपला विरोध असल्याचा आव आणला आहे.

म्हणजे गंमत पाहा. मुळात २०११–१२ मध्ये भ्रष्टाचाराचे आरोप करून अजित पवार आणि राष्ट्रवादीच्या प्रतिष्ठेला सुरुंग लावण्यात आला. नंतर त्यांना २०१९ आणि २०२३ मध्ये ते सत्तेसाठी सहज विकत घेता येऊ शकणारे नेते असल्याचे दाखवून उरलीसुरली प्रतिमा खलास करण्यात आली. त्यावेळी कोणत्याही स्थितीत भाजपसोबत जाणार नाही अशी भूमिका शरद पवारांनी घेतली होती. पण त्यांच्या घरातले नेते आणि बहुसंख्य कार्यकर्तेच त्यांच्यासोबत नाहीत हे दाखवून देण्यात आले. विधानसभा निवडणुकांनंतर तर खुद्द शरद पवारही आपल्या भूमिकेपासून ढळू आणि पळू लागले. त्याचे मराठी जनतेसमोर नीट प्रदर्शन होईल, याची काळजी घेण्यात आली. पालिका निवडणुकीत शरद पवारांशी युती करण्याआधी अजितदादांनी दिल्लीत जाऊन अमित शाह यांची भेट घेतली होती, हे इथे नोंदवणे आवश्यक आहे. म्हणजे, याची योजना भाजपच्या संमतीनेच ठरवली गेली होती. शरद पवारांचा भाजपविरोध कसा नेस्तनाबूत झाला, हे स्लो मोशनमध्ये जनतेला दिसत राहणे भाजपसाठी आवश्यक होते. आता गेल्या काही दिवसात पवारांचा भाजप–विरोध किती तकलादू होता, हे भाजपने उघडे पाडले आहे व त्यांचे पुरेसे वस्त्रहरण केल्यानंतरच विलीनीकरणाला हिरवा कंदील दिला जाईल असे दिसते.

### फासिस्ट पद्धतीचे संमोहन

हे केवळ सत्तेच्या जोरावर विरोधकांना खलास करणे किंवा आपल्या बाजूने वळवणे इतकेच नाही. भाजपला विरोध करणाऱ्यांमध्ये किंवा त्यांच्या मागे कोणतीही नैतिक ताकद नाही व त्यामुळेच ते पराभूत होणे अपरिहार्य आहे हे जनतेच्या मनावर बिंबवण्याचा हा सर्व उपक्रम आहे. अजित पवारांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे भाजपवालेच त्यांना जवळ घेतात आणि तरीही भाजपला याचा डाग लागत नाही किंवा मतदारांच्या मनातली भाजप, मोदी, देवेंद्र यांची प्रतिमा काळवंडत नाही याचे अनेकांना आश्चर्य वाटते. हे फासिस्ट पद्धतीचे संमोहन आहेच. पण ते तेवढेच नाही.

सत्ता असल्यामुळे भाजप ताकदवान आहे असे नसून, भाजपकडे नैतिक ताकद असल्याने तो ताकदवान आहे, त्यामुळेच त्याला सतत सत्ता मिळते हे आम जनतेच्या मनावर ठसवण्यात आतापर्यंत तरी मोदी आणि मंडळी चांगलीच यशस्वी झाली आहेत. ती नैतिकता ठसवण्यासाठी नरेंद्र मोदी किंवा योगी आदित्यनाथ यांना कुटुंबाचे पाश कसे नाहीत, ते कसे धार्मिक आहेत, राजा हा उपभोगशून्य स्वामी असल्याचा साक्षात अवतार कसे आहेत अशा प्रतिमा सतत प्रसृत केल्या जात असतात. नरेंद्र मोदींच्या धार्मिकतेचे प्रदर्शन हे हिंदू धर्मियांना सुखावण्यापुरते मर्यादित नसते. तर हे धार्मिक आहेत म्हणजेच उच्च नैतिक मूल्यवाले आहेतच, अशी प्रतिमा रुढ करण्याचा तो प्रयत्न असतो.

### वरपासून खालपर्यंत तोच अजेंडा

केवळ वरिष्ठ नेत्यांच्या प्रतिमा निर्मितीत नव्हे तर खालच्या पातळीवरही विविध प्रकारे हा खेळ खेळला जात असतो. गुजरातमध्ये सर्व मंत्र्यांना राजीनामा द्यायला लावून एका झटक्यात अननुभवी आमदारांना मंत्री करणे, फडणवीसांना उपमुख्यमंत्री होण्याचा आदेश देणे, शिवराजसिंगांचे पंख

छाटणे, बावनकुळे किंवा विनोद तावडे यांचे तिकिट कापणे असे प्रकारही यात सामील असतात. परवा नागपूर महापालिकेत नव्याने निवडून आलेले भाजप नगरसेवक शपथ घ्यायला गेले, तर पहिल्यांदा त्या सर्वांचे कोऱ्या कागदावर राजीनामे घेण्यात आले. भल्या भल्या नेत्यांवरही पक्षाचा जबरदस्त अंकुश आहे व ते हूं का चूं करू शकत नाहीत, हे सामान्य जनतेला सुखावणारे असते. पापी लोकांना देव शिक्षा करतो अशी श्रध्दा असावी तशी लोकांची भाजपवर श्रध्दा तयार होते.

दुसऱ्या बाजूने, भाजपला विरोध करणारे हे कसलीही तत्त्वे न मानणारे आणि सत्तेसाठी लाचार आहेत, हे वेगवेगळ्या रीतीने दाखवण्यात येते. पवार ते नीतीशकुमार ते मुलायम ते चंद्राबाबू अशी असंख्य उदाहरणे समोर आहेत. आज काहींना हे म्हणणे धाडसाचे वा मूर्खपणाचे वाटेल. पण भविष्यात एखाद्या टप्प्यात ममता बॅनर्जी यांनाही नीतिभ्रष्ट म्हणून दाखवण्याची संधी भाजप साधू शकेल. ममता एकेकाळी वाजपेयींच्या मंत्रिमंडळात सामील होत्या, हे विसरून चालणार नाही.

तमाम विरोधकांना नीतिभ्रष्ट व स्वतःला नैतिकतेचा पुतळा म्हणून पेश करणाऱ्या भाजपला नडू शकतील व त्याची प्रतिमा उद्ध्वस्त करू शकतील असे दोनच जण आहेत. एक आहेत डावे कम्युनिस्ट पक्ष. पण त्यांची ताकद खूपच मर्यादित आहे. त्यांचा अस्तित्वासाठी संघर्ष सुरू आहे. दुसरे आहेत राहुल गांधी. त्यांचाच संघर्ष आपण सध्या पाहतो आहोत.

***राहुल यांचा एकला संघर्ष***

राहुल गांधी यांच्यामागे गांधी–नेहरुंच्या काँग्रेसची पुण्याई आहे. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करणे भाजपला शक्य झालेले नाही. राहुल यांच्याविरुद्धचे भाजप कार्यकर्त्यांनी दाखल केलेले सर्व खटले हे सावरकर किंवा संघ किंवा मोदींवर टीका केल्याबद्दलचे आहेत. नॅशनल हेरॉल्डसारखी प्रकरणे न्यायालयांनी उडवून लावली आहेत. राहुल कोणत्याही स्थितीत मोदी किंवा भाजपशी दोस्ती तर सोडाच, समेटही करण्याची शक्यता नाही. विरोधकांकडे नैतिक ताकद नाही, या भाजपच्या सध्याच्या मुख्य सूत्राची हवाच राहुल काढून घेत आहेत.

राहुल यांच्या नेतृत्वाच्या अनेक मर्यादा आहेत. त्यांच्याकडे इंदिरा गांधी यांच्यासारखा मुरब्बीपणा, बाजी उलटवण्याचे कौशल्य नाही. सत्ता राबवण्याचा अनुभव नसल्याने त्यांचा विरोध हा अनेकदा अकादमिक किंवा एनजीओ धर्तीचा वाटतो. संघटना उभारणीमध्ये त्यांना रसच नाही, अशीही काहीशी स्थिती आहे. इतरही अनेक बाबी आहेत. पण भाजपला असलेला त्यांचा तात्त्विक व राजकीय विरोध हा शंभर टक्के प्रामाणिक आहे, हे दिवसेंदिवस जनतेमध्ये अधिक ठसत चालले आहे, हे भाजपसाठी चिंतेचे आहे. म्हणूनच भाजप त्यांच्यावर विखारी त्वेषाने व चहू दिशांनी हल्ले चढवत आहे. एकाच वेळी त्यांना कारस्थानी सोरोसचे भारतातील एजंट ठरवणे, दुसरीकडे अबोध बालक ठरवणे, तिसरीकडे अपयशी नेता ठरवणे असे पर्याय चाचपले जात आहेत.

राहुल हे काँग्रेसच्या नावाने ही लढाई लढत असले, तरी काँग्रेसवाले त्यांच्यासोबत आहेत असा भरवसा देता येत नाही. भलेभले नेते कधी भाजपपुढे दबून जातील वा तडजोडी करतील, हे सांगता येत नाही. शशी थरुर यांचे उदाहरण सर्वांच्या डोळ्यापुढे आहे. रेवंत रेड्डी यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांचे प्रेम सत्तेवर अधिक असते वेळोवेळी दिसले आहे. या स्थितीत, (काँग्रेसवाल्यांना हे म्हणणे आवडणार नाही, पण एका अर्थाने) इंदिरा गांधींविरोधातल्या जयप्रकाश नारायणांसारखी भूमिका राहुल बजावत आहेत. काँग्रेस संघटनेच्या डोक्यावरून थेट जनतेच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन करीत असल्यासारखा त्यांचा पवित्रा आहे. म्हणूनच ते संघटना बांधण्याबाबत काहीसे उदासीन असावेत.

पण राहुल यांचा सामना अत्यंत पाताळयंत्री व सर्वसत्ताधीश भाजपशी आहे. त्याहूनही अधिक तो फितूर जनतेशी आहे. लाडकी बहीण योजना असो की मतदानासाठी मिळणारे रोख पैसे... हे सगळे घेऊन खुद्द जनताही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारात सामील होऊ लागली आहे.

या जनतेला कसे जागे करायचे हा 'एका अकेल्या'पुढचा खरा प्रश्न आहे.


**राजेंद्र साठे हे लेखक ज्येष्ठ पत्रकार, संपादक तसेच मुक्त संवादच्या सल्लागार संपादक मंडळाचे सदस्य आहेत. 'सरदार वल्लभभाई पटेल : एक सडेतोड व्यक्तिमत्त्व' (मनोविकास) हे त्यांचे अलीकडचे प्रकाशित झालेले अनुवादित पुस्तक आहे.**
**संपर्क :** satherajendra@gmail.com
**मोबाइल : ७०४५१ ५४३५४**

# शतकी सातत्य न्यूनगंडाचे



डॉ. विवेक कोरडे

**विरोधी बाकावरून**




**मो**ठेच गमतीशीर दृश्य होते. फेब्रुवारी महिन्यात मुंबईतल्या नेहरु सेंटरमध्ये संघाच्या शंभरीनिमित्त 'नए क्षितिज' हा संघाबद्दलचे 'समज–गैरसमज' दूर करणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. लोकशाही आणि संघ, संघ आणि नेहरु आणि अशी प्रतिकात्मकरीत्या संगती–विसंगती तिथे एकत्र नांदताना दिसत होती. संघाचे शिस्तबद्ध कार्यकर्ते उद्योगपती–नोकरशहा–सत्ताधारी राजकारणी, मानाचे संपादक, फिल्मी नट–नट्या, दिग्दर्शक, निर्माते अशा सगळ्यांच्या सरबराईत गुंतले होते. त्यातही सलमान खान, रणबीर कपूरसारख्या फिल्मी (आणि काही बदनामही) लोकांसाठीची कार्यकर्त्यांची लगबग विलक्षणच गमतीशीर होती. सरसंघचालक मोहन भागवतांनी उधळलेले विचारधन साठवण्यासाठी आलेला हाच वर्ग काँग्रेसच्या काळात त्या वेळच्या सत्ताधीशांपुढ्यात आपल्या निष्ठा जाहीर करत होता. इथे त्यांना धर्म, देव, जात–पात आणि राष्ट्रावादाचा 'व्हॅल्यू ॲडेड' डोस मिळणार होता. जो धार्मिक, जो देवभोळा, जो संघात जाणारा वा संघसमर्थक तो नैतिक अशी मूल्यव्यवस्था रुजल्याच्या या नव–नैतिक काळातला हा म्हटला, तर न्यूनगंड दर्शन सोहळाच होता आणि त्यातली सरसंघचालकांची वचने/उद्धृते/भाष्य संघाचे खरे रुप झाकणारी होती...

**स्व**तःला हिंदुत्ववादी सांस्कृतिक संघटन म्हणून घेणाऱ्या राजकीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण झाली. एरवी, एखाद्या संस्था-संघटनेच्या आयुष्यात शंभरी गाठणं हा खरोखरच अभिमानाचा आणि गौरवाचा विषय असतो. त्या अभिमानास आणि गौरवास संघ पात्र ठरला आहे. या प्रदीर्घकाळात संघात छोटे-मोठे मतभेद झाले असतील, छोट्या मोठ्या कुरबुरी झाल्या असतील, पण त्या कधीही बाहेर आल्या नाहीत. नाही म्हणायला, गोव्यात कुण्या स्वयंसेवकाने बंडाचा प्रयत्न केला. त्या स्वयंसेवकाचे साधे नाव आज फारसे कुणाच्या आठवणीत नाही. शंभर वर्ष जसेच्या तसे टिकून राहणे, तीच एकच एक भाषा बोलत राहणे, हे बुद्धीचे वरदान लाभलेला मानवी समाज म्हणून साधी गोष्ट नाही. एकेकाळी टिंगलीचा विषय असणारी ही संघटना कशामुळे का असेना, आज आपल्या विचारांचे सरकार केंद्रात आणि अनेक राज्यात स्थापन करण्यास यशस्वी झाली आहे. बाकी कशासाठी नाही, तरी निदान यासाठी तरी संघ परिवाराचे अभिनंदन करावयाला हवे.

सातत्य हे विघातक कृतीलाही सहाय्यभूत ठरते, विधायक कृतीलाही. लोकशाहीत विधायक सातत्याची अपेक्षा, आकांक्षा आणि प्रतीक्षा असते. संघाला आज जे लौकिक यश मिळाले आहे, ते विघातक प्रकारातल्या सातत्याने मिळाले आहे. 'हिंदूंनो संघटित व्हा', 'आणि संघटित होण्यासाठी एक व्हा' या बोलण्यापलीकडे संघाने हिंदू समाजात सामाजिक सुधारण्यासाठी फार असे काही केलेले नाही. संघाच्या आजवरच्या इतिहासात महिला, दलित आणि शोषित-वंचित समूहांच्या हक्क आणि अधिकारांसाठी समाज परिवर्तनाची एकही चळवळ वा आंदोलन नोंदले गेलेले नाही. संघाला जातिव्यवस्थेची चौकट कायम ठेऊन, धर्मश्रेष्ठत्वाचा गंड बाळगून हा देश आपल्या विचार-वर्चस्वाखाली आणायचा आहे. स्वातंत्र्य आंदोलनापासून दूर राहूनही, आम्हीच खरे राष्ट्रवादी आणि देशप्रेमी ही छद्म प्रतिमा निर्माण करण्यात संघ यशस्वी झाला आहे. असे म्हणण्याचे कारण, संघाच्या राष्ट्रवादात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेले भारत हे राष्ट्र नाही. भारत या स्वतंत्र राष्ट्राचा राष्ट्रध्वज 'तिरंगा' हा संघाला आपला (सत्तेपर्यंत पोहोचण्याचा आपद्धर्म म्हणून कालांतराने संघाने तो आपला मानला हा भाग निराळा.) वाटला नाही आणि सर्वांना समान नागरिकत्व देणारे संविधानही संघाने आजही मनापासून स्वीकारलेले नाही. असे असतानाही संघ राष्ट्रप्रेमी संघटना म्हणून मान्यता पावली आहे. गेल्या शंभर वर्षात संघाचे सर्वात मोठे यश मोजायचे तर ते हे आहे.

एकच गोष्ट पुन्हा पुन्हा उच्चरवाने बोलली, मग ती खोटी असली तरी खरी ठरते, हा गोबेल्सचा आदर्श संघाचा आदर्श आहे, ही गोष्ट कधीही लपून राहिलेली नाही. संघाला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी मुंबईत जे व्याख्यान दिले त्यातही ही गोष्ट स्पष्टपणे जाणवते.

***अखंड भारताचे दिवास्वप्न***

भागवतांनी मुंबईतील व्याख्यानमालेत संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासावर प्रकाश टाकला. त्याचबरोबर त्यांनी अखंड भारत, जातविरहित समाज, हिंदू एकता सामाजिक समरसता या संघाच्या नेहमीच्या केवळ बोलायच्या विषयांवर भाष्य केले. या साऱ्या बाबींवर संघ बोलत आला आहे. परंतु असे बोलणे म्हणजे संघाने सार्वजनिक सभेत घेतलेले सोज्वळ रूप असते. संघाला या गोष्टींवर कृती न करता फक्त बोलायचे असते, म्हणूनच यावर लिहिणे भाग आहे.

'अखंड भारत' हा संघाचा तर स्थापनेपासूनचा लाडका विषय. त्यावर बोलल्याशिवाय भागवत कसे राहणार? १९४७ला झालेल्या फाळणीचा उल्लेख करत त्यांनी २०४७ मध्ये अखंड भारताच्या निर्मितीचे स्वप्न मांडले. फाळणी या देशाचे मोठे दुर्दैव होते. हिंदूंना मुसलमान आपल्यावर राज्य करतील याची भीती वाटत होती. आजही मुस्लिम लोकसंख्यावाढीचा बागुलबुवा उभा करून 'हिंदू खतरेमे' म्हणणारे लोक कोणत्या विचाराचे आहेत, हे वेगळे सांगायला नको. हिंदूंना मुसलमानांचे राज्य येईल ही भीती होती, तर मुसलमानांना लोकशाहीत हिंदू बहुसंख्य असल्यामुळे आपल्यावर 'हिंदुराष्ट्र' लादले जाईल ही भीती वाटत होती. फाळणी टाळण्यासाठी या दोन समाजांमध्ये परस्परविश्वास आणि भारतीय म्हणून ऐक्याची भावना निर्माण करणे आवश्यक होते. ते करणाऱ्या महात्मा गांधींना विरोध करण्यापलीकडे या तथाकथित हिंदुत्ववाद्यांनी नेमके काय केले, याचा हिशेब भागवतांनी मांडायला हवा होता, 'हिंदुस्तान हिंदूओंका नही किसी के बापका' म्हणणारे वाचाळवीर अखंड हिंदुस्तान कसा निर्माण करणार होते? द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडणारे कोणती देशसेवा करत होते? त्रावणकोरच्या दिवाणाला सावरकरांनी भारतात विलीन न होण्याचा सल्ला का दिला होता? 'काश्मीर



*जसे सत्ताधारी भाजपने आपली पकड मजबूत करण्यासाठी कोंडीग्रस्त विरोधकांना वॉशिंग मशिन उपलब्ध करून दिले, तोच मार्ग भाजपच्या मातृसंस्थेने कोंडीग्रस्त वलयांकितांसाठी आरंभलेला दिसतो आहे...*

अॅज अ हिंदू स्टेट शल नॉट मर्ज विथ सेक्युलर इंडिया' असे म्हणणारा प्रेमसिंग डोग्रा नेमका कोणत्या हिंदुत्ववादी संघटनेचा नेता होता? या प्रश्नांचा ऊहापोह भागवतांनी करायला हवा होता. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, फाळणी होत असताना तथाकथित हिंदुत्ववादी नेते काय करत होते, कुणाबरोबर सत्तेत सहभागी झाले होते, हे देखील भागवतांनी सांगायला हवे होते.

***झुलवत ठेवण्याची क्लृप्ती***

२०४७ मध्ये अखंड हिंदुस्तान निर्माण करणार म्हणजे पाकिस्तान आणि बांगलादेश यासह आणखीन बरेच देश भारतात येणार. म्हणजेच मुसलमानांची संख्या वाढणार. म्हणजेच हिंदू अधिक 'खतरेमे' येणार की नाही, हे देखील भागवतांनी सांगायला हवे. पण भागवत यापैकी काहीच करणार नाहीत. कारण अखंड भारत हे हिंदूंना झुलवण्यासाठी वापरण्याची क्लृप्ती आहे. २०४७ फार लांब नाही. २०४७ मध्ये जे सरसंघचालक असतील ते २१४७ साली अखंड भारत करणार असे जाहीर करतील.

याच भाषणात भागवतांनी जातीव्यवस्था कालबाह्य असून ती मिटवली पाहिजे, असे ठाम मत व्यक्त केले. या विचारांमागे उदारमतवाद, प्रागतिकता ही मूल्ये आहेत, असे नक्कीच म्हणवत नाही. कारण, ही हाक संघाच्या राजकीय सामर्थ्याला बळ देणारी आहे. संघाला हे पुरते ठाऊक आहे की, समाज जातीपातींमध्ये विभागला की, हिंदुत्वाचे राजकीय कथन कोसळते, ते तोलून धरण्यासाठी भागवत जातीव्यवस्था कालबाह्य ठरवतात. एरवीसुद्धा, भागवतांचा या प्रतिपादनावर जर खरंच विश्वास बसला असता तर फार बरे झाले असते. पण संघाच्या गुरु गोळवलकरांनी आणि आज संघाचे आदर्श असलेल्या सावरकरांनी मनुस्मृतीचा पुरस्कार करून मनूचा कायदा हा सर्वात प्राचीन आणि आदर्श कायदा होता, असे म्हटले होते.

अर्थात संघाला आजही मनुस्मृती पवित्र वाटते. संघ आपल्या कृतीतून ते प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे दाखवूनही देत असतो. याच मनुस्मृतीने वर्णव्यवस्थेचा पुरस्कार केला. ब्राह्मणीव्यवस्था उचलून धरली. एकाच गुन्ह्यासाठी विविध वर्णांना वेगळी शिक्षा सुनावणारी विषमता पुरस्कारली. शूद्र समाजावर जन्मजात गुलामी लादली. त्या मनुस्मृतीची भलावण करणाऱ्यांचे काय करायचं, हे जोपर्यंत भागवत स्पष्ट करत नाहीत तोपर्यंत जातीविरहित समाज ही संघाची जाहीर सभेपुरता घेतलेली सोज्वळ भूमिका असणार आहे.

***भारतीय एकता नव्हे, हिंदू एकता***

हिंदू एकतेवर संघ नेहमीच भर देतो. हिंदू समाजाने एकत्र येऊन देश विकासात योगदान दिले पाहिजे, असे भागवत म्हणतात. परंतु देश विकास म्हणजे काय, केवळ हिंदूंनीच एक का व्हायचे? अन्य समाजांचे योगदान देश विकासासाठी गरजेचे नाही, असे भागवतांना म्हणायचे आहे का? होय, त्यांना तसेच म्हणायचे आहे. अन्यथा त्यांनी साऱ्या भारतीय नागरिकांनी एक व्हावे, अशी राष्ट्रीय एकात्मतेला पूरक संविधानवादी भूमिका घेतली असती. पण संघाला हिंदुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व वाटते. ही संविधानविरोधी भूमिका आहे.

अशीच भूमिका समरसतेची आहे. संघाला समता या आधुनिक मूल्याचेच वावडे आहे. अर्थात त्यांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, समाजवाद आणि सर्वधर्मसमभाव या संविधानाच्या उद्देशिकेमधील साऱ्याच मूल्यांचे वावडे आहे. म्हणूनच संघ सामाजिक समता हा शब्द न वापरता 'सामाजिक समरसता' हा शब्द आवर्जून वापरतो. मुंबईत भागवतांनी सामाजिक समरसतेचा महिमा वर्णन केला आणि विविध जाती धर्मांच्या लोकांमध्ये परस्पर सहकार्य आणि संवाद वाढवण्यावर भर दिला.

एकीकडे, देशाच्या हिंदूंनी एकत्र या म्हणायचे आणि दुसरीकडे, अन्य जाती धर्मियांना परस्पर सहकार्य वाढवण्यास सांगायचे यासारखा दुटप्पीपणा शोधून सापडायचा नाही. याचा अर्थ असा घ्यायचा, की कोणा हिंदूंना अभक्ष्य असलेले अन्न

भक्षण केल्याने तथाकथित हिंदू धर्मरक्षक एखाद्याचा झुंडीने बळी घेत असतील, तर ते सर्वांनी समरसतेने पाहायचे, असा करावा लागेल. त्याचबरोबर देशातल्या दोन लोकांनी सारी संपत्ती मोदीकृपेने मिळवायची आणि ८० कोटी लोकांनी पाच किलो धान्य घेऊन देशात समरसतेने राहायचे असाही करावा लागेल.

***ॲलर्जी समतेची***


संघाला समता या कल्पनेचीच अलर्जी आहे आणि ही ॲलर्जी लपविण्यासाठी संघाने समरसता हा शब्द शोधला आहे. एक प्रकारे हा मनुस्मृतीचाच पुरस्कार आहे. अन्यायपूर्ण समाज रचनेला आदर्श म्हणायचे, ही परंपरा टिकवण्याचे कार्य मनुस्मृती आणि तिचे समर्थक करत आले आहेत. वस्तुस्थिती ही आहे की हिंदू-हिंदू करणाऱ्या संघाने हिंदूंच्या उद्धाराचे लढे कधी दिलेच नाहीत. प्रश्न मंदिर प्रवेशाचा असो वा अस्पृश्यता निवारण्याचा, या प्रश्नांवर चळवळ उभारणे राहू द्या, सुरू असणाऱ्या चळवळींनाही संघाने कधी साधा मौखिक पाठिंबा दिलेला नाही. हिंदू कोड बिल, हिंदू समाजातील महिलांच्या जीवनात सुधारणा घडविण्यासाठी होते. त्याला विरोध करणारे लोक संघाच्याच विचारसरणीचे होते. संघाचे हिंदुत्व केवळ भाषणातले हिंदुत्व आहे. बहुजन हिंदू समाजाच्या हितासाठी संघाने कधीही भूमिका घेतलेली नाही. संघाचा तो अजेंडाच नाही.

भागवतांनी बांगलादेशमध्ये सव्वा कोटी हिंदू आहेत, असे म्हणून त्यांना एकत्र येण्याचा सल्ला दिला आहे. खरंतर भागवतांनी बांगला देशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा बिमोड करण्याचा सल्ला भारताचे छप्पन्न इंची छाती असलेले पहिले 'नॉन बायोलॉजिकल' पंतप्रधान 'विश्वगुरू' मोदींना द्यायला हवा होता. खरंतर बांगलादेशचाच बिमोड करून, त्याला भारतात सामील करून अखंड भारताची सुरुवात करायला सांगायला हवे होते. त्यांनी बांगलादेशातील हिंदूंना दिलासा मिळाला असता. असो.


याच भाषणात सावरकरांना भारतरत्न दिल्यास तो भारतरत्न पुरस्काराचा गौरव होईल असे भागवतांनी म्हटले आहे. सावरकरांचे गौरवीकरण हा संघाचा अलीकडचा अजेंडा आहे आणि दुरूनही स्वातंत्र्य आंदोलनाशी संबंध नसल्याने तसे गौरवीकरण करणे हे संघाला भाग आहे. कारण निदान १९०८ पर्यंत सावरकर ब्रिटिशविरोधी लढ्यात सामील होते. नंतरच्या काळात हिंदुत्ववाद्यांची पाटी याबाबतीत कोरी आहे. तुरुंगातून सुटका करून घेतलेल्या सावरकरांनी ब्रिटिश विरोधी कोणताही लढा दिला नाही. मात्र सुभाष चंद्र बोस यांची आझाद हिंद सेना ब्रिटिशांशी लढत असताना, ब्रिटिशांना सैन्य भरती करण्यास मदत करण्याची सर्वात मोठी देश सेवा सावरकरांनी केली. या महान देशसेवेबद्दल त्यांना भारतरत्न देऊन गौरवावे, असे भागवतांना वाटत असल्यास त्यांनी मोदी सरकारला तसे करण्यास सांगायला हवे. उदात्तीकरण करण्यास संघाकडे दुसरे कोणतेही व्यक्तिमत्व नाही.

थोडक्यात, भागवतांचे मुंबईतील भाषण संघाच्या दुटप्पीपणा या सातत्याला धरून झाले. शंभर वर्षांनीही संघ बदलला नाही, याबद्दल संघाचे अभिनंदन!

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**
**ई मेल :** drvivekkordeg@mail.com



# आपले घर, आपला किल्ला!



रवि आमले

पाळतशाहीच्या पाऊलखुणा – ३




अमेरिकेत 'स्नोडेन'सारखा जागल्या जन्मतो, तो अचानक नव्हे. तो तेथील सरकारी पाळतशाहीचा गौप्यस्फोट करतो, ते अविचाराने नव्हे. त्या कृतीमागे त्या आणि एकूणच पाश्चात्य समाजात व्यक्तीचे अधिकार, तिचा खासगीपणाचा हक्क यांविषयी असलेली आस्था उभी आहे. पण ही आस्थाही अचानक क्रांती वगैरे होऊन उगवलेली नाही. त्या संस्कृतीलाही पाळतखोरीचा मोठा ऐतिहासिक वारसा आहे...

स्नोडेनला जन्म देणाऱ्या अमेरिकी पाळतखोरीचा ऐतिहासिक वारसा पाहायचा, तर दिवसेंदिवस रुपयाच्या डोक्यावर पाय देऊन त्यास पाताळात ढकलत चाललेली अमेरिकी डॉलरची नोट पाहा. तिच्या पाठीमागे एक पिरॅमिडसारखी आकृती दिसते. त्या पिरॅमिडच्या टोकावरील त्रिकोणात एक उघडा डोळा आहे. त्याला म्हणतात 'आय ऑफ प्रॉव्हिडन्स'. प्रॉव्हिडन्स म्हणजे दैवी कृपा. आय ऑफ प्रॉव्हिडन्स म्हणजे दैवी कृपेचा नेत्र, दैवी नैत्र. ही ख्रिश्चन संज्ञा, संकल्पना आहे. ख्रिश्चन प्रतिमाशास्त्रानुसार, त्रिकोणात असलेला डोळा हे त्यांच्या 'होली ट्रिनिटी'चे – 'पवित्र त्रयी'चे – प्रतीक आहे. ख्रिस्ती परंपरेनुसार हा डोळा सर्वसाक्षी आहे. सारे काही पाहणारा आहे. प्रत्येक व्यक्तीचे विचार आणि कृती यांवर त्याची सातत्याने 'नजर' आहे. व्यवहारात हे नजर ठेवण्याचे कार्य करत होते, स्वतःस परमेश्वराचे प्रतिनिधी समजणारे राजे आणि धर्मगुरू. मध्ययुगातील सर्वशक्तिशाली धर्मसत्तेने या पाळतखोरीला अनोखे आयाम दिले. याचे एक लक्षणीय उदाहरण आहे, तेराव्या शतकातले.

***पाळतीचा धर्मादेश***

संदर्भासाठी सांगायचे, तर आपल्याकडे अद्याप संत ज्ञानेश्वरांचा जन्म झालेला नव्हता. देवगिरीच्या सिंहासनावर नुकताच जैत्रपालपुत्र सिंघण यादव आला होता. त्या काळात, इ.स. १२१५च्या नोव्हेंबरमध्ये पोप इनोसन्ट तिसरे यांनी धर्मगुरूंची महासभा बोलावली होती. लॅटरन हे रोममधल्या एका भागाचे नाव. तेथील एका भव्य प्रासादात ही महासभा झाली म्हणून तिला नाव पडले 'फोर्थ कौन्सिल ऑफ द लॅटरन'. या सभेस ठिकठिकाणचे बिशप, राजे आणि सम्राटांचे प्रतिनिधी वगैरे बरीच मंडळी उपस्थित होती. सभेपुढे अनेक विषय होते. त्यातील महत्त्वाचे विषय तीन. क्रुसेड म्हणजे धर्मयुद्ध, चर्चमधील संस्थात्मक सुधारणा आणि 'हेरेसी' म्हणजे अधर्मी, निधर्मी, धर्मविरोधी विचार यांचे काय करायचे?

११ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत यावर खल झाला. त्यातून ७१ धर्मनियम तयार करण्यात आले. त्यातील एक महत्त्वाचा नियम होता धर्मविरोधी, तथाकथित 'पाखंडी', यहुदी आणि कुष्ठरोगी यांच्याविषयीचा. या धर्मसभेतून असे घोषित करण्यात आले, की लोकांस 'मोक्ष' केवळ रोमन कॅथॉलिक चर्चच्या माध्यमातून मिळू शकतो. ज्यास हे अमान्य असेल त्याला राज्यसत्तेने शिक्षा करावी. त्याची मालमत्ता जप्त करावी. त्याला समाज–बहिष्कृत करावे. त्याने ख्रिश्चन धर्मविचार मान्य केले, तर पुन्हा समाजात घ्यावे. नाही केले, तर मारून टाकावे. सरदार–दरकदार वर्गाने यात हयगय केली, तर त्यांनाही शिक्षा करावी. पदच्युत करावे आणि त्यांच्या जागी सच्च्या कॅथॉलिक व्यक्तीस बसवावे.

आता यातील कुष्ठरोगी पटकन ओळखता येतील. पण यहुद्यांचे काय? त्यासाठी या धर्ममार्तंडांनी असा नियम केला, की यहुदींनी वेगळी वस्त्रे घालावीत. विसाव्या शतकात हिटलरने याचाच कित्ता गिरवला होता. यहुद्यांनी त्यांच्या घरा–दारावर, दंडावर डेव्हिडचा तारा लावावा, अशी सक्ती त्याने केली होती. मात्र एखाद्या व्यक्तीचे विचार धर्मविरोधी आहेत, हे कसे ओळखणार? जॉर्ज ऑर्वेल यांच्या भाषेत सांगायचे, तर हा 'थॉट क्राइम' कसा पकडणार? या धर्मसभेने त्यावर मार्ग काढला, की बिशपांच्या प्रतिनिधींनी वर्षातून एकदा त्यांच्या विभागातील सर्व चर्चमध्ये जायचे. लोकांना विचारायचे, की येथे कोणी सर्वसामान्य धार्मिकाहून वेगळे वर्तन करीत आहे का? धार्मिक गोष्टींच्या संदर्भात कोणी गुप्तबैठका घेत आहे का? यावर तुम्ही बारीक लक्ष ठेवा. असे लोक असतील त्यांची नावे चर्चला, अधिकाऱ्यांना सांगा. ते प्रत्येक धार्मिकाचे परमकर्तव्य आहे.

थोडक्यात, हे धर्ममार्तंड सामान्य माणसांना एकमेकांवर पाळत ठेवण्यास सांगत होते. मराठीत ज्यास चुगली, चहाडी असे म्हणतात, ते करावयास सांगत होते. मध्ययुगीन युरोपातील धर्म आणि सत्तेच्या अभ्यासक, इतिहासकार ॲमन्डा पॉवर यांनी त्यांच्या 'अंडर वॉचफूल आइज' या निबंधामध्ये याबाबत सखोल मांडणी केली आहे. ते बहुधा आधुनिक धर्ममार्तंडांना पचलेले नाही. परिणामी, हा निबंध निदान भारतात तरी निर्बंधित असल्याचे दिसते. त्या मध्ययुगातील धर्मसत्तेशी आजच्या 'मास सर्व्हेलन्स'चा धागा जोडलेला असल्याचे त्यांना या निबंधातून दाखवून दिले आहे.

***पाळतीचे पर्व***

अमेरिकेतील 'मॅकार्थीझम'मध्ये हाच धागा दिसतो. पहिल्या आणि दुसऱ्या अशा दोन्ही महायुद्धांच्या मागेपुढे अमेरिकेत 'रेड स्केअर' म्हणजे कम्युनिस्टांविरोधातील द्वेषाची आणि भयाची लाट निर्माण करण्यात आली होती. मॅकार्थीझम हे त्याचेच दुसरे नाव. त्या काळात तेथील सरकारी समित्या कम्युनिस्टांना वा कम्युनिस्टांचे सहानुभूतीदार असल्याच्या निव्वळ संशयावरून कोणालाही 'सपीना' धाडत असत. एकदा त्या व्यक्तीला असे बोलावणे आले, की संपले. त्याचे जीवन उद्ध्वस्त झालेच



*चहुबाजूंनी पाळतशाही आपले हातपाय पसरत असली तरीही खासगीपणाच्या हक्काची जाणीव तीव्र असल्याने अमेरिकेत स्नोडेन आणि मॅनिंगसारखे धाडसी लोक अवतरतात...*

म्हणून समजा. ओपनहायमर, बर्टोल्ट ब्रेख्त, चार्ली चॅप्लीन यांच्यासारखे मातब्बरही सुटले नव्हते यातून. तो काळ असा होता, की शेजारी शेजाऱ्यांवर पाळत ठेवू लागले होते. कोण काय बोलते, कोण कसे वागते याच्या सरकारी अधिकाऱ्यांकडे चुगल्या करू लागले होते. कर्मचाऱ्यांच्या 'सरकारनिष्ठेच्या चाचण्या' घेतल्या जात होत्या.

सामाजिक पाळतीचा असाच एक प्रकार मध्ययुगीन इंग्लंडमध्ये आढळतो. 'फ्रँकप्लेज' म्हणत त्यास. यात गावातील दहा-दहा पुरुषांचे गट केले जात. त्यांना 'टायथिंग' म्हणत. त्या गटातील प्रत्येकाने इतरांवर नजर ठेवायची. त्यातील कोणी काही 'वाईट साईट' केले की त्याची खबर अधिकाऱ्यांना द्यायची. कोणी 'गुन्हा' वगैरे केला, तर त्या संशयिताला पकडून द्यायचे. समजा नाही दिले, तर त्या गटातील बाकीच्या सगळ्यांना दंड.

***दिशा प्रबोधनाची***

एकंदर, संस्कृती पाश्चात्य असो वा पौर्वात्य, त्यात खासगीपणाच्या – आज आपण जे मानतो त्या – मूल्यास किंमत नव्हती. मुळात तेथे व्यक्तीलाच व्यक्ती म्हणून किंमत नव्हती. त्यामुळे आजच्या व्याख्येने व्यक्तीस्वातंत्र्य वगैरे गोष्टी फारच दूर होत्या. एरिक फ्रॉम यांच्यासारखे विचारवंत तर अशी मांडणी करतात, की त्या मध्ययुगीन समाजात 'अद्याप 'व्यक्ती' अस्तित्वातच आलेली नव्हती. मनुष्य अजूनही प्राथमिक बंधनांनीच जगाशी जखडलेला होता.' काहीही असो, त्या समाज-समूहातील माणसाला खासगीपणा, गोपनीयता यांचा स्पर्शही झालेला नव्हता. तो जो काही विचार होता, तो केवळ सत्ताधीशांपुरता – राजे आणि धर्मगुरू यांपुरता – मर्यादित होता. यात बदल होत गेला, तो मध्ययुगाच्या उत्तरकालात. त्याची कारणे अर्थातच त्या समाजाच्या बदललेल्या अर्थकारणात होती. त्यातून निर्माण झालेल्या सांस्कृतिक घडामोडींमध्ये दडलेली होती. प्रॉटेस्टंट बंडात, मार्टिन ल्यूथरने व्यक्तीच्या सद्सद्विवेकबुद्धीला धर्मशास्त्राच्या आज्ञांच्या वरचे स्थान दिले, त्या विचारांत त्याची मुळे होती. त्या खोलात जाण्याचे येथे कारण नाही. येथे आपण एवढे लक्षात घेतले, तरी पुरे, की युरोपात अवतरलेल्या प्रबोधन – रेनेसाँ – युगाने व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधांत मोठी उलथापालथ केली. युरोपात आधुनिक व्यक्तित्ववादास प्रारंभ झाला. व्यक्तीचे स्वातंत्र्य, त्याचे हक्क, अधिकार यांविषयीची तत्त्वचर्चा सुरू झाली. खासगीपणा हा त्यातीलच एक हक्क.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर दोनच वर्षांनी जन्मलेला इंग्लिश तत्त्वज्ञ जॉन लॉक याच्या तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव आधुनिक व्यक्तिवादावर पडलेला आहे. याच्या मुळाशी होता व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकाराचा सिद्धांत. जॉन लॉक हा या सिद्धांताचा मोठा पुरस्कर्ता. हा सिद्धांत सांगतो, की माणूस हा जन्मतःच स्वतंत्र असतो आणि एक व्यक्ती म्हणून त्याला निसर्गतः काही अधिकार मिळालेले असतात. ते काढून घेण्याचा हक्क कोणालाही नाही. लॉकने या नैसर्गिक अधिकारात व्यक्तीच्या खासगी मालमत्तेचाही समावेश केला. 'माणसाचे घर हा त्याचा किल्ला आहे' हा सिद्धांत – 'कॅसल डॉक्ट्रिन' – हा याचाच भाग.

हॉलिवूडमधील गुन्हेगारीपटांच्या चाहत्यांना हा प्रसंग चांगलाच परिचयाचा असेल. एफबीआयचे एजंट एखाद्या गुन्हेगाराच्या मागावर असतात. तो कुठेतरी उभा असल्याचे दिसते. ते लांबूनच ओरडतात, 'एफबीआय. स्टॉप.' तो गुन्हेगार पळतो. किंवा कुणा गुन्हेगाराच्या घरात पोलीस 'एनवायपीडी एनवायपीडी' असे ओरडत शिरतात. कारण तसा नियमच आहे. त्यास 'नॉक अँड अनाऊन्स' नियम म्हणतात. त्याची उत्पत्ती झाली त्या इंग्लिश न्यायव्यवस्थेतील 'कॅसल डॉक्ट्रिन'मधून. हा १६०४मध्ये एका न्यायालयीन खटल्यातून – 'सिमेन्स केस'मधून – पुढे आलेला सिद्धांत. आपल्याकडील पेशवाईच्या काळात, १७६३मध्ये तिकडे ब्रिटनमध्ये एक खासदार होऊन गेले विल्यम पिट नावाचे. त्यांनी संसदेतील एका भाषणात मोजक्या शब्दांत या सिद्धांताचे सार मांडले आहे. ते म्हणाले होते, 'सर्वात गरीब माणूससुद्धा त्याच्या झोपडीमध्ये राजसत्तेच्या सर्व शक्तीला आव्हान देऊ शकतो. ती झोपडी

कमकुवत असली, तिचे छप्पर हलत असले, आत वारा शिरत असला, वादळ घुसत असले, तरीही त्या उद्ध्वस्त झोपडीचा उंबरा ओलांडण्याचे धाडस राजाची शक्ती करू शकत नाही.' 'असशील तू तुझ्या घरचा राजा,' हे उद्गार या सिद्धांताने खरे ठरतात! घर ही व्यक्तीची खासगी मालमत्ता. त्यात त्याला खासगीपणाचा हक्क. त्यावर आक्रमण करण्याचा कोणासही अधिकार नाही, असा या सिद्धांताचा सोपा अर्थ आहे. अमेरिकेत आजही हे तत्त्व – अपवाद बरेच आहेत त्यास, पण – पाळले जाते. मात्र व्यक्तीचा खासगीपणा एक 'हक्क' म्हणून प्रस्थापित होण्यात तेथेही मध्ये बराच काळ जावा लागला.

डिसेंबर १८९०च्या 'हार्वर्ड लॉ रिव्ह्यू' या पत्रिकेत प्रसिद्ध झालेला एक लेख यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला. अमेरिकेच्या विधी इतिहासातील सर्वांत प्रभावशाली निबंध म्हणून गौरवल्या गेलेल्या या लेखाचे नाव आहे – 'राइट टु प्रायव्हसी'. लेखक – सॅम्युएल डी. वॉरेन द्वितीय आणि लुईस ब्रँडाइस. ते म्हणतात, 'पूर्वी व्यक्तीचे जीवन आणि मालमत्ता यांवरील शारीरिक ताकद आणि शस्त्रांच्या साह्याने ('व्ही एट आर्मीस') केल्या जाणाऱ्या बलात्काराच्या बाबत कायदा उपाय सांगत होता. त्या वेळी 'जीवनाचा अधिकार' केवळ विविध प्रकारच्या मारहाणीपासून व्यक्तीचे संरक्षण करण्यापुरताच मर्यादित होता. तेव्हा स्वातंत्र्य म्हणजे प्रत्यक्ष बंधनांपासून मुक्तता आणि मालमत्तेचा अधिकार म्हणजे व्यक्तीच्या जमिनी आणि जनावरांचे संरक्षण, एवढ्यापुरताच मर्यादित होता हळूहळू या कायदेशीर अधिकारांची व्याप्ती वाढत गेली आणि आज 'जीवनाचा अधिकार' याचा अर्थ जीवनाचा आनंद घेण्याचा, एकले राहण्याचा अधिकार असा झाला आहे.' यातील एकले राहण्याचा अधिकार ही संज्ञा लक्षणीय आहे. त्यात खासगीपणा, गोपनीयता, स्वातंत्र्य, संरक्षण असे सारेच अंतर्भूत आहे.

या लेखात पुढे या लेखकद्वयीने एक भीती व्यक्त केली होती. ते म्हणतात, 'व्यक्तीच्या संरक्षणासाठी आणि एकले राहण्याचा अधिकार सुरक्षित राहावा यासाठी पुढची पावले उचलण्याची गरज आहे. अलीकडे लागलेले शोध आणि व्यवसाय पद्धती यांमुळे याकडे लक्ष देणे गरजेचे बनले आहे. तत्काळ निघणारी छायाचित्रे आणि वृत्तपत्र उद्योग हे खासगी व कौटुंबिक जीवनाच्या पवित्र क्षेत्रात घुसखोरी करू लागले आहेत. 'वस्त्रकपाटांमधली कुजबूजही घरांच्या छतावरून जाहीर केली जाईल', अशी भविष्यवाणी केली जाते. आज अनेक यांत्रिकी साधनांमुळे ती भविष्यवाणी खरी ठरेल अशी भीती निर्माण झालेली आहे.' १३५ वर्षांपूर्वी व्यक्त करण्यात आलेली ही भीती आजही तितकीच खरी आहे. या लेखातून त्यांनी 'आपला कायदा गोपनीयतेचा अधिकार मान्य करील का? खासगीपणाचे संरक्षण करील का?' असा सवाल केला होता. याबाबत न्यायालयांनी लवकरच विचार करावा असे आवाहन केले होते. आणखी काही वर्षांनी तो हक्क, अधिकार प्रत्यक्षात येणार होता.

***खासगीपणाच्या हक्काची लागवड***

तर या अशा विचारांतून, वैचारिक घुसळणीतून पाश्चात्य समाजात खासगीपणाच्या हक्काची पक्की लागवड झाली. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र आणि तिचे घर हा तिचा किल्ला, हे एकदा पक्के झाले, की मग 'नॉक अँड अनाऊन्स' हा नियम केवळ राज्ययंत्रणेपुरताच राहात नाही. शेजाऱ्यांनीही त्या व्यक्तीच्या घरी जायचे, तर आधी कळवून जायला हवे, ही जाणीव यातून उतरत जाते. प्रत्येकाचा वैयक्तिक अवकाश जपणे ही स्वाभिवकता बनून जाते. त्यावर आक्रमण हा कायद्याने गुन्हा तर ठरतोच, पण ते असभ्य, असंस्कृत मानले जाते. पाश्चात्य समाजाची मानसिक जडणघडण या पद्धतीने होत गेली. या अशाच समाजात स्नोडेन जन्मू शकतो. व्यक्तीच्या स्वातंत्र्याची चाड असलेल्या व्यक्तींमधूनच डंकन कॅम्पबेल यांच्यासारखा पत्रकार वा चेल्सिया मॅनिंग यांच्यासारखा जागल्या पुढे येऊ शकतो. पण म्हणून हा समाज पाळतखोरीपासून मुक्त झाला असे म्हणता येईल?

तसे होत नसते. खरेतर तेथे स्नोडेन वा मॅनिंग 'आहेत' यातच या प्रश्नाचे उत्तर आहे. पाळतखोरी ही राज्ययंत्रणेची, सत्ताधाऱ्यांची गरज आहे. आपल्या पूर्वसूरींनी या बाबत आखून दिलेल्या रस्त्यावरूनच ते चालत आहेत. कालानुरूप तंत्रे बदलली, गरजा विस्तारल्या. 'गरजवंत'ही वाढले. वेढिले विश्वमंडळा हे आजचे तिचे अक्राळविक्राळ स्वरूप आहे. ते किती भयंकर आहे याची जाणीव पहिल्यांदा जगाला झाली, ती १९७६मध्ये. मोठी थरारक कहाणी आहे, ती...

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार–संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉः भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**
**संपर्कः** ravi.amale@icloud.com

# इंडो-युरोपः विकासाच्या दोन भिन्न वाटा एकमेंकात मिसळताना



हितेश पोतदार

अर्थबोध



**मा**णसं उपजीविकेसाठी काय निर्माण करतात? कसं करतात? कुणासाठी करतात? आणि त्या प्रक्रियेत कोणाचं श्रममूल्य कसं वापरलं जातं? यावर समाजाचं रूप ठरत जातं. म्हणूनच उत्पादन-संबंध हे केवळ आर्थिक व्यवहार नसून, ते सामाजिक नातेसंबंध घडवणारं, सत्ता निर्माण करणारं आणि मानवी आयुष्याला दिशा देणारं मूलभूत क्षेत्र आहे. याच कारणामुळे इतिहासाकडे पाहण्याची राजकीय अर्थशास्त्राची पद्धत (म्हणजेच इथे ऐतिहासिक भौतिकवाद) महत्त्वाची ठरते. ती आपल्याला इतिहास म्हणजे केवळ राजे, युद्धं किंवा धोरणांची मालिका म्हणून नव्हे, तर उत्पादनसंबंधांच्या बदलांचा इतिहास म्हणून पाहायला शिकवते. हा इतिहास म्हणजे भूतकाळात अडकून राहणं नाही, तर तो आजचा वर्तमान समजून घेण्यासाठीचा एक आरसा आहे- history of the present...

पृथ्वी 'जड' आहे. म्हणजे भौतिक. मटेरियल. आणि तिच्यावर उगवलेली सगळी सजीवसृष्टीसुद्धा मुळात भौतिकच आहे. आपण ज्या अवकाशात, ज्या परिस्थितीत, ज्या पर्यावरणात स्वतःला सापडतो, ते आपल्या येण्याच्या आधीच अस्तित्वात होते, असं आपण म्हणतो. पण ते आपोआप, निर्विकारपणे निर्माण झालेलं नाही. त्यामागे असंख्य जैविक, भौगोलिक आणि ऐतिहासिक प्रक्रिया कार्यरत आहेत. या भौतिक अवकाशात आपण जगतो. काम करतो. श्वास घेतो. आणि नकळत आपलं मन, आपली भावना, आपली जाणीव घडत जाते.

एखाद्या क्षणी आपल्याला सुरक्षित का वाटतं? आपलं आयुष्य जगण्यालायक वाटतं का? की एखाद्या अदृश्य ताणाखाली आपण सतत आक्रसलेले असतो? हे प्रश्न बहुतेकदा आपण मनाशी, विचारांशी, चेतनेशी जोडतो. पण हे सगळं केवळ आपल्या डोक्यात घडतं, असं खरंच आहे का?

थोडं थांबून पाहिलं, तर लक्षात येतं की आपल्या भावना, आपली मानसिकता, अगदी आपली स्वप्नंसुद्धा आपण ज्या भौतिक परिस्थितीत असतो, त्यावर खोलवर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, जर आपण एखाद्या गलिच्छ, गर्दीच्या, दमछाक करणाऱ्या भोवतालात असलो, तर मन अस्वस्थ होतं. विचार तुटक होतात. भविष्य धूसर वाटतं. त्याउलट, मोकळ्या, स्वच्छ, श्वास घेता येईल अशा अवकाशात आपण अधिक शांत, उत्साही आणि शक्यतांकडे पाहणारे होतो.

म्हणजेच, आपलं सजग, सचेत अस्तित्व हे कुठल्यातरी अमूर्त चेतनेतून नाही, तर ठोस भौतिक परिस्थितीतून घडत असतं.

आपण काय आहोत? कसे विचार करतो? कशाची भीती वाटते? आणि कशाची आशा बाळगतो? हे सगळं आपण ज्या भौतिक जगात जगतो, काम करतो आणि उत्पादन करतो, त्याच्याशी घट्ट विणलेलं आहे. आणि ही भौतिक परिस्थिती निर्माण होते कशातून? ती निर्माण होते आर्थिक क्रियांतून म्हणजे उत्पादनातून.

या लेखात आपण याच दृष्टीने जगाच्या आणि पर्यायाने भारताच्या, महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासाकडे पाहणार आहोत. युरोपातून सुरू झालेली कथा म्हणून नव्हे, तर भारतासह जगाच्या विविध भागांत कशी उत्पादनपद्धती, व्यापार, सत्ता आणि श्रम यांची गुंफण बदलत गेली, हे पाहण्याचा हा एक प्रयत्न असेल. प्राचीन आणि मध्ययुगीन भारतातील उत्पादनसंबंधांपासून, व्यापारी आणि वाणिज्य भांडवलाच्या उदयापर्यंत आणि पुढे वसाहतवाद व आधुनिक भांडवलशाहीपर्यंत या दीर्घ प्रवासाचा मागोवा घेण्याचा हा एक प्रयत्न आहे.

***भांडवलशाहीपूर्व उत्पादनसंबंध : भारत आणि जग***

माणसाचा इतिहास म्हणजे फक्त कल्पनांचा किंवा महान विचारवंतांचा इतिहास नव्हे. तो मुळात लोकांच्या जगण्याचा, सृजनाचा, पोट भरण्याच्या प्रयत्नांचा इतिहास आहे. माणसं कशी जगली, काय खाल्लं, कुठे राहिली आणि एकमेकांशी कशी जोडली गेली? यातूनच समाजाची रचना घडत गेली. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर माणसांनी सामूहिक श्रमांद्वारे उपजीविकेची साधनं निर्माण केली आणि जेव्हा उत्पादनाची साधनं बदलली, तेव्हा त्या साधनांभोवती गुंफलेले सामाजिक नातेसंबंधही बदलले.

मानवाच्या इतिहासाचा फार मोठा भाग, जवळपास नव्वद टक्के, हा भांडवलशाहीपूर्व काळात गेला. या दीर्घ टप्प्यात समाज प्रामुख्याने सामुदायिक जीवनपद्धतींवर उभा होता. शिकारी, संकलन आणि नंतर प्राथमिक शेती या सगळ्या टप्प्यांवर संसाधनांवर सामायिक हक्क होता. वर्ग नव्हते, राज्य नव्हते आणि शोषणाची 'संस्थात्मक' यंत्रणाही नव्हती. ही अवस्था आपण 'आदिम साम्यवाद' (primitive communism) म्हणून ओळखतो. जिथे सहकार्य हे अस्तित्वाचं मूलभूत तत्त्व होतं.

सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी घडलेली 'नवपाषाण क्रांती' म्हणजे शेतीचा उदय हा निर्णायक वळणबिंदू ठरला. शेतीमुळे स्थिर वस्ती शक्य झाली. गावं निर्माण झाली. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे अधिशेष (surplus) (किंवा नफा म्हणूयात) निर्माण झाला. या अधिशेषावर नियंत्रण मिळवणं, तो गोळा करणं आणि त्याचं पुनर्वितरण करणं यातूनच सामाजिक भेद जन्माला आले. सुरुवातीला हे भेद 'मुखिया' किंवा 'प्रमुख' अशा स्वरूपात होते. पण ते अजूनही समुदायाशी घट्ट बांधलेले होते.

पण जेव्हा नगरे उभी राहिली, जसे– मेसोपोटेमिया, इजिप्त, सिंधू खोरे, चीन, तेव्हा अधिशेषावर ताबा मिळवणारा एक अल्पसंख्याक वर्ग तयार झाला. इथूनच वर्गसमाज आणि राज्य जन्माला आलं. राज्य म्हणजे सर्वसमाजाचं प्रतिनिधित्व करणारी संस्था नव्हे, तर अल्पसंख्याकांच्या हितासाठी



*युरोपात गुलामगिरीने मूळ धरले, तेव्हा भारतात विविध घटकांच्या श्रमावर नियंत्रण ठेवणारी सामाजिक व्यवस्था रुजली...*

अधिशेष काढून घेणारी, मुख्य म्हणजे, तो क्रम टिकवून ठेवणारी एक दडपशाही यंत्रणा होती. भारतात हा प्रवास वेगळ्या भौतिक अटींमध्ये दाखल झाला. सिंधू खोऱ्यानंतरचा मोठा टप्पा म्हणजे, गंगेच्या मैदानाचं शेतीकरण होणं (लोखंडी अवजारांच्या मदतीने). इथे, राज्यनिर्मिती ही गुलामगिरीवर आधारलेली नव्हती, जशी ग्रीस–रोममध्ये होती. त्या ऐवजी भारतात श्रमावर नियंत्रण ठेवण्यासाठी जातव्यवस्था (वर्ण–जाती) ही एक ऐतिहासिक यंत्रणा म्हणून विकसित झाली.

जात ही केवळ सामाजिक किंवा धार्मिक रचना नव्हती, तर ती श्रमांचं वाटप करणारी आणि श्रमांचं अवमूल्यन करणारी भौतिक संस्था होती. शूद्र वर्णाच्या माध्यमातून नातेविरहित श्रम (non-kin labour) समाजात आणले गेले. यामुळे शेतीचा विस्तार शक्य झाला, पण त्याचबरोबर श्रम हे जन्माशी बांधले गेले. युरोपमध्ये जसा सरंजामी काळात शेतकरी 'दास/वेठबिगार' (Surf) म्हणून एखाद्या जमीनदाराशी वैयक्तिकरित्या बांधला गेला, तसं भारतात घडलं नाही. इथे श्रमाचं नियंत्रण कायद्याने नव्हे, तर विधी, रूढी आणि सामाजिक बहिष्काराने केलं गेलं.

भूमध्यसागरी प्रदेशात (ग्रीस आणि रोममध्ये) उत्पादनाचा मोठा आधार गुलामगिरी होता. युद्धात पकडलेले, नातेविरहित, बहुतेक वेळा वाळीत घातलेली समाजाबाहेरची लोक यांच्या श्रमावर अधिशेष उभा राहिला. गुलाम हा उत्पादनाचं साधन होता. त्याचं पुनरुत्पादन समाजाच्या जबाबदारी कक्षेत नव्हतं. या व्यवस्थेत राज्य आणि शोषक वर्ग वेगळे नव्हते. ते एकमेकांत मिसळलेले होते. पण याच गुलामगिरीच्या मर्यादांमुळे रोमन अर्थव्यवस्था पुढे तांत्रिक नवकल्पनांकडे वळली नाही. अधिशेष वाढवण्यासाठी श्रम अधिक पिळणे हाच मार्ग राहिला.

रोम कोसळल्यानंतर युरोप सरंजामशाहीकडे वळतो. इथे गुलामाऐवजी दास/वेठबिगार येतो. म्हणजेच जमिनीला बांधलेला शेतकरी–मजूर. इथे शोषण परस्पर व्यक्तिपातळींवरील सबंधांतून घडतं. प्रभू–दास, जमीन–बेगारी, सेवा–संरक्षण. राज्य कमकुवत असतं. सत्ता विखुरलेली असते. युरोपियन सरंजामशाही ही एका अर्थाने राजकीय शक्ती विखुरणारी व्यवस्था होती, जिथे प्रभू अनेकदा राज्यसत्तेच्या विरोधात उभा राहत असे.

भारतात मात्र हा प्रवास वेगळ्या वाटेने गेला. इथे न गुलामगिरी केंद्रस्थानी होती, न दास/वेठबिगारी. त्या ऐवजी श्रमावर कायमस्वरुपी नियंत्रण ठेवण्यासाठी एक दीर्घकाळ टिकणारी सामाजिक यंत्रणा विकसित झाली. अनेक अभ्यासक भारताच्या भांडवलशाहीपूर्व समाजरचनेला 'कर आधारित' किंवा 'tributary' उत्पादनपद्धती म्हणून समजतात. या पद्धतीत राज्य हेच मुख्य शोषक असतं. जमिनीची 'खरी' मालकी सार्वभौमाकडे आहे, ही एक कायदेशीर कल्पना होती. प्रत्यक्षात गावं आपलं अंतर्गत उत्पादन आणि पुनरुत्पादन करत होती. पण अधिशेष थेट राज्य किंवा त्याच्या प्रतिनिधींमार्फत काढून घेतला जात होता. मुघल काळात मनसबदार आणि जागीर व्यवस्था याचाच भाग होती. इथे एक स्वतंत्र, वारसागत जमीनदार वर्ग युरोपसारखा उभा राहिला नाही.

याच कारणामुळे भारतात वेठबिगारी युरोपात होती तशीच दिसून येत नाही. शोषण वैयक्तिक गुलामगिरी किंवा वेठबिगारीच्या स्वरूपात नव्हे, तर आर्थिक आणि सामाजिक अवलंबित्वाच्या स्वरूपात होतं. पुढे व्यापारी आणि सावकार वर्ग या दडपणात शिरला. बी–बियाणं, अन्नधान्य, सण–उत्सव किंवा दुष्काळाच्या काळात दिलेली आगाऊ मदत हळूहळू साखळी बनली. ज्यात शेतकरी नावाला स्वतंत्र राहिला, पण त्याचा संपूर्ण अधिशेष 'व्याज' आणि कर्जफेडीत अडकत गेला.

तरीसुद्धा, भांडवलशाहीपूर्व भारत हा स्थिर समाज नव्हता. गंगेच्या मैदानातील दुसरं नागरीकरण, व्यापारी संघटना (श्रेणी) आणि बौद्ध–जैन परंपरांचा उदय हे सगळं वाढत्या व्यापाराचं द्योतक होतं. मौर्य साम्राज्यात राज्याने खाणी, व्यापार आणि वसाहती यावर थेट नियंत्रण ठेवून उत्पादन वाढवलं. मुघल काळात भारतात अत्यंत सजीव अर्थव्यवस्था होती. मोठ्या शहरांमध्ये उत्पादन, उपभोग आणि चलनप्रवाह प्रचंड होता.

मात्र या संपन्नतेतून युरोपसारखी क्रांतिकारी बूर्ज्वा वर्गनिर्मिती झाली नाही. भारतीय व्यापारी वर्ग राज्याशी संघर्ष करण्याऐवजी त्याच्यावर अवलंबून राहिला. जातव्यवस्थेने व्यापाऱ्यांमधील ऐक्य रोखलं. आणि राजसत्तेच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित केले गेले नाहीत. अखेरीस, अनेक व्यापाऱ्यांनी स्थैर्यासाठी परकीय सत्तेला पाठिंबा दिला आणि हाच निर्णय पुढे निर्णायक ठरला.

ब्रिटिश वसाहतवादाने भारताच्या या ऐतिहासिक प्रवासाला जबरदस्त धक्का दिला. यंत्रमागांमुळे वस्त्रोद्योग उद्ध्वस्त झाला. अधिशेष बाहेर वाहून गेला. भारत भांडवलशाहीत औद्योगिक राष्ट्र म्हणून नव्हे, तर औपचारिकरीत्या अधीन असलेला श्रमपुरवठादार म्हणून सामील झाला. ही भांडवलशाही होती. पण तिचे फायदे भारताला नव्हते.

***राज्य, श्रम आणि अधिशेष : भारत व युरोपचे भिन्न मार्ग***

या सगळ्या कारणांमुळे भारतात दास/वेठबिगारी युरोपात होती तशीच दिसून येत नाही. शोषण हे वैयक्तिक गुलामगिरी किंवा कायदेशीर बंधनाच्या स्वरूपात नव्हे, तर आर्थिक आणि सामाजिक अवलंबित्वाच्या जाळ्यातून घडत होतं. शेतकरी नावाला स्वतंत्र होता, पण कर, सावकारी आणि जातीय बंधनांमुळे तो कायम दबावाखाली राहायचा. उत्पादन थांबवणं, स्थलांतर करणं, किंवा सत्तेला थेट आव्हान देणं हे पर्याय प्रत्यक्षात फार मर्यादित होते.

या करआधारित व्यवस्थेचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे राज्य आणि समाज यांच्यातील नातं. युरोपमध्ये सरंजामशाहीच्या काळात राज्य तुलनेने कमकुवत होतं. प्रभूवर्गाकडे स्थानिक सत्ता होती आणि ते अनेकदा राजसत्तेच्या विरोधात उभे राहत. भारतात मात्र चित्र उलटं होतं. इथे राज्य ही केवळ एक राजकीय रचना नव्हती, तर अधिशेष गोळा करणारी मध्यवर्ती यंत्रणा होती. सत्ता विखुरलेली नव्हती तर ती केंद्राभोवती एकवटलेली होती. त्यामुळे समाजातील प्रमुख संघर्ष हे राज्याविरुद्ध नव्हे, तर राज्याच्या आत मनसबदार, जमीनदार आणि प्रादेशिक सत्तांमध्ये घडत.

तरीही, ही व्यवस्था म्हणजे केवळ शेतीवर आधारलेली स्थिर रचना नव्हती. उलट, मध्ययुगीन भारतात शहरं, बाजार आणि व्यापार प्रचंड वाढले होते. आग्रा, दिल्ली, लाहोर, अहमदाबाद, सुरत, ढाका ही शहरं फक्त राजकीय केंद्रं नव्हती तर ती उत्पादन, उपभोग आणि व्यापाराची केंद्रं होती. कापड, धातुकाम, जहाजबांधणी, निळी, मीठ, साखर या सगळ्यांचा व्यापार देशांतर्गतच नव्हे, तर आशिया, आफ्रिका आणि युरोपपर्यंत पोहोचलेला होता.

युरोपच्या तुलनेत इथे एक महत्त्वाचा फरक दिसतो. युरोपमध्ये मध्ययुगाच्या उत्तरार्धात व्यापारी वर्ग हळूहळू राज्याच्या बाहेर उभा राहू लागतो. शहरं स्वतंत्र सत्ता-केंद्रं बनतात. व्यापारी संघटना राजसत्तेला आव्हान देऊ लागतात. भारतात मात्र व्यापारी वर्गाची वाढ राज्याच्या सावलीत होते. व्यापारी संघटना (श्रेणी/गिल्ड्स) प्रशासनात सामील होतात. दरबार, सैन्य आणि उच्चवर्गीय उपभोग हेच त्यांच्या मुख्य बाजारपेठा राहतात. त्यामुळे संपत्ती वाढते, पण राजकीय स्वायत्तता निर्माण होत नाही.

इथे जातव्यवस्थेचाही परिणाम दिसतो. व्यापारी आणि कारागीर वर्ग आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले असले, तरी सामाजिकदृष्ट्या ते अनेक विभागांत विखुरलेले राहतात. एकसंध वर्ग म्हणून उभं राहणं, जसं युरोपमध्ये नंतर घडलं, इथे कठीण ठरतं. त्यामुळे युरोपप्रमाणे व्यापारी वर्ग क्रांतिकारी शक्ती न बनता स्थैर्य शोधणारा वर्ग बनतो. याच टप्प्यावर व्यापारी आणि सावकार वर्गाची भूमिका अधिक ठळक होते. उत्पादनासाठी बी-बियाणं, उपजीविकेसाठी अन्नधान्य किंवा संकटाच्या काळात रोख मदत या माध्यमातून शेतकरी आणि कारागीर वर्ग हळूहळू कर्जाच्या नाल्यात अडकत जातो. नावाला स्वतंत्र असलेला उत्पादक प्रत्यक्षात आपल्या श्रमाचा अधिशेष परतफेडीच्या आणि व्याजाच्या ओझ्याखाली गमावत राहतो. शोषण इथे थेट कोरड्या सक्तीने नव्हे, तर गरज, अभाव आणि अवलंबित्व यांतून घडतं.

हे सगळं असूनही, भांडवलशाहीकडे जाणारा तो निर्णायक वळणबिंदू जिथे उत्पादनपद्धतीच आमूलाग्र बदलते, तसे भारतामध्ये आतून घडत नाही. युरोपमध्ये सरंजामशाही संकटात सापडते, शेतकरी उठाव होतात, शहरं बंडखोर होतात आणि जुन्या नातेसंबंधांचा ऱ्हास होतो. भारतात मात्र करआधारित राज्यव्यवस्था ढासळते खरी, पण तिच्या जागी उभी राहणारी शक्ती आतील सामाजिक संघर्षातून नव्हे, तर बाहेरून येते. इथूनच इतिहास एका निर्णायक वळणावर येऊन थांबतो. जागतिक व्यापाराच्या नावाखाली, संरक्षणाच्या वचनाखाली, आणि स्थैर्याच्या आश्वासनाखाली वसाहतवादी सत्ता या आधीपासून अस्तित्वात असलेल्या रचनेत शिरते. म्हणूनच पुढचा निर्णायक टप्पा हा भांडवलशाहीचा उदय ठरतो. पण तो



*युरोपात गुलाम हा उत्पादन व्यवस्थेचे साधन बनला, अधिशेष वाढवण्यासाठी श्रमाची पिळवणूक करण्याची पद्धत रुजत गेली...*

युरोपसारखा अंतर्गत संकटे व अरिष्टातून येत नाही. तर भारतात ही प्रक्रिया सैंद्रियरित्या न घडता, बाहेरून येते. याचा अर्थ असाही नाही, की भारतात भांडवलशाहीचा उदय झाला नसता. परंतु वसाहतवाद हा इतिहासाचा रोख थांबवतो. इथल्या इतिहासाला नवीन वळण देतो. त्या अर्थाने येथील उत्पादनसंबंधही बदलतो.

***वसाहतवाद : जेव्हा दोन भिन्न इतिहास एकमेकांवर आदळतात***

वसाहतवाद म्हणजे एखाद्या यादृच्छिक दिवशी बाहेरून आलेल्या परक्यांनी सत्ता काबीज केली. ती इतकी सरळ गोष्ट नाही. तो एका क्षणात घडलेला अपघातही नव्हता. वसाहतवाद हा दोन भिन्न ऐतिहासिक प्रवासांचा हिंसक संगम होता. एकीकडे युरोप–जिथे भांडवलशाही आतून, अंतर्गत–संघर्षातून आणि उलथापालथींतून आकार घेत होती. आणि दुसरीकडे भारत–जिथे करआधारित राज्य, व्यापारी शहरं आणि श्रमावर नियंत्रण ठेवणाऱ्या सामाजिक रचना आधीच अस्तित्वात होत्या.

हा संगम एका पोकळीत आणि आकस्मिक काळात–अवकाशात घडलेला नव्हता. भारत हा कोणत्याही अर्थांनी 'स्थिर', 'अचल' किंवा 'इतिहासविरहित' समाज नव्हता. उलट, सतराव्या–अठराव्या शतकात भारत जागतिक व्यापारात घट्ट गुंतलेला होता. कापड, मसाले, निळी, धातू यांचा प्रवाह आशिया, आफ्रिका आणि युरोपपर्यंत पोहोचलेला होता. शहरं गजबजलेली होती; कारागिरी प्रगत होती. आणि व्यापारी–सावकार वर्गाकडे मोठ्या प्रमाणावर भांडवल साठलेलं होतं.

पण या सगळ्या हालचाली करआधारित राज्यरचनेच्या चौकटीत चालत होत्या. जसं आपण यापूर्वी पाहिलं की अधिशेषाचं मुख्य नियंत्रण राज्याकडे होतं. आणि व्यापारी वर्ग राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होण्याऐवजी स्थैर्य शोधत होता. हीच रचना पुढे निर्णायक ठरली. कारण जेव्हा राज्यसत्ता प्रादेशिक संघर्ष, युद्धं, महसूल यंत्रणेचा ताण यांमुळे कमकुवत होऊ लागली, तेव्हा अनेक सामाजिक गटांनी आतून बदल घडवण्याऐवजी बाहेरून येणाऱ्या शक्तीकडे आशेने पाहिलं.

युरोपियन व्यापारी कंपन्या, विशेषतः इंग्लंडची कंपनी–इस्ट इंडिया कंपनी, याच फटीत शिरल्या. सुरुवातीला त्या व्यापाराच्या नावाखाली आल्या. संरक्षण देण्याचं, स्थैर्य राखण्याचं, आणि 'नियमित व्यवहार' घडवण्याचं आश्वासन दिलं गेलं. अनेक व्यापारी, सावकार आणि स्थानिक सत्ताधारी गटांनी याला पाठिंबा दिला, कारण त्यांना वाटलं की ही नवी शक्ती त्यांच्या मालमत्तेला, व्यापाराला आणि नफ्याला सुरक्षित करेल. पण इथेच दोन इतिहासांचा खरा संघर्ष सुरू झाला.

युरोपातून आलेली ही सत्ता केवळ व्यापारी नव्हती. ती औद्योगिक भांडवलशाहीचं प्रतिनिधित्व करत होती. यंत्रांवर आधारित उत्पादन, मोठ्या प्रमाणावर मालनिर्मिती आणि जागतिक बाजारपेठेवर ताबा या सगळ्याची गरज तिला होती. भारतात मात्र उत्पादन अजूनही कारागिरीवर, हातमागावर आणि श्रमप्रधान पद्धतींवर आधारित होतं. त्यामुळे भारत हा औद्योगिक प्रतिस्पर्धी नव्हे, तर कच्चा माल पुरवणारा आणि तयार माल खरेदी करणारा बाजार म्हणून उपयुक्त ठरला.

वसाहतवादी राज्याने ही दिशा मुद्दाम घडवली. भारतात उद्योग उभे राहावेत, व्यापारी वर्गाने उत्पादनात गुंतवणूक करावी किंवा स्थानिक भांडवल साठवण वाढावी यासाठी कोणतीही राजकीय मोकळीक दिली गेली नाही. उलट, कररचना, कायदे आणि व्यापारधोरणं अशा पद्धतीने आखली गेली की भारतीय उत्पादन पद्धती दाबल्या गेल्या आणि युरोपियन मालासाठी बाजार खुला राहिला.

याचा सर्वात मोठा फटका बसला तो कारागीर आणि श्रमिक वर्गाला. कापड उद्योगाचं उदाहरण पुरेसं बोलकं आहे. यंत्रमागावर बनलेलं स्वस्त कापड भारतात येऊ लागलं आणि हातमागावर जगणाऱ्या लाखो कुटुंबांचा उपजीविकेचा आधार ढासळला. पण हे केवळ 'उद्योग नष्ट होणं' नव्हतं तर ही एक संपूर्ण सामाजिक उलथापालथ होती. भारतीय शहरांतील उत्पादन खुंटलं. ग्रामीण भागावर ताण वाढला आणि उपजीविकेच्या शोधात लोक कर्ज, स्थलांतर आणि असुरक्षित श्रमांकडे ढकलले गेले.

या सगळ्या प्रक्रियेत वसाहतवादी राज्याने भारतातील आधीच्या करयंत्रणेचा वापर केला. पण तिचा उद्देश बदलला. पूर्वी अधिशेष शहरं, दरबार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेत फिरत होता. आता तो थेट बाहेर वाहू लागला. करातून गोळा झालेला पैसा भारतीय समाजात परत गुंतवला गेला नाही. तो सैन्य, प्रशासन आणि साम्राज्याच्या गरजांसाठी वापरला गेला. म्हणजेच, भारताची भौतिक संपन्नता भारताच्या पुनरुत्पादनासाठी नव्हे, तर परकीय भांडवलाच्या वाढीसाठी वापरली गेली.

याच अर्थाने वसाहतवाद हा केवळ परकीय सत्तेचा काळ नव्हता. तो भारताच्या ऐतिहासिक प्रवासाचा जाणीवपूर्वक खंडित केलेला टप्पा होता. भांडवलशाहीकडे जाण्याची जी शक्यता आतून, वेगळ्या मार्गाने आणि वेगळ्या अटींवर उभी राहू शकली असती, ती या धडकेत मोडीत निघाली. भारत भांडवलशाहीत सामील झाला, पण निर्माता म्हणून नव्हे तर अधीन घटक म्हणून.

आणि याच तुटलेल्या इतिहासाचे पडसाद आपल्याला आजही दिसतात. जसे, असुरक्षित श्रम, कर्जावर उदरनिर्वाह चालवणं, उत्पादनापेक्षा वितरणावर अवलंबून असणारी अर्थव्यवस्था विकसित होणं आणि सतत 'स्थैर्य' शोधणारा समाज अधिक विखुरलेला असणं. पुढचा प्रश्न मग स्वाभाविकपणे उभा राहतो: ही तूट कशी समजून घ्यायची? आणि आजच्या भांडवलशाही वास्तवाशी तिचं नातं काय? इथून पुढचा प्रवास आधुनिक भांडवलशाहीकडे वळतो आणि त्या वर्तमानाकडे वळतो, ज्यात आपण आज जगतो.

***वर्तमानाकडे वळताना***

या प्रवासातून एक गोष्ट स्पष्ट होते, की भांडवलशाही ही जगभर एकासारख्याच मार्गांनी घडलेला ऐतिहासिक टप्पा नव्हता. ती वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या ऐतिहासिक अटींमध्ये रुजली. युरोपात ती अंतर्गत संघर्षातून, सरंजामशाहीच्या संकटातून आणि उत्पादनपद्धतींच्या उलथापालथीतून उभी राहिली. भारतात मात्र ती वसाहतवादी सत्तेच्या माध्यमातून, आधीपासून अस्तित्वात असलेल्या करआधारित आणि सामाजिक रचनांवर आरूढ झाली. म्हणूनच भारतीय समाजाने भांडवलशाहीचा अनुभव तिच्या निर्मितीचा म्हणून कमी आणि अधीनतेचा म्हणून अधिक घेतला.

याच ऐतिहासिक फरकाचे पडसाद आजच्या अर्थव्यवस्थेत स्पष्टपणे जाणवतात. आजची भारतीय अर्थव्यवस्था उत्पादन वाढवण्यापेक्षा वितरण, कंत्राटीपणा आणि तात्कालिक नफ्यावर अधिक उभी आहे. श्रम सुरक्षित करण्याऐवजी त्यांना 'लवचिक' बनवण्यावर भर दिला जातो. सामाजिक पुनरुत्पादन म्हणजे आरोग्य, काळजी, शिक्षण, जगण्याची खात्री या सगळ्या गोष्टी बाजाराच्या हवाली केल्या जातात. हे सगळं 'नैसर्गिक' नाही. ही स्थिती इतिहासाने घडवलेली आहे.

पण इथेच प्रश्न थांबत नाही. कारण इतिहास केवळ भूतकाळ समजावून सांगत नाही. तो आपल्याला वर्तमानात विचार करायला भाग पाडतो. जर भांडवलशाही वेगवेगळ्या समाजांत वेगवेगळ्या वाटांनी आली असेल, तर आज ती आपल्याकडे नेमकी कशी काम करते? तिचे नियंत्रणाचे नवे प्रकार कोणते? आणि आपली रोजची कामं, वेळ, शरीर आणि नाती या सगळ्यांवर तिचा ताबा कसा वाढत चालला आहे?

पुढच्या लेखात आपण याच प्रश्नांकडे वळणार आहोत. इतिहासाच्या पातळीवर नव्हे, तर आजच्या जागतिक वास्तवाच्या पातळीवर. उदारीकरणानंतरची अर्थव्यवस्था, असुरक्षित रोजगार, कर्जावर चालणं, प्लॅटफॉर्म्स, खोटी 'आंत्रप्रिन्योरशिप' या सगळ्यांच्या माध्यमातून भांडवलशाही आज कशी दैनंदिन आयुष्यात शिरते, हे समजून घेण्याचा तो प्रयत्न असेल. म्हणजेच, इतिहासातून वर्तमानाकडे आणि वर्तमानातून बदलाच्या शक्यतेकडे पुन्हा एकदा नजर टाकण्याचा हा प्रयत्न असेल.

**लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पीएच.डी. अभ्यासक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड येथेही ते अध्यापन सहाय्य करतात. त्यांचे संशोधन मुख्यत: कामगार (श्रम), तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क : ९६५७७९९९८६,**

**ईमेल :** hiteshdpotdar@gmail.com

# एक बर्फाळ जमिनीचा तुकडा, जगाचा संसार मोडणार?



डॉ. मोहन द्रविड

विश्वकारण



**ग्री**नलँड हे जगातलं सर्वात मोठं बेट. अर्थात ऑस्ट्रेलिया सोडून. ऑस्ट्रेलिया आता खंड धरला जातो. ग्रीनलँडमध्ये सध्या चाललेल्या घटनांनी जगाच्या इतिहासाला नवीन वळण लागतंय. श्वेतवर्णीय जगताची छकलं पडण्याची चिन्हं दिसताहेत. रोमच्या साम्राज्याच्या ऱ्हासाची पुनरावृत्ती आपल्याला पाहायला मिळण्याचा योग दिसतोय...

जगाच्या नजरेत आलेला ग्रीनलँड हा देश आकाराने मोठा जरी असला तरी ट्रंपसाहेबांना वाटतो तेवढा मोठा नाही. आपल्या शालेय पुस्तकात तो आफ्रिकेच्या आकाराचा वाटतो आणि ट्रंपसाहेबांचं भूगोलाचं ज्ञान त्यापुढे गेलेलं नाही. वास्तविक आफ्रिका ग्रीनलँडच्या अठरापट मोठा आहे. पण गोलावरचा नकाशा सपाट कागदावर काढला की असाच विपर्यास होतो. ग्रीनलँडची प्रजा एस्किमोसारख्या इनुविट या वंशाची. सबंध देशाची वस्ती जेमतेम पंचावन्न हजार! मालकीहक्क गेली तीनशे वर्षं ट्रंप यांच्या दृष्टीने य:कश्चित असलेल्या युरोपीयन देश डेन्मार्ककडे. ट्रंपना तो हक्क येनकेन प्रकारे त्यांच्याकडे हस्तांतर करून पाहिजे विकत, सामोपचाराने किंवा लढाई करून. त्यासाठी लागणारी कारणं ते नंतर शोधतील.

***अमेरिकेची नजरच वाईट***

ट्रंप यांचा हा हट्ट जगावेगळा आहे, हा सर्वसामान्य समज मात्र चुकीचा आहे. दुसऱ्या महायुद्धापासून अमेरिकेचा ग्रीनलँडवर डोळा आहे. युद्धाच्या काळात युरोपचं जर्मनीपासून संरक्षण हे कारण अमेरिकेने पुढे केलं. खरं म्हणजे, त्यात तथ्य नव्हतं. वास्तवत: जवळजवळ सर्व युरोप या युद्धात जर्मनीधार्जिणा होता. जर्मनी युद्धात हरल्यानंतर सगळ्यांनी आपली पाठ्यपुस्तकं बदलली. सगळे नात्सीविरोधी झाले. त्यानंतर युरोपनं आपलं इतिकर्तव्य बदललं. रशियाशी शत्रुत्व या अमेरिकेच्या नवीन धोरणात तो सामील झाला. सांगायचा मुद्दा, हा की डेन्मार्कला जर्मनीपासून संरक्षणाची काही गरज नव्हती.

रशियापासून संरक्षण या कारणासाठी १९५१ साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांनी डेन्मार्कबरोबर लष्करी करार केला. त्यानुसार अमेरिकेने ग्रीनलँडमध्ये पंधरा लष्करी तळ उभे केले. पण हा प्रदेश बर्फाळ वाळवंट या व्याख्येत बसणारा, निर्मनुष्य आणि मरणाचा थंड. ऐंशी टक्के भाग आर्क्टिक समुद्रात. काही वर्षांनी अमेरिकेने जवळजवळ सर्व तळ सोडून दिले. तिथे जमलेला कचरा कुणी साफ करायचा. डेन्मार्कने की अमेरिकेने – हा वाद अनेक वर्षं चालला होता. तो कचरा शेवटी स्थानिक इनुविट लोकांनी उचलला. १९६८ साली अमेरिकेचं चार हैड्रोजन बॉम्ब वाहून नेणारं एक विमान ग्रीनलँडमधील थूल या लष्करी तळाजवळ कोसळलं. बॉम्बमधील किरणोत्सारी प्लुटोनियम सर्वत्र विखुरलं गेलं. नंतर ॲटम (किंवा हॅड्रोजन) बॉम्ब घेऊन जाणारं विमान डेन्मार्कच्या भूमीवरून उडून द्यायचं नाही, असा डेन्मार्कनं कायदा केला. पण प्रश्न होता, तो कायदा अमेरिका मानेल की नाही. मुळात, ग्रीनलँड डेन्मार्कच्या भूमीत येतो की नाही, हेच अमेरिकेला मान्य नव्हतं.

***दुर्मिळ धातूंसाठी सर्वकाही...***

भौगोलिकदृष्ट्या ग्रीनलँड म्हटलं, तर पूर्व गोलार्धात आहे, म्हटलं तर पश्चिम गोलार्धात. म्हटलं तर डेन्मार्कचा भाग आहे, म्हटलं तर नाही. म्हटलं तर स्वायत्त देश आहे, म्हटलं तर नाही. म्हटलं तर अमेरिकेच्या ताब्यात असल्यासारखा आहे, म्हटलं तर नाही. या संदिग्धतेमुळे या बोटावरची थुंकी सहजपणे त्या बोटावर करणं सोपं जातं. 'अमेरिका आणि डेन्मार्कचा राजा यांच्यात झालेल्या कराराप्रमाणे अमेरिकेला ग्रीनलँडमध्ये केव्हाही वास्तव्य करता येतं,' असं वक्तव्य डेन्मार्कच्या पंतप्रधानांनी नुकतंच केलं. त्याच वेळी अमेरिकेला एक इंचही जमीन देणार नाही, असं डेन्मार्कचे परराष्ट्रमंत्री म्हणाले. या दोन विधानांचा समन्वय ज्याला पाहिजे तसा करता येईल. पण सामना आहे ट्रंपसाहेबांशी. ते काही असल्या सूक्ष्म वीणकामासाठी सुईदोरा घेऊन बसले नाहीत. त्यांच्या हातात हातोडा आहे आणि त्यांना पुरती घाई झाली आहे.

शिवाय ग्रीनलँडचं नाटक ट्रंपसाहेबांनी काही नव्यानं काढलेलं नाही. त्यांच्या पहिल्या मुदतीतसुद्धा २०१९ साली त्यांनी ग्रीनलँड गिळंकृत करायची इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या अनेक व्यापांत ती अंमलात आणणं त्यांना शक्य झालं नाही. आता ते नव्या जोमानं मैदानात उतरले आहेत. शिवाय या जून महिन्यात त्यांना ८० वर्षं पुरी होतील, त्यांना सर्व अजेंडा पटापट आटोपून घ्यायचा आहे. त्यात युक्रेन आहे, इराण आहे, व्हेनेझुएला आहे. अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नांपैकी एक ग्रीनलँड. तो 'मला पाहिजे,' असं त्यांनी ठरवलं. त्यासाठी त्यांनी नवीन कारणं शोधून काढली.

पहिलं कारण म्हणजे, दुर्मिळ धातूंची टंचाई. ही टंचाई खरं म्हणजे अनेक वर्षं आहे आणि गेले वीस वर्षं तर प्रकर्षाने जाणवत आहे. पण कोणत्याही अमेरिकन विद्वानाने त्या प्रश्नाचा ना उहापोह केला ना त्यातून काही मार्ग सोपवला. वेळ आली तर बघून घेऊ, अमेरिकेला काय अशक्य आहे? अशा मग्रुरीत सर्व जण होते. तो भ्रम होता, हे त्यांना



*लिंबूटिंबू देश आहे, सहज चिरडून टाकू अशा भ्रमात असलेल्या अमेरिकेला ग्रीनलँडमधल्या स्थानिकांनी जोरदार टक्कर दिली आहे...*

समजायला पाहिजे होतं. एक उदाहरण त्यांच्या डोळ्यासमोर होतं. २०१० साली जपानला याच प्रश्नाने ग्रासलं होतं. चीनने त्यांची नाकेबंदी केली होती आणि त्यांना दुर्मिळ धातूंचा पुरवठा करायचं बंद केलं होतं. त्यावर चिडून जपानने स्वतःच दुर्मिळ धातूंचं उत्पादन करायचं ठरवलं. कझाखस्तानमध्ये खनिजं होती. तेव्हा जपानने तिथे २०१२ साली धातू बनवायचा कारखाना उघडला. पण पाच वर्षांच्या भगीरथ प्रयत्नांनंतरसुद्धा त्याला यश प्राप्त झालं नाही. गंमत ही आहे, जपान हा देश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अमेरिकेच्या किती तरी पुढे आहे. पण जपानला शेवटी चीनची मनधरणी करणं भाग पडलं. (या घटनेचा भारतानेसुद्धा अभ्यास करणं इष्ट आहे.)

पृथ्वीवरील वातावरणातील बदलामुळे ग्रीनलँडमधील बर्फ वितळायला सुरुवात झाली आहे आणि काही जमीन उघडी होत आहे. तिथे दुर्मिळ धातूंची संयुगं असतील असा अंदाज आहे. जगात सर्व ठिकाणी दर्मिळ धातूंची संयुगं सापडतील असं स्वप्न सगळ्यांना पडतं. युक्रेनमध्येसुद्धा ती असतील असा भास होऊन ट्रंपसाहेब तिथे हजारो अब्ज डॉलरचे करार करायला निघाले होते. (आता सौदी अरेबियालासुद्धा वाळूत दुर्मिळ धातूंची संयुगं सापडली आहेत, म्हणे!) आणि या सर्व गोष्टी एखादे वेळेस खऱ्या जरी असल्या तरी त्या संयुगांचं जोपर्यंत धातूंमध्ये रूपांतर होत नाही तोपर्यंत त्यांचा उपयोग शून्य.

***ग्रीनलँडचा खमकेपणा***

ग्रीनलँडमध्ये खनिज तेल आहे का? अमेरिकन भूगर्भशास्त्रज्ञांचं म्हणणं जमिनीवर नसलं तरी आर्क्टिक समुद्रात भरपूर आहे. पण ते बाहेर काढण्याचे आतापर्यंतचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले आहेत. असल्या संशोधनाने पर्यावरणाला धोका आहे, असं वाटून ग्रीनलँडच्या लोकांनी २०२१ सालापासून तेलाच्या संशोधनाला बंदी घातली आहे. पण ट्रंपसाहेबांचं पर्यावरणाशी काही देणंघेणं नसल्याने ते असल्या कायद्याला जुमानणार नाहीत आणि संशोधन परत चालू करतील यात शंका नाही. (या उद्योगधंद्यांतील त्यांच्या दोस्तमंडळींनाच ती योजना अजून तरी पसंत नाही, ती एक ग्रीनलँडच्या दृष्टीने जमेची बाजू.)

ग्रीनलँडचा कब्जा घ्यायचं ट्रंपसाहेबांचं दुसरं कारण थोडंसं वैयक्तिक आहे. या वर्षीच्या ४ जुलैला अमेरिकेला २५० वर्षं पुरी होतील. इ.स. १८९८ पासून अमेरिकेची भरीव भौगोलिक वाढ झालेली नाही. त्यानंतर अमेरिकेला संधी मिळाली नाही, असं नाही. पण ती अमेरिकेने घेतलीच नाही. ट्रंपसाहेबांच्या मते, ती मोठी चूक झाली. त्यांच्या मते, अमेरिकेने स्वतःच्या बळावर दुसरं महायुद्ध जिंकलं, त्या वेळीच जगाचा जमेल तेवढा भाग बळकवायला पाहिजे होता. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन अमेरिकेच्या २५० व्या जयंतीच्या प्रसंगोपात अमेरिकेला ग्रीनलँडची भेट दिली, तर सुवर्णकांचन योग होईल आणि आपलंही इतिहासातील स्थान मजबूत होईल. राष्ट्राध्यक्ष थॉमस जेफरसन यांनी १८०३ साली लुईझियाना प्रदेश (अमेरिकेतील आजची बारा राज्ये) विकत घेतला तसं आपलं पण नाव होईल आणि माउंट रशमोरच्या डोंगरावर जेफरसनसारखी आपलीसुद्धा मूर्ती कोरली जाईल, असं ट्रंपसाहेबांचं मनोगत आहे. जाणकारांना माहीत असेल, की अमेरिकेने तिचा बराचसा प्रदेश विकत घेतलेला आहे. १८६७ साली रशियाकडून ७२ लाख डॉलरमध्ये अलास्का, तर १९१७ साली डेन्मार्ककडून अडीच कोटी डॉलरमध्ये डेनिश वेस्ट इंडिज (आजचं यु. एस. व्हर्जिन आयर्लंड).

ट्रंपसाहेबांनी पुढे केलेलं तिसरं कारण, असं की चीन आणि रशियाच्या नौका आर्क्टिक समुद्रात इकडे तिकडे फिरत असतात. त्यांनी हे लक्षात ठेवलं पाहिजे, की जोपर्यंत त्या नौका देशाच्या सागरी सरहद्दीबाहेर फिरतात तोपर्यंत अमेरिकेला त्याबद्दल काही करता येणार नाही – ग्रीनलँड ताब्यात असो वा नसो. रशियाने ग्रीनलँडकडे वाकडा डोळा केला तर? त्याचीही शक्यता कमी आहे कारण एकूण आर्क्टिक प्रदेशातील ८० टक्के भाग रशियात आहे. शिवाय

आर्क्टिक समुद्रात फिरण्यात रशियाचा हात कुणी धरणार नाही. त्यांच्याकडे सागरी बर्फ फोडणाऱ्या तब्बल ३६ नौका आहेत. त्यातील दहा अणुशक्तीवर चालणाऱ्या. अमेरिकेकडे अशा फक्त दोनच नौका आहेत. त्यातील एक कायम दुरुस्तीलाच असते. चीन आणि रशियाच्या या नौका हेरगिरी करतात, असं ट्रंपसाहेब म्हणतात. तेव्हा ग्रीनलँड अमेरिकेच्या ताब्यात असलं की या हेरगिरीवर देखरेख ठेवता येईल, असं कारण त्यांनी पुढे केलं.

या दूरदृष्टीने त्यांनी आपल्या सैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ग्रीनलँडची पाहणी करायला पाठवले. त्यानंतर उपाध्यक्ष व्हॅन्स त्यांची पत्नी उषासह तिथे जावून आले. ट्रंपसाहेबांचा मोठा मुलगा तर ग्रीनलँड ही आपली जहागीर असल्यासारखा तिथे वावरत असतो. एका अर्थी त्यात वावगं काही नाही. सर्व युरोपच गेली ऐंशी वर्षं अमेरिकेची जहागीर आहे. या काळातील युरोप आणि अमेरिका यांचे संबंध हा एक खास संशोधनाचा मनोरंजक विषय आहे. एक डुकरीण आणि तिच्या थानांना बिलगलेली पिल्लावळ असं एक व्यंगचित्र काही वर्षांपूर्वी आलं होतं, ते समर्पक होतं.

***लाळघोटा नि हतबल युरोप***

युरोपला अमेरिकेबद्दल आदर आणि धाक वाटतो. या भावनेचा उगम मुख्यत: सोव्हिएत युनियनबद्दल वाटणाऱ्या भीतीत होता. याउलट अमेरिकेला युरोपबद्दल फारसं प्रेम वाटत नाही. हे वातावरण द्विपक्षीय संमत असं होतं. २०१४ साली जेव्हा युक्रेनमध्ये अमेरिकेने सत्ताबदल घडवून आणला, तेव्हा बायडनसाहेबांच्या सहकाऱ्याने 'Fxxx EU' अशी युरोपची बोळवण केली होती. ट्रंपसाहेब आल्यानंतर त्यात वाढच झाली आहे. युरोपचा लाळघोटेपणा वाढला आहे तर ट्रंपसाहेबांना युरोपबद्दलची तुच्छता व्यक्त केल्याशिवाय चैन पडत नाही. त्यांनी जबरदस्तीने युरोपीय संघ आणि ब्रिटन यांच्या घशात टॅरिफ घातले. त्यांना ५०० अब्ज डॉलरची अमेरिकन शस्त्रास्त्र घ्यायला लावली आणि अमेरिकेत तेवढ्याच रकमेची गुंतवणूक करण्यास भाग पाडलं. त्यानंतर युरोपीयन देशप्रमुख आणि ट्रंप यांच्यांत झालेल्या बैठकीत ट्रंप यांनी युरोपीयन देशप्रमुखांना आज्ञाधारक शालेय विद्यार्थ्यांसारखं समोर बसवून चार गोष्टी सुनावल्या.

चीन आणि रशियापासून संरक्षण हा गेल्या सत्तर वर्षांतला परवलीचा शब्द आहे. ट्रंपसाहेबांच्या सुदैवाने अशा संरक्षणाची मागणी युरोपकडूनच आणि विशेषत: डेन्मार्ककडून, सर्वात जोरात होत आहे. फरक एवढाच आहे, डेन्मार्कचं म्हणणं आहे, की या कामाकरता आम्हाला अमेरिकेची गरज नाही. हे आमचं आम्हीच करू. ती तयारी दाखवण्यासाठी डेन्मार्कने ग्रीनलँडमध्ये दोनशे माणसांचं सैन्य पाठवलं. ट्रंपनी त्या गोष्टीची मनसोक्त चेष्टा केली. युरोपीयन देशांना चीन आणि रशियाची भीती वाटते मग आम्ही संरक्षणासाठी आलो आणि ही जागा घेतली तर काय बिघडलं, असा ट्रंपसाहेबांचा सवाल आहे.

अमेरिका जेव्हा इतर देशात जाऊन त्यांच्या राष्ट्रीय संपत्तीचं अपहरण करत होती, तिथल्या लोकांची हत्या करत होती, तेव्हा युरोप नुसत्याच टाळ्या वाजवत नव्हता, तर त्या लुटमारीत सक्रिय मदत करत होता. अमेरिकेने जेव्हा व्हेनेझुएलावर आक्रमण करून त्या देशाच्या अध्यक्षाचं अपहरण केलं, तेव्हा युरोपला त्यात काही गैर वाटलं नाही. जेव्हा इराण हा देश अमेरिकेची जीवघेणी बॉम्बफेक सहन करत होता, तेव्हा युनोमध्ये 'तुमचीच वर्तणूक बरोबर नाही,' असं इराणला दटावलं होतं, डेन्मार्कच्याच प्रतिनिधीने. पण जेव्हा अमेरिकेने ग्रीनलँडकडे वाईट नजरेने पहायला सुरुवात केली तेव्हा मात्र त्यांना 'धर्म' आठवला. 'सिरियात तुम्ही जे काही केलंत त्यात आम्ही तुम्हाला साथ दिली. इराणमध्ये तुम्ही जे करणार आहात, त्याला आमचा पाठिंबा आहे. व्हेनेझुएलावरील आक्रमणात आम्ही तुमच्या बरोबर होतो,' असं फ्रान्सचे अध्यक्ष यांनी ट्रंपना सांगितलं. 'पण ग्रीनलँडच्या बाबतीतली तुमची भूमिका बरोबर नाही.' दुतोंडेपणाचं यापेक्षा चांगलं उदाहरण कुठे मिळेल?

वस्तुत: गरीब देशांवर अत्याचार करण्यात आपण साथ दिली याची युरोपला लाज वाटायला हवी. डेन्मार्कने त्यांच्या दुष्कृत्यात मृत पावलेल्या आपल्या सैनिकांचं गौरवपूर्ण दफन केलं आणि आपण अमेरिकेच्या बरोबर कसं आहोत याची ग्वाही दिली. गंमत म्हणजे, ट्रंपसाहेबांनी सर्व युरोपवर भित्रेपणाचा आरोप केला आहे. 'आम्ही युरोपचं रक्षण करायचं आणि हे मात्र रणछोडदास!' अशी त्यांनी युरोपची चेष्टा केली आहे.

ग्रीनलँडच्या बाबतीत चाललेल्या घटनांमुळे अमेरिका

आणि युरोपमध्ये मोठी दरी पडत चालली आहे हे उघडच आहे. युरोपीय संघाने अमेरिकेबरोबर सहा महिन्यांपूर्वी केलेला व्यापारी करार तोडावा, असं मत युरोपीय संघाच्या काही सभासदांनी व्यक्त केलं आहे. तसं काही केलंत तर मी टॅरिफ दुपटीने वाढवीन अशी धमकी ट्रंपनी आताच दिली आहे. चीन आणि रशिया यांच्याविरुद्ध लढण्याकरता सैन्य उभारावं अशी एक पर्यायी चर्चा पुढे येत आहे. शस्त्रास्त्रं बनवणाऱ्या कंपन्यांच्या प्रेरणेतून ही चर्चा निघाली आहे, हे सांगण्याची गरज नाही. यात जर्मनीचा पुढाकार आहे. आज जर्मनीत प्रचंड मंदी आहे आणि हिटलरने जसे युद्धतयारीने राष्ट्राला मंदीतून बाहेर काढून वैभवाच्या दिशेने नेलं तसं आजची जर्मनी शस्त्रसंपन्न होऊन युरोपला चांगले दिवस दाखवेल, असा प्रचार चालू आहे. आधीच रशियाकडून मिळणारा स्वस्त गॅस सोडून जर्मनीने स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. विनाशकाले विपरित बुद्धी म्हणतात ती ही!

***लत्ताप्रहारामुळे कॅनडा ताळ्यावर... इतरांची धाव चीनकडे***

आता खुद्द उत्तर अमेरिका खंडात अमेरिकेने आणखी एक सामना सुरू केला आहे. त्यात प्रतिपक्षी आहे अमेरिकेचा सगळ्यात जवळचा साथी कॅनडा. सर्व हंगामात तो अमेरिकेचं उपांग असल्यासारखा राहिला होता. पण ट्रंपनी दुसऱ्यांदा निवडून आल्यावर डिसेंबर २०२४ मध्ये कॅनडा अमेरिकेत विलीन करण्याची भाषा चालू केली. कॅनडाच्या पंतप्रधानांना अमेरिकेच्या ५१व्या राज्याचे राज्यपाल असं संबोधायला सुरुवात केली. त्याचा एक परिणाम म्हणजे, कॅनडात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आघाडीवर असलेल्या कन्झर्वेटिव्ह पक्षाने (अमेरिकेतला रिपब्लिकन पक्ष) चांगलाच मार खाल्ला. त्यानंतर दोन देशांत जकात-युद्ध चालू झालं. आता तोही सामना रंगात आला आहे. दोघांचे संबंध इतके ताणले गेले आहेत, की ते केव्हाही तुटण्याची शक्यता आहे.

वास्तविक गेली अनेक दशकं कॅनडा अमेरिकेच्या पाळलेल्या कुत्र्यासारखा वागत होता. जेव्हा 'वुहावे' या चीनी कंपनीची मुख्य व्यापारी अधिकारी चीनमधून कॅनडावरून मेक्सिकोत जात होती तेव्हा तिला अमेरिकेच्या आज्ञेवरून कॅनडाने अटक केली आणि तीन वर्षं स्थानबद्धतेत ठेवलं. आता जेव्हा अमेरिकेचाच लत्ताप्रहार चालू झाला, तेव्हा कुठे कॅनडास सद्‌बुद्धी आली. तीन महिन्यांपूर्वी चीन हा अभद्र त्रिकुटापैकी एक होता. (रशिया आणि इराण हे बाकीचे दोन.) आज कॅनडाचे चीनबरोबर लांगूलचालन चाललं आहे. जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात कॅनडाचे नवीन पंतप्रधान मार्क कार्नी यांनी चीनला एक धडकभेट दिली आणि एक मोठा व्यापारी करार केला. त्यात कॅनडाने चीनच्या विद्युतवाहनांवरचा कर १०० टक्क्यांवरून मामुली सहा टक्क्यांवर आणला आहे.

त्याआधी २०२५ च्या जून आणि जुलै महिन्यांत पंचाक्ष (Five-Eyes) या हेरसंघटनेच्या न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन सभासद देशांच्या पंतप्रधानांनी चीनला भेटी दिल्या. डिसेंबर महिन्यात फ्रान्सचे अध्यक्ष चीनमध्ये दाखल झाले. २०२६ सालच्या जानेवारी महिन्यातल्या पहिल्या आठवड्यात आयर्लंडच्या पंतप्रधानांनी चीनचा पाच दिवसांचा दौरा केला. (दक्षिण कोरियाचे अध्यक्षही त्यावेळी तिथे होते.) आयर्लंडच्या पंतप्रधानाचा हा अठरा वर्षानंतरचा पहिला दौरा. त्याच महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात ब्रिटनचे पंतप्रधान स्टार्मर साठ लोकांच्या शिष्टमंडळासह चीनला पोचले. त्याच्या आधी एक दिवस फिन्लंडच्या पंतप्रधानांनी क्षी जिन-पिंग यांची भेट घेतली होती. २४ फेब्रुवारीस जर्मनीचे चान्सलर मेर्त्स चीनच्या दौऱ्यावर जात आहेत. हे बहुतेक वरिष्ठ नेते आठ-दहा वर्षांनी प्रथमच चीनला भेटायला जात आहेत अगदी रांग लावल्यासारखे. प्रत्येकाला व्यापारी करार पाहिजे आणि तोही युरोपीय संघाच्या चौकटीच्या बाहेर! अशा परिस्थितीत ही अनैसर्गिक युती किती काळ टिकणार आहे याबद्दल शंका निर्माण होते.

या सर्वाचा क्लायमॅक्स झाला, तो मार्क कार्नी यांच्या दाव्होसमधल्या ऐतिहासिक भाषणाने. कार्नी मूळचे राजकारणी नाहीत, तर बँक ऑफ इंग्लंडचे आणि बँक ऑफ कॅनडाचे भूतपूर्व गव्हर्नर. आपण, म्हणजे पाश्चिमात्य देश, इतकी वर्षं जगाला फसवत होतो, ते त्यांनी प्रांजळपणे मान्य केलं. 'नियमावर आधारित व्यवस्था' (Rules-based order) ही आपली घोषणा पद्धतशीर थोतांड होती आणि दुबळ्या देशांवर हुकूमत गाजवण्यासाठी केलेला तो बनाव होता, हे त्यांनी कबूल केलं. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आज जे

काय जगात चाललंय, ते काही साधंसुधं संक्रमण (Transition) नसून जुन्या व्यवस्थेचा संपूर्ण चक्काचूर (Rupture) दर्शवत आहे.

प्रश्न एवढाच आहे, की कॅनडा प्रभृती आपल्या वैयक्तिक स्वार्थाच्या पुढे जावून जगाच्या बाकीच्या समस्यांवर अशीच परंपराभंजक भूमिका घेणार का? की शिवराळ आणि मारकुट्या नवऱ्याकडे त्याची बायको आपलं सुजलेलं तोंड घेऊन परत जाते, तसा प्रकार होणार आहे? ग्रीनलँडचा प्रश्न सायप्रसच्या धर्तीवर सोडवावा असा मध्यममार्ग (?) सुचवला जातेय. सायप्रसमध्ये आक्रोतिरी आणि ढोकेलिया असे ब्रिटनचे दोन सैनिकी तळ आहेत. या तळांवर ब्रिटिशांचा आजन्म सार्वभौम हक्क आहे. अमेरिकाही ग्रीनलँडमध्ये असाच चंचूप्रवेश मिळवणार असं दिसतंय.

थोडक्यात, उत्तर ध्रुवावरील बर्फाळ जमिनीचा एक तुकडा नकळतपणे जगातले अनेक वर्षं जोपासलेले संसार उद्ध्वस्त करणार, असं दिसतंय!


**डॉ. द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून 'मुक्काम पोस्ट अमेरिका' हे अमेरिकेचं सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक 'रोहन प्रकाशन'ने प्रसिद्ध केले आहे.**

**संपर्क : ९८२०५ ६३१३०**


**अक्षर प्रकाशनाचं नवं पुस्तक...**

# गोष्ट तिरंगा ध्वजाची

निशा शिवूरकर




**आपला राष्ट्रध्वज आपल्याला माहीत असतो. तसंच आपलं राष्ट्रगीतसुद्धा आपल्याला माहीत असतं, पाठही असतं. राष्ट्रगीताच्या बाबतीत आपल्याला ते रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलं आहे, हेदेखील माहीत असतं. पण राष्ट्रध्वजाचं डिझाइन कोणी बनवलं? कधी बनवलं? त्यामागची प्रेरणा काय होती? या प्रश्नांची उत्तरं मात्र आपल्याला माहीत नसतात. इतकं कशाला, भारत देशाच्या भौगोलिक सीमा माहीत असल्या, तरी या देशाचं 'राष्ट्र' कसं झालं, याची आपल्याला अजिबात कल्पना नसते.**


**निशा शिवूरकर यांनी या पुस्तकात या सर्व प्रश्नांची उत्तरं दिली आहेत. अगदी स्थळकाळाचे, व्यक्ती आणि घटना यांचे ऐतिहासिक संदर्भ देत दिली आहेत. निशा शिवूरकर यांची शैली रसाळ आहे. त्यामुळे अत्यंत महत्त्वाची माहिती रंजकपणे समोर येते. हे पुस्तक वाचनीय तर आहेच; परंतु त्यातील विधानांना भक्कम पुराव्यांचं पाठबळ असल्याने ते स्वत:च एक ऐतिहासिक दस्तावेज झालं आहे.**

**– हेमंत कर्णिक**

**किंमत रु.२००/-**

अ अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई-६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# क्रीडाकेंद्री विद्यापीठांचे भव्यदिव्य चिनी धडे



गजानन जोशी

शोधक नजर



*बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीचे प्रवेशद्वार*



*एकाच वेळी शेकडो विद्यार्थ्यांना सामावून घेणारे कँटिन...*

**मो**ठ्या धामधुमीत, १७ सप्टेंबर २००८ या दिवशी पॅरालिम्पिकची बीजिंग येथे सांगता झाली. एक मोठी पोकळी निर्माण झाल्याची जाणीव दुसऱ्या दिवशी सकाळी झोपेतून उठल्यावर जाणवत राहिली. सकाळीच माझ्या तीनही मित्र-मैत्रिणींना फोन केला. त्यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे बोलणे होते, ते रेन या मित्राबरोबर. स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला भेट देण्याबद्दल. त्यानंतर जवळ-जवळ एक महिन्यानंतर रेनबरोबर बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला भेट देण्यासाठी गेलो. प्रचंड मोठा परिसर, जवळ-जवळ सगळे खेळ शिकवण्याची सोय. पण त्याहीपेक्षा मला महत्त्वाचे आश्चर्य वाटले ते...

बीजिंगमध्ये २००८चे मुख्य ऑलिम्पिक संपन्न झाले, विनायक दळवी, संदीप चव्हाण आणि मोहन बने हे आमचे सगळे पत्रकार मित्र भारतात परत गेले. पुढील तीन आठवड्यामध्ये पॅरालिम्पिक होणार त्याची तयारी सुरू होती. मी मात्र आता माझ्या कामात संपूर्ण व्यग्र झालो होतो. पॅरालिम्पिक विसरून देखील गेलो होतो.

परंतु एक महत्त्वाची घटना घडणार होती, याची सुतराम चाहूल नव्हती. पॅरालिम्पिकला ५-६ दिवस बाकी असताना मला भारतामधून संदीप चव्हाण आणि विनायक दळवी यांचा फोन आला. त्यांनी मला सांगितलं, की माझं नाव भारतीय क्रीडा पत्रकार म्हणून पॅरालिम्पिकसाठी मान्य झाले आहे. पॅरालिम्पिक समितीकडून देखील मान्यता मिळाली आहे. फक्त माझा पासपोर्ट घेऊन बीजिंगमधील पॅरालिम्पिकच्या मीडिया ऑफिसमध्ये जाऊन रजिस्ट्रेशन करून एंट्री पास घ्यायचा आहे. मला थोडा वेळ काय बोलावे, तेच समजेना. परंतु दळवी साहेब आणि संदीप म्हणाले, की १०-१५ दिवसामध्ये माझ्याबरोबर झालेल्या चर्चा आणि सहवासामधून त्यांना पूर्ण खात्री आहे, की जरी रूढार्थाने पत्रकार नसलो, तरी हे काम नक्कीच चांगले करू शकेन. नाईलाजाने त्यांना हो म्हणालो. मी त्यांना हे देखील म्हणालो, की जर तुम्ही दोघंही हा धोका पत्करायला तयार असाल तर मग मला हे काम करायला काहीच अडचण नाही. थोडक्यात, या दोघांनीही पुन्हा मला संपूर्ण विश्वास दिला आणि दुसऱ्या दिवशी पॅरालिम्पिक मीडिया कार्यालयात जाऊन एंट्री पास मिळवला. येथूनच मला एक मोठे विश्व - एक मोठा ज्ञानाचा खजिना एक अतिशय अविस्मरणीय ठेवा मिळाला. कोणतेही काम एकदा जबाबदारीने घेतले, की ते माझ्या संपूर्ण कुवतीने - ताकतीने आणि प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करतोच. त्याच ध्येयाने आणि निष्ठेने हेदेखील कार्य प्रामाणिकपणे करण्याचा निर्धार करून कामाला सुरुवात केली.

***अवचित संधी सोन्यासारखी...***

पॅरालिम्पिकची सुरुवात होण्यापूर्वी त्याबद्दल माहिती घ्यायला सुरुवात केली. अभ्यास सुरू केला. वेगवेगळ्या खेळांची आणि त्यामधील विविध स्पर्धा - स्पर्धक - वेगवेगळ्या पातळीच्या अपंगांच्या वर्गवारी आणि त्याप्रमाणे त्यांच्या स्पर्धा तसेच आणखी बऱ्याच गोष्टींचा संपूर्ण ५-६ दिवस मन लावून अभ्यास करू लागलो. मीडिया ऑफिसमध्ये जाऊन तेथील व्यवस्था -सुविधा- यंत्रणा याबद्दल माहिती घेऊ लागलो. माझ्यासाठी सगळंच नवीन होतं. पॅरालिम्पिक ६ सप्टेंबर २००८ रोजी सुरू झाले आणि १७ सप्टेंबरला यशस्वीपणे संपन्न झाले. त्याचा सविस्तरपणे आढावा माहिती - माझी मतं - माझे आकलन - माझे अनुभव याबद्दल कदाचित एखादा वेगळा लेख सुद्धा लिहीन. परंतु आतासाठी या बीजिंग पॅरालिम्पिक दरम्यान एक अतिशय महत्त्वाचा आणि अतिशय अविस्मरणीय अनुभव आला त्याबद्दल लिहिणार आहे ज्यामुळे मला चीन या देशाची एक वेगळीच खेळ संस्कृती - त्यांच्या समाजामधील खेळाबद्दलची आपुलकी - जीवनामधील विविध खेळांबद्दल आपलेपणा आणि प्रोत्साहन देणारी संस्कृती याबद्दल आणखी एक वेगळी ओळख होण्यास मदत झाली.

या आधीच्या लेखांत लिहिले आहे, की एकूण चिनी समाज खेळाला किती महत्त्व देतो. खेळांसाठी सोयी सुविधा किती मोठ्या प्रमाणात आणि सहजपणे उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कित्येक दशकांपासून ही खेळ संस्कृती चीनमध्ये मजबूतपणे आपली मुळं घट्ट रोवून वाटचाल करत आहे.

***नियोजनबद्ध दर्जेदार प्रशिक्षण***

पॅरालिम्पिकमध्ये पत्रकार म्हणून काम करत असताना आणखी एक सुखद - धक्कादायक माहिती आणि प्रचिती मिळाली ती म्हणजे देशामधून जवळ जवळ एक लाख विद्यार्थी (कॉलेज विद्यार्थी) स्वयंसेवक म्हणून वर्षभर आधीच निवडले गेले होते. हे विद्यार्थी वेगवेगळे विषय शिकणारे होते, जसे विज्ञान-वाणिज्य-कला-कायदा-वैद्यकीय-खानपान-ललितकला तसेच खेळ या विषयांमध्ये शिकणारे कॉलेज विद्यार्थी होते. पॅरालिम्पिकमध्ये वेगवेगळ्या सेवा-सुविधांची आवश्यकता असते, त्यानुसार या विद्यार्थ्यांचे वेगवेगळे गट बनवून त्यांना वर्षभर प्रशिक्षण देण्यात आले होते.

अशा या एक लाख विद्यार्थ्यांपैकी तीन अशा अतिशय कार्यक्षम आणि मेहनती स्वयंसेवकांशी माझी ओळख झाली आणि चांगली मैत्री झाली. ही मैत्री आजही टिकून आहे.

या तीन मित्र-मैत्रिणींपैकी कॅरॉल ही वैद्यकीय महाविद्यालयात शिकणारी मैत्रीण आणि बियर ही ललित कला महाविद्यालयात शिकणारी मैत्रीण. या दोघींच्याकडून खूप चांगली माहिती, चीनमधील वैद्यकीय शिक्षण-वैद्यकीय सेवा-वैद्यकीय संशोधन-आरोग्याची स्थिती त्याचप्रमाणे ललितकला




*चीनमधल्या भव्यदिव्य क्रीडा संस्कृतीची सफर घडवून आणणारे चीनी मित्र रेन आणि जेन ...*

याबद्दलचे शैक्षणिक धोरण–नोकरी/व्यवसाय संधी–संशोधन–सांस्कृतिक जाणीवा आणि सरकार तसेच समाजाकडून मिळणारी आर्थिक मदत/नियोजन इत्यादी बद्दल खूप चांगली आणि सखोल माहिती मिळत गेली. मी त्यांच्या महाविद्यालयाला कित्येक भेटी दिल्या. हा सगळा अनुभव थक्क करून टाकणारा होता.

***क्रीडाभ्यासाचे अनोखे विश्व***

परंतु आज या विषयांच्या संदर्भात जे मला विस्ताराने सांगायचे आहे, माझा अनुभव तुमच्याबरोबर शेअर करायचा आहे, त्याच्या पाठीमागे जो तीन नंबरचा मित्र त्याचे, नाव रेन (Rain–ज्याचे मूळ चिनी नाव चेन शुओ चु.). हा मित्र रेन बीजिंग पॅरालिम्पिमध्ये एक स्वयंसेवक त्याचप्रमाणे मुख्य करून मैदानावरील खेळा संदर्भातील नियोजन आणि आयोजन या कामामध्ये सहभागी होता. हा मित्र रेन, बीजिंगमधील बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी येथे पाच वर्षाचा टेनिस या विषयामध्ये पूर्णवेळ अंडर ग्रॅज्युएट म्हणजेच पदवी अभ्यासक्रम शिकत होता. पाच वर्ष आणि ती सुद्धा टेनिस या एका विषयांत पदवी अभ्यासक्रम. माझं डोकंच गरगरायला लागलं हे ऐकून. आपल्याकडे जसं बारावी पास झाल्यावर आपण पदवीसाठी प्रवेश घेतो महाविद्यालयात, त्याप्रमाणे रेन याने बारावी एका खेडेगावातून पास करून टेनिस या खेळाच्या विषयांत पदवी अभ्यासक्रम जो पाच वर्षाचा आहे, त्यामध्ये प्रवेश घेतला. रेनचे आई–वडील एक छोटासा व्यवसाय आपल्या गावात करणारे. त्यांनी आपल्या मुलाला टेनिस या खेळामध्ये शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. हा मुलगा शरीराने अतिशय सुदृढ आणि खेळामध्ये चलाख. रेन या मित्राकडून बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीबद्दल ऐकायचो, त्यामुळे या युनिव्हर्सिटला प्रत्यक्ष भेट देण्याची फार उत्कंठा लागली होती.

परंतु, मी सकाळी साधारण ११ वाजता ऑलिम्पिक मैदानावर हजर असायचो आणि रात्री मध्यरात्र उलटल्यानंतर साधारण २ किंवा ३ वाजता पुन्हा घरी जायचो. संपूर्ण दिवस कसा जायचा हे समजायचेच नाही, इतके या स्पर्धेचे वातावरण खिळवून ठेवायचे. त्याचप्रमाणे मी खरं म्हणजे, पत्रकार नसलेला पत्रकार त्यामुळे प्रत्येक घटना, बातमी माझे लक्ष वेधून घ्यायची. या सगळ्यामुळे अतिशय तीव्र इच्छा असूनही या युनिव्हर्सिटीला भेट देणे झाले नाही.

अशा सगळ्या धामधुमीत १७ सप्टेंबर २००८ या दिवशी पॅरालिम्पिकची सांगता झाली. एक मोठी पोकळी निर्माण झाल्याची जाणीव दुसऱ्या दिवशी सकाळी झोपेतून उठल्यावर झाली. सकाळीच माझ्या या तीनही मित्र–मैत्रिणींना फोन केला. त्यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे बोलणे होते, ते रेन या मित्राबरोबर. तेव्हा स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला भेट देण्याबद्दल पुन्हा आमचे बोलणे झाले. रेन सुट्टीसाठी दहा दिवस गावाला जाणार असल्यामुळे ऑक्टोबर २००८ मध्ये बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला भेट देण्याचे नक्की झाल्यावरच मला माझ्या कामाकडे लक्ष देणे शक्य झाले.

***सोयीसुविधांचा सुकाळ***

त्यानंतर जवळ–जवळ एक महिन्यानंतर रेनबरोबर बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला भेट देण्यासाठी गेलो. प्रचंड मोठा परिसर, जवळ–जवळ सगळे खेळ शिकवण्याची सोय. पण त्याहीपेक्षा मला आश्चर्य वाटले, ते बऱ्याच कारणासाठी. खेळ या विषयावर विश्वविद्यालय हेच मुळी पहिल्यांदाच बघत होतो परंतु तेथे २००८ मध्ये एकूण ७००० ते ८००० विद्यार्थी/विद्यार्थीनी पदवी–पदव्युत्तर आणि डॉक्टरेट करत होती. सध्या येथे किमान १५,००० विद्यार्थी शिकत आहेत. यापैकी साधारण २,५०० हे उच्च पदवी/डॉक्टरेट करत आहेत. त्याच वेळेला आणखी एक माहिती मिळाली, की चीनमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी मिळून अशी एकूण ६–७ क्रीडा विद्यापीठं आहेत. यामध्ये बीजिंग बरोबरच शांघाई, वुहान (येथून कोविडची सुरुवात झाली असं जग मानतं), शियान, तियांनजीन, चेंगडू, शेनयांग आणि इतर काही ठिकाणं आहेत.

काही माहिती सर्वसाधारणपणे आज आपल्याला इंटरनेटवरती उपलब्ध होऊ शकते. तरी देखील बीजिंग स्पोर्ट्स

युनिव्हर्सिटी संदर्भात काही माहिती येथे देणे गरजेचे वाटते, ज्यामुळे याचे महत्त्व किती मोठे आहे हे समजण्यास मदत होईल.

*१) कँपस क्षेत्रफळ साधारण ७.५० लाख स्क्वेअर मीटर. २) वेगवेगळ्या इमारती आणि इतर बांधकाम साधारण ५ लाख स्क्वेअर मीटर. ३) एकूण १०० पेक्षा जास्त इनडोअर आणि आऊटडोअर प्रशिक्षण संकुल सोयी उपलब्ध आहेत. ४) एकूण कॉलेज आणि शाळा २५ पेक्षा जास्त. ५) खेळांच्या संदर्भातील शास्त्रीय पद्धतीने संशोधन करण्यासाठी ३ रिसर्च इन्स्टिट्यूट/संस्था. ६) फार मोठे पुस्तकालय/ग्रंथसंग्रहालय जेथे १३ लाख पेक्षा जास्त पुस्तक/संदर्भ ग्रंथ/संशोधन मासिक त्याचप्रमाणे अद्ययावत तंत्रज्ञानाने उपलब्ध इलेक्ट्रॉनिक/कॉम्प्युटर लायब्ररी आहे. ७) शिकवणारा वर्ग (अध्यापक); अ) पूर्ण वेळ शिक्षक ६०० पेक्षा जास्त, ब) डॉक्टरेट गाइड्स जवळजवळ १००, क) राष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञ मार्गदर्शक २० पेक्षा जास्त, ड) साधारण ५० आंतरराष्ट्रीय पंच, ई) बाहेरच्या देशामधून तज्ज्ञ साधारण २०० जे विद्यार्थ्यांना स्पेशल मार्गदर्शन करण्यासाठी. ८) येथे एकूण शिकणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनींची संख्या; अ) पदवी (अंडर ग्रॅज्युएट) : ९००० पेक्षा जास्त. ब) पदव्युत्तर आणि पीएच.डी. : ३००० पेक्षा जास्त, क) आंतरराष्ट्रीय विद्यार्थी : २५० पेक्षा जास्त. यामध्ये आणखी एक महत्त्वाची माहिती म्हणजे साधारण ३००० विद्यार्थी दूरस्थ शिक्षणाच्या सोयी मार्फत शिक्षण घेणारे.*

रेन बरोबर जेव्हा २००८ ते २०१० मध्ये मी नेहमी स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला जात होतो, तेव्हापासून आतापर्यंत प्रत्येक वर्षी आपला आवाका आणि विस्तार वाढतच चालला आहे, असे या युनिव्हर्सिटीकडे बघताना जाणवते. वरील दिलेली माहिती जेन या माझ्या मैत्रीण आणि रेन या मित्राकडून खास करून पुन्हा घेतली आहे.

आजच्या काळातील जगातील संशोधन सोशल मीडिया, कॉम्प्युटर, डेटा सायन्स, इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशन्स इत्यादी आपल्या रोजच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या गोष्टी या खेळांच्या शिक्षणावर काय प्रभाव टाकत असतील असा मनात प्रश्न आला आणि त्याची पण माहिती रेनकडून घेतली. येथे एकूण महत्त्वाचे विभाग म्हणजे, *१)डिपार्टमेंट ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड हेल्थ, २) डिपार्टमेंट ऑफ ह्युमॅनिटिज अँड सोशल सायन्सेस, ३) डिपार्टमेंट ऑफ ऑलिम्पिक स्पोर्ट्स, ४) डिपार्टमेंट ऑफ स्पोर्ट्स इंजिनिअरिंग. अर्थात, यांच्या खाली सुद्धा किती महत्त्वाचे शिक्षण विभाग आहेत. ते म्हणजे, अ) स्कूल ऑफ एज्युकेशन अँड स्कूल ऑफ सायकॉलॉजी, ब) स्कूल ऑफ मॅनेजमेंट, क) कॉलेज ऑफ कॉम्पिटिटिव्ह स्पोर्ट्स, ड) चायना फुटबॉल ॲकॅडेमी, स्कूल ऑफ स्पोर्ट्स इंजिनिअरिंग (चायना स्पोर्ट्स बिग डेटा सेंटर), ई) जनरल अडमिनिस्ट्रेशन ऑफ स्पोर्ट्स स्कूल, फ) कोच ॲकॅडेमी, ग) चायना ऑलिम्पिक ॲकॅडेमी, घ) की लॅबोरेटरी ऑफ स्पोर्ट्स, च) की लॅबोरेटरी ऑफ फिजिकल ट्रेनिंग अँड फिजिकल फंक्शन रिकवरी, छ) चायना स्पोर्ट्स स्ट्रॅटेजी रिसर्च इन्स्टिट्यूट इत्यादी. याउपर आणखीन बरंच काही आहे ते सगळं लिहिणे म्हणजे फक्त बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी वर प्रबंध स्वरुपात पुस्तकच होईल.*

पण एक महत्त्वाचा भाग आपण लक्षात घेतला पाहिजे तो म्हणजे, चीन हा देश मुख्यत्वे वैज्ञानिक मानसिकता जपणारा देश आहे. कोणत्याही क्षेत्रात बघितले, तर हा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि त्यावर आधारीत भक्कम पायावर सर्व डोलारा उभा करायचा हा इथला शिरस्ता. वरती उल्लेख केलेले विषय सगळे खेळांच्या शिक्षणासाठी आहेत, याचा आपल्याला विश्वास सुद्धा बसणे कठीण.

***शाळांचे प्रयोगशाळांगण***

या संदर्भातील एक महत्त्वाचा आणि कदाचित शेवटचा मुद्दा सांगून पुढे जातो. तो म्हणजे, लॅबोरेटरीचे (प्रयोगशाळा) जाळे या संपूर्ण परिसरात मिळेल ज्यामध्ये खालील विभाग बघा म्हणजे लक्षात येईल : *१) फिजिकल इफिशियन्सी ट्रेनिंग, २) एक्सरसाइज फॉर कार्डिओ- पल्मोनरी रिहॅबिलिटेशन रिसर्च सेंटर, ३) फंक्शनल रिहॅबिलिटेशन, ४) स्ट्रेस ॲडाप्शन, ५) किन्सिओलॉजी इव्हॅल्युएशन अँड ट्रेनिंग ॲनालिसिस, ६) इंजिनिअरिंग रिसर्च सेंटर ऑफ स्पोर्ट्स न्युट्रिशन, ७) स्पोर्ट्स इंडस्ट्री रिसर्च, ८) एआय स्पोर्ट्स इंजिनिअरिंग, ९) स्पोर्ट्स इक्विपमेंट आर अँड डी सेंटर, १०) स्पोर्ट्स बिग डेटा रिसर्ट सेंटर आणि आणखीन खूप काही.*

या वरून लक्षात येईल की खेळ हा किती गंभीरपणे घेण्याचा विषय आहे. एखादा खेळाडू जेव्हा खेळत असतो, तेव्हा त्यांच्या शरीरात-मनात-मेंदूत-स्नायूंमध्ये आणि बऱ्याच विषयांतर्गत होणारे बदल आणि त्याचे परिणाम याचा बारकाईने अभ्यास करून सराव आणि मार्गदर्शन करणे हे किती महत्त्वाचे. खेळाडू हे फक्त स्वत:साठी किंवा देशासाठी पदकं मिळवणारे यंत्र नाही तर त्यांना देखील मानव म्हणून आदरानेच बघितले




*बीजिंगमधले पॅरालिम्पिक हे शिस्तबद्ध नियोजन, देखणे आयोजन आणि मार्गदर्शक संयोजन यासाठी स्मरणात राहिले...*

पाहिजे आणि त्यांना योग्य ते मार्गदर्शन-शिक्षण-सराव-आहार-व्यायाम-विश्रांती-नवीन तंत्रज्ञानाचा-उपयोग तसेच जगातील इतर ठिकाणी होणारे प्रयोग आणि प्रगती/यश या प्रमाणे सुविधा मिळाल्याच पाहिजेत. याची पुरेपूर जाणीव आणि त्याचा संपूर्ण आदर आणि त्याप्रमाणे नियोजन-संचालन मला बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीमध्ये बघायला मिळाले. फक्त स्पर्धा जिंकणे - पदक मिळवणे याच दोन गोष्टींकडे लक्ष न देता, या ध्येयापाठीमागे काय मेहनत-श्रम-अभ्यास करावा लागतो आणि त्यासाठी कोणत्या गोष्टी अतिशय आवश्यक आहेत हे सर्व चांगले समजून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपल्या योजना आणि कार्यक्रम राबवले गेले पाहिजेत. खेळ हा फक्त एक इव्हेंट नसून संपूर्ण जीवनशैली आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

***क्रीडापीठाची अकल्पित रचना***

ज्या वेळेस रेनबरोबर बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीमध्ये गेलो तेव्हा महत्त्वाच्या कोणत्या ठिकाणी भेटी दिल्या आणि मला काय समजलं त्यापैकी काही आता येथे मांडत आहे.

युनिव्हर्सिटी आवारात शिरतानाच एक अति प्रचंड मोठे प्रवेशद्वार. ज्याला वास्तुकलेचा अतिशय सुंदर आधार होताच परंतु फुले, झाडे, वेली यांची अतिशय सुंदर सजावट केली होती. जी रोज नव्याने केली जाते. आत प्रवेश करताच एक प्रचंड उंच पुतळा माओ त्से तुंग यांचा. एक महत्त्वाची माहिती म्हणजे ही युनिव्हर्सिटी पहिल्यांदा १९५३ मध्ये सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल एज्युकेशन या नावाने स्थापन झाली, जी नंतर १९५६ ते १९९३ पर्यंत बीजिंग इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल एज्युकेशन या नावाने ओळखली जात होती. सन १९९३ पासून मात्र याचे नाव बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी असे करण्यात आले जे आज देखील आहे.

रेन पहिल्या दिवशीच यामधील काही विभाग दाखविण्यासाठी घेऊन गेला. सर्व प्रथम टेनिस कार्यशाळेला आणि त्याच्या इन्स्टिट्यूटला भेट द्यायची होती. परंतु त्याच्याबरोबर त्याचा मित्र जो घोडेस्वारी शिकत होता तेथे घेऊन गेला. प्रचंड मोठे रेसकोर्स होते. साधारण १०-१५ जण सराव करत होते. घोड्यांच्या तबेल्याकडे गेलो, तर आणखी एक आश्चर्य कमीतकमी ३०-४० घोडे अगदी व्यवस्थितपणे एकेका लोखंडी जाळ्या असलेल्या प्रत्येकाच्या घरात ठेवले होते. घोडे म्हणजे अतिशय धष्टपुष्ट आणि त्यांची सेवा आणि काळजी घेण्यासाठी ५-१० व्यक्ती होत्या. तेथेच बाजूला त्यांच्यासाठी वैद्यकीय उपचार दवाखाना, खाण्याच्या पदार्थांचे स्टोअर्स, घोडेस्वारी संदर्भातील शिक्षण देणारी संस्थेची इमारत आणि बरेच काही. मला या विषयामधील काहीच माहीत नव्हते परंतु सगळेच अवाढव्य-अफाट काम होते. येथे मुले आणि मुली यांचे प्रमाण जवळजवळ सारखेच जाणवले. आणखी एक माहिती मिळाली, की इतरही खेळ शिकणारे विद्यार्थी येथे शरीर कमावण्यासाठी, व्यायाम करण्यासाठी येत असतात. त्यांच्यासाठी ५-६ वेगवेगळे घोडे होते.

तेथून परत येईपर्यंत दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. रेन आम्हाला त्यांच्या कँटिनमध्ये किंवा ज्याला आपण हॉस्टेल मेस म्हणतो तेथे घेऊन गेला. त्या इमारतीच्या हॉलमध्ये पाऊल टाकले आणि पुन्हा एक आश्चर्याचा धक्का. नजर ठरत नव्हती, एवढे ते मोठे कँटिन होते. माझ्या अंदाजे कमीत कमी ८०० जण एका वेळेला जेवण करू शकतील, एवढी बसण्याची व्यवस्था होती. आणि जेवणाची व्यवस्था साधारण अर्धा तास आम्ही तेथे होतो त्यावेळेत किती मोठ्या संख्येने विद्यार्थी येऊन जेवण करून गेले, याचा हिशेब करणेच शक्य नव्हते. मुख्य गोष्ट म्हणजे, याच ठिकाणी यांचे शिक्षक, वरिष्ठ शिक्षक, कोच इ. सगळे देखील आपले जेवण घेत असल्याची माहिती मिळाली. सगळी माणसं अशा ठिकाणी समान फक्त त्यांच्या कर्तृत्वाने-कामांमुळे त्यांची वेगळी ओळख.

त्यानंतर आम्ही पुन्हा बाहेर पडलो, तेव्हा रस्त्यातच बाजूला बास्केट बॉल शिक्षणाची मोठी संस्थेची इमारत दिसली. त्या आसपास बास्केट बॉलची मैदाने होती. माझ्या माहिती प्रमाणे साधारण २०-२५ मैदान होती. प्रत्येक कोर्टवर काही ठिकाणी सराव-प्रशिक्षण चालू होते, तर काही ठिकाणी सामने चालू

होते. येथे देखील मुलगा–मुलगी यांच्या संख्येमध्ये मला फारसा फरक जाणवला नाही. प्रत्येक कोर्ट वर १–२ प्रशिक्षक होतेच. आणखी एक फारच अचंबित करणारी बाब म्हणजे, ही प्रत्येक बास्केट बॉल मैदाने आंतरराष्ट्रीय दर्जाची होती.

या दोन–तीन ठिकाणी भेटी संपेपर्यंत संध्याकाळ झाली होती. घरी परतणे आवश्यक होते. तरीही पुन्हा बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला भेट देण्याचे मनोमन ठरवले. कारण, इतरही बऱ्याच ठिकाणी भेट देण्याची आणि माहिती घेण्याची इच्छा होतीच. मात्र, दुसऱ्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या निमित्ताने चीनमधील इतर शहरांना भेटी देण्यासाठी प्रवास सुरू झाला. त्यातून पुढे जाऊन चीनमधल्या जवळपास सर्वच क्षेत्रांतल्या महाकाय व्यवस्थांचा आणि त्यातून पुरविल्या जाणाऱ्या सोयीसुविधांचा मला नव्याने परिचय व्हायचा होता... **(क्रमशः)**

**हा लेख लिहिताना जेन लिऊ (जेन) आणि चेन शुओ चु (रेन) यांची मोलाची मदत झाली. दोघांचेही आभार.**

**गजानन जोशी नामवंत ऊर्जानिर्मिती अभ्यासक, भाष्यकार आहेत. समाज, साहित्य आणि कला हे त्यांचे चिंतन आणि आस्वादनाचे विषय आहेत.**

**संपर्क :** joshigajanan@hotmail.com

KITABKHANA, MUMBAI

Located in a 150-year old heritage building in Fort, Kitab Khana is a bookstore with a soul. With an old world charm, the bookshop houses a beautifully curated collection of books from modern fiction, classics, children's books to titles in regional languages like Hindi, Marathi, Gujarati and more. KitabKhana offers a 10-15% discount all year round and also regularly hosts author events, bookclubs and workshops. Readers can unwind at the in-house cafe. A literary haven for bibliophiles.



Somaiya Bhavan 45/47 MG Road, Fort +91 22 61702276/77/78
Whatsapp: +91 88795 40538 / 10:30 am - 7:30 pm, Open all days

kitabkhanabooks

# ये इश्क़ मैं कैसे छोड़ दूँ,
# मेरी उम्र भर की तलाश है!



**प्रा.श्रीनिवास हेमाडे**

**गोष्ट प्रेमाची**



**'प्रेम' ही मूलभूत मानवी भावना आणि संकल्पना 'केवळ प्रौढांकरिता'चे (A certificate) गुप्तज्ञान नाही; तर 'प्रेम' भावना व संकल्पना 'सर्वांसाठी' (U certificate) आहे. 'केवळ प्रौढांकरिता'चे असलेले प्रेम मुख्यत्वे शारीरिक प्रेम आहे, ते 'बिनतात्त्विक प्रेम' म्हणता येईल आणि जे 'सर्वांसाठी, सर्व मानवजातीसाठी अन् समग्र जीव आणि अजीव विश्वासाठी' आहे, ते 'तात्त्विक प्रेम' (Philosophical Love). तथापि तात्त्विक प्रेम ही तात्त्विक 'संकल्पना' (Concept) असण्यासह साक्षात एक जीवन व्यवहार आहे. म्हणजेच, तत्त्वज्ञानाचा संघर्ष अमूर्त संकल्पनांशी जसा असतो, तसा प्रत्यक्ष जीवन व्यवहाराशी असतो. त्या थेट जीवन व्यवहारातूनच तात्त्विक संकल्पनांचा जन्म होतो. 'प्रेम' ही अमूर्त संकल्पना आणि तिचा साक्षात जीवन व्यवहार यांचे 'तात्त्विक भान' या सदरात अपेक्षित आहे...**

"प्रेम म्हणजे काय?" ही एक प्राचीन अनिर्णीत समस्या आहे. ती नेमकी व अचूक स्वरुपात अजूनही सुटलेली नाही, हे उघडच आहे. या समस्येचे उत्तर देणारे शास्त्र, विज्ञान अजूनही तयार केले गेले नाही. प्रेमाची शारीरिक आणि मानसिक यंत्रणा विज्ञान स्पष्ट करू शकते; जसे की प्रेम ही भावना हृदयात कमी आणि मेंदूमध्ये जास्त स्रवते. प्रेम ही हृदयापेक्षा न्यूरो ट्रांसमीटर आणि हार्मोन्सद्वारे चालणारी, तीन टप्प्यांची – वासना, आकर्षण आणि आसक्ती यांची अविरत चालणारी एक जटिल प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत हार्मोन्स आणि मेंदूतील डोपामाइन, सेरोटोनिन आणि ऑक्सिटोसिन हे काही प्रमुख न्यूरो ट्रांसमीटर उत्तेजित होतात, ज्यामुळे आनंद आणि समाधान अनुभवण्यास मदत करतात, इत्यादि इत्यादि.

***प्रेमाचे शास्त्र***

अर्थात 'प्रेमाचे शास्त्र' (The science of Love) या शीर्षकाखाली हजारो स्पष्टीकरणे आढळतील. शास्त्र किंवा विज्ञान आणि प्रेम यांची सांधेजोड घालणारी जीवशास्त्र, प्रजननशास्त्र, मानसशास्त्र, उत्क्रांती विज्ञान, रसायनशास्त्र इत्यादी विविध नैसर्गिक विज्ञाने प्रेम भावनेची अन् प्रेमाच्या आविष्कारांची खुलासेवार माहिती देतील. त्याचप्रमाणे प्रेमाचे समाजशास्त्र देखील काहीएक निश्चित सिद्धांत सांगण्याचा आटोकाट प्रयत्न करेल. प्रेमाचे अर्थशास्त्र, प्रेमाचे धर्मशास्त्र अजून विकसित झालेले नसले, तरी प्रेम आणि धर्म, प्रेम आणि अर्थ, अथवा दोन्ही जोडगोळ्या परस्पर विरोधी, जणू शत्रू असल्याने 'पैसा या प्यार' आणि धर्मयुद्धे व्हर्सेस प्रेमयुद्धे ही to be or not beची 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे'ची रणभूमी बनतात. प्रेमयुद्ध ही सनातन गोष्ट आहेच. म्हणून तर 'प्रेमात आणि युद्धात सारे काही चालते' उर्फ प्रेम आणि युद्ध या दोन्ही गोष्टी नैतिकतेच्या अतीत मानल्या जातात (पण हा थोर गैरसमज आहे). त्याचप्रमाणे प्रेमातील राजकारण आणि प्रेमाचे राजकारण देखील सांगता येईल. प्रेमाचे तंत्रज्ञान (प्रेमाच्या युक्त्या) हे गेल्या काही दशकात फोफावलेले मिथ्या विज्ञानही बरीच माहिती देईल. या सर्वांसाठी व्हॉट्सॲप विद्यापीठे, फेसबुक, टेलीग्राम इत्यादी समाज माध्यमे सर्टिफिकेट ते पीएच.डी. पदव्यांची खिरापत वाटत आहेतच.

'प्रेमाचे शास्त्र' या शब्दप्रयोगात 'प्रेम' व 'शास्त्र' असे दोन शब्द असल्याने त्यांना जोडून येणारी अतिशय लोकप्रसिद्ध आणि लोकप्रिय स्पष्टीकरणे म्हणजे, देशोदेशीच्या ज्ञानी आचार्य, ऋषि, मुनी, चिंतक, विचारवंत इत्यादि विद्वान मंडळींनी मांडलेले स्थानिक कामशास्त्र, कोकशास्त्र, रतिशास्त्र, रतिविद्या, रतिरहस्य, प्रेमशास्त्र, कामसूत्र, अनंगरंग, कामकला, कामविज्ञान इत्यादी. त्या त्या देशांच्या भाषा व शब्दावली नुसार ही 'तथाकथित' शास्त्रे रचली गेली असणार. त्यांच्या शीर्षकात शास्त्र, विज्ञान, कला, रहस्य असे शब्द जोडले गेलेले असले, तरी 'आधुनिक विज्ञान' ज्या प्रकारे मांडले जाते ते शास्त्र अथवा विज्ञान नसून 'एक प्रकारचे ज्ञान' असा त्याचा अर्थ आहे, हे उघडच आहे. पण ते उघड आहे म्हणून आबालवृद्धांना उघडपणे उपलब्ध नाही, तर केवळ प्रौढ माणसासाठी उपलब्ध असल्याने आणि बालकांसाठी 'गुप्त' असल्याने ते 'गुप्तज्ञान' देखील आहे.

अधोरेखित केले पाहिजे ते हे, की या साऱ्या शोध प्रवासात 'प्रेमाची कला', 'प्रेमाचे विज्ञान', 'प्रेमशास्त्र' अशा शीर्षकाखाली बराच भावनिक उच्छाद मांडला गेला आहे. या भावनिकतावादांनी ज्ञानशास्त्र, नीतिशास्त्र, भौतिक शास्त्र इत्यादि ज्ञानरचनेत जसे व्यवहारात उतरणारे बौद्धिक आणि प्रत्यक्ष वर्तन अपेक्षित असते, त्यानुसारचे प्रेमशास्त्र रचले आहे आणि वैज्ञानिक पद्धतीनुसार ते स्पष्ट केले आहे, याचे पुरावे देता येत नाहीत. हे खरे की प्रेमाचे जैव रसायनशास्त्र किंवा प्रेमाचे मानसशास्त्र यासारखी प्रेमाच्या काही नैसर्गिक बाजूंचे दर्शन घडविणारी मोजकी नैसर्गिक विज्ञाने रचली गेली. या विज्ञानांचे योगदान महत्त्वाचे आहे.

...तर, निसर्ग विज्ञाने, सामाजिक विज्ञाने, मानव्य विज्ञाने आणि कला प्रांताने विविध सिद्धांत साहित्य, संगीत, नाट्य, काव्य गीते, विविध कला या द्वारे वैज्ञानिक पद्धती शास्त्रीयदृष्ट्या प्रेमाचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला आहे. विशेषतः मानसशास्त्रज्ञांनी प्रेमाच्या पॅथॉलॉजिकल-पृथकशास्त्रीय अभिव्यक्तींचा अभ्यास केला आहे तर उत्क्रांतीवादी जीवशास्त्रज्ञांनी प्रेमभावनेला मानवी प्रजातींच्या अस्तित्वाशी जोडलेली एक 'मूलभूत जैविक आणि मानसिक प्रेरणा' या रुपात परिभाषित करण्याचा प्रयत्न केला आहे.

***प्रेम आणि स्त्रीवाद***

स्त्रीवादाने प्रेमाचा सखोल अभ्यास केला आहे. पण त्यांनी कोणत्याही अभ्यासक्रमात सर्टिफिकेट ते पीएच.डी.मध्ये 'प्रेम' या विषयाचा समावेश करणे टाळले आहे. स्त्री शोषणाच्या पलीकडे जाण्यास स्त्रीवाद तयारच नाही. प्रेम म्हणजे, स्त्री शोषण हे तर अनेकांचे आवडते ब्रीदवाक्य ठरले तर नवल नव्हे. 'व्यक्तिगत ते राजकीय अन् राजकीय ते व्यक्तिगत' म्हणून

व्यक्तिगत प्रेम व शोषण अधोरेखित झाले, हे मोठे योगदान मिळाले असले तरी व्यापक प्रेम भावनेकडे मात्र दुर्लक्ष झाले, हे मोठे नुकसान झाले आहे, हे देखील अधोरेखित होणे अनिवार्य आहे. स्त्रीवाद अभ्यासक, अभ्यासक्रम रचियते, विद्यार्थीवर्ग आणि स्त्रीमुक्तिवाद चळवळीचे नेते, कार्यकर्ते, प्रसारक, आंदोलक इत्यादी लोकांना प्रेमविषयक मूलभूत तात्त्विक चिंतनाचे भय (Phobia) आहे की काय, अशी भीती वाटावी, अशी स्थिती मी अनुभवली आहे. या साऱ्यांचे चेहरे कायम उदास, अनिमिया झाल्यासाखे अन् विरही वासवदत्ताप्रमाणे सपक का असतात, हा एक गंभीर विषय मानला पाहिजे, अन् समजा तसे नसेल तर त्याचेही विश्लेषणात्मक चिंतन केले पाहिजे...!

'ज्ञान म्हणजे काय?' या समस्येचे उत्तर देणारे शास्त्र ते 'ज्ञानशास्त्र'. सरकारची आणि नागरिकाची कर्तव्ये कोणती? 'न्याय म्हणजे काय?' याचे उत्तर देते ते 'कायदाशास्त्र', 'रसायन म्हणजे काय?' याचे उत्तर देते ते 'रसायनशास्त्र', 'नीति किंवा नैतिकता म्हणजे काय?' याचे उत्तर देते ते 'नीतिशास्त्र', 'धर्म म्हणजे काय?' याचे उत्तर देते ते धर्मशास्त्र. आता, या प्रश्नोत्तरानुसार 'प्रेम म्हणजे काय?' याचे उत्तर देते ते 'प्रेमशास्त्र' असे म्हणण्याचा मोह होतो, झाला, होतही आला.

***सौंदर्यशास्त्र व प्रेम***

तत्त्वज्ञानाची शाखा असलेल्या 'सौंदर्यशास्त्र'(Aesthetics) या शाखेनेही गुंतागुंतीचे अनेक प्रेम सिद्धांत मांडून प्रणयरम्य साहित्य निर्मितीच्या पर्वत रांगा उभ्या केल्या आहेत. 'सौंदर्यशास्त्र' या संज्ञेत 'शास्त्र' शब्द असल्यामुळे ते रसायन, भौतिक, खगोल इत्यादी सारखे पद्धतीशास्त्रीय 'विज्ञान' (science) असावे, असा भास गेली हजारो वर्षे झाला. 'सौंदर्य' हीच संकल्पना संदिग्ध अन् संशयास्पद असल्याने त्याचे हे तथाकथित 'शास्त्र'ही संदिग्ध बनले. पण तत्त्वज्ञान नेहमीच तात्त्विक संशयाकडून तात्त्विक निश्चिततेकडे प्रवास करीत असते. त्यामुळे या संदिग्ध प्रांतातूनही काही सिद्धांत निष्पादित झाले, हे सत्य आहे.

या निष्पादनाचा एक परिणाम म्हणून जागोजागी देशोदेशी स्थानिक आणि जागतिक स्वरूपाचा अद्भुतरम्यतावाद, सिद्धांत, चळवळी, साहित्य, काव्य उगवले. या अद्भुत-रम्यतावादाने (romanticism of love) प्रेमाबद्दल अनंत अन् अपरिमेय काव्य आणि साहित्य निर्माण केले, ही एक मोठी व श्रेष्ठ गोष्ट आहे. पण त्याखेरीज 'प्रेमाचे तात्त्विक' (philosophical), तर्कशास्त्रीय (logical), भाषाशास्त्रीय (philological) आणि भाषा तत्त्वज्ञानाच्या (philosophy of language) दृष्टिकोनातून अचूकतेच्या जवळपास जाणारे कोणतेही स्पष्टीकरण यातील सिद्धांतांनी दिलेले नाही, हे देखील तितकेच निर्विवाद सत्य आहे. समीक्षा प्रांताने काहीएक प्रयत्न केले असले, तरी त्याला आधुनिक गती मिळालेली नाही, हे ही 'साहित्यिक सत्य' आहे.

कदाचित असे स्पष्टीकरण देण्यात अद्भुतरम्यतावाद समर्थकांना आणि प्रेमाची विविध सामाजिक विज्ञाने, निसर्ग विज्ञाने आणि काव्यशास्त्रे रचियत्यांना अनेक अडचणी आल्या असू शकतील. परिभाषा गवसली नसेल, स्पष्टीकरण देण्याच्या प्रशिक्षणाचा अभाव असू शकेल, तात्त्विक व तार्किक वैचारिक शिस्तीचाही अभाव असू शकेल किंवा स्पष्टीकरणाचे भानचं मुदलात नसेल. किंवा असे काही स्पष्टीकरण देण्याचे भय वाटू शकत असेल. असे स्पष्टीकरण दिले की 'प्रेमाचे साहित्य, संगीत, कला, निसर्ग विज्ञाने व सामाजिक विज्ञाने निर्माण करण्याची दुकानेच बंद पडतील,' अशीही भीती असू शकेल. प्रेम नेहमीच प्रेमळ नसते, ते हिंसक असते. 'प्रेममय हिंसा व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर अति व्यापक अन् विध्वंसक युद्धजनित स्वरुपाची असते', हे रहस्य उघडकीस आले की सामाजिक रचनेचा आराखडा कोसळू शकतो, असेही सुप्त भय असू शकते.

***तत्त्वज्ञान आणि प्रेम***

तत्त्वज्ञानाची चर्चा करताना, तत्त्वज्ञानातील विविध सिद्धांतांची; विशेषतः नैतिक तत्त्वज्ञानाची चर्चा करताना 'प्रेम' संकल्पनेची चर्चा होतेच होते; पण ती चर्चा म्हणजे काही 'एक निखळ ज्ञान रचना' या अर्थाने नसते. ते एक स्वतंत्र ज्ञानशाखा या अर्थाने 'प्रेमाचे तत्त्वज्ञान' नसते. ती अनुषंगिक चर्चा असते एवढेच. कोणत्याही चिंतन विषयाचे जसे 'तत्त्वज्ञान' मांडले जाते; जसे की विज्ञानाचे तत्त्वज्ञान, भाषेचे तत्त्वज्ञान किंवा धर्माचे तत्त्वज्ञान, प्लेटोचे तत्त्वज्ञान, वैदिक तत्त्वज्ञान, मांडले जाते तसे 'प्रेमाचे तत्त्वज्ञान' अजूनही मांडले गेलेले नाही, हेही तितकेच सत्य आहे. कारण 'प्रेम ही घडण्याची गोष्ट आहे, विचार करण्याची गोष्ट नाही' हा भयंकर आवडता आणि लोकप्रिय लोकसमज आहे.

या आकलनाने जणू एक अशी अभेद्य भावनिक परंपराच घडवली आहे, की आणि ती परंपरा प्राणाहून प्रिय असल्याने

'प्रेमविषयक तात्त्विक चिंतन' अशक्य करुन ठेवले आहे. स्त्रीमुक्तीवाद, स्त्रीवाद आणि सामाजिक व राजकीय चळवळींना जसा प्रेमविषयक चिंतनाचा फोबिया असावा तसा तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, चिंतक, अभ्यासक्रम रचियते यांनाही असावा की काय, अशी शंका येते. वस्तुतः कोणत्याही विषय वस्तूचा पूर्ण वस्तुनिष्ठ विचार करणारा एकमेवाद्वितीय चिंतन प्रांत म्हणजे तत्त्वज्ञान. पण येथेही 'पार्शिआलिटी अंपायर' असतात. कारण प्रेमाचा थेट संबंध लैंगिकतेशी येतो आणि लैंगिकता हा एक टॅबू मानला गेला आहे. त्याचा भययुक्त प्रभाव 'तत्त्वज्ञान' या प्रांतावरही पडला असावा, असे अनुभवास येते. परिणामी प्रेमाचे तत्त्वज्ञान हा विषय तत्त्वज्ञानाच्या इयत्ता ११ वी ते पीएच.डीच्या अभ्यासक्रमात कुठेही नसावा, हे तर आणखी जास्त शोकांतिक आहे. ''भय तिथलेही संपत नाही अन् इथलेही संपत नाही!'' ही अतिशय शोचनीय व चिंताजनक गोष्ट आहे.

***भक्तिभाव आणि प्रेम***

मानवी सामाजिक उत्क्रांतीच्या विकासक्रमात धर्म आणि अध्यात्म (metaphysics) यांचा प्रवेश झाला तसा मूर्त आकार धारण करणाऱ्या भावनिक प्रेमाची परिणती 'दैवी भक्तिभाव' या अन्य 'अमूर्त प्रेम प्रकरणा'त केली गेल्यामुळे जीव-अजीव जगताबद्दलचे अपेक्षित असलेले वास्तव प्रेम आकलनशक्ती बाहेर आणि प्रत्यक्ष व्यवहाराबाहेर गेले. परिणामी, आवश्यक असलेले 'वैश्विक प्रेम' अस्तित्वात येऊ शकत नाही, ही मानवी जीवनाची शोकांतिका अन्य एक बाजू म्हणावी. ती टाळावयाची असेल तर 'प्रेम ते भक्ती' वास्तव बनवण्याच्या दिशेने मानवी संस्कृतीची वाटचाल अनिवार्य ठरते. त्यासाठी निखळ तात्त्विक मांडणी आवश्यक आणि अनिवार्य आहे.

***असो, म्हणजेच नसो!***

...तेव्हा, 'प्रेम' ही मूलभूत मानवी भावना आणि संकल्पना 'केवळ प्रौढांकरिता'चे (A certificate) गुप्तज्ञान नाही; तर 'प्रेम' भावना व संकल्पना 'सर्वांसाठी' (U certificate) आहे. 'केवळ प्रौढांकरिता'चे असलेले प्रेम मुख्यत्वे शारीरिक प्रेम आहे, ते 'बिनतात्त्विक प्रेम' म्हणता येईल आणि जे 'सर्वांसाठी, सर्व मानवजातीसाठी अन् समग्र जीव आणि अजीव विश्वासाठी' आहे, ते 'तात्त्विक प्रेम' (Philosophical Love). तथापि तात्त्विक प्रेम ही तात्त्विक एक 'संकल्पना' (Concept) असण्यासह साक्षात जीवन व्यवहार आहे. तत्त्वज्ञानाचा संघर्ष अमूर्त संकल्पनांशी जसा असतो, तसा प्रत्यक्ष जीवन व्यवहाराशी असतो. त्या थेट जीवन व्यवहारातूनचं तात्त्विक संकल्पनांचा जन्म होतो. 'प्रेम' ही अमूर्त संकल्पना आणि तिचा साक्षात जीवन व्यवहार यांचे 'तात्त्विक भान' या सदरात अपेक्षित आहे.

''माणसाच्या सामूहिक कल्पनाशक्तीला इतके तीव्रतेने मोहित करणाऱ्या परंतु समग्र भावनिक आणि बौद्धिक - अंतःप्राज्ञिक मानवी आकलनशक्तीला आव्हान देणाऱ्या 'प्रेम' या भावना अन् तद्नुषंगिक वर्तनाबद्दल विज्ञानाने व तत्त्वज्ञानाने गोळा केलेल्या सर्वात आकर्षक व मार्मिक अंतर्दृष्टी नेमक्या कोणत्या आहेत?'' हा प्रश्न येथे उपस्थित करणे योग्य राहील.

येथे मी 'प्रेम' या संकल्पनेचे तात्त्विक आणि तार्किक स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करेन. तो यशस्वी होईलच, असे नाही. पण त्या दिशेने प्रयत्न केल्यास त्यात प्रगती होऊन अधिकाधिक अचूक किंवा कमीत कमी चूक असलेले स्पष्टीकरण मिळण्याचा मार्ग खुला राहील, पुढे त्यात भरही पडेल. प्रेमाच्या मिथ्याकरणाच्या (falsification) शक्यता किमान पातळीवर राहतील, अशी आशाही करता येईल.

तथापि मिथ्या प्रेमशास्त्र, लोकप्रिय प्रेमशास्त्र हा मोठा धोका आहे. 'प्रेमशास्त्र' असे काहीही वस्तुनिष्ठ विज्ञान किंवा 'प्रेमाचे तत्त्वज्ञान' अशी निखळ तत्त्वज्ञानात्मक ज्ञानरचना एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धाचा अर्धा हिस्सा संपला, तरीही अजून अस्तित्वात आलेली नाही; ती येण्याची शक्यता नाही, असे म्हणावे लागते. ते शक्य नाही, याचे कारण वंश, वर्ण, धर्म, जातजमात, आर्थिक भेदभाव, सामाजिक विषम स्तरीकरण इत्यादी जन्मजात अ-सामाजिक अन् अमानवीय घटकांमुळे 'प्रेम' भावनेचा अवकाश नष्ट झाला आहे. तो नव्याने निर्माण करण्याचे भान जागे करणे, प्रत्यक्षात तो अवकाश अनुभवणे-उपभोगणे, त्याचे तात्त्विक मार्ग उपलब्ध करवून घेणे, इत्यादींच्या तात्त्विक चर्चेचा शुभारंभ प्रस्तुत लेखापासून सुरू केला आहे. कारण, ''ये इश्क़ मैं कैसे छोड़ दूँ, मेरी उम्र भर की तलाश है!''


**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क : ९१५ ८६५ ८०६६,** wiselove2026@gmail.com

# सीतेच्या शोधात दाहिदिशा



राजा पटवर्धन

**पुनर्शोध रामायणाचा**



सुग्रीव स्वतःच थोडा गंभीर झाला. म्हणाला, ''हे विनता! लक्ष देऊन ऐक. वानरांना यापुढे जाता येत नाही. फक्त देवतानाच ते शक्य असते. सूर्य चंद्राचा प्रकाशच पोहोचू शकत नाही, म्हणजे जिथे अंधारच असतो तिथे आपण काय करणार? (वानरांना रात्रीचे स्पष्ट दिसत नाही) खुद्द मलाच पुढे काय आहे, ते माहिती नाही. अंधारात देशांची सीमाच दिसत नसेल, तर पुढे जायचे तरी कसे? मी वर्णन केलेल्या जागांशिवाय तुम्ही आपल्या जबाबदारीने अन्य जागाही शोधा. फक्त एका महिन्यात परत यायचे आहे. उशीर झाला तर मृत्युदंड निश्चित आहे...''

**रा**माने दिलेली खुणेची अंगठी हनुमानाने आपल्या हाती घेतली. ती मस्तकाला लावून रामाला नमस्कार करून हनुमान निघाला. संपूर्ण विश्वात आपल्या इतका बलवान आणि गतिमान दुसरा कुणीही नाही, या सुग्रीवाच्या स्तुतीने हनुमान अधिक धीरगंभीर झाला. आपल्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करण्याची जबाबदारी येऊन पडली आहे, याची त्याला पूर्ण कल्पना होती. जे काम राम-लक्ष्मण यांनाही शक्य नाही अशी कबुली खुद्द रामाने दिली, ते काम म्हणजे, शंभर योजने दूर असलेला समुद्र उल्लंघून रावणाने दशरथाची सून, राम पत्नी सीतेला कोठे पळवून नेले आहे, याचा शोध घ्यायचा. त्या महान कार्यासाठीच आपला जन्म झाला आहे, या भावनेने तो अधिकच भारावून गेला, अधिक उत्साही सुद्धा झाला.

आधुनिक संख्याशास्त्रज्ञाचा संगणकसुद्धा या आकडेमोडीने बंद पडेल, अशी अगणित वानर सेना जमली होती. (कोटी सहस्त्राणां सहस्त्रेण शतेन च, पद्मसहस्त्रेण वृत:शंकशतेनच्) आजच्या सोप्या देशी मराठीत बोलायचे, तर असंख्य ट्रिलियन म्हणावे लागेल! पृथ्वी हादरून जाईल इतके वानर सैन्य सुग्रीवाने जमा केले. दशदिशांचे त्याला ज्ञान होते. मुख्य चार दिशांचे चार सेनापती प्रमुख नेमले. पूर्वेला वानत, पश्चिमेला सुशेण, उत्तरेला शतबली, दक्षिणेला किश्किंधेचा युवराज वालीपुत्र अंगद. अशा प्रकारे चारही दिशांना सीतेचा शोध सुरू झाला.

***सुग्रीवाची ध्येयनिश्चिती***

या सर्व वानर प्रमुख वीरांच्या डोक्यावर एक टांगती तलवार होती. सीतेचा शोध घेऊन एका महिन्यात परतायचे होते. जो कुणी एक महिन्याची कालमर्यादा ओलांडेल त्याला मृत्युदंड दिला जाईल. हे राजा सुग्रीवाने स्पष्टपणे बजावले होते. हे काम फत्ते करणाऱ्याला सुग्रीवाने ''माझ्या समान सन्मान आणि वैभव प्रदान करीन'' असे बक्षीसही जाहीर केले. चारही वीरांना दिशा दिग्दर्शन केले गेले. या कार्याला जाणाऱ्यांना वाटेत लागणाऱ्या सर्व मुख्य टप्प्यांची तपशीलवार माहिती देण्याचे काम सुग्रीवाने चोख बजावले. त्याच्या हातात जणू संपूर्ण पृथ्वीचा नकाशाच होता. समुद्र, पर्वत, नद्या, वृक्ष, वने, प्राणी, पक्षी, कडे, कपारी असा सूक्ष्म तपशील वाचताना थक्क व्हायला होते. उदा.पूर्व दिशेला उद्देशून जाणाऱ्या वानरांना काय सांगितले पाहूया. रामाच्या देखत मार्गदर्शन सुरू असते, ''रामा! इच्छेप्रमाणे रुप धारण करणारे (या अतिमानवी कलेत राक्षस निष्णात असायचे) मोठमोठे बलाढ्य वानर आता हजर झाले आहेत. यांनी युद्धात पराक्रम गाजवलेला आहे. ते दैत्य दानवांसारखे बलाढ्य आहेत. ते थकत नाहीत, अनुभवी आहेत. दीर्घोद्योगी चपळ आहेत. ते जमिनीवर, पाण्यावर आणि पर्वतांवरही संचार करू शकतात. कोट्यावधींच्या संख्येने आलेले माझे अनुयायी तुझ्या आज्ञेचे पालन करतील.''

राम प्रसन्न झाला. त्याने सुग्रीवाला आलिंगन दिले. ''रावण कोठे राहतो, ते स्थान शोधून सीता जिवंत आहे की नाही, याची खात्रीपूर्वक माहिती आणा. पुढे काय करायचे ते मी सांगीन.'' असे राम म्हणाला. त्याला सुग्रीवाने पुस्ती जोडली. ''हे विनता (पूर्व दिशा प्रमुख) भागिरथी, शरयू, कौशिकी, कालिंदी, यमुना, सरस्वती, सिंधू, शोण नदी, महती, कालमही असा सर्व परिसर पालथा घाला'' (ही सुरुवात कुठून करायची हे समजणे कठीण आहे. राम सुग्रीव भेट किश्किंधेतील माल्यवन किंवा प्रस्रवण पर्वतावर झाली. आजच्या कर्नाटकात. सिंधू नदी उगवते, तिबेट-हिमालय परिसरात, जाते आजच्या पाकिस्तानातून अरबी समुद्रात. हा संशोधनाचा विषय आहे) सुग्रीव पुढे सांगतो, ''विदेह (आजचा नेपाळ-बिहार) मालव, काशी, कोसल, मगध, पुंड्र, अंग देश, कोशकारांचा देश, चांदीच्या खाणींचा देश (आजच्या भारतात चांदी ही जस्त आणि तांबे या धातू उत्पादनात उपधातू म्हणून मिळते. राजस्थान मध्यप्रदेश काही दक्षिणेकडील राज्यातही) अशा प्रदेशात शोध घ्या. समुद्रातील पर्वतांवर जाऊनही शोधा. विचित्र एकपाद प्राणीही दिसतील, हे नरभक्षसही असतात. कधी नौकांतूनही तिथे लोक जातात. वाटेत अनेक द्वीपही लागतील.'' (हा उल्लेख जावा, सुमात्रा, इंडोनेशिया इ. बेटदेशांचा आहे असा दावा केला जातो) अतिपूर्वेकडे काय दिसेल, याचे वर्णन सुग्रीव सुरुच ठेवतो. त्या वर्णनात लोहित सागर, शाल्मली द्वीप असे उल्लेख आहेत. एका बेटावर असलेल्या उंच पर्वतावर कूट शाल्मली वृक्ष आहे. वैनतेय गरुडाचे निवासस्थान आहे. सुग्रीवाचे अतिपूर्वेकडचे वर्णन सुरुच असते. काही पर्वत शिखरांवर भयंकर राक्षस राहतात तरीही तुमचा शोध सुरुच ठेवा. क्षीरोद (दुग्ध सागर) पाहा. एका पर्वत शिखरांवर तुम्हाला एक सरोवर दिसेल. तिथे शुभ्रकमळे दिसतील. फुलांच्या सुगंधाने परिसर भरुन जाईल. तिथे राजहंसांची क्रीडा पाहायला मिळेल. देवता, चारण, यक्ष, गंधर्व, अप्सरा जलविहार करताना दिसतील. ''सुग्रीवाचे पालुपद असते, तिथे जाऊन सीतेचा शोध घ्या.''

***भयपटसमान वर्णने***

त्यानंतर जळाचेच भक्षण करणाऱ्या अग्नीचे वर्णन आहे. हे ज्वालामुखीचेच वर्णन आहे. वाल्मिकी ऋषींनी हा अग्नी कुणा



*सुग्रीवाने आपली वानर सेना सर्व दिशांना धाडली... मात्र सीतेचा ठावठिकाणा दक्षिण दिशेला झेपावलेल्या वानरसेनेलाच लागणार हे त्याने जाणले होते...*

ऋषींच्या कोपामुळे निर्माण झाला, असे सांगितले आहे. (वा.रा.किश्किंधा.सर्ग.५०) पूर्वेकडे ज्वालामुखींचा उद्रेक भारताच्या सीमेवरील म्यानमार देशात झालेले आहेत. भारताचाच भाग असलेल्या अंदमान-निकोबार बेटांवर ज्वालामुखींचा उद्रेक झालेला आहे. आणखी पूर्वेकडे गेल्यास इंडोनेशियात जावा, सुमात्रा बेटांवर ज्वालामुखींचे उद्रेक नोंदलेले आहेत. जपान न्यूझीलंड या उगवत्या सूर्यांच्या देशांना ज्वालामुखींचा भयाण उपद्रव होत असतो. 'रिंग ऑफ फायर' अशी खास संज्ञा या प्रदेशाची ओळख आहे. अशा प्रकारे अनेक विस्मयजनक माहिती देऊन सुग्रीव सीता शोध मोहीम पूर्वेकडे कशी कुठे चालू ठेवायची, ते कथन करतो. एखादा रहस्यमय भय चित्रपट पाहावा अशी ही वर्णने आहेत. शत योजने उंच असलेल्या पर्वत सुवर्णशिखरांवरही जा, असे सुग्रीव बजावतो. (लंका दक्षिण दिशेकडचे शत योजने दूर समुद्रातले बेट) आणखी पूर्वेकडे गेल्यावर उदयगिरी नावाचा अत्यंत रमणीय पर्वत लागेल. याच पर्वतावर विष्णुने वामन अवतारातील पहिले पाऊल ठेवले. (दुसरे मेरु पर्वतावर. तिसऱ्या पावलाने बळीराजाला पाताळात गाडले.) सूर्य या उदयगिरी पर्वतावर येतो, तेव्हा जंबुद्वीपातील (सम्राट अशोकाच्या काळात शीलालेखातही हा शब्द प्रथम वापरला गेला. जंबु म्हणजे जांभूळ. जांभूळ वृक्षांचा देश? आजच्या भारतीय उपखंडाला उद्देशून हा शब्द अनेक पौराणिक ग्रंथात वाचायला मिळतो.) लोकांना त्यांचे बिंब दर्शन होते. १९७२ साली भारतात नेफा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाला अरुणाचल प्रदेश हे सुंदर नाव मिळाले. वाल्मिकी रामायणात ब्रह्मदेवाने प्रथम उदयगिरीची निर्मिती केली असे म्हटले आहे. (तो नेमका कोणता प्रदेश? इंडोनेशियातील जावा, असे काही तज्ज्ञांचे मत आहे.) उदयगिरी नंतर येते, ते सुदर्शन द्वीप. उदयगिरी हे ब्रह्मलोकाचे प्रथम द्वार आहे. नंतर पृथ्वीलोकात जाता येते. पूर्व हीच पहिली दिशा. या पर्वतांवर जाऊन तुम्ही सीतेचा शोध घ्या. गुहेत दऱ्याखोऱ्यात वनात सर्वत्र रावणाला गाठा, सीतेला शोधून काढा.''

***वानरांपुढचे आव्हान मोठे***

''सुग्रीव स्वतःच थोडा गंभीर झाला. हे विनता! लक्ष देऊन ऐक. वानरांना यापुढे जाता येत नाही. फक्त देवतानाच ते शक्य असते. सूर्य चंद्राचा प्रकाशच पोहोचू शकत नाही, म्हणजे जिथे अंधारच असतो तिथे आपण काय करणार? (वानरांना रात्रीचे स्पष्ट दिसत नाही) खुद्द मलाच पुढे काय आहे, ते माहिती नाही. अंधारात देशांची सीमाच दिसत नसेल तर पुढे जायचे तरी कसे? मी वर्णन केलेल्या जागांशिवाय तुम्ही आपल्या जबाबदारीने अन्य जागाही शोधा. फक्त एका महिन्यात परत यायचे आहे. उशीर झाला तर मृत्युदंड निश्चित आहे.'' सुग्रीव हे पुन्हा पुन्हा ठासून सांगत होता. सुग्रीवाने ''मला माहिती नाही'' हे सांगून आपली ज्ञान मर्यादा कबूल केली. हे विधान किश्किंधेच्या राजाचे आहे!

पूर्वेकडे पुढे पुढे जायचे म्हणजे एका सरळ रेषेत नव्हे, आजच्या भारताचे उत्तर टोक काश्मीर ते दक्षिणेस कन्याकुमारी असे दोन भाग जोडणारी रेषा काढून उत्तर दक्षिण वाढवली, तर पूर्वेकडच्या संपूर्ण भागात उत्तर-ईशान्य-पूर्व-आग्नेय-दक्षिण असा विस्तृत भू भाग येतो. सुग्रीव एक माहिती जाणीवपूर्वक देतो ती म्हणजे, ''अग्नीने समुद्र गिळला'' हा उल्लेख केवळ ज्वालामुखीचाच असू शकतो. भारताचाच भाग असलेल्या अंदमान निकोबार बेटांवर ज्वालामुखी उद्रेक नोंदी आहेत (भारतापासून अंतर १२००-१४०० कि.मी.) आणखी पूर्वेकडे ज्वालामुखी उद्रेक होतात, ते इंडोनेशियातील जावा सुमात्रा बेटांवर

(भारतापासून अंतर आहे ४०००-५००० कि.मी.) हा रिंग ऑफ फायर विभाग. पूर्वेकडचा आणखी एक देश उरला, तो जपान (५०००-६००० कि.मी) हा उत्पाती ज्वालामुखींचा प्रदेश आहे. पुन्हा रिंग ऑफ फायर. सुग्रीवाचे वानर समुद्र उल्लंघून पूर्वेकडे फारतर अंदमान पर्यंतच जाऊ शकले असते. आणखी अति पूर्वेकडे जायचे, तर विनता टीम मधील वानरांना पक्षीरुपानेच हे शक्य होते. वानरांची उंची पर्वतासारखी, बल, पराक्रम इंद्रासारखा असला, तरी एका महिन्याच्या कालमर्यादेत ही शोध मोहीम यशस्वी करून परतायचेही होते. हे केवळ पक्षीच करू शकले असते.

***कुबेराचे व्हाइट हाउस***

रामायणात असा प्रयत्न करणारे दोन पक्षी आहेत. वरुण पुत्र.

पहिला जटायू, दुसरा त्याचा भाऊ संपाती. असा पराक्रम करणे विनताच्या बसकी बात नव्हती. नाहीतर हनुमान स्त्रोत्रांप्रमाणे विनता स्तोत्रे रचली गेली असती. उघडच आहे, विनताच्या नेतृत्वातील  वानर सहकारी अपयशी ठरले. हे वानर नक्की किती योजने उड्डाण करुन नकार घंटा वाजवीत परत आले, याचा उल्लेख वाल्मिकी ऋषींनीच केलेला नाही. वाल्मिकी रामायणात पश्चिम मोहीम आणि उत्तर मोहीमेच्या भूगोलाची वर्णने ही अशीच आश्चर्यचकित करणारी रहस्याने भरलेली आहेत. उत्तरेस प्रमुख म्हणून 'शतबली' वानर वीराची योजना होती. त्याची वानरसेना कुणाच्या अंशाने तयार झाली असावी? ही चक्क यमाची संतती होती. थोडीथोडकी नव्हे ती सेना होती, एक लक्ष वानरांची. ही सेना चक्क हिमालयावरच स्वारी करायला निघाली. वाटेतल्या देशप्रदेशाची यादी अशी आहे... म्लेंच्छ, पुलिंद, शूरसेन, भरत, कुरुक्षेत्र, मद्य, कांबोज, यवन, शक हे सर्व आजच्या भारताच्या वायव्य दिशेकडचे प्रदेश आहेत. जे वेदिक संस्कृतीतील नाहीत ते म्लेंच्छ. अफगाणी लोकांना उद्देशून हा शब्द असावा. कंबोज हे घोड्यावर बसणारे लोक. शक हे मध्य आशियाई. देव आणि गंधर्व राहतात तेथेही यमपुत्रांना जायची आज्ञा होती. तेथील शिखरे आणि गुहांचा शोध घ्यायचा होता. आश्चर्याची बाब म्हणजे, तिथे एक कालपर्वत असून त्यात सोन्याच्या खाणी आहेत. (बापरे) त्याच्याही पलीकडचा दुर्गम भाग ओलांडून पुढे गेल्यावर  मनाला आनंद देणारा शुभ्र हिमालय लागेल. त्याच्या पलीकडे देवांचा धनाध्यक्ष कुबेराचे विश्वकर्मा याने बांधलेले  रमणीय भवन आहे. ते शुभ्रपांढरे आहे. जणू व्हाइट हाऊसच.

कुबेर हा रावण आणि कुंभकर्ण या सख्या भावांचा सावत्र भाऊ. त्याचे व्हाइट हाऊस सोन्याने मढवलेले होते. सुग्रीवाने त्याही पलीकडच्या क्रौंच गिरीवर जाऊन शोध घ्यायला सांगितले. पलीकडच्या मैनार्क पर्वतावरही जाणे महत्त्वाचे आहे, असे बजावले. तिथे मयराक्षसाने स्वत:साठी बांधलेले घर आहे. (मय हा मंदोदरीचा पिता) तिथेही सीतेचा शोध घ्या. त्याच्याही वर चढत जा आणि तुम्हाला फक्त आकाशच दिसेल. सूर्य, चंद्र, तारे आणि मेघही दिसणार नाहीत. असे असले तरी उत्तम प्रकाश असतो. हे ऋषीमुनींच्या तपश्चर्येमुळे घडते. (असे वर्णन तंतोतंत लागू पडणारा भूभाग आजतरी हिमालय परिसरात नाही. ध्रुव प्रदेशात तरी अशा वर्णनाचा परिसर पाहाता येईल का? हा संशोधनाचाच विषय आहे.) असो. असेच पुढे पुढे उत्तरेला जाण्याचा सल्ला सुग्रीव यम पुत्रांना देतो. सर्व ऋतूत चविष्ट फळे, सुगंधी फुले, रूप यौवन संपन्न स्त्रिया, तेजस्वी गंधर्व, किन्नर, सिद्ध विद्याधर असे सर्व स्त्री पुरुष विहार करतात. कुणी दु:खी नाही, विषण्ण नाही, कुकर्मी नाही, फक्त सद्गुणांची वृद्धी जिथे होते. आणखी पुढे उत्तरेचा समुद्र लागेल. त्या समुद्रात एक पर्वत आहे त्याचे नाव 'सोमगिरी'. इंद्र आणि ब्रह्म लोकातील पुण्यवानच त्या सोमगिरीचे दर्शन घेतात. तिथे सूर्य नसतो तरी पर्वताचाच प्रकाश पडतो. तिथे ब्रह्मा, विष्णु, महेश, रूद्र आणि ब्रह्मर्षी राहतात. त्या सोमगिरीच्या पलीकडे जाऊ नका. वानर सैनिकांनो, त्या पलीकडे देवही जाऊ शकत नाहीत. ती अंतिम सीमा समजून तुम्ही माघारी फिरा. या पुढे सूर्यप्रकाश नाही. कोणत्याही देशाची सीमा नाही. त्यापुढच्या सीमेची मलाही माहिती नाही. मी न सांगितलेल्या अन्य देशातही जाऊन तुम्ही शोध घ्या. रामाचे कार्य पूर्ण करुन आलात की मी तुमचा सत्कार करीन. नंतर आनंदाने जीवन जगा.

***पाताळयंत्री रावणाच्या मागावर...***

पश्चिम दिशेला जाणाऱ्या वानरांचा प्रमुख होता सुशेण. हा सुग्रीवाचा सासरा म्हणजे तारा (पाच जणींपैकी – अहल्या, द्रौपदी, सीता नंतर येते, तीच ही तारा... पाचवी मंदोदरी) या तारेचे प्रथम इंद्रपुत्र वालीशी लग्न झाले होते. वाली मृत झाला, असे समजून सुग्रीव राजा झाल्यावर तारा ही सुग्रीवाची द्वितीय पत्नी झाली. रुमा नावाची सुग्रीवाची प्रथम पत्नी होतीच. वाली मृत झालेला नव्हताच तो एका गुहेत राक्षसाशी दीर्घकाळ युद्ध करीत होता. त्या राक्षसाचा वध करुन वाली किश्किंधेत परतला. वालीने सुग्रीवाला हाकलून दिले, पण त्याच्या पत्नीला जबरीने ठेऊन घेतले. रामाने वालीचा वध केल्यावर त्याची पत्नी तारा ही पुन्हा सुग्रीव पत्नी झाली. याच ताराचा पिता सुशेण. हा पश्चिम दिशेला जाणाऱ्या वानरसेनेचा मुख्य बनला. सासरा असल्याने सुग्रीवाने त्याला वंदन केले. तो मेघासारखा काळाकुट्ट आणि पराक्रमी होता. सुशेणाच्या वानर सैन्यात अतिशय पराक्रमी असे ऋषींचे वानर पुत्र होते. त्यात मरीची ऋषींचा पुत्र अर्चिष्मानही होता. मारीच नावाचा एक वानरही सहभागी होता. सुग्रीवाने या सर्वास पश्चिमेस जाऊन सीतेचा शोध घेण्यास सांगितले. शोध घ्यायच्या देशांची यादी दिली. सौराष्ट्र, बाल्हिक, कुक्षी, मरूभूमी (राजस्थान?) पुढे समुद्राच्या दिशेलाही जायचे आहे. समुद्रातल्या मोठ्या माशांपासून, अन्य बलाढ्य जलचरांपासून सावध राहाण्याचा सल्ला दिला. मुरवी (मोरवी?) अवंती, जटापूर, सिंधूसागर, संगम आणि शंभर शिखरांच्या सोमगिरी पर्वतासह सर्व ठिकाणांचा शोध घ्या. दुर्गम परिपात्र पर्वतावरही जाऊन शोध मोहीम सुरु ठेवा. अशा

पर्वत शिखरांवर भयंकर असे हजारो गंधर्व राहतात. त्यांच्याशी नीट वागा. हे रुपधारी पराक्रमी आहेत. परिपात्र, वज्र असे पर्वत आहेत. हा परिसर पंचजन्य शंख आणि सुदर्शन चक्राच्या कथेशी जोडलेला आहे. त्या परिसरातही शोध मोहीम जोमाने राबवा. तेथे एक वराह पर्वत आहे. नरकासुरांचे प्राग्ज्योतिषपूर आहे.

(महाभारतातही नरकासूर प्राग्जोतिषपूर आहे, ते पूर्वेकडे आसाम परिसरातले) हे प्राग्ज्योतिषपूर म्हणजे आजच्या गोवा परिसरातले मानले जाते. या वराह पर्वतापलीकडेही एक सुवर्ण पर्वत आहे. तो मेघगिरी पर्वत. इथेच इंद्राला राजपदी बसवून देवांनी अभिषेक केला होता. सुग्रीवाने अशा अनेक पर्वतांची नावे सांगून कथा मूळ पदावर आणली. पुढच्या अस्ताचल पर्वतांवर वरुण देवाचे निवासस्थान आहे. अशा सर्व ठिकाणी रावण आणि सीतेचा ठावठिकाणा शोधून काढा. या अस्ताचलापलीकडे जाऊ नका. त्या पलीकडे सूर्यप्रकाश नाही, देशांची सीमा नाही. महिन्याची मुदत सासऱ्यासही पाळायची होती. या वर्णनावरुन रावण सीतेला देवांकडेही लपवून ठेवील अशी सुग्रीवाला शंका वाटत होती.

***सुग्रीव हतबल होतो तेव्हा...***

आता पुन्हा हनुमानाकडे वळूया. दक्षिण मोहिमेचा प्रमुख अंगद होता. सुग्रीव हिमालयातून दक्षिणेकडचा प्रवास डोळ्यासमोर ठेऊन बोलतोय. विंध्यपर्वत हा हजारो शिखरांनी नटलेला आहे. नर्मदा, गोदावरी, कृष्णवेणी, वरदा या नद्यांच्या किनाऱ्यावर, मेकल, उत्कल, दशार्ण, तसेच विदर्भ, ऋष्टिक माहिषक अशा प्रदेशात अजून शोध घ्या. वंग, कलिंग, कौशिक आणि दंडकारण्य अशा सर्व ठिकाणी गुहांमध्ये शोधा. गोदावरीचा परिसर खास करून पिंजून काढा. आंध्र, टुंड्रा, चोल, पांड्य, केरळ सर्वत्र शोध घ्या. चंदनाच्या अरण्यात जा. कावेरीचे दर्शन घ्या. तिथे अप्सराही येतात. मलयगिरीवर तेजस्वी अगस्त्य ऋषींचे दर्शन घ्यायला जरुर जा. चंदनाची अनेक वने लागली की पुढे जाऊन सागरतीर गाठा. अगस्त्य ऋषींनी महेंद्र पर्वत सागरात निर्माण केला. समुद्रात खूप खोलवर त्याचा पाया रचलेला आहे. तिथे कोण कोण विहार करतात? देवता, ऋषी, यक्ष, सिद्ध चारण, अप्सरांचाही संचार सुरू असतो. या महेंद्र पर्वतापासून शतयोजने दूर एक द्वीप आहे. मानवांना तिथे जाणे दुर्गम आहे. तिथेच रावणाचे निवासस्थान आहे. हा रावण इंद्रासारखा तेजस्वी आणि शक्तिमान आहे. तिथेही सीतेचा शोध घ्या. रावणाच्या निवासस्थाना पलीकडे असलेल्या पर्वताची शिखरे अत्यंत तेजस्वी आहेत. सोनेरी शिखरावर सूर्यकिरण पडले, की ते तळपू लागते. त्यावर चांदणे पडले की अत्यंत मोहक दिसते. पण पापी माणसांना ते तसे दिसत नाही. (म्हणजे रावणाला ते तेज दिसत नसणार.) त्याही पुढे गेलात की सूर्यभान आणि वैद्युत पर्वत दिसेल. अगस्त्य ऋषींसाठी विश्वकर्म्याने विस्तीर्ण घर बांधले आहे. ते सोन्याचे रत्नमंडित आहे. शेजारी एक विषारी सर्पांची भोगवतीनगरी आहे. वासुकी सर्पाचे ते वसतिस्थान आहे. (या वासुकीचीच मेरु पर्वताभोवती दोरी करुन समुद्रमंथन झाले अशी कथा आहे) तिथेही सीतेचा शोध घ्या. थोडक्यात, जीव धोक्यात घालून सीतेचा शोध घ्यावा लागणार आहे, हेच सुग्रीव वानर सेनेला सांगत आहे.

त्याही पुढे अत्यंत दाट अरण्ये आहेत. गंधर्व त्यांचे रक्षण करतात. तिथे पुण्यवान महात्मे राहतात. त्यापुढे पितृलोक आहे. यम तिथेच राहातो. (म्हणूनच दक्षिण दिशेला यमाची दिशा म्हटले जाते) अंधाराचे तिथे साम्राज्य आहे. तिथे मात्र जाऊच नका. तुम्ही दक्षिणेचे टोक गाठलेत असे समजा. तिथे शोधकार्य समाप्त करा. तुम्ही विशेष गुणवंत आहात. जो कोणी सीता सापडल्याची बातमी आणील, त्याला माझ्यासारखाच मान सन्मान मिळेल. तो माझा प्राणप्रिय होईल. तुम्हाला नक्की सीतेचा शोध लागेल.


हा संवाद झाल्यावर रामाने आपले नाव कोरलेली अंगठी हनुमानाला दिली. ''हे हनुमंता, बलशाली कपिश्रेष्ठा! मी तुझ्या बळावर अवलंबून आहे.'' हे पवनकुमारा! कोणत्याही शक्ती आणि युक्तीच्या बळावर तू जनकसुता सीतेला शोधून काढ. आता तू प्रयाण कर.

परंतु, पूर्व पश्चिम उत्तरेकडे गेलेले सर्व बलाढ्य वीर हताश होऊन परत आले. ना रावण दिसला ना सीतेचे दर्शन झाले. सुग्रीवाला याची कल्पना होती. यश मिळणार ते दक्षिणदिशेला गेलेल्या वानर सेनेलाच. वाट पाहून पाहून सर्व थकले. एक महिना संपून गेला, तरी कुणी आनंदाची बातमी घेऊन आलाच नाही. आता रामाला तरी तोंड कसे दाखवणार? सुग्रीव कर्माला दोष देत बसला. लक्ष्मणाच्या प्रत्यंचेचा आवाज घुमतोय असा भास त्याला होऊ लागला.

**राजा पटवर्धन हे विज्ञान, समाज, अर्थशास्त्र आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. कोकणातील विकास प्रकल्पांवर यांनी सातत्यपूर्ण लेखन केले आहे. यांचे 'पुनर्शोध महाभारताचा' हे पुस्तक प्रकाशित आहे.**

**संपर्क :** ९८२००७१९७५

# बौद्ध तत्त्वज्ञानाचा उत्कर्ष



जगदीश काबरे

नास्तिक दर्शन





प्रत्येक धर्माची आचार व तत्त्वज्ञान अशी दोन अंगे असतात. बौद्ध धर्म मुख्यतः आचारधर्म आणि त्यातून निर्माण होणारे तत्त्वज्ञान असा आहे. बुद्धाचा सिद्धांत होता की माणसाचे बरे–वाईट होणे, तसेच त्याला सुख किंवा दुःख होणे, हे त्याचे कर्म व चारित्र्य यावर अवलंबून आहे. मनुष्याचे लक्ष आपण काय करतो आणि काय जाणतो, या दोहोंमध्ये पहिल्या गोष्टीवर असले पाहिजे. करणे आणि जाणणे या दोहोंमध्ये बुद्धाने कर्मालाच प्राधान्य दिले आहे. जे विषय बुद्धीला ग्रहण होत नाहीत आणि ज्यांच्याविषयी केवळ तर्क आणि अनुमानच करावे लागते, अशा विषयांवर त्याने जोर दिला नाही...

**बौ**द्ध धर्माचे नेमके दर्शन काय, याविषयी जगातल्या पंडितांमध्ये मतभेद आहेत. ही सृष्टी कुठून उत्पन्न झाली? मनुष्य प्राणी कुठून आला आणि तो मेल्यानंतर कुठे जाईल? मनुष्य मरणोत्तर आत्म्याच्या स्वरूपात जिवंत राहतो की नाही? बुद्धाने ज्याला निर्वाण म्हटले, ती चीज काय आहे? निर्वाणाचा अर्थ मृत्यू आणि विनाश हाच आहे का दुसरा काही? हे बौद्ध दर्शन समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरणारे काही प्रश्न आहेत. या प्रश्नांविषयी विद्वानांत कडाक्याचे वादविवाद होतात.

***जीवनकेंद्री तत्त्वभान***

कोणत्याही दर्शनात आत्मा, परमात्मा आणि सृष्टी या त्रयींचा विचार प्रामुख्याने असतो. काहींच्या मते बुद्ध हा नास्तिक होता. कारण तो आत्मा आणि परमात्मा यांपैकी कोणालाच मानीत नव्हता. तर ईश्वराच्या बाबतीत अज्ञेयवादी होता. दुसऱ्या काहींचे म्हणणे असे, की जीवनाच्या पलीकडे काय आहे, हे बुद्ध जाणत नव्हता त्यामुळे त्याने त्याबाबतीत मौन पाळलेले आहे. तिसऱ्या काहींचे मत असे की बुद्धाला सगळे माहीत होते; पण इंद्रियांतीत विषयांत काही सांगणे किंवा जाणून घेणे या गोष्टींची त्याला जरुरी वाटली नाही आणि म्हणून तो अशा प्रश्नांविषयी मूक राहिला. आत्मा, परमात्मा, ईश्वर या बाबतीत त्याचे हे मूक राहणे त्याच्या ज्या काही शिष्यांना आवडले नाही, त्यांपैकी मालुंक्यापुत्त हा अग्रेसर होता. आत्मा आणि विश्व, तसेच मृत्यूनंतरची माणसाची स्थिती याविषयी बुद्धाने स्पष्टीकरण दिलेच पाहिजे आणि ते जर त्याने दिले नाही तर आपण त्याला सोडून जायचे, असे त्याने ठरविले. तो एकांती बुद्धाकडे येऊन म्हणाला. 'महाराज, मला आत्मा-परमात्म्यासंबंधीच्या प्रश्नांची उत्तरे हवीत; अन्यथा मी तुमचा शिष्य राहणार नाही.'

त्यावर बुद्ध मालुंक्यापुत्ताला म्हणाला, 'बाबारे, मी तुझ्या प्रश्नांची उत्तरे देईन असे कधी आश्वासन दिले होते काय?'

मालुक्यापुत्त म्हणाला, 'नाही. तुम्ही तसे आश्वासन दिले नाही.'

त्यावर बुद्धाने प्रतिप्रश्न केला, 'मग तू हा धाक कुणाला दाखवतोस? अरे, जो मनुष्य अशा प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत वाट पाहील, तो ती उत्तरे मिळण्यापूर्वीच मरून जाईल. मालुंक्यापुत्ता, एखाद्या मनुष्याला विषलिप्त बाण लागावा, तो काढण्यासाठी त्याच्या नातेवाईकांनी शस्त्रकुशल अशा वैद्याला बोलवावे, वैद्याने पुढे यावे, पण बाणहत मनुष्याने त्याला थांबवून म्हणावे, 'अहो वैद्यराज, मला ज्याने बाण मारला तो क्षत्रिय होता, ब्राह्मण होता, का आणखी कोण होता, त्याचा रंग कसा होता, उंची किती होती, हे सगळे आधी मला सांगा आणि मग माझ्या अंगातला बाण काढा.' तर मालुंक्यापुत्ता, ही सगळी माहिती मिळेपर्यंत तो माणूस जिवंत राहील काय? मी बोलतो ते पवित्र जीवनाविषयी. तसे जीवन जगायला जग हे शाश्वत की अशाश्वत, सान्त की अनंत, आत्मा देहरूप की देहभिन्न हे समजायची मुळीच गरज नाही. ब्रह्मचर्य, वैराग्य, निवृत्ती, उपशम, अभिज्ञान, संबोध, प्रसाद व निर्वाण यांच्याशी या प्रश्नांचा संबंध येत नाही. मी दुःखाचे कारण व दुःखनिरास याविषयी ज्ञान दिले आहे. पवित्र जीवनाशी त्याचा फक्त संबंध येतो.'

दुसऱ्या एका वेळी बुद्धाने वच्छगोत्ताला म्हटले, 'विश्व व आत्मा या विषयी ज्या चर्चा चालतात, त्यांची मी उपेक्षा करतो. तशी चर्चा म्हणजे एक वैचारिक गोंधळ आहे. ते तापदायक असून ज्ञान व निर्वाण यांच्याकडे मनुष्याला नेऊ शकत नाही. हा धोका पाहून मी त्या चर्चा सोडून दिल्या आहेत.'

***हे तर अनर्थाचे मूळ***

मानवी जीवनाचे प्रश्न, विश्वाचे प्रश्न सुटल्याशिवाय सोडवता आले पाहिजेत. कारण मानवी जीवित अल्पकालिक आहे. विश्वाचा प्रश्न सुटेपर्यंत थांबायला माणसाकडे अवसरच नाही. म्हणून जीवनाचा प्रश्न निश्चितपणे सोडविण्याचे बुद्धाने ठरविले व महत्त्वाची दार्शनिक तत्त्वे अव्याकृत म्हणून सोडून दिली. अव्याकृत म्हणजे अनिर्णित, ज्याचे व्याकरण अर्थात विशदीकरण सांगितलेले नाही ते... बुद्धाने ईश्वर आहे की नाही या प्रश्नाचेही उत्तर दिले नाही. त्याने आपल्या धर्मोपदेशात ईश्वराचे कुठे नावही घेतले नाही आणि अर्थातच त्याच्या भक्तीची साधनाही सांगितली नाही. कारण जर कोणी विश्वावर सत्ता चालविणारा ईश्वरच अस्तित्वात नाही, तर भक्ती आणि प्रार्थना कुणाची करायची?

बुद्ध हा अनात्मवादी होता. त्याने आत्मवादी लोकांचे मोठ्या आवेशाने खंडन केले आहे. तो म्हणतो की आत्मवादी पुरुष आत्मस्वरूप न जाणताच त्याच्या कल्याणासाठी नाना प्रकारची कर्मे करीत राहतो. असे करणे म्हणजे रूप, रंग, गुण, देह, नाम, गोत्र यांची काहीही माहिती नसताना एखाद्या सुंदर स्त्रीवर प्रेम करण्यासारखा प्रकार आहे. अशा मूढ पुरुषाचा लोक सर्वथा उपहासच करतील. तद्वत्तच गुण व धर्म समजल्यावाचून

परलोकात सुखप्राप्ती व्हावी म्हणून जे लोक यज्ञयागादी करतात, त्यांनाही मूर्खच म्हटले पाहिजे. आत्म्याचे अस्तित्व मानणे हे सर्व अनर्थाचे मूळ आहे. आत्म्याचे अस्तित्व मानल्याने अहंकाराचा उदय होतो. मग आत्म्याला सुख देण्याच्या उद्देशाने मनुष्य नाना प्रकारे या शरीराला सुख देण्याचा प्रयत्न करतो आणि अशा सुखाचे उपाय सतत शोधत राहतो. बुद्धाने पारमार्थिक रूपात आत्म्याचा निषेध केला; पण व्यावहारिक स्वरूपात मात्र केला नाही. लोकव्यवहारासाठी त्याने आत्म्याची सत्ता मानली; पण तो रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान या पंचस्कंधांचा केवळ समुदाय आहे, असे त्याने म्हटले आहे.

नागसेन व मिलिंद यांच्या संवादांत हा नैरात्म्य सिद्धांत चांगल्या रीतीने समजावून दिलेला आहे. नागसेनाने मिलिंद राजाला विचारले. 'राजा, तू इथवर पायी आलास की वाहनात बसून आलास?'

राजा, 'मी रथात बसून आलो.'

'मग मला दाखव, की तुझा रथ कुठे आहे? दांडा म्हणजे रथ आहे काय?'

राजा, 'नाही, महाराज.'

'आस म्हणजे रथ काय?'

राजा, 'नाही, महाराज.'

'चाके म्हणजे रथ काय?'

राजा, 'नाही, महाराज.'

'मग, रथाचा पिंजरा, दोऱ्या, लगाम, चाबूक म्हणजे रथ काय?'

राजा, 'नाही, महाराज.'

मिलिंद पुढे म्हणाला, 'आता मला कळले, की रथ नावाची कोणती वस्तूच अस्तित्वात नाही. दंड, चक्र, पंजर इ. अवयवांच्या आधारावर केवळ व्यवहारासाठी त्या सर्वांना मिळून रथ असे म्हणतात.'

नागसेन म्हणाला, 'आत्म्याच्या बाबतीतही तसेच आहे. तो केवळ समुच्चयमात्र आहे.'

***अनीश्वरवादी बुद्ध***

बुद्धाने राहुलला जो उपदेश दिला, तो 'अनत्तलखखणसुत्ता'त सांगितला आहे. त्यात आत्म्याविषयी सांगताना बुद्ध म्हणतो, 'देहधारी व्यक्तीच्या पंचस्कंधांना वास्तविक अस्तित्व नाही. ते तत्त्वहीन आहेत. मिथ्या आहेत. जेव्हा आयू, ऊष्मा व विज्ञान यांचा अंत होतो, तेव्हा ते पंचस्कंधही विघटित होतात. या पंचस्कंधांविरहित देहधारी व्यक्तीच्या आत आत्मा नावाचे एखादे सहावे तत्त्व नाही. जेव्हा पंचस्कंध संघटित होऊन देहधारी व्यक्ती निर्माण करतात, तेव्हा ते उपादानस्कंध बनतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर प्रत्येक स्कंध एका निश्चित मात्रेत अन्य सर्व स्कंधांशी मिश्रित होऊन देहधारी व्यक्तीची उत्पत्ती करतो. स्कंधांचे हे संघटन कोण्या सृष्टिकर्त्या ईश्वराच्या इच्छेने किंवा प्रेरणेने होत नसून, प्रतीत्यसमुत्पादाच्या सिद्धांतानुसार होत असते.

याचे उदाहरण असे की, वनात उगवलेला वृक्ष प्रथम फुलांना व नंतर फळांना जन्म देतो. जर नवनिर्मितीसाठी आवश्यक असलेली परिस्थिती व कारणे विद्यमान असतील, तर जमिनीवर पडलेल्या फळातील बीज दुसऱ्या वृक्षांना पुनश्च उत्पन्न करते. या उत्पत्तिपरंपरेत आत्मा नावाच्या एखाद्या वस्तूला कसलेच स्थान नाही. या पंचस्कंधांच्या समष्टीलाही आत्मा समजणे ही भ्रांती आहे. आत्मा आणि स्कंध एकच आहेत, असे म्हटल्यास आत्मा हा स्कंधासारखाच अनित्य व नाशवान ठरतो. तो स्कंधाहून भिन्न आहे, असे मानल्यास त्याची अवस्था गाईच्या बरोबर असलेल्या गुराख्यासारखी होते. म्हणून आत्मा आणि स्कंध एक आहेत, असेही म्हणता येत नाही आणि ते दोन आहेत, असेही समजता येत नाही.

बुद्ध हा अनीश्वरवादी होता. त्याच्या मते, ईश्वराचे अस्तित्व मानण्यासाठी कोणताही तर्क उपलब्ध नाही. दीघनिकायाच्या पाथिकसुत्तात बुद्धाने ईश्वराच्या कर्तृत्वाचा उपहास केला आहे. केवट्टसुत्तात ईश्वरालाही अन्य देवतांसमान एक सामान्य देवता म्हटले आहे. त्या देवता जितक्या अज्ञानी तितकाच ईश्वरही अज्ञानी. बुद्ध ईश्वराला सर्वज्ञ मानायला तयार नाही. ईश्वराचे अस्तित्व अशा प्रकारे नाकारून बुद्धाने आपल्या अनुयायांना त्याच्या प्रभावातून मुक्त केले. कधी न पाहिलेला, न ऐकलेला ईश्वर मानायचा, त्याच्यावर आपला सर्व भार सोपवायचा आणि आपण आळशासारखे बसून राहायचे, ही वृत्ती बुद्धाला पसंत नव्हती. ईश्वराच्या सर्वकर्तृत्वावर श्रद्धा ठेवल्याने मनुष्याचा आत्मविश्वास खचतो, असे त्याला वाटत होते.

पण बुद्ध अनात्मवादी आणि अनीश्वरवादी असूनही भौतिकवादी मात्र नव्हता. त्याने अनेक ठिकाणी भौतिकवादाचे जोरदार खंडन केले आहे. भौतिकवाद हा ब्रह्मचर्य

(इंद्रियनिरोध) व समाधी यांना नितांत प्रतिबंधक होतो, असे त्याचे मत होते. मनुष्याला जेव्हा परलोकी शुभ फलाच्या प्राप्तीची अभिलाषा होते, तेव्हाच तो साधुजीवन जगण्यासाठी प्रवृत्त होतो. पण भौतिकवादी लोक तर परलोकच मानीत नाहीत. बुद्धाचा जोर धर्माच्या दर्शनावर नव्हता; तर आचारावर होता. मनुष्य मूलतः निष्पाप नाही. त्याला निष्पाप व्हायचे आहे. तो मूलतः साधू नाही. त्याला त्या कोटीला जायचे आहे, असे बुद्ध मानीत असे. मनुष्याला आपले निर्मल रूप प्रकट व्हावे, असे वाटते. पण ज्याचे आचार, विचार व उच्चार निर्मल असतात, त्यालाच ते प्राप्त होते, असा बुद्धाचा आशय आहे.

***धर्माचा बौद्धिक प्रवास***

बौद्ध नैयायिक प्रत्यक्ष व अनुमान अशी दोनच प्रमाणे मानतात. दोनच प्रमाणे मानण्याचे कारण विषय स्वलक्षण व सामान्यलक्षण असे दोनच प्रकारचे असतात हे होय. स्वलक्षण म्हणजे ज्यात वस्तूचे स्वरूप शब्दादी प्रमाणावाचून ग्रहण केले जाते ते. सामान्यलक्षण म्हणजे अनेक वस्तूंबरोबर गृहीत वस्तूचे सामान्य रूप होय. यात कल्पनेला अवकाश असतो. पहिले प्रत्यक्षविषय व दुसरे अनुमानविषय असते. पहिला अर्थ, क्रिया करण्यात समर्थ होतो व दुसरा अर्थ त्या कामी असमर्थ असतो. जे ज्ञान कल्पनारहित व निभ्रांत असते, त्याला प्रत्यक्ष म्हणतात. नाम, जाती, गुण, कर्म, द्रव्य इत्यादींचे ग्रहण न करता म्हणजेच कल्पनाविरहित असे जे ज्ञान, ते प्रत्यक्ष होय, अशी त्याची व्याख्या केली आहे. संज्ञाभ्रांती (मृगजळाच्या ठिकाणी जलाचे ज्ञान), संख्या भ्रांती (नेत्रदोषांमुळे एका चंद्राच्या जागी दोन दिसणे), संस्थानभ्रांती (जळके कोलीत वेगाने फिरविल्यामुळे चक्र फिरत आहे, अशा प्रकारचे ज्ञान होणे), वर्णभ्रांती (कावीळ झालेल्या रोग्याला पांढऱ्या वस्तू पिवळ्या दिसणे) व कर्मभ्रांती (वेगवान वाहनात बसून जाताना रस्त्याच्या कडेचे वृक्ष मागे पळत जात आहेत, असे दिसणे), अशा प्रकारच्या पाच भ्रांतींनी स्पर्श न केलेले ज्ञान म्हणजे प्रत्यक्ष होय, असे असंग म्हणतो. कोणत्यातरी संबंधी धर्माने घर्मीच्या विषयात जे परोक्ष ज्ञान होते, ते अनुमान होय. व्यवहारातला अनुभव असा, की एकाला पाहिले असता दुसऱ्याच्या स्थितीची कल्पना स्वयमेव उपस्थित होते. पण अशा प्रत्येक वेळी हा अनुभव प्रमाणकोटीत येऊ शकत नाही. त्या साठी त्या दोन वस्तूंचा संबंध नित्य व उपाधिरहित असावा लागतो. यालाच व्याप्तिज्ञान असे म्हणतात आणि व्याप्तिज्ञानावरच अनुमान अवलंबित असते.

बौद्ध दर्शनाचा ऐतिहासिक विकास– सनपूर्व ५ व्या शतकापासून इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंतचा सुमारे १५०० वर्षांचा कालखंड बौद्ध दर्शनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. या प्रदीर्घ कालखंडात बौद्ध आचार्यांनी तीन वेळा बौद्ध दर्शनात परिवर्तन केले आहे. या तीन विभागांना त्रिचक्र असे म्हणतात. पहिल्या चक्रात आत्म्याच्या अनस्तित्वाचा सिद्धांत प्रमुख होता. हे जगत शक्तीचा मूलसत्ताविहीन एक क्षणिक परिणाम अर्थात केवळ संतानमात्र आहे, असे त्या काळी मानीत. प्रतीत्यसमुत्पाद हा सिद्धांत त्या कालखंडात प्रभावी होता. आचाराच्या दृष्टीने व्यक्तिगत निर्वाण हेच अंतिम लक्ष्य व अर्हत्पदाची प्राप्ती हेच मानवमात्राचे कर्तव्य मानले जात होते. बौद्ध दर्शनाच्या या स्वरूपाचा परिचय वैभाषिक मतात मिळू शकतो.

दुसऱ्या चक्रात पुद्गलशून्यतेची जागा सर्वधर्मशून्यता किंवा धर्मनैरात्म्यवाद याने ग्रहण केली. व्यक्तिगत कल्याणाऐवजी विश्वकल्याणाच्या भावनेने विशेष जोर धरला. या चक्रात जगताच्या सत्तेला एकदम उखडून न टाकता परमार्थदृष्टीने तिला आभासमात्र मानले. चार आर्यसत्यांच्या जागी सांवृतिक व पारमार्थिक या दोन सत्यांच्या कल्पनेने माहात्म्य मिळविले. मूळ बौद्ध धर्मातल्या बहुत्ववादाच्या जागी शून्याद्वैतवाद प्रतिष्ठित झाला. बोधिसत्त्व ही कल्पना याच काळात उगम पावून आदरणीय ठरली. त्या द्वारे विश्वकल्याणाचा मंगलमय आदर्श मनुष्यांच्या पुढे उभा केला. बौद्ध दर्शनाचा हा विकास शून्यवाद या नावाने ओळखला जातो.

तिसऱ्या चक्रात बौद्ध न्यायाची विशेष प्रगती झाली. सर्वशून्यतेचा सिद्धांत सदोष मानून त्याचा त्याग केला गेला व त्या जागी विज्ञान–चैतन्य–चित्त या सिद्धांताची सत्यता स्वीकारली गेली. आलयविज्ञान ही कल्पना घेऊन हे नवीन दर्शन उदयाला आले. बौद्ध दर्शनाचा हा तिसरा विकास विज्ञानवाद व योगाचार या नावांनी विख्यात आहे. त्यानंतरच्या काळात बौद्ध दर्शनामध्ये कोणतीही नवीन कल्पना उदयाला आली नाही व त्याचा नास्तिकतेकडे झुकणारा बौद्धिक विकास थांबला.

**जगदीश काबरे हे विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत.**
**संपर्क :** ९९२०१९७६८०
**ई मेल :** jetjagdish@gmail.com

# फुल रही सरसों सकल बन



आशय गुणे





*दिल्लीच्या निझामुद्दीन दर्ग्यात फुललेला बहुधर्मीय वसंत बहार...*

**फु**ल रही सरसों सकल बन ही कव्वाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात राग बहार म्हणून प्रसिद्ध झाली. भारत व पाकिस्तान या दोन्ही देशातील कव्वाल अजूनही विलक्षण आत्मीयतेने गातात, ती. मागच्या वर्षी (२०२५) आणि या वर्षी (जानेवारी २०२६) असे दोन्ही वेळेस मी हा सोहळा अनुभवण्यास दिल्लीच्या निजामुद्दीन दर्ग्यात गेलो होतो. या वर्षी नेमका वसंत पंचमीच्या दिवशीच पाऊस पडल्यामुळे कव्वाली गायनात व्यत्यय येत राहिला, त्यामुळे शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमाला देखील उशीर झाला. मात्र मागच्या वर्षी या पिवळ्या वसंत पंचमीत मन:पूत सामील होता आलं...

**२०१६** ची गोष्ट आहे. स्क्रोल या डिजिटल वृत्तपत्रात दिल्लीच्या निजामुद्दीन दर्ग्याबद्दल एक लेख प्रकाशित झाला होता. वसंत पंचमी हा आपल्या सर्वांना परिचित असलेला भारतात अनेक ठिकाणी तिथल्या लोकसंस्कृतीनुसार साजरा होणारा उत्सव. मात्र दिल्लीच्या निजामुद्दीन दर्ग्यातही हा सण साजरा होतो आणि तो देखील एका विशिष्ट पद्धतीने, हे त्या लेखात लिहिले होते. मी जसा तो लेख वाचू लागलो, तेव्हा लक्षात आलं की या दर्ग्यात ही परंपरा जवळजवळ सातशे वर्ष सुरू आहे. साहजिकच, दिल्लीला जाऊन हा सोहळा प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा मनात बळावली. मात्र हा सोहळा प्रत्यक्ष अनुभवायला २०२५ उजाडले. तोपर्यंत मला दिल्लीत स्थायिक होऊन जवळजवळ चार महिने झाले होते. वसंत पंचमीचे महत्त्व वेगवेगळ्या अंगाने समजू लागले होते.

मात्र निजामुद्दीन दर्ग्यात वसंत पंचमी साजरी करण्याचे विधी व त्यामागची अत्यंत रोचक कथा सांगण्याआधी अजून थोडा वेळ भूतकाळात जातो. स्क्रोल मधील हा लेख वाचल्यानंतर काही महिन्यांनी, जानेवारी २०१७ मध्ये, माझा पहिला दिल्ली प्रवास झाला. त्या वर्षी वसंत पंचमी मला दर्ग्यात जाऊन अनुभवता आली नाही, मात्र ती येत असल्याची नैसर्गिक नांदी दिल्लीहून पुढे पिवळ्या शेतांना ओलांडत उत्तरप्रदेशात गेल्यावर आली. निजामुद्दीन दर्ग्यात मात्र जाणं झालं.

***औलियांचा दरबार...***

उत्तरप्रदेशात जाण्याआधी जे काही मोजके दिवस मी दिल्लीत होतो, तेव्हा निजामुद्दीन दर्ग्यात गुरुवारी रात्री कव्वाली गायन होतं, ही माहिती मला मिळाली होती. आठवड्याच्या गुरुवारी मी दिल्लीतच असल्यामुळे दर्ग्यात जाणं निश्चित झालं. त्या संध्याकाळी मी दोन गोष्टी शिकलो – एक म्हणजे, निजामुद्दीन दर्ग्याचे आपल्याकडून पैसे घेण्याचे (उकळायचे, खरं तर) एक विशिष्ट व्यवस्थापन आहे हे लक्षात आलं. दुसरं म्हणजे, पुढच्या वेळेस तिकडे येऊ तेव्हा एकही पैसा न देता आत जाण्याचे तंत्र गवसले! निजामुद्दीन बस्ती या भागात असलेल्या दर्ग्यात शिरण्याआधी आपल्याला एका अरुंद रस्त्याने जावं लागतं जिथे सुरुवातीला दोन्ही बाजूला (तुम्हाला मांसाहारी जेवण आवडत असल्यास) चवीला उत्तम, पण स्वच्छतेच्या दृष्टीने जरा बेताची अशी खाण्याची ठिकाणं आहेत. आपल्याला त्यांच्याकडे ओढण्याची त्यांच्यातील रस्सीखेच पार पडली की दोन्ही बाजूला फुलवाली मंडळी दिसतात, ज्यांच्याकडे आपल्या चपला काढून ठेवायची जागा असते. इथे आपला खिसा हलका होण्यास सुरुवात होते. चपला ठेवण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही, मात्र त्या तिथे ठेवल्या की तिथले फुलवाले दर्शनाचे ताट विकत घेण्याची गळ घालू लागतात. या ताटात गुलाबाच्या पाकळ्या, अन्य काही फुलं, उदबत्तीचा पुडा आणि आत थडग्यावर चढवायला चादर हे सारं साहित्य असतं नि ताटाच्या आकाराप्रमाणे पन्नास रुपयांपासून ते अडीचशे रुपयांपर्यंत त्या चढाव्याची  किंमत असते. तेव्हा रिकाम्या हाती कसं जायचं, या भावनेने संबंधित यात्री थोडे पैसे देऊन ताट विकत घेतोच. मात्र आत शिरल्यावर खिसा हलका होण्याचा दुसरा अध्याय सुरु होतो. आत निजामुद्दीन औलिया आणि हजरत आमिर खुसरो यांचे थडगे आहेत. जेव्हा संबंधित यात्री/भाविक त्यांनी विकत घेतलेलं ताट आत अर्पण करायला जातो तेव्हा तिथे रजिस्टर घेऊन दोन तीन लोक उभे असतात. 'क्या दोगे', असं थेट विचारात आपल्याकडून कमीतकमी शंभर रुपये घेऊन ही मंडळी आपल्याला दुआ मिळेल याची शाश्वती देतात!

संगीताचा आस्वादक असल्यामुळे आमिर खुसरोला नमस्कार करायला गेलो. मात्र पैसे देण्याच्या बंदिशीतले हे स्थायी आणि अंतरा मला नाहीच टाळता आले! त्या संध्याकाळी कव्वाली ऐकताना मात्र मजा आली. २०१७ म्हणजे 'बजरंगी भाईजान' हा सिनेमा येऊन दोन वर्ष झाली होती आणि म्हणून भर दो झोली ऐकायचा योग आला.

***सर्वधर्मसंगीतभाव***

दुसऱ्याच दिवशी दिल्लीहून कामानिमित्त उत्तर प्रदेशातील गोंडा आणि बाराबंकी या जिल्ह्यात गेलो. प्रवासात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पिवळी धम्मक शेतं दिसली. हे काय पिकवलंय, असं विचारल्यावर उत्तर आलं, 'सरसों.'

सुफी संत हजरत निजामुद्दीन औलिया (१२३८ – १३२५) हे त्यांचा भाचा ख्वाजा ताकीऊद्दीन नूह याच्या निधनामुळे शोकाकुल अवस्थेत होते. त्यांचे शिष्य त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटायची आतुरतेने वाट बघत होते, परंतु त्यांची प्रतीक्षा बरीच लांबत होती. एके दिवशी त्यांचे शिष्य आमिर खुसरो यांनी काही स्त्रियांचा समूह रस्त्याने गात जाताना पाहिला. त्यांनी पिवळी वस्त्रे परिधान केली होती, त्यांच्या हातात मोहरीची (सरसों) फुले होती. आपण कुठे जात आहात, असं विचारल्यास स्त्रियांनी आपण देवळात जात असल्याचे उत्तर

दिले. 'याने तुमचा देव प्रसन्न होईल का?' या खुसरोच्या प्रश्नाला जेव्हा त्यांनी होकारार्थी उत्तर दिलं, तेव्हा खुसरोने लगोलग पिवळी साडी नेसली, हातात मोहरीची फुलं घेतली आणि निजामुद्दीन औलियासमोर जाऊन गाऊ लागला, 'फुल रही सरसों सकल बन!' खुसरोला या वेशात पाहून निजामुद्दीन औलियांना स्मित फुटलं आणि त्यांचे सर्व शिष्य आनंदी झाले. तेव्हापासून हा दर्गा वसंत ऋतूचे स्वागत मोठ्या आनंदात करतो. हा सोहळा साजरा करणारे लोक पिवळ्या रंगाचे कपडे घालून कव्वाली गायकांबरोबर गातात, 'फुल रही सरसों सकल बन!' हीच ती वसंत पंचमी साजरी करण्याची विशिष्ट पद्धत!

ही कव्वाली गाऊन झाल्यावर, हजरत निजामुद्दीन औलिया आणि त्यांच्या शेजारी असलेल्या हजरत आमीर खुसरो यांच्या कबरीवर चादर चढवून हा सोहळा थोडावेळ थांबतो. मग रात्री या दोन्ही कबरींच्यामध्ये बसून कव्वाली गायनाची मैफल रंगते. त्याच संध्याकाळी हजरत अमीर खुसरोच्या कबरीसमोर एक छोटेसे सभागृह आहे, जिथे शास्त्रीय संगीताची मैफल रंगते.

***कव्वालीचा मुग्ध माहोल***

हेच फुल रही सरसों सकल बन हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात राग बहार म्हणून प्रसिद्ध झाली. ही कव्वाली भारत व पाकिस्तान या दोन्ही देशातील कव्वाल अजूनही विलक्षण आत्मीयतेने गातात. मागच्या वर्षी (२०२५) आणि या वर्षी (जानेवारी २०२६) असे दोन्ही वेळेस मी हा सोहळा अनुभवायला दर्ग्यात गेलो होतो. या वर्षी नेमका वसंत पंचमीच्या दिवशीच पाऊस पडल्यामुळे कव्वाली गायनात व्यत्यय येत राहिला, त्यामुळे शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमाला देखील उशीर झाला. मात्र मागच्या वर्षी या पिवळ्या वसंत पंचमीत सामील होता आलं. दोन्ही वेळेस कुणालाही पैसे द्यायला लागू नये याची योजनाच मी केली होती. दर्ग्याच्या थोडं आधी थांबून, पिशवीत चपला टाकून त्या एका बॅग मध्ये भरून मी कव्वालीचा आनंद घेतला.

कव्वाली ऐकताना २०१८ या वर्षी एप्रिल महिन्यात बेळगाव येथे हीच बंदिश पं. मुकुल शिवपुत्र यांनी गायली होती, त्याची आठवण झाली. यु-ट्यूबवर कोक-स्टुडियो आणि नुसरत फतेह आली खां यांच्यासारख्या कलाकारांनी गायलेली हीच कव्वाली देखील आठवली आणि मी जवळजवळ सातशे वर्ष चालत आलेल्या या परंपरेचा भाग झालो. खिलजी, लोधी, मुघल, इंग्रज आणि आता स्वतंत्र भारताची जवळवळ ऐंशी वर्षे



*इतिहासाने दोन संस्कृतींमधला संघर्षही नोंदला आणि संगमही... निझामुद्दीन दर्ग्यात दरवर्षी संगम साजरा होत असतो...*

– हा सोहळा अखंडपणे सुरूच आहे!

या वर्षी विशेष लक्षात राहणारा प्रसंग इथे सांगावासा वाटतो आहे. शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम सुरु होण्याआधी तिथे बसलेल्या लोकांना एक छोटासा बिस्किटचा पुडा देण्यात आला. माझ्या उजव्या हातात मोबाइल असल्यामुळे मी डावा हात पुढे केला, तर प्रसाद उजव्या हातात घ्यावा ही विनंती करत, मला उजवा हात पुढे करण्यास सांगितले गेले. हे डावे-उजवे करणे ही हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मांची सामायिक मानसशास्त्रीय धारणा असावी!

योगायोगाने, मागच्या वर्षी वसंत पंचमी नंतर मी दिल्लीतच पुराना किला येथे फाळणी या विषयावर आधारित एका अनौपचारिक चर्चासत्रात सहभागी झालो होतो. त्यात देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचे फाळणी आणि एकूण धर्म या आधारावर होणारे विभाजन याबद्दलचे विचार ऐकायला मिळाले. दिल्ली शहरातून मुस्लिम समुदाय हद्दपार झाल्यास या शहराचे प्रचंड मोठे सांस्कृतिक नुकसान होईल आणि दिल्ली आपली ओळख हरवून बसेल, असं मत त्यांनी व्यक्त केलं होतं. निजामुद्दीन दर्ग्यातील सोहळा आणि एकूणच दिल्लीत आमीर खुसरोपासून सुरु होते, जी सांस्कृतिक उत्क्रांती होती ती हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मांची सामायिक ओळख आहे, हे पुन्हा एकदा पटलं आणि नेहरूंच्या त्या विचारांना मी दुजोरा दिला.

वसंत पंचमीच्या त्या सोहळ्याच्या आधी देखील माझे निजामुद्दीन दर्ग्यात जाणे झालेच होते, म्हणा. ते कारण अत्यंत विशेष होते. १५ डिसेंबर २०२४ या दिवशी  माझ्या अत्यंत आवडत्या नि माझ्यासाठी गुरुस्थानी असलेल्या उस्ताद झाकीर



*अजूनही सारे काही संपलेले नाही... याची ग्वाही देणाऱ्या वसंत पंचमीत हिंदू आणि मुस्लीम धर्मीय दरवर्षी आपल्यातल्या सौहार्द-सृजनाचे दर्शन घडवतात...*

हुसेन यांचे निधन झाले, माझ्यात एका अनामिक रिक्ततेने प्रवेश केला. ही रिक्तता अजून जरी शिल्लक असली तरीही आता हळूहळू ही घटना मनाला मान्य होऊ लागली आहे. मात्र त्या दिवसांत मला उस्तादजींना श्रद्धांजली वाहावी असं मनापासून वाटू लागलं. पण काय करणार होतो मी? त्यांच्यावर लेख लिहून, रोज त्यांच्या तबल्याचे रेकॉर्ड्स ऐकूनही चैन पडेना. तेव्हा मी थेट निजामुद्दीन दर्ग्यात गेलो, आमीर खुसरोला चादर चढवून घरी आलो! तोपर्यंत कोणतेही विधी करण्यात अजिबात रस नसलेल्या मला त्या दिवशी मात्र थोडं शांतशांत वाटलं. त्याचं कारण, उस्ताद झाकीर हुसेन यांच्यात आमीर खुसरोचे रूप पाहिले होते. ते का, हे झाकीरभाईंनीच त्यांच्या एका कार्यक्रमानंतर एका चर्चा सत्रात सांगितले होते.

### संम्मिलन संस्कृतीचे

'फ्युजन' म्हणजे काय असं विचारल्यास ते म्हणाले होते, की हे केवळ भारतीय आणि पाश्चात्य संगीतप्रकारांना एकमेकांत मिसळून सादर करणे नव्हे. तर, ती एक रोज घडत असणारी घटना आहे. सातशे ते आठशे वर्षांपूर्वी हजरत आमीर खुसरोने दिल्लीत एक प्रकारचे फ्युजन सुरू केले. त्याच्या काळात काल्बाना (कव्वाली) या पर्शियन व तुर्क (इस्लामी) संगीत परंपरांचा इथल्या प्रबंध/धृपद (हिंदू) गायकीशी संपर्क सुरू झाला. परिणामी, काही शतकांनंतर ख्याल हा संगीतप्रकार जन्माला आला, जो आज हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा सर्वात लोकप्रिय गानप्रकार आहे. हे दोन्ही प्रकार आत्मसात करताना खुसरोने कोणत्याही एका प्रकाराला विशेष महत्त्व दिलं नाही – ते दोघांचे झाले आणि दोन्ही गानप्रकार त्यांचे झाले. इतकेच काय तर, तराणा, सतार आणि पुढे जाऊन गझल, उर्दू भाषा या साऱ्याच्या उत्क्रांतीचं उगम आहे, अमीर खुसरो. हीच बहुआयामी ओळख मला उस्ताद झाकीर हुसेन यांच्यात आढळते. झाकीरभाईंनी तबला हा आपल्या कल्पनाशक्तीद्वारे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व भारतीय ललित संगीताच्या बाहेर पाश्चात्य शास्त्रीय संगीत, जॅझ तसेच अनेक आंतरराष्ट्रीय संगीतकार आणि थेट ग्रॅमी पुरस्कारांपर्यंत नेला. या नव्या शैलीच्या उत्क्रांतीचे ते उगम ठरले आणि कोणत्याही एका प्रतिमेत कैद राहिले नाहीत.

तबला या विषयावरून आठवलं, खुसरो हयात असताना आणि नंतर काही शतकं भारतीय शास्त्रीय संगीत हे धृपद अंगाने गायले, वाजवले जायचे, त्यात साथीला पखवाज हे वाद्य असे. आजही धृपद संगीतात हीच मांडणी आहे. मात्र जसा ख्याल विकसित होऊ लागला, तशी एका वेगळ्या प्रकारच्या ताल वाद्याची गरज भासू लागली. या उत्क्रांतीत दिल्लीच्या मुघल दरबारात तबल्याचा जन्म झाला. आजही तबला वादनात दिल्ली घराणं हे सर्वात जुनं मानलं जातं.

### दर्ग्यात घुमला रुद्रवीणेचा झंकार

आमीर खुसरो समोर हात जोडताना मी हे या सर्व विचारांचे स्मरण केले आणि पुढे काही महिन्यांनी या इतिहासाची व परंपरांची पुन्हा एकदा उजळणी व्हावी असा प्रसंग घडला. जून महिन्यात निजामुद्दीन दर्ग्याच्या अगदीच शेजारी – सुफी संत हजरत इनायत खां दर्ग्यात – मी, काही मोजक्या श्रोत्यांबरोबर उस्ताद बहाउद्दीन डागर साहेबांच्या रुद्रवीणेची मैफल ऐकली. वीणा हे वाद्य सरस्वतीशी जोडलं गेलं असलं, तरीही खूप कमी भारतीयांना त्याच्याबद्दल माहिती आहे. या वाद्यावर केवळ धृपद संगीतच वाजवता येतं. हेच ते संगीत आहे, जे देशात इस्लामी प्रभाव येण्याआधी गायलं-वाजवलं जात होतं. आजही धृपद शैली ऐकणारे खूप कमी श्रोते आहेत. त्यांच्या असण्यामुळे ही परंपरा जिवंत आहे. जून महिन्याच्या त्या चटके बसणाऱ्या दिल्लीच्या असह्य उन्हाळ्यात आम्ही दर्ग्यात पोचलो आणि पुढे साधारण तीन तास त्यांनी वाजवलेल्या देस आणि यमन रागात एक अनामिक शांतता अनुभवून परत आलो. आधुनिक भारतीय ख्याल संगीत विकसित होण्याच्या भूमीवर सहा महिन्यांच्या अंतरावर कव्वाली आणि धृपद (ज्या दोन संगीतप्रकारांमुळे ख्यालाचा जन्म झाला) ऐकायला मिळणे हे विशेषच होते.

आधी म्हटल्याप्रमाणे दिल्लीच्या निजामुद्दीन दर्ग्यात अनेक उणिवा आहेत. तिथला परिसर अजिबात स्वच्छ नाही. सतत असणाऱ्या गर्दीमुळे यात बदल होणे अत्यंत अवघड आहे. वसंत पंचमीच्या दिवशी तर चेंगराचेंगरी होण्याचा धोका असतो. परिणामी, महिला, लहान मुलं आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ही जागा अजिबात सोयीस्कर नाही. पण या जागेचे महात्म्य मंदिरांसारखे आहे. त्यांच्यातही कितीही उणिवा असल्या तरीही ते आपला सांस्कृतिक वारसा आहेत.

जाता जाता, वसंत पंचमीच्या आठवड्यात वैयक्तिक पातळीवर अनुभवलेली एक गोष्ट सांगतो. साधारण पाच डिसेंबर २०२५ पासून दिल्लीने थंडीचा चढता क्रम घेतला आणि डिसेंबरच्या शेवटच्या व जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात उच्चांक गाठला. मंगळवार, २० जानेवारी २०२६, या दिवशी (वसंत पंचमीच्या तीन दिवस आधी) अचानक थंडी कमी झाल्याचं जाणवलं. विशेष म्हणजे, दिल्लीचे प्रदूषण ही पार्श्वभूमी असतानादेखील दिवाळीच्या शेवटच्या दिवशी (२०२४ आणि २०२५ या दोन्ही वर्षी) हवेत हलका गारवा जाणवत होता. मला तो जाणवल्याचा क्षणही आठवतो आहे. हे मानसिक आहे की खरोखर असं जाणवतं, हे सांगणं अवघड आहे. मात्र दोन्ही क्षण अत्यंत सुखद होते. दिवाळीच्या शेवटच्या दिवशी थंडीच्या आगमनाची उत्सुकता आणि वसंत पंचमीच्या आठवड्यात हवेत प्रसन्नता व सौंदर्य उत्पन्न होण्याची नांदी!

मुंबईची सवय झालेल्या जवळपास ऋतुविरहीत आयुष्यात मला असे बदल कधीही स्पष्टपणे जाणवले नाहीत. मात्र स्थलांतरित व्यक्ती ही जरा अधिकच सतर्क बनत असावी. असाच एक क्षण मी होळीच्या दिवशी देखील अनुभवीन, पण तो सुखद नक्कीच नसेल. कारण दिल्लीतील चढत जाणारा उकाडा, विशेषतः जून ते ऑगस्ट/सप्टेंबर हे महिने दिल्लीकरांसाठी अत्यंत भीषण असतात. पण त्याबद्दल नंतर लिहीन. तूर्तास संगीत, इतिहास, ऋतुचक्र आणि एकूणच जीवनशैली या सर्वांवर एकत्रितपणे प्रभाव टाकणाऱ्या वसंत पंचमीपासून सुरु झालेल्या वसंत ऋतुचा आस्वाद आणि आनंद घेतो...

**आशय गुणे हे दिल्लीस्थित अमेरिका इंडिया फाउंडेशनचे कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग–ए टेम्पेस्टुअस टेन्यूर–सहलेखक सुजय शास्त्री– हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क:** gune.aashaygmail.com



# लिओनार्दोची अजरामर मोनालिसा



डॉ. आनंद जोशी





*आंतरविद्याशाखीय विवेचनाचा विषय ठरलेली मोनालिसा... तिला चितारणारा लिओनार्दो... त्याचे हे कल्पनाचित्र... साभार : द ॲटलांटिक*

लिओनार्दोचा कॅटलॉग समोर होता. त्यातील मोनालिसाचे पोर्ट्रेट न्याहळत होतो. लेखाची सुरुवात कशी करावी या विचारात होतो. नोंदवह्या टेबलावर पडल्या होत्या. धांडोळा घेता घेता अचानक आरंभाचा उलगडा झाला. होर्हेस लुई बोरहेसच्या (१८९९–१९८६) मुलाखतीचा तिसरा खंड उघडला. बोरहेसचे चर्मचक्षु वयाच्या पन्नाशीत विझले होते, पण चित्तचक्षु सताड उघडे होते. त्याने एक किस्सा मुलाखतीत सांगितला आहे. अब्राहम लिंकन (१८०९–१८६५) अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष असताना त्याला सचिव हवा होता. त्याच्या पुढे त्याच्या सहायकाने बरेच फोटो ठेवले. लिंकन ते चेहरे नजरत होता. त्यातील एक फोटो त्याने नाकारला. त्याचा सहायक म्हणाला 'पण सर, तो काही त्याच्या चेहऱ्या करता जबाबदार नाही' लिंकन म्हणाला, 'तीस वर्षे जगल्या नंतर प्रत्येक जण त्याच्या चेहऱ्या करता जबाबदार असतो.' पुढे बोरहेसने नमूद केले आहे, 'चेहरा हा आत्म्याचा आरसा असतो'. बोरहेसचा मुलाखतकार म्हणाला, 'ग्रीकांनी हेच सांगितले आहे आणि लिओनार्दोने पण हेच सांगितले आहे.' बोरहेस त्याच्याशी अर्थात सहमत होता. लिओनार्दो चेहऱ्याच्या संदर्भात पुन्हा असा भेटला...

ते दिवस होते, एशियाटिक सोसायटीला जाण्याचे. मी आठवड्यातून एक दोन दिवस तिकडे जात असे. लोकल ट्रेनला अशी गर्दी नसायची. लोक हसतखेळत, तर कधी गरमागरमी करत चकाट्या पिटत जात. मोबाइल नव्हता. त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बघत वेळ कसा निघून जाई. वैद्यकीय विद्यार्थी असल्यापासून मेंदूविज्ञानाच्या नजरेतून चेहऱ्यांचा अभ्यास करण्याची सवय होती. डार्विनचे एक्स्प्रेशन्स ऑफ मॅन अँड ॲनिमल्स वाचलेले, त्याच्या मागची उत्क्रांतीही समजली होती. आता चित्रवंताचे लेखन वाचल्यापासून 'मुखदर्शन' निराळ्या कोनातून घडले. वैद्यकीय विज्ञानाच्या जोडीला कलाज्ञानाची जोड मिळाली. माझ्यातील विद्यार्थी जागा राहिला. 'मुखचर्या-विज्ञानाचा' परीघ रुंदावला.

***चेहेरेपट्टीचे विज्ञान***

physiognomic perception-फिजिओग्नोमिक परसेप्शन हा पारिभाषिक जड शब्द. लॅटिन 'परसेप्टिओ' म्हणजे गोळा करणे, मिळवणे या पासून या संज्ञेचा अर्धा भाग तयार झाला. फिजिओग्नोमिक म्हणजे 'मुखलक्षणे'. मुखलक्षणावरून व्यक्तीचा स्वभाव, मूड या बद्दलचा अंदाज बांधणे हा त्याचा सुलभ अर्थ.

पोर्ट्रेटमध्ये इतर कितीही आरास असली तरी चेहरामोहरा महत्त्वाचा. चेहऱ्यावरून चरित्र आणि चारित्र्य याचा कयास करणे, याची पद्धतशीर सुरुवात झाली, अठराव्या शतकात युरोपमध्ये. जोहानन कॅस्पर लॅव्हटर (१७४१-१८०१) हा स्विस कवी, तत्त्वज्ञ, याने पोट्रेट आणि मुख्यत्वे करून त्यातील चेहरा पाहून 'तो माणूस कसा वाचायचा' याचे विवेचन करणारे चार खंड लिहिले. लोकांना दुसऱ्याचा स्वभाव त्याचे नैतिक व्यक्तित्व यावर चर्चा करण्यात खूप रस असतो. पोर्ट्रेट ही 'बड्यांची' असायची, मग काय विचारायला नको. त्याकाळी ती एक फॅशन पडली.

जॉर्ड ख्रिस्तोफ लिशेनबर्ग (१७४२-१७९९) हा जर्मन भौतिकीतज्ज्ञ आणि विडंबनकार. त्याने लॅव्हटरच्या विचारांची खिल्ली उडवणारे हलके फुलके नाटुकले लिहिले होते. असे जरी असले तरी चेहऱ्यावरून स्वभावलक्षणे शोधण्याचा व्यवस्थित अभ्यास करणे जरूर आहे, हा विचार विज्ञानात स्थिरावला आणि फोफावला. चेहरा, अंगकाठी याची वर्णने याचा उपयोग कादंबरीकारांनी त्यांच्या व्यक्तिरेखा रंगवण्यासाठी केला. 'फेस रिडिंग' या छद्म विज्ञानाची काही काळ चलती होती. गुन्हे शोधन विज्ञानात त्याचा उपयोग केला गेला. आजच्या सोशल मिडियात 'फेस बुक' हे नाव लक्षणीय आहे. मेंदूविज्ञान आणि 'ए-आय' याचा उपयोग करून 'फेस रेकग्निशन' यावर गंभीर संशोधन चालू आहे. हा सगळा पट माझ्या पुढे उलगडला गेला.

***चेहऱ्यांची दृश्यकला***

मला शोध घ्यावयाचा आहे, दृश्यकला आणि मानवी चेहरा याचा. मी त्या नजरेने धांडोळा घेत होतो, विचार करत होतो. माणसाच्या अनेक वर्षांच्या वर्तनातून स्मृती तयार होत असतात. त्याची अभिव्यक्ती चेहऱ्यावर नकळत होत असते. म्हणून व्यक्तीचा तोंडावळा हा मनाचा आरसा असतो, असे म्हणतात. व्यवहारातही आपण हे अनुभवत असतो. तुम्ही काही कारणाने अस्वस्थ असाल, त्याचवेळी तुमचा मित्र तुम्हाला भेटला तर तो म्हणतो, 'काय रे आज तुझा चेहरा बरोबर दिसत नाही' हा तुमच्या मित्राचा दृश्यानुभव असतो. पण दृश्यकलेत चित्रकार वा शिल्पकार हा दृश्यानुभव कसा निर्माण करतात? याचे उत्तर मिळणे इतके सहज सोपे नाही. उत्तराला अनेक चलपदे आहेत. प्रत्येक दर्शकाचा त्याच चित्राचा दृश्यानुभव भिन्न असतो.

अनेक चित्रवंतांनी अनेक वर्षांपासून या सगळ्याचा चित्राभ्यास केला आहे. कलेच्या इतिहासकारांनी, कलासमीक्षकांनी त्यावर विचार मांडले आहेत. ते शोधण्याचा प्रयत्न येथे करत आहे.

***चित्राभ्यासाचा शोध***

लिओनार्दोच्या मोनालिसा या सुप्रसिद्ध पेंटिंगबद्दल आंतरविद्याशाखीय नजरकोनातून विचार करत होतो. 'पोर्ट्रेचर' ही पाश्चात्य चित्रकलेतील महत्त्वाची शाखा आहे. त्यातील 'सेल्फ पोर्ट्रेट' ही उपशाखा, चर्येच्या चित्राभ्यासासाठी बोधक ठरेल, असे वाटून गेले. गतकालातील 'मास्टर्सनी', 'सेल्फ पोर्ट्रेट्स' म्हणजे स्वत:चे चेहेरे काढले आहेत. दुसऱ्याचे चेहरे चित्रित करणारे हे चित्रवंत स्वमुख कसे काढतात, याचा शोध घेतला. तो थोडक्यात पुढे देत आहे.

पीटर पारलेर (१३३०-१३९९) हा जर्मन शिल्पकार याने १३७० साली दगडात स्व-शिल्प कोरले, ते एका कॅथड्रलमध्ये जतन करून ठेवले आहे. हे युरोपातील पहिले स्व-चित्र मानले जाते. जॅन व्हान आइक (१३९०-१४४१) हा नेदरलँड्स येथील पेंटर, हा ऑइल पेंटिंगचा नवकल्पक असा त्याचा




*पारलेरचे स्व-शिल्प आणि लिओनार्दोचे स्व-चित्र... दृश्यकलेच्या विकासाला नवे वळण देणारे क्षण...*

नावलौकिक. एक इटालियन व्यापारी आपल्या वाग्दत्त वधू सह नेदरलँड्ला आला होता. त्यांच्या साखरपुड्याचे चित्र त्याने रंगवले आहे. त्या चित्रात तो व्यापारी बायकोचा हात धरून उभा आहे. दोघांच्या मध्ये भिंतीवर लावलेला आरसा आहे त्यात हा चित्रकार त्या प्रसंगाचे चित्र काढतानाचे प्रतिबिंब पडले आहे. त्या चित्रकाराचे स्व चित्र त्यात आहे. जणू हा चित्रकार या प्रसंगाचा साक्षीदार होता. १४३४ साली काढलेले हे पेंटिंग युरोपातील चित्रसंग्रहालयात दर्शकांकरता खुले आहे. ऑइल पेंटिंगचा उत्तम नमुना म्हणून हे समजले जाते.

कोणतीही ज्ञानशाखा कल्पक प्रयोगाशिवाय पुढे जात नाही. मध्ययुगात दोन दगडात वाटून घोटून तयार केलेली 'पिग्मेंट्स' अंड्याच्या बलकात मिसळत. हे रंग ठीक होते, पण ते झटकन वाळून जात. याला 'tempara-टेम्पारा' म्हणत. व्हान आइक या रंगाबाबत असमाधानी होता. त्याने तेलात पिग्मेंट्स मिसळवली आणि वापरायला सुरुवात केली. हे 'तैलरंग' झटकन वाळून जात नसत. त्यामुळे धीम्या गतीने काम करणे शक्य झाले. रंगकलेचे हे सोयीस्कर माध्यम आहे याची खात्री पटून चित्रकारांनी त्याचा स्वीकार केला. काही विशिष्ट दृश्यपरिणाम साधण्याकरता तैलरंग जास्त प्रभावी ठरतात हे सुद्धा उमजू लागले.

रेम्ब्राँ (१६०६-१६६९) हा नेदरलँडचा चित्रकार पाश्चात्य जगातील 'ग्रेट मास्टर' त्याने त्याच्या जीवनाचे चिरस्थाई स्वरूप स्व-चित्राच्या मालिकेत चित्रबद्ध करून ठेवले आहे. ते पाहून चकित व्हायला होते. तारुण्यापासून म्हातारा होई पर्यंतची ही सेल्फ पोर्ट्रेट्सची साखळी आहे. तरुणपणात यशस्वी झालेला हा मास्टर म्हातारपणी एकटा पडला होता. वृद्धत्वात आलेली कर्जबाजारी, दिवाळखोरीची शोकात्मिका त्याच्या स्व-चित्रातील चेहऱ्यावरुन दर्शकापर्यंत परावर्तित होते. रेम्ब्राँच्या स्व-चित्रांची ही माला म्हणजे एक आगळेवेगळे 'शब्देवीण' आत्मकथन आहे. जीवनात जे भोगले ते स्वहस्ते 'रंगभाव' दाखवणारा हा ग्रेट मास्टर. रेम्ब्राँचा चेहरा सुंदर नव्हता. स्वत:ची कुरूपता झाकण्याचा प्रयत्न त्याने केला नाही. तो मन:पूर्वकतेने स्वत:ची सूरत आरशात न्याहाळत असे. त्याच्या या प्रामाणिकपणामुळे त्याच्या सेल्फ पोर्ट्रेटकडे बघताना सौंदर्य, तो कसा दिसतो, याचा विचारही दर्शकाच्या मनाला शिवत नाही. हा खऱ्या माणसाचा, कोणताही 'पोज' न घेतलेला, मी किती ग्रेट आहे हा आविर्भाव नसलेला, एका चित्रकाराचा मोहरा आहे. स्वत:च्या मुखड्याची बारकाईने छाननी करून मानवी मुखाची गुपिते, सुप्त भावरंग शोधायचे असतात. रेम्ब्राँचे उतार वयातील सेल्फ पोर्ट्रेट बघितले, त्याचे वर्णन वाचले. तेव्हा होरेस (65 BC - 8 BC) या रोमन कवीने एका कवीला उद्देशून उद्गारलेले वाक्य आठवले, 'तुला जर तुझी कविता वाचून वाचकाचे डोळे पाण्याने डबडबायला हवे असतील तर प्रथम तू ती दु:खाची संवेदना अनुभवली पाहिजेस.'

जीवनातील क्षण हातातून निसटून जातात. त्या क्षणांचा अर्थ लावणे कलेमुळे शक्य होते. कलेने मला हे शिकवले. कला मला अशी गतकाळात घेऊन गेली.

गुस्ताव कोर्बे (१८१९-१८७७) या फ्रेंच पेंटरने एक क्रांतिकारी विचार मांडला. त्याला त्याने नाव दिले 'गुस्ताव्ह कोर्बेचा वास्तववाद'. त्याचा आशय 'मी कोणाचाही शिष्य नाही, फक्त निसर्गाचा' त्याने स्व-चित्र काढले. कोर्बे पाठीवर त्याच्या चित्रसाधनांची मोठी पिशवी घेऊन चालला आहे आणि समोरून येणाऱ्या पॅट्रनला 'बोन्जूर' म्हणत आहे. हे पेंटिंग १८५४ साली रंगविले होते. कोर्बे म्हणत असे 'मी माझ्या चित्रकलेने माझी उपजीविका करतो, पण एक क्षणही मी माझ्या 'कॉन्शसशी' प्रतारणा करत नाही' या विचाराला सार्थ असे, हे कोर्बेचे सेल्फ पोर्ट्रेट आहे.

लिओनार्दोने सेल्फ पोर्ट्रेट काढले होते. त्यावेळी त्याचे वय होते, ६० वर्षे. दाढीधारी वृद्धाचा हा चेहरा माझ्याकडे असलेल्या कॅटलॉगच्या मुखपृष्ठावर आहे. लाल खडूने काढलेले हे स्व-चित्र टूरिन येथील रॉयल लायब्ररीत जतन करून ठेवले आहे. सेल्फ पोर्ट्रेट ही दृश्यकलेच्या विकासातील महत्त्वाची पायरी आहे. आजही चित्रकार स्व-चित्रे काढतात. हा जमाना आहे सेल्फीचा. सेल्फी हे तंत्र आहे. सेल्फ पोर्ट्रेट ही कला आहे.

***लिओनार्दोची मोनालिसा***

माणूस दोन भाषा वापरत असतो. एक तर्कबुद्धीची भाषा, दुसरी भावनेची भाषा. चेहऱ्यावरील 'एक्स्प्रेशन्स' हावभाव ही भावभावनांची भाषा. ही भाषा गुंतागुंतीची, तिच्यावर नियंत्रण असतेच असे नाही. जेव्हा चित्रकार चेहऱ्याचे चित्रांकन करत असतो तेव्हा त्याला भावनांची भाषा वापरायची असते. लिओनार्दोने मोनालिसाचं पेंटिंग या चित्रभाषेत रंगवले आहे. इथे सेल्फ पोर्ट्रेट्स बाबतची ऐतिहासिक माहिती वाचल्यामुळे चित्रवंत दुसऱ्याच्या चेहरे काढताना किती उत्कटतेने ही दुसरी भाषा वापरण्याचा प्रयत्न करत असतील याची कल्पना आली.

***पिग्मेलियन ते मोनालिसा***

पिग्मेलियन ही ग्रीक पुराणकथा. पिग्मेलियन हा शिल्पकार मार्बल मधून सुंदर स्त्रीचा पुतळा कोरून काढतो. तो काही एका विशिष्ट स्त्रीचा पुतळा नसतो. ती त्याची निर्मिती असते. पण तो त्या सुंदर स्त्रीच्या प्रेमात पडतो. तो देवाकडे प्रार्थना करतो 'हिला जिवंत कर'. देव त्याची प्रार्थना ऐकतो आणि तिला जिवंत करतो. लिओनार्दोने अशी काही विनंती देवाजवळ केली नाही. पण त्याने मोनालिसाच्या चेहऱ्यावर अगदी जिवंत वाटावी अशी 'एक्स्प्रेशन्स' कोरली, मोनालिसा जिवंत झाली. एकदा तर लूव्र मधून तिचे अपहरणही झाले होते! तो त्याच्या चित्रकर्माचा विजय होता.

'मोनालिसा' हे लिओनार्दोचे पोर्ट्रेट गेली पाच शतके गाजते आहे. स्टेन्थाल हा फ्रेंच लेखक (१७८३-१८४२), गोएट हा जर्मन 'पॉलिमॅथ'-बहुआयामी विद्वान (१७४९-१८३२), प्रूस्त हा फ्रेंच कादंबरीकार (१८७१-१९२२), मारलॉ हा फ्रेंच कलेचा सिद्धांतकार (१९०१-१९७६), फ्रॉइड हा ऑस्ट्रीयन मेंदूवैज्ञानिक आणि मनोविश्लेषक (१८५६-१९३९) असे सुप्रसिद्ध व्यासंगी साहित्यिक आणि मनोविज्ञानातील बापमाणूस यांची जिज्ञासा या जादुई पेंटिंगने जागृत केली आणि त्याचे पडसाद त्यांच्या साहित्यात उमटले.

मोनालिसा ही गिओकोंडो या इटालियन खानदानी व्यापाऱ्याची पत्नी, तिचे पोर्ट्रेट लिओनार्दोने १५०३-१५०४च्या सुमारास केले. ते घेऊन तो फ्रान्सला गेला. ते पोर्ट्रेट फ्रांसिस पहिला या फ्रेंच राजाने विकत घेतले. लिओनार्दोने हे पेंटिंग मृत्यूपूर्वी १५ वर्षे आधी तयार केले. ते बरेच वर्षे राजघराण्यात होते. १८०४ साली मोनालिसा लूव्रमध्ये स्थानापन्न झाली. आज ती 'बुलेट प्रुफ' काचेच्या फ्रेममध्ये बंदिस्त आहे.

पॅरिस येथील 'लूव्र' हे सुप्रसिद्ध संग्रहालय. लूव्रचा अर्थ खिडकी. कलेचा इतिहास दाखवणारी ही खिडकी आहे. दोन दशकापूर्वी या खिडकीतून डोकावलो होतो, तेव्हा 'मोनालिसा' बघितले होते. हा जादुई चेहरा आहे, या पलीकडे माझा काही समज नव्हता. आज त्याबद्दल वाचल्यानंतर अंधार दूर झाला.

द्विमितीय संरचित अवकाशात त्रिमितीय प्रतिमा चित्रित करणे, एवढाच लिओनार्दोचा उद्देश नव्हता. पोर्ट्रेटच्या व्याख्येनुसार 'पर्फेक्ट' पोट्रेट तयार करणे, हा सुद्धा लिओनार्दोचा हेतू नव्हता. त्याला काळाच्या उलथापालथीचे परिमाण या कलाकृतीला द्यायचे होते. जी चित्रकृती मानवी नजरेलाच नव्हे, तर बुद्धीलासुद्धा अनेक वर्षे विचारात पाडेल, असे काही त्याला निर्माण करावयाचे असावे असे मला वाटून गेले. याला कारण जेम्स जॉइस (१८८२-१९४१) याने 'युलसिस' ही कादंबरी लिहिली तेव्हा तो काय म्हणाला ते मला आठवले, 'युलसिस ही कादंबरी साहित्याच्या प्राध्यापकांना काही शतके 'बिझी', 'व्यग्र' करून ठेवेल.' १९२२ साली प्रकाशित झालेली कादंबरी आजही जगभरच्या अनेक विद्यापीठांत आंतरविद्याशाखीय अभ्यासाचा, चर्चासत्राचा विषय ठरते आहे. लिओनार्दोच्या मोनालिसाला हे तंतोतंत लागू आहे.

काही निर्मिक असे असतात, ते असे काही निर्माण करून ठेवतात जे अनेक शतके जगभरातील माणसांना विचारात पाडते. विचारात पाडणे म्हणजे मानवी मेंदूतील सुप्त कप्पे उघडणे. यातच मानवी मेंदूचा विकास होत राहिला आहे. असे निर्मिक कला, तत्त्वज्ञान, विज्ञान, सगळ्या शाखांत असतात.

डीएनए रचनेचा शोध फ्रान्सिस क्रिक वगैरेंनी लावला. या शोधांनी इतक्या लोकांना विचारात पाडले, त्यामुळे पुढील अनेक वर्षे जनेटिक्सची अनेक दालने उघडली आणि अजूनही उघडत आहेत. जनेटिक्स आज कलेच्या इतिहासासाठीसुद्धा उपयुक्त ठरत आहे.

फ्रांसिस क्रिक (१९१६-२००४) हे भौतिकीतज्ज्ञ त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात नमूद केले आहे- 'मी जैवविज्ञानाचा शोधाभ्यास करू लागलो, तेव्हा मला जणू पुनर्जन्म घ्यावा लागला. माझ्या विचारपद्धतीत आमूलाग्र बदल करावा लागला.'

हे विधान मला प्रकाशदायी ठरले. ते त्यांच्या शोधाइतकेच महत्त्वाचे वाटले. आंतरविद्याशाखीय अभ्यास नकळत दुसरा कसा विचार करतो, याचे भान निर्माण करतो. विचारांचा परीघ



*लिओनार्दोचे मोनालिसा हे चित्र पॅरिसच्या लुव्र म्युझियमचा अभिमानबिंदू आहे. या चित्रासोबत फोटो काढण्याची उर्मी कोणालाही रोखता येत नाही...*

रुंदावतो. मेंदू उदारमतवादी होण्याच्या शक्यता वाढतात. 'झाले मोकळे आकाश अशी स्थिती येते.'

***अदृश्य प्रगती***

विज्ञानातील प्रगती दिसते, ती व्यवहारात आपण अनुभवतो, ती 'टॅन्जिएबल' असते. पण कला, तत्त्वज्ञान, यातील प्रगती दिसत नाही, ती अदृश्य असते. असे का घडते? रिबेका गोल्डस्टिन (१९५०) अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठात विज्ञानाच्या तत्त्वज्ञ आहेत. त्यांनी 'प्लेटो ॲट गुगलप्लेक्स' या त्यांच्या पुस्तकात याचे स्पष्टीकरण दिले आहे, त्याचा आशय– 'विज्ञानातील प्रगती दिसते, ती आपण रोज अनुभवतो. पण तत्त्वज्ञानातील प्रगती दिसत नाही, ती अदृश्य असते. याला कारण ती प्रगती अत्यंत गुंतागुतीच्या चर्चेच्या प्रयत्नाने मानवाच्या विचार–उर्मीमध्ये, 'कॉन्शसनेस'मध्ये हळूच मिसळून गेलेली असते. म्हणून त्याचा उगम कोठे आहे हे माणूस विसरतो. ही प्रगती आपल्या विचार–दृष्टीचा भाग बनते. ती माणसाला अदृश्य वाटते कारण माणूस त्याच विचार–दृष्टीने बघत असतो.'

कलाशाखेतील कलेबाबतच्या विचारांच्या प्रगतीलाही हे लागू आहे. ही प्रगती माणसाच्या 'कॉन्शसनेस'मध्ये मिसळून गेलेली असते. म्हणजे, त्या विचारांनी मानवी मेंदूतील जोडण्या=न्युरॉनल कनेक्शन्स बदलेली असतात आणि बदललेल्या जोडण्यामुळे मानवी वर्तन बदलते. हे वर्षानुवर्षे, पिढ्यान्‌पिढ्या घडते. सुलभ भाषेत म्हणायचे तर, हे प्रगत विचार कालगतीने माणसाच्या दृष्टिकोनाचा भाग बनतात. म्हणून तर कप्पेबंद शिक्षणापेक्षा आंतरविद्याशाखेय शिक्षण महत्त्वाचे ठरते, कारण मेंदूतील बंद कप्पे उघडण्याची ती एक संधी असते.

***गूढ मोनालिसा***

मोनालिसाच्या पेंटिंगबद्दल गोएट लिहितो, 'हा शाश्वत स्त्रीत्वाचा चेहरा आहे, चिरंतन मोहकता आहे, स्त्रीत्वाच्या गूढतेला लिओनार्दोने साकार रूप दिले आहे, कोणती भावना ती व्यक्त करत आहे? एका क्षणी वाटते ती प्रसन्न स्मित करत आहे, तर दुसऱ्या क्षणी वाटते ती कसली, तरी खंत वा दु:ख तर करत नसेल. लिओनार्दोने हे क्षणोक्षणी बदलणारे भाव कसे चित्रित केले असावेत, असा प्रश्न दर्शकाला पडतो. हे नुसत्या एका स्त्रीच्या मुखाचे पेंटिंग नाही, तर मानवी भाव भावनांचे पोट्रेट आहे असे वाटून जाते.'

मागरिट लिविंग्स्टन (१९५०) या हार्वर्ड विद्यापीठात 'जैव मेंदूविज्ञानाच्या' प्राध्यापक आहेत. त्यांनी मोनालिसाच्या गुढतेचे मेंदूविज्ञानाच्या नजरेतून विश्लेषण केले आहे. त्याचा आशय 'मानवी दृष्टिपटलाचा मध्यबिंदू म्हणजे 'फोविया'. दृष्टीसमोर येणाऱ्या चेहऱ्याच्या प्रतिमेतील नाक, ओठ, यांचा आकार ठेवण याचे 'प्रोसेसिंग' फोवियातील कोनपेशी करतात. दृष्टी पटलाच्या परिघातील कोनपेशी चेहऱ्याची भावनिक स्थिती काय आहे, याचे 'प्रोसेसिंग' करतात. दर्शक एकाच वेळी सगळा चेहरा पाहत नाही. काही क्षणात तो चेहरा 'स्कॅन' करतो आणि ते संदेश मेंदूतील दृष्टिकेंद्रात आणि इतर महत्त्वाच्या केंद्रात जातात. तिथे त्याचा अर्थ लावला जातो. हे सगळे निमिषार्धात घडते.'

पाश्चात्यकलेतील हे 'मास्टरपिस' पोट्रेट समजले जाते. हे पेंटिंग 'ॲम्बिग्युइटी'चे उत्तम उदाहरण आहे. दर्शकाला हे कोड्यात टाकते, विचार करायला लावते अर्नेस्ट क्रिस (१९००–१९५७) हे ऑस्ट्रियन मनोविश्लेषक, कलेचे–जाणकार आणि इतिहासकार. डॉ. क्रिस यांनी प्रथम व्हिएन्ना विद्यापीठात कलेच्या इतिहासाचे शिक्षण घेतले, पदवी मिळवली आणि पुढे त्याच विद्यापीठातून मनोविश्लेषकाचे शिक्षण पुरे केले. फ्रॉइडचे मित्र त्यांचे प्राध्यापक होते. डॉ. क्रिस यांनी मोनालिसाच्या पेंटिंगचे विश्लेषण केले आहे, त्याचा आशय 'मोनालिसाच्या चेहऱ्यातून व्यक्त होणाऱ्या संदिग्धते–ॲम्बिग्युइटीमुळे दर्शकाला त्याच्या 'मूड'नुसार तिच्या चर्येवरील भाव दिसतात. निरनिराळ्या वेळेला तिच्या मुखावरील 'एक्स्प्रेशन्स' वेगवेगळी भासतात. हे लिओनार्दोचे कसब आहे. या करता त्याने sfumato–स्फुमाटो हे नाजूक छायांकनाचे–शेडिंगचे कलातंत्र वापरले आहे. ओठाभवती काही छाया त्याने निर्मिल्या आहेत. प्रथम अर्धपारदर्शक गडद रंगलेपन, त्यावर अपारदर्शक सफेद रंगानी पेंटिंग केले आहे. ओठांचे कोपरे रंगवताना

ब्रशपेक्षा त्याच्या बोटांच्या अग्राचा वापर केला असावा'. रोझाब्ला टार्डिटो (१९३०) या इटालियन कलेच्या इतिहासकार आणि कला समीक्षक. लिओनार्दो तज्ज्ञ म्हणून त्या नावाजल्या जातात. त्यांनी लिओनार्दोच्या 'लिक्विड तंत्रा'बद्दल लिहिले आहे. त्याचा उपयोग त्याने त्याच्या पेंटिंगमध्ये कसा केला, हे त्यांनी नमूद केले आहे. लिओनार्दोच्या १४८७ ते १४९० या काळातल्या हस्तलिखितात त्याचा संदर्भ आहे.

मोनालिसा पेंटिंगच्या पार्श्वभूमीवरील भूप्रदेश असममित आहेत. डाव्या अर्धभागतील क्षितिज उजव्या बाजूच्या क्षितिजापेक्षा थोडे खाली आहे, म्हणजे दोन क्षितिजावरील विलयबिंदू भिन्न आहेत. या अस्थिरतेमुळे, असमतोलामुळे दर्शकाला चित्र बघताना त्याची नजर इकडून तिकडे फिरवावी लागते. हलक्याशा उजेडात चित्रित केलेली मुखमुद्रा दर्शकाच्या डोळ्याचा जणू मागोवा घेत आहे, असा भास होतो. दर्शकाच्या मेंदूला या प्रतिमेचे कोडे उलगडण्यासाठी जास्त काम करावे लागते.

***जैवविज्ञानाची सोबत***

कलेच्या इतिहासाचा जैवविज्ञानाच्या मदतीने केलेला शोधाभ्यास म्हणजे 'आर्टिओमिक्स'. या नवीन विज्ञानशाखेचा उदय होत आहे. 'नेचर' या जगन्मान्य विज्ञान पत्रिकेत याबद्दल नुकतीच माहिती वाचली. न्यूयॉर्क येथील एका खाजगी संग्रहात 'होली चाइल्ड' हे लाल खडूने लिओनार्दोने काढलेले चित्र आहे. त्याचा एप्रिल २०२४ मध्ये जनुकतज्ज्ञ नोबोर्तो गोन्झालिस व्हार्बे यांनी शोध घेतला. ५०० वर्षापूर्वीच्या या चित्राच्या एका कोपऱ्यातून 'स्वॅब' तपासणीसाठी घेतला. गेले एक दशक लिओनार्दोचे 'डी एन ए' शोधण्याचा जागतिक प्रकल्प चालू आहे. तो सफल होण्याचा काळ आलेला दिसतो. या स्वॅबमध्ये बरेच जैविक कण मिळाले. त्यात होते त्वचेचे पातळ पापुद्रे, घामाचे क्षार, धागे, परागकण, पर्यावरणाचे काही अंश. त्यातून काही जनुक वेगळे करण्यात संशोधकांना यश आले. या जनुकांच्या तपासात पुरुषविशिष्ट Y गुणसूत्र–क्रोमोझोम आढळले. हा महत्त्वाचा जैविक सुगावा ठरला. टस्कनी हे लिओनार्दोचे जन्मस्थळ. तेथे जतन करून ठेवलेल्या लिओनार्दोच्या चुलतभावाच्या पत्रावर जे जनुक मिळाले. त्यात पुरुषविशिष्ट Y गुणसूत्र मिळाले. यात आणि होली चाइल्डमध्ये मिळालेल्या Y गुणसूत्रात साम्य आहे. सामायिक पितृवंश असण्याची ही चिन्हे असल्यामुळे, 'होली चाइल्ड' या चित्रात सापडलेले डीएनए लिओनार्दोचे असण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. हे सिद्ध करण्याकरता आणखी संशोधन जारी आहे. हे संशोधन हा आर्टिओमिक्समधील मैलाचा दगड ठरेल आणि कलेच्या इतिहासाचा जनेटिक्स या जैवविज्ञानाच्या शाखेतून शोध घेण्याचे ज्ञानदालन खुले होईल. जुन्या पेंटिंगमधून मिळालेले पदार्थ त्या पेंटिंगचा स्थळ–काल निश्चित करण्यास सुद्धा मदत करतात.

***वाचकाची जीवनमर्यादा***

लिओनार्दो वरील हा तिसरा लेख टंकत होतो. पाचशे वर्षांपूर्वीच्या घटना वाचता वाचता आर्टिओमिक्सच्या भविष्य काळात केव्हा जाऊन पोहोचलो, ते कळलेच नाही. तेव्हा मला पाचशे वर्षापासून भविष्यापर्यंतचे आयुष्य मिळाले, जणू वाचकाला जीवनमर्यादा नसते. वाचक हा उदंड आयुष्याचा प्राणी असतो, असे वाटून गेले. वाचकमित्रांबरोबर हे 'शेअर' केले, त्यांनाही तसे वाटावे म्हणून...

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी हे मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निधरि', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**


**ई मेल :** drjoshianand628@gmail.com


# मूल्यभान देणाऱ्या झाडांचं जगणं नि गाणं टिपणारी काव्यलिपी



डॉ. नेहा सावंत

काव्यगत संवाद






**व**संत आबाजी डहाके हे १९७५ या कालखंडातले अतिशय महत्त्वाचे कवी म्हणून ओळखले जातात. संतप्त तरुण पिढीची कविता या काळात प्राधान्याने प्रसिद्धीला आली होती. लक्षवेधी गोष्ट म्हणजे, १९७५ या कालखंडामध्ये त्यांच्या कवितेमध्ये असलेली आशयसूत्रे आजच्या काळातही दिसून येतात. याच ओघात आजच्या काळातील घटितांच्या संदर्भाने प्रस्तुत लेखासाठी निवडलेल्या तीन अल्पाक्षरी कविता झाड या केंद्राभोवती गुंफलेल्या असल्या तरी पारंपरिक निसर्ग कवितेपेक्षा वेगळ्या आहेत. त्यात झाडाच्या जीवन-मृत्यू विषयीचा एक समान धागा आहे, त्यातून झाडाच्या तीन अवस्था टिपलेल्या आहेत, तीन टप्पे रेखाटलेले आहेत. कवीचे संवेदनशील चिंतन त्यातून व्यक्त झालेले दिसते. म्हणून तीनही कवितांचा सलग विचार होणे आवश्यक आहे...

**मी** एम. ए.ला असताना अस्तित्ववादी समीक्षा हा अभ्यासक्रमातील एक घटक शिकवण्यासाठी प्रा. वसंत आबाजी डहाके येत असत. अतिशय शांत, संयत आणि हळुवार आवाजात ते शिकवीत असत. शिकवताना अधेमधे हंऽऽ असा हुंकार देत असत. त्यामुळे शिकवताना अगदी मायेने समजूत काढल्यासारखा त्यांचा स्वर असे. 'योगभ्रष्ट'कार कवी आपल्याला शिकवतो आहे, याचं तेव्हा आम्हाला विलक्षण अप्रूप होतं. उंच शिडशिडीत शरीरयष्टी, लांब खादीचा सदरा आणि खांद्याला शबनम बॅग हीच त्याची पहिली छबी मनावर ठसलेली आहे.

१९७५ मध्ये त्यांचा 'योगभ्रष्ट' हा काव्यसंग्रह आला. त्याचं मुखपृष्ठ आणि आतली रेखाटने पाहिल्यावर हा कवी चित्रकारही आहे, ही नवी माहिती मिळाली. संतप्त तरुणपिढीचे प्रतिनिधित्व करणारे, मर्ढेकर परंपरेतील दुसऱ्या पिढीतील, लघुनियतकलिकांतून लेखन करणारे कवी अशी त्यांची ओळख झाली होती. केवळ उत्साहापोटी तो संग्रह वाचला आणि त्यांच्या कवितांच्या समकालीन वैविध्यपूर्ण आशय सूत्रांनी भारावून गेले. मग याच काव्यसंग्रहावर एम.फील. केलं. विविध अंगांनी त्यांची कविता अभ्यासली, पण मनाला अधिक भावली ती त्यांची अल्पाक्षरी रचना किंबहुना स्फुट कविता. मोजक्याच चार किंवा पाच ओळींतून एक विचार एक उत्कट संवेदना, जाणीव ते पेरत जातात, याची अनुभूती कविता वाचताना येत गेली.

***कालसुसंगत काव्याभिव्यक्ती***

वसंत आबाजी डहाके हे १९७५ या कालखंडातले अतिशय महत्त्वाचे कवी म्हणून ओळखले जातात. संतप्त तरुण पिढीची कविता या काळात प्राधान्याने प्रसिद्धीला आली होती. लघु नियतकालिकातून लिहिणाऱ्या कवींचा जो वर्ग होता, त्याचे प्रतिनिधित्व करणारे वसंत आबाजी डहाके हे प्रमुख कवी होते. असे असले तरी त्यांनी आजपर्यंत सातत्याने काव्यलेखन केलेले आहे, करीत आहेत. १९७५ या कालखंडामध्ये त्यांच्या कवितेमध्ये असलेली आशयसूत्रे आजच्या काळातही दिसून येतात उदाहरणार्थ, तरुण पिढीचे अस्वस्थ करणारे भावविश्व, मानवी अस्तित्वाचे प्रश्न, मनाला जाणवणारे एकाकीपण, परकेपण, निरर्थकता, अनिश्चितता, दुभंगलेपण, व्यक्तित्वलोप, भीती, मृत्यूची जाणीव ही काही त्यांच्या कवितेची खास अशी आशयसूत्रे सांगता येतात. अर्थात, समकाळाचा विचार केला तर हीच आशयसूत्रे आजच्या काळातील अनेक कवींच्या कवितांमध्ये दिसून येतात, कारण ती आजच्या काळातील अस्थिर अशा जीवनातून आलेली आहेत. किंबहुना, आजच्या काळातील कवींचे ते अनुभव विश्व आहे असे म्हणायला हरकत नाही.

## झाड

**झाड तोडायचे, कापायचे,**
**लगदा करायचा, कागद बनवायचा,**
**त्यावर लिहायचे, ते छापायचे,**
**मग वाचायचे.**
**एवढा खटाटोप कशासाठी?**
**सरळ**
**झाडच वाचावे!**
**झाड वाचताना**
**मला तुझाही अर्थ**
**उलगडत जातो.**

१९७५ साली प्रकाशित झालेल्या 'योगभ्रष्ट' या काव्यसंग्रहानंतर त्यांचे 'शुभवर्तमान', 'शुन:शेप', 'चित्रलिपी, 'रूपांतर', 'वाचाभंग', 'कर्कवृत्त' असे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहाला २००९ सालाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. महानगरीय जाणीव, मानवी अस्तित्वाचा शोध, मूल्य ऱ्हासाची जाणीव ही त्यांच्या 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहातील कवितेची मुख्य आशयसूत्रं सांगता येतात. 'योगभ्रष्ट' या काव्यसंग्रहातही ही वैशिष्ट्ये दिसत होती, परंतु हे प्रश्न किंवा या जाणिवा आजही तशाच आहेत, हे 'चित्रलिपी' या त्यांच्या काव्यसंग्रहातून पुन्हा एकदा प्रत्ययाला आले. म्हणूनच त्यांची कालची कविता आजही ताजी वाटते, यादृष्टीने पाहता ती कालही समकालीन होती आणि आजही समकालीन वाटते. त्यामुळे आजच्या काळाचे संदर्भ अपरिहार्यपणे त्यांच्या कवितेत येतात. काळाबरोबर जगणारा कवी असे कवी डहाके यांचे वर्णन केल्यास वावगे होणार नाही.

'चित्रलिपी' या संग्रहात आजच्या काळातील घटितांचे संदर्भ प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे दिसून येतात. जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेल्या शहरात भल्या मोठ्या गर्दीत, माणसांच्या समूहात राहूनही माणूस एकटा आहे, एकाकी आहे

ही जाणीव त्यांनी अधोरेखित केली आहे. जुन्या चाळी आणि कारखाने जाऊन तिथे टोलेजंग इमारती आल्या आहेत. मॉल्स आले आहेत. मेट्रो रेल्वे, मॉल्स उभारणी यासाठी कित्येकदा इमारती पाडल्या जात आहेत किंवा जुन्या बैठ्या चाळी पाडून, कित्येक महावृक्ष तोडून, झाडे जमीनदोस्त करून तिथे बांधकाम करण्यात येत आहे. गोरेगाव आरे कॉलनीतील जंगल नाहिसे करणे ही एक मोठी समस्या मेट्रो रेल्वेच्या काळात निर्माण झाली होती. त्यासाठी अनेकांनी ही जंगलं, वनं वाचविण्यासाठी आंदोलन केली होती. ही समस्या केवळ मुंबईमध्येच नाही तर शहरीकरणाच्या नावाखाली सर्वत्रच दिसत होती. ही केवळ पर्यावरणाची समस्या नव्हती, तर त्यामागे अनेक राजकीय, आर्थिक स्वार्थी डावपेच एकमेकांत गुंतलेले होते. संवेदनशील माणूस या प्रकाराने सहाजिकच अस्वस्थ होत होता. या घटितांचे पडसाद वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेत उमटलेले दिसतात, म्हणूनच झाड या विषयाशी निगडित त्यांच्या तीन कविता मी येथे रसग्रहणासाठी घेतल्या आहेत.

वरवर पाहता या कवितांचा हेतू पर्यावरण रक्षण, पर्यावरण सुरक्षा, वने वाचवा, झाडे जगवा असा वाटत असला तरी इतकाच अल्पविचार त्यामागे नाही, तर एक वृक्ष तोडणे म्हणजे एका सजीवाची हत्या करणं आणि ही हत्या म्हणजे एका अर्थाने पापच आहे, असा मानवतावादी सूरही या कवितांमागे आहे. यातूनच कवीच्या संवेदनशीलवृत्तीचा प्रत्यय येतो. म्हणूनच ही कविता निसर्ग घटकावर आधारलेली असली तरी ती सौंदर्यलक्ष्यी ठरत नाही किंवा झाडे जगवा हा संदेश देणारी असली तरी ती प्रचारकीही ठरत नाही.

***कोंडमाऱ्याचे सूचन***

प्रस्तुत लेखासाठी निवडलेल्या तीन अल्पाक्षरी कविता झाड या केंद्राभोवती गुंफलेल्या असल्या तरी पारंपरिक निसर्ग-कवितेपेक्षा वेगळ्या आहेत. त्यात झाडाच्या जीवन-मृत्यू विषयीचा एक समान धागा आहे, त्यातून झाडाच्या तीन अवस्था टिपलेल्या आहेत, तीन टप्पे रेखाटलेले आहेत. कवीचे संवेदनशील चिंतन त्यातून व्यक्त झालेले दिसते. म्हणून तीनही कवितांचा सलग विचार होणे आवश्यक वाटते.

**झाडाचं गाणं**
**झाडातून सळसळ आवाज होतोय.**
**झाड अतिशय उच्च स्वरात गातंय.**
**मी कोंडून ठेवतोय झाडाचं गाणं**
**माझ्या आत गच्च;**
**अलीकडे, सांप्रत, आजकाल, सद्यःस्थितीत.**

'झाडाचं गाणं ही कविता म्हणजे, 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहातील झाड विषयक कवितांमधील पहिली कविता. अवघ्या पाच ओळींची कविता. येथे झाडाचा होणारा सळसळ आवाज म्हणजेच झाड उच्च स्वरात गाणं गातंय असं कवीला वाटतंय. कदाचित आजूबाजूच्या कोलाहलात झाड आपलं अस्तित्व दाखविण्यासाठीच उंच आवाजात गात नसेल ना! झाडाचं उत्स्फूर्त गाणं कवीला सतत ऐकायचं आहे म्हणून तो ते गाणं मनात जपतोय. नव्हे, तो कोंडून ठेवतोय, बाहेरच्या जगातील कोलाहलापासून ते मुक्त असावं, स्वतंत्र आणि अक्षय असावं म्हणून ते गाणं मनात कोंडून ठेवतोय. कारण आजचा भवताल हा शांतही नाहीये किंवा आनंदीही नाहीये अशा वातावरणात कवी झाडाचं गाणं पर्यायाने स्वतः मधला संवेदनशील माणूसच जपू पाहतोय; पण ते त्याला करता येत नाही, म्हणून तो अस्वस्थ आहे. झाडाचं मुक्त गीत जपण्यासाठी ते कोंडून ठेवावं लागतंय, या जाणिवेतच सूक्ष्म विरोध अन् विसंगती दडलेली दिसतेय, खरंतर तीच कवीची अस्वस्थता आहे. ही अस्वस्थता कवी आक्रमक शैलीत किंवा आक्रस्ताळेपणाने व्यक्त करत नाही, तर अतिशय संयतपणे व्यक्त करतो. म्हणूनच तो म्हणतो-

**मी कोंडून ठेवतोय झाडाचं गाणं**
**माझ्या आत गच्च;**
**अलीकडे, सांप्रत, आजकाल, सद्यःस्थितीत.**

वरील शेवटच्या ओळीतील अलीकडे, सांप्रत, आजकाल, सद्यःस्थिती या चार शब्दातून समकालाचं चित्रच तो उभं करतो. हे चार शब्द केवळ कालवाचक शब्द म्हणून येत नाहीत, तर आजच्या समाजस्थितीचे, समाजातील विपरीत घडामोडींचेही सूचन करतात. अशा वातावरणात कवीच्या मनाचा होणारा कोंडमाराही येथे अधोरेखित होत जातो. आजूबाजूच्या कोलाहलात झाडाचं गाणं म्हणजेच त्याचं जगणं हरवून जाईल की काय या जाणिवेने कवी अस्वस्थ झालेला दिसतो. अशाच तऱ्हेचा सूर 'झाड' या कवितेतूनही व्यक्त झालेला दिसून येतो.

**झाड-**
**झाड तोडायचे, कापायचे,**
**लगदा करायचा, कागद बनवायचा,**
**त्यावर लिहायचे, ते छापायचे,**

**मग वाचायचे.**

**एवढा खटाटोप कशासाठी?**
**सरळ**
**झाडच वाचावे!**
**झाड वाचताना**
**मला तुझाही अर्थ**
**उलगडत जातो.**

'झाड' ही अतिशय अर्थपूर्ण आणि आशयगर्भ अशी अल्पाक्षरी कविता आहे. या कवितेची मांडणी दोन भागात केलेली जाणवते. लिखाणासाठी वापरला जाणारा कागद हा झाडापासून बनवला जातो, ही वस्तुस्थिती असली तरी एखाद्या संवेदनशील मनाला अस्वस्थ करणारी आहे, हा गर्भितार्थ या कवितेतून सूचित केलेला आहे.

कवितेच्या पहिल्या भागात कागद बनण्याची किंवा बनवण्याची प्रक्रिया सूचित केली आहे, तर दुसऱ्या भागात लेखनाची प्रक्रिया सांगितली आहे. एखादी कविता उतरविण्यासाठी कागद लागतो, ही स्वाभाविक आणि सर्वसाधारण बाब आहे. परंतु तो कागद बनवण्यासाठी एक अख्ख झाड तोडावं लागतं, म्हणजेच पर्यावरणाचा ऱ्हास करावा लागतो. याचाच अर्थ, कवितेसारख्या सर्जनशील कृतीसाठी जिवंत झाडाचा मृत्यू घडवावा लागतो. कवी म्हणतो–

**झाड तोडायचे, कापायचे,**
**लगदा करायचा, कागद बनवायचा,**
**त्यावर लिहायचे, ते छापायचे,**
**मग वाचायचे.**

लिखाणाची क्रिया ही सर्जनाची क्रिया आहे, या सर्जनासाठी झाड, तोडणे, कापणे या क्रिया विध्वंसक, विनाशकारी आहेत. येथे कवीने सृजन आणि मृत्यू यांच्यातील विपरीत ताण अतिशय साध्या, सोप्या भाषेतून नेमकेपणाने अधोरेखित केलेला दिसतो. तसाच एकप्रकारचा उपरोधही व्यक्त केलेला दिसतो. नकळत मानवी प्रवृत्तीवर तिरकसपणे कोरडा ओढलेला दिसतो. एवढा विध्वंस करून लिहिण्यापेक्षा 'सरळ झाडच वाचावे' असा उपयुक्त आणि सूचक सल्ला कवी देतो. म्हणूनच तो म्हणतो–

**एवढा खटाटोप कशासाठी?**
**सरळ**
**झाडच वाचावे!**
**झाड वाचताना**
**मला तुझाही अर्थ**
**उलगडत जातो.**

येथेही अतिशय मार्मिकपणे कवी काहीतरी सुचवतोय. कवितेच्या पहिल्या भागातील लेखनप्रक्रिया आणि दुसऱ्या टप्प्यातील वाचनप्रक्रिया कवी उलगडून सांगत आहे. पेपरवर लिहिलेल्या ओळी वाचण्यापेक्षा सरळ झाडच वाचावे, असा सल्ला तो देतोय.

झाडच वाचताना असे म्हणताना कवी केवळ वाचन प्रक्रियेविषयीच बोलत नाही, तर तो आकलनाविषयी बोलतो. झाड वाचणे याचा कितीतरी मोठा गर्भित अर्थ दडलेला आहे. पुस्तक वाचण्यासारखं झाड वाचलं जात नाही. झाड वाचणं म्हणजे केवळ झाडाचं निरीक्षण करणं, झाडाकडे पाहणं असं होत नाही; तर झाडापासून तुम्ही कोणत्या गोष्टी शिकता किंवा झाड तुम्हाला कोणकोणत्या गोष्टींच्या जाणिवा करून देतं याची जाणीव कवी करून देतो. या ठिकाणी कवी विंदा करंदीकर यांच्या 'घेता' या कवितेची नकळत आठवण होते. 'घेता' या कवितेमध्येही कवीने निसर्गाकडून कोणकोणत्या गोष्टी, सद्भावना शिकून घ्याव्यात हे सांगितले आहे, तोच अर्थ डहाक्यांनाही अभिप्रेत असावा असं वाटतंय. एक झाड आपल्याला कितीतरी नैतिक गोष्टी शिकवून जातं. जसं की स्वतः उन्हात राहून दुसऱ्याला सावली देणं, पानगळतीचा ऋतू आपल्याच डोळ्यांनी पाहणं, अंगावर ऊन पावसाच्या धारा झेलत उभ राहणं, दुसऱ्याकडून कसलीही अपेक्षा न करता दुसऱ्याला मात्र भरभरून फुलं, फळ, सावली देणं आणि कितीही कष्ट झेलावे लागले तरी ठामपणे उभं राहणं अशा अनेक गोष्टींचा बोध झाडाकडून मिळतो. या गोष्टी माणसाने शिकून घ्यायला हव्यात असंच कवीला सांगायचं आहे. कवितेची शेवटची ओळ महत्त्वाची आहे.

**झाड वाचताना मला तुझाही अर्थ उलगडत जातो**

येथे तू म्हणजे नेमकं कोण? कवीने हा प्रश्न वाचकांवर सोडलेला दिसतो. येथे तू या सर्वनामाचे अनेक अर्थ सूचित होतात. तू म्हणजे अख्खा निसर्ग, तू म्हणजे परमेश्वर, तू म्हणजे प्रेयसी, तू म्हणजे कवी स्वतःच किंवा मानवजात असे अनेक अर्थ यातून सूचित होतात.

***सर्जन आणि विनाशाचा तरल वेध***

वरवर पाहता ही कविता निसर्गाला उद्देशून केलेली कविता म्हणून सौंदर्यलक्ष्यी म्हणता येईल. कवीचं आत्मनिवेदन त्यात



*झाड आणि त्याला तोलणारा निसर्ग डहाकेंच्या अंतःसृष्टीतला एक महत्त्वाचा घटक आहे. म्हणूनच त्यांची कविता अख्खे झाडच वाचावे, असा आग्रह धरताना दिसते...*

असल्यामुळे ही आत्मलक्ष्यी कविता असेही म्हणता येईल. तसेच या कवितेला समकाळाचाही कळत नकळत संदर्भ असलेला सूचित होतो. मॉलच्या, मेट्रो ट्रेनच्या नावाखाली जंगलाची जी कत्तल होतेय, वृक्षतोड होतेय यावरच कवी थेटपणे न बोलता अतिशय तरलपणे सूचन करतो. एकीकडे पर्यावरण रक्षणाचा संदेश यातून दिलेला दिसतो म्हणून ही प्रचारकी कविताही वाटू शकते; पण त्या प्रचारकी वळणापेक्षाही कवीने मांडलेला निसर्ग वाचनाचा विचार किंवा व्यक्त केलेली मृत्यू विषयक जाणीव ठळकपणे अधोरेखित होते. सर्जन, विनाश या विरोधी जाणिवा अतिशय तरलतेने येथे टिपलेल्या आहेत, हेच या कवितेचे वेगळेपण म्हणता येईल.

झाड किंवा निसर्ग हा डहाक्यांच्या अंत:सृष्टीतील घटक आहे. ही अंत:सृष्टीच त्यांना वाचायला अधिक आवडते, म्हणूनच ते म्हणतात – अख्ख झाडच वाचावं. कवितेत बाकीचे जे तपशील येतात उदाहरणार्थ, झाड सुकणे, तोडणे, त्याचे कागद बनवणे इत्यादी हे संदर्भ आणि तपशील लौकिक सृष्टीतील आहेत त्या त्यांना नकोशा वाटतात. म्हणूनच अंतःसृष्टीतील झाड जपण्याचा, त्या झाडाचं गाणं जपण्याचा ते प्रयत्न करतात, असं म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

झाडाचं गाणं, झाडाचं जगणं जपू पाहणारे डहाके पुढील कवितेतून झाडांच्या आणि मानवी जीवनाच्या मुळांचा शोध घेताना दिसतात. वार्धक्याकडे प्रवास करणारे मानवी जीवन आणि वृद्धत्वाने जर्जर होणारी झाडे यातील साम्य, अद्वैतच गर्भितपणे व्यक्त करतात.

**मुळं**

**अर्थात ती म्हातारी झाडे, जी खचताहेत आतल्या आत**

**आणि काही दिवसांतच जी संपूर्णपणे पोकळ होऊन जातील आतून,**

**वाऱ्याच्या एका हलक्याशा तडाख्याने कोसळून होऊन जातील भुईसपाट–**

**अशांनाच तोडलं जावं.**

**का की त्यांच्यापासून नवी टेबलं, नव्या खुर्चा आकारास येतील.**

**नव्या झाडांसाठी जागा होईल.**

**ती आतून खचण्याची वाट पाहात पुन्हा येतील नवी झाडं.**

**जुन्या खुर्च्याही मोडकळीस आलेल्या असतील एव्हाना.**

**तोडली जातील म्हातारी झाडं, पण त्यांची जमिनीत खोलवर घुसलेली मुळं,**

**हाताच्या बोटांसारखी, वळवळत राहतील आतल्या आत.**

'मुळं' ही झाड विषयक तिसरी कविता. पूर्णपणे गद्यप्राय शैलीत आपलं मनोगत व्यक्त करावं, असं या कवितेचे स्वरूप आहे. वस्तुस्थिती दर्शक, अतिशय वास्तववादी अशी ही कविता आहे. तरीही वाच्यार्थ आणि गर्भितार्थ अशा दोन पातळ्यांवरून या कवितेचा विचार करता तिचे वेगळेपण जाणवते. या कवितेतही मृत्यू आणि जीवन याच दोन अवस्थांचा विचार मांडलेला दिसतो. निसर्गचक्राप्रमाणे झाडं जर्जर होतात, पोकळ होतात मग भुईसपाट होतात. अशा मृत झालेल्या झाडांपासूनही मानवजातीला उपयोगी पडणाऱ्या वस्तू तयार केल्या जातात. म्हणजे, झाडाच्या मृत्युनंतरही ते आपल्या अस्तित्वाची साक्ष देत, माणसाच्या उपयोगी पडते, (सहजच इंदिरा संतांच्या ऐक जरा ना ही कविता आठवते.) शिवाय अशा मृत झाडाच्या रित्या जागेवर दुसऱ्या झाडासाठी जागा रिती होईल. म्हणजेच एका पिढीनंतर दुसऱ्या पिढीचे आगमन होईल, असे कवी सुचवू पाहतो. जन्मानंतर मृत्यू असतोच, तो स्वीकारावा लागतोच, याचे भान या कवितेतून व्यक्त झालेले आहे. येथे झाड ही वंशवृक्षाची, वंशवृद्धीची प्रतिमा म्हणून योजलेली दिसते. म्हातारी झाडं ही प्रतिमा वयोवृद्ध होत जाणाऱ्या माणसांची म्हणजेच जुन्या पिढीची निदर्शक म्हणून येते, तर नवी झाडं ही प्रतिमा नव्या पिढीचे, तरूण पिढीचे सूचन करणारी म्हणून येते.

*जीवनविषयक मूल्यभान*

वरवर पाहता झाडाच्या वार्धक्याविषयी किंवा झाडाच्या जर्जर अवस्थेविषयी कवी वस्तुस्थिती कथन करीत आहे असे वाटते, परंतु हे कथन इतक्याच पातळीवरचे नसून, कवी एका वस्तुस्थितीची जाणीव करून देतो, की झाडं वृद्ध झाल्यावर सुकतात, त्यांचा मृत्यू होतो. या सुकलेल्या झाडांपासून सर्वसामान्य माणूस आपल्या उपयोगाच्या वस्तू तयार करतो. उदाहरणार्थ; टेबल, खुर्ची इ., त्यामुळे जिवंत झाडांची कत्तल करण्यापेक्षा जी मृतावस्थेतील झाडं आहेत, त्या झाडांपासून मानवाला त्याचा उपयोग व्हावा, ही एक सर्वसाधारण सूचना कवी या कवितेतून देतो. परंतु अतिशय मार्मिकपणे तो मानवाच्या पुढच्या पिढीविषयीही सुतोवाच करतो की, एक पिढी गेल्यानंतर ती जागा मोकळी होते आणि दुसरी पिढी त्या जागेवर येते. कालांतराने ही दुसरी पिढी देखील वृद्ध होते आणि त्या जागी तिसरी पिढी वाट पाहत असते. हे निसर्गचक्र केवळ झाडांच्या बाबतीत नाही, तर मानवी जीवनाच्याही बाबतीत घडतं, तसंच ते वस्तूंच्या बाबतीतही घडतं. ज्याप्रमाणे झाडांना वार्धक्य येते त्याचप्रमाणे या झाडांपासून तयार केलेल्या वस्तूही कधी ना कधीतरी मोडकळीस येतात त्या निरुपयोगी ठरतात आणि मग पुन्हा मृतावस्थेला आलेल्या झाडांपासून वस्तू तयार केल्या जातात. हे एक व्यावहारिक चक्र आहे, हे येथे व्यक्त झालेले आहे येथे उल्लेखिलेल्या टेबल, खुर्ची या वस्तू देखील मानवी अस्तित्वाच, अधिकाराचे, सत्तेचे सूचन करणाऱ्या प्रतिमा आहेत. त्यामुळे ही कविता गर्भितार्थाच्या दृष्टीने अधिक व्यापक व व्यामिश्र होताना दिसते.कवी जेव्हा म्हणतो–

**जुन्या खुर्च्याही मोडकळीस आलेल्या असतील एव्हाना.**

**तोडली जातील म्हातारी झाडं, पण त्यांची जमिनीत खोलवर घुसलेली मुळं,**

**हाताच्या बोटांसारखी, वळवळत राहतील आतल्या आत.**

ही झाडांची मुळं किंवा मानवी जीवनाची मुळं अगदी खोलवर रुतलेली, पसरलेली असतात. ती सहजासहजी मृत पावत नाहीत, तर ती आपल्या अंतर्मनातही वळवळत राहतात. हेच जिवंतपणाचे लक्षण असावं असं कवी सुचवू पाहतो. अतिशय मार्मिकपणे जीवन आणि मृत्यू या दोन जाणिवा कवी येथे रेखाटतो. या दृष्टीने पाहता वसंत आबाजी डहाके यांची कविता ही एकीकडे समकालाची म्हणून कालसापेक्ष किंवा समकालीन ठरतेच, पण दुसऱ्या बाजूला या कवितेतील प्रश्न, घटिते ही प्रत्येक काळात चिरंतन घडताना दिसतात म्हणून या तीनही कविता कालनिरपेक्ष किंबहुना सार्वकालिक ठरतात.

'झाड' विषयक वरील तीनही कविता निसर्गभान, निसर्ग जाणीव देणाऱ्या आहेत. म्हणूनच त्या जीवनाविषयीचेच मूल्यभान देणाऱ्या आहेत असे म्हणता येईल. यावरून असे दिसून येते की तीनही कवितांमध्ये अंतर्गत सुसंगती आहे, झाडाच्या तीन विविध अवस्थांची भावोत्कट अशी अभिव्यक्ती वसंत आबाजी डहाक्यांनी केली आहे. आपल्या कवितेतील निसर्गाविषयी सह्याद्री वाहिनीवरील एका मुलाखतीत म्हणाले होते की, ''निसर्ग मला सुंदर वाटतो परंतु बालकवींप्रमाणे किंवा महानोरांप्रमाणे मी निसर्ग कविता लिहीत नाही. जी काही थोडीफार सृष्टी माझ्या कवितेत आलेली आहे, ती व्याकूळ किंवा हिंस्र, अमानुष अशी आहे, त्यात निसर्ग सौंदर्याचा प्रत्यय नाही'' त्यांच्या या म्हणण्याचा प्रत्यय वरील झाड विषयक तीन कवितांमधून उत्कटपणे येतो, म्हणूनच त्यांची कविता ही इतर निसर्ग कवींपेक्षा किंवा इतर कवींपेक्षा वेगळी ठरलेली दिसते. ती अधिकाधिक समकालीन आहे, समकाळाचं चित्र आणि दुःख व्यक्त करणारी आहे असे म्हणावे लागते. निसर्गाचं गाणं ऐकून, ते गाणं जपण्याचं, पुढच्या पिढीला व्याकुळ आवाहन करण्यात या तीनही कविता यशस्वी झालेल्या दिसतात.

**संदर्भ –**

**१) डहाके वसंत आबाजी; चित्रलिपी, लोकवाङ्मय गृह, मुंबई.**

**२) राजाध्यक्ष विजया; कवितारती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.**

**डॉ. सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रात त्या सक्रिय राहिल्या आहेत.**

**संपर्क** : nehasawant603@gmail.com

# ...तेव्हा नादावतात नादस्वर



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध





**गा**णं आवडणं आणि ते समजणं यात जमीन आस्मानचा फरक असतो. गाणंच तुम्हाला जवळ खेचून घेतं, हा अनुभव तर कित्येक वेळा घेतला आहे. गाणं वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यातून तुमच्याजवळ पोहोचत असतं, तुम्ही किती संवेदनशीलतेनं ते ओंजळता तेच महत्त्वाचं असतं...

**स्वां**त सुखाय वाचनाच्या प्रवासात जी.ए. कुलकर्णींच्या पुस्तकात असा उल्लेख वाचायला मिळाला होता, की त्यांना विदुषी प्रभा अत्रेंचा मारू बिहाग आणि कलावती प्रचंड आवडायचा. त्यातली 'जागू मैं सारी रैना...' ही बंदिश तर अक्षरशः जीवघेणी. हे वाचून तो राग ऐकण्यासाठी तळमळत असायचो, कारण कॉलेजच्या दिवसात गाणं ऐकण्यासाठी लागणारी साधने आवाक्याबाहेरच होती. सुरूवातीला सीडी प्लेअर घेतला त्यासाठी लागणारी सीडी घ्यायला कधी-कधी रिदम हाऊसला जायचो. तिथलं आल्हाददायक वातावरण हवंहवंसं वाटायचं. पण त्या काळात त्या सीडींची किंमत मला खूपच महाग वाटायची, त्यामुळे अक्षरशः दिवस पालथा घालून एखादीच सीडी चोखंदळपणे विकत घ्यायचो. पण त्याचा आनंद खूप मोठा असायचा. त्यामुळे निवडकच गाणं ऐकायला लागलो. नकळत त्या पार्श्वभूमीवरच इतरांच्या गाण्याची तुलना वगैरे व्हायची. म्हणजे,

**एक बस तू ही नहीं खफा हो बैठा**
**मैने जो संग तराशा वो खुदा हो बैठा**

ही मेहदी हसनच्या आवाजातली फरहत शहजादची मिया की मल्हार मधली गझलची सीडी विकत घेतली आणि मेहदीच्या प्रचंड प्रेमातच पडलो. नंतर कुठेही, कुणाचाही मिया की मल्हार ऐकायला मिळाला की, मी मात्र मनानं या गझलपाशीच येऊन थबकायचो. एकदा पुण्यात मेहदी हसनच्या मुलाची मैफल होती. ती ऐकायला अस्मादिक स्वतः जातीने हजर होते. अतिशय तुरळक रसिक होते, पण मेहदीचा मुलगा स्टेजवरून गाताना, आम्हीही ती गझल त्यांच्या बरोबर गुणगुणत होतो. इतक्या गझला सर्व रसिकांना पाठ होत्या. शेवटी, तेही म्हणाले की तुमच्या मेहदी वरच्या प्रेमानं मी नतमस्तकच होऊन गेलोय.

***कष्टाने कमावलेली रसिकता***

तर सीडी वगैरे विकत घेताना चोखंदळपणा दाखवताना आजूबाजूला माणसं अक्षरशः बास्केट वगैरे भरभरून सीडी घेऊन जाताना न्यूनगंडच यायचा. डोंबिवलीहून मुंबईत जाऊन मैफली ऐकायचं तसं वेळ आणि पैशाच्या दृष्टीनं खर्चिकच असायचं. आमच्या दोघांच्या अडनिड्या वेळेच्या नोकऱ्या आणि मुलाच्या शाळेच्या वेळा सांभाळून जाणं, गाणं ऐकणं हे सर्वार्थाने कष्टाचंच काम असायचं. पण ते सातत्याने करत राहिलो, कारण त्यातून चिरंतन मिळणारा आनंद सापडायला लागला होता.

या अशा कष्टाने कानांत साठवलेल्या गाण्यावरच तिघेही पोसले गेलो, वाढत गेलो, समृद्ध होत गेलो. तर सीडी घेण्याची समज आणि ऐपत वाढल्याने इतरही कलाकार आणि त्यांचं गाणं पोतडीत जमा व्हायला लागलं. आपल्याला गाणं वाजवता किंवा गाता येत नाही, पण त्यातला आनंद भरभरून घेता येतो, हे मात्र नेमकेपणानं समजलं. म्हणजे, याआधीच्या एका लेखात उल्लेख केल्यानुसार अगदी सुरूवातीला यशवंतराव चव्हाण सेंटरमधल्या एका सकाळच्या मैफलीत अश्विनी भिडेताईंचं गाणं ऐकायला गेलो होतो. तेव्हा गाणं काय गायल्या वगैरे तपशील नाही आठवत, पण त्यांनी डोक्यात माळलेला मोगऱ्याचा टप्पोरा गजरा तेवढा आठवतोय. पण नंतर नंतर इतर गोष्टींवरचं ध्यान बाजूला होत गेलं आणि निव्वळ गाण्यावरच स्थिर होत गेलो.

गाणं आवडणं आणि ते समजणं यात जमीन आस्मानचा फरक असतो. गाणंच तुम्हाला जवळ खेचून घेतं, हा अनुभव तर कित्येक वेळा घेतला आहे. गाणं वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यातून तुमच्या जवळ पोहोचत असतं, तुम्ही किती संवेदनशीलतेनं ते उचलता तेच महत्त्वाचं असतं.

याच दरम्यान कधी तरी देवकुळे नावाच्या गृहस्थांशी अगदी योगायोगानंच ओळख झाली. तेही आमच्यापेक्षा सरस असे संगीत रसिक. ते डोंबिवलीतल्या नाख्येंच्या हॉलवर मॅनेजरचे काम करत आणि खानपानची व्यवस्थाही बघत. त्यांच्याकडे काही कार्यक्रम असला की जेवणाच्या हॉलमध्ये हमखास प्रभा ताईंचं 'जागू मैं सारी रैना' लागलेलं असायचं. जेवणापेक्षा या गाण्यात जीव जास्त अडकलेला असायचा. या प्रभाताईंना तलत मेहमूद खूप आवडायचा, अशीही नोंद कुठेतरी वाचायला मिळाली आहे. इंदूरचे कवी, लेखक श्रीकृष्ण बेडेकरांनी आपल्या सुवाच्य अक्षरात प्रभाताईंच्या बंदिशींचं पुस्तक तयार केलं, तेव्हा पॉप्युलर प्रकाशनाचे रामदास भटकळ स्वतः जातीने कौतुक करायला, पाठीवर शाबासकीची थाप द्यायला सरसावले होते. पण इतरांना वाटतं, तसं मलाही वाटतं की, प्रभाताईंनी मात्र म्हणावी तशी दखल बेडेकरांची घेतलीच नाही.

त्यावेळी कॅसेट, टेप या अतिशय महाग असल्या, तरी हौस मात्र मोठी असायची. माझ्या बहिणीच्या लग्नासाठी डोंबिवलीतला स्टेशनजवळचाच दाते हॉल बुक केलेला. सकाळी हॉलचे मालक म्हणाले, 'मस्त सनईची कॅसेट घेऊन या



*शांततेला जसा स्वतःचा एक आवाज असतो, तसाच एक सूरही असतो. गायक-श्रोत्यांची समाधिवस्था लागली की, त्या शांततेतून निनादणारा नाद अनुभवास येतो...*

लावूया.' मीही लगेच ७५ रूपयांची बिस्मिल्ला खानची कॅसेट घेऊन आलो. तर म्हणाले, स्पीकर नाही आणलात, म्हटले अहो, तुमच्याकडे ती व्यवस्था असेल हे गृहीत धरलेले. कारण तुम्हीच आम्हाला कॅसेट आणायला सांगितले होते ना? ते निर्विकारपणे म्हणाले, 'अहो माझ्याकडे नाही ही व्यवस्था.' मग काय ७५ रूपये वाया घालवले म्हणून ओरडा खायला लागू नये, यासाठी भर लग्नाच्या गडबडीत मी ती कॅसेट कुणी विकत घेईल, का याच विवंचनेत होतो. मला हेही आठवतंय की माझ्या मावस भावाने ती विकत घेऊन, माझी लाज राखली होती.

त्यांच्याकडे डबल कॅसेटचा प्लेअर होता. त्यांच्याकडे गेलो की त्यावर लता-मुकेशची 'चोरी-चोरी'ची वगैरे जुनी गाणी ऐकायला मिळायची. अर्थात अशा वस्तू आम्हाला हाताळायला मिळायच्या नाहीत. घरात एक वॉल्व्हचा मोठा रेडिओ बरेच दिवस होता. त्यावर बाबा सकाळपासून खटपट करून बातम्या वगैरे लावायचे. आजच्या पिढीला ते फ्रिक्वेन्सी ॲड्जस्ट करणं वगैरे माहितीही नसेल. पण यामुळे रात्री 'बेला के फुल' ऐकण्याची सवय लागली ती कैक वर्षे. नंतर बाबांकडे छोटा ट्रान्झिस्टर असायचा, कानाला झोपताना. रात्रभर तो एका कुशीत असायचा आणि दुसऱ्या कुशीत मी असायचो. त्यावेळी रात्रभर आणि पहाटे पहिल्या फेरीपासून सगळी गाणी/बातम्या ऐकून कान तृप्त व्हायचे.

***नादस्वरांचा माग***

आपलं राग संगीत चार-हजार वर्षांपूर्वी पासूनचे आहे, असे पूर्वीच्या तमाम कलाकारांचे दावे आहेत, पण प्रत्यक्षात चार हजार वर्षांपूर्वी राग ही संकल्पनाच नव्हती. उदाहरणार्थ, ऋग्वेदाचं पाठांतर करताना जे प्रकार आहेत, वेगवेगळ्या पद्धतीने ऋचांचं पाठांतर केलं जातं, ते बऱ्याच अंशी भारतीय संगीताला जन्म देणारं आहे, असं पुराव्यावरून दिसून येतं. हे संपूर्ण उपखंडात समान आहे. राजकीय विभाजन नंतर झालं; परंतु बांगलादेश, नेपाळ, पाकिस्तान या सगळ्या ठिकाणच्या संगीतात समानता आहे. या समानतेचा विचार करूनच सुरुवातीचं भारतीय संगीताचं शास्त्र बनवण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे या अर्थानं भारतीय संगीत अस्तित्वात आहे. आज अनेक शतकं ही लक्षणं घेऊन ते उभं आहे.

एकदा दुर्गाबाई भागवत बोरिवली इथल्या कान्हेरी गुंफा बघायला म्हणून गेल्या. तर तिथल्या झुडुपांवर त्यांना अनेक भुंगे गुणगुणताना दिसले. परत आल्यावर त्यांनी प्रसिद्ध संगीतज्ज्ञ प्रा. अशोक रानडेंना सांगितले की त्या गुणगुणण्यात एक वेगळाच नाद मला जाणवतोय. तर प्राध्यापक लगोलग तिथे गेले आणि त्यांनी चक्क त्या गुणगुणण्याचं नोटेशनच लिहून काढलं. त्यातून असा शोध लागला, की हे गुणगुणणं पूर्वीच्या बौद्ध भिक्कूच्या स्वरनादाशी समांतर जाणारं आहे. तर भारतीय संगीत हा ज्याला ॲकॉस्टिक फेनॉमेनन (नादव्यवस्था) म्हणावा असा आहे.

तिबेटी लामांमध्ये ओम मणि पद्मोहम म्हणण्याची जी प्रथा आहे, ते एक श्रेष्ठ संगीत आहे, असं काहीजण मानतात. त्यातल्या तीन स्वरांत हार्मनी असते. हे काही लोकसंगीत किंवा शास्त्रीय संगीत नाही. कारण आपल्याकडच्या राजस्थानी लोकांच्या संगीतासारखा त्याचा तिबेटी लोकांच्या जीवनाशी संदर्भ आहे. लंगा, मंगनियार लोक खूप चांगले गातात. त्यांचा फेस्टिव्हल ऑफ इंडियासारख्या उत्सवात समावेश करून त्यांना देशाबाहेर नेतात. आपल्याला हे नक्की जाणवतं, की राजस्थानी लोकांचं लोकसंगीत ऐकताना बऱ्याचदा त्यात आणि शास्त्रीय संगीतात फरकच जाणवत नाही. राजस्थानी लोककलांचे आभ्यासक कोमलदा कोठारी यांनी लंगा आणि मंगनियारांच्या वंशावळ्या तपासल्या, अभ्यासल्या आहेत. त्यांनी असं शोधून काढलंय की, राजस्थानातील पूर्वीची जी प्रसिद्ध घराणी होती, त्यातले बरेच लोक लंगांकडून शिकलेले किंवा त्यांच्या समाजातलेच होते. वरची सामाजिक पायरी गाठण्याकरता ते बाहेर पडले. पुढे ते महाराष्ट्रात आले. आग्रा, उत्तरप्रदेश येथे गेले आणि तिथे त्यांनी घराणी सुरू केली. १९४७ च्या पुढच्या

काळात भारत हा एक देश आहे. त्याची संस्कृती एक आहे. हे ठसवण्यासाठी म्हणून खूप प्रयत्न करावे लागले. याच संदर्भाने भानू काळेसंपादित 'अंतर्नाद' मासिकात व्यासंगी लेखक स.ह. देशपांडेंनी एक अनुभव नोंदला होता, की कुठल्या तरी जागतिक परिषदेच्या निमित्ताने ते परदेशात कुठेतरी गेले होते. संध्याकाळी सगळ्या देशांतील नागरिक कँप फायरसाठी जमा झाले होते. सगळ्यांनी आपापल्या देशाचं प्रतिनिधित्व प्रकट होईल, असं गाणं गाण्याचं ठरलं. प्रत्येक देशाने आपापलं गाणं गायलं, तेव्हा भारतीय माणसं या चर्चेतच रमली की कुठलं गाणं गायलं म्हणजे आपलं भारतीयत्व प्रकट होईल. प्रत्येक राज्यात प्रत्येकाचं आवडतं गाणं वेगवेगळं असल्याने एकमतच होईना, शेवटी राष्ट्रगीत 'जन गण मन' यावर एकमत होऊन सगळ्यांनी मिळून ते गायलं.

***शांततेचा स्वर***

एक प्रसिद्ध पाश्चात्य संगीतकार आहे, त्याने संगीताचा एक प्रकार म्हणून केवळ शांतता एके ठिकाणी वापरली. संगीत सादर करणारा म्हणून एक माणूस रंगमंचावर येतो, लोकांसमोर उभा राहतो; पण काहीही आवाज न करता निघून जातो. हेच संगीत आहे! असं जॉन कजर नावाचा संगीतकार सांगतो. १९५०च्या आसपास हा प्रकार बराच गाजला होता. यहुदी मेन्युहीन नावाचा प्रसिद्ध संगीतकार हे म्हणायचाच, की संगीताचा अंतिम अविष्कार हा शांतताच असायला हवा. मोठ-मोठ्या दिग्गज कलाकारांचे गायन वादन ऐकून खूप वेळा ही शांतता आम्ही अनुभवली आहे. टॉलस्टॉयसारख्या माणसानं या संदर्भात फार पूर्वी लिहिलंय की, आपल्या मनात ज्या कल्पना, भावना आहेत; त्या स्वतःच्या शरीरात पुन्हा एकदा निर्माण करून त्या भावना, त्या संवेदना लोकांपर्यंत पोहोचवणं हे कलाकाराचं काम असतं. हे करण्यात जो कलाकार यशस्वी होतो, तो यशस्वी कलाकार असं म्हणता येईल. त्याकरता शिक्षणाची गरज नाही.

आपल्या समाजात शंभर-सव्वाशे वर्षांपासून अशी कल्पना आहे की, चांगली कला कोणालाही आकर्षून घेते. माझ्या गाणं ऐकण्याच्या प्रवासात पहिली सीडी माझ्याकडे ओंकारनाथ ठाकूरांचीची आलेली आठवते. ग्वाल्हेर घराण्याचे प्रसिद्ध गायक पद्माकर बर्वे यांनी ओंकारनाथांबद्दल एक गोष्ट सांगितली आहे. एकदा एका संगीतसभेत ओंकारनाथांचा कार्यक्रम होता. त्यांच्या गाण्याच्या अगोदर एक बरीच प्रसिद्ध नर्तिका रंगमंचावर आपलं नृत्य सादर करून गेली. लोकांनी अगदी टाळ्यांचा कडकडाट केला. ही नर्तिका चित्रपटात वगैरे होती. त्यानंतर पंडितजी गाण्याकरता रंगमंचावर आले, तेव्हा श्रोते काही त्यांचं गाणं ऐकायला तयार होईनात. तेव्हा पंडितजींनी त्यांना सांगितलं की, 'मला तुम्हाला जे गाऊन दाखवायचंय, ते मी गाईन. तुम्हाला ते आवडलं तर सांगा, नाही तर मी माझं गाणं थांबवीन.' नंतर त्यांनी सूरदासांचं 'मैया मोरी मैं नही माखन खायो' हे भजन म्हणायला सुरुवात केली. पाच मिनिटांत सगळे श्रोते शांत झाले. त्यांना ते खूप आवडलं.

डोंबिवलीत उस्ताद झाकीर हुसेनांचा कार्यक्रम होता. त्यांच्या अगोदर प्रसिद्ध नटी माधुरी दीक्षितांचा कार्यक्रम झाला होता. नंतर उस्ताद मंचावर आले, तरी माधुरी बाईंना तमाम फॅन लोकांनी घेरून तिथेच सह्या वगैरे घेण्याचा कार्यक्रम सुरू होता. शेवटी झाकीरभाई स्वतः जागेवरून उठले, आतिशय प्रेमानं त्यांनी माधुरीचा हात हातात घेतला आणि हळूवारपणे चालवत स्टेजच्या बाजूला नेऊन उभे केले. नंतर एका नितांत सुंदर मैफलीचा आम्ही आनंद घेतला.

***संगीतकलेचे भरणपोषण***

कलांमध्ये, कलाकारांमध्ये, त्यांच्या अभिव्यक्तींमध्ये, आविष्कारांमध्ये फरक असतो. वेगवेगळे कलाकार वेगवेगळ्या पद्धतीने त्यांची कला मांडतात. संगीत ही प्रवाही कला आहे. त्यामुळे भांडवलशाही समाजव्यवस्थेत मूल्य वाढवत नेणं संगीताच्या बाबतीत अवघड ठरतं. भास्कर चंदावरकरांसारखे संगीत अभ्यासक हे सिद्ध करून दाखवतात, की दक्षिणेत कर्नाटक संगीतात बऱ्याच प्रमाणात ब्राह्मणांचा सहभाग आहे. ती केवळ ब्राह्मणांची कला होऊन राहिलेली आहे. म्हणजे याचा परिपाक एवढ्या टोकाला आहे, की टी. एम. कृष्णा यांना मिळालेल्या ललित कला निधी पुरस्काराचा दक्षिणेत उच्चभ्रू थरातून विरोध होतो आहे आणि याचं मोठं कारण इतकंच की त्यांनी स्पृश्य अस्पृश्य प्रथेला केलेला विरोध आणि सर्वधर्मसमभावाचा केलेला पुरस्कार. असो.

पण उत्तर भारतात मात्र असं झालं नाही. पारंपरिक किंवा परिवेशानुरूप ज्या गोष्टी संगीताकरता असायला हव्या होत्या, त्या उत्तरेतील ब्राह्मण वर्गाकडे होत्याच, असं नाही. गाण्याच्या संदर्भात बोलताना माणूस एक तर श्रीमंत असायला हवा किंवा फकीर, असं म्हटलं जात असे. या बाबतीत ब्राह्मण वर्ग फार जपून वागत असे, असं म्हणावं लागेल. फकीर व्हायला तो तयार नव्हता आणि तो श्रीमंत तर कधीही नव्हता. त्यामुळे तो



*सूफी परंपरा ही मुस्लिम धर्मातली सुधारणावादी चळवळीचा महत्त्वाचा हिस्सा होती. याच परंपरेमुळे मुसलमान समाजात संगीत कलेचा अवकाश विस्तारत गेला, ते जिथे स्थिरावले, तिथे त्यांनी आपले संगीत रुजवले...*

संगीताकडे पूर्णतः वळू शकला नाही. गाणं शिकलं, तरी ते तात्पुरत्या स्वरूपाचं असे. त्यामुळे पेशेवर कला बऱ्याच अंशी मागासवर्गीयांकडे किंवा मुसलमानांकडे राहिली.

मुसलमानांकडे संगीत येण्याचं अगदी पूर्वीचं कारण सूफी प्रभाव हे आहे. उत्तरेत तर मुसलमानांकडेच सत्ता होती. या बादशहा, नबाबांनी लोकांना पैशाचा आश्रय दिला. मुसलमानांकडे संगीत येण्याचं दुसरं मुख्य कारण म्हणजे सूफी परंपरा, सूफी संत अमीर खुस्रो, निजामुद्दीन औलिया किंवा त्यांच्याही आधीपासून त्यांनी मोठ्या प्रमाणात बाहेरील संगीताचे प्रभाव इथे रुजवले. अरबी संगीत आपल्याकडे दक्षिणेत रुजलं होतं, याचा पुरावा आपल्याला आदिलशहाच्या संदर्भात मिळतो. इराणी, अरबी आणि आपल्याकडच्या संगीताचा संदर्भ लावून इब्राहिम आदिलशहा (दुसरा) याने किताब-इ-नवरस हे पुस्तक रचलं. ते अतिशय वेगळं आहे. याचा काळ विजापुरातला, शिवाजीच्याही आधीचा, त्यागराजापूर्वी दोन-सव्वादोनशे वर्षांचा आहे. दक्षिण भारतातलं संगीत जास्त विशुद्ध आहे, त्याच्यावर मुसलमानी प्रभाव नाही. असं आपण समजतो, ते तेवढंसं खरं नाही. त्यागराजाचा जन्म १७७०च्या आसपासचा, तर मृत्यू निश्चितपणे १८४८चा आहे. याचाच अर्थ त्यागराज, ज्याला फादर ऑफ साऊथ इंडियन म्युझिक म्हटलं जातं व जो विश्वभर दाक्षिणात्य संगीतातील श्रेष्ठ रचनाकार मानला जातो, त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या तीस वर्षांत ब्रिटिश सत्ता इथे चांगलीच प्रस्थापित झालेली होती., त्यांच्या मृत्यूपूर्वी चाळीस वर्षांपूर्वीच इथे व्हायोलिन आलेलं होतं आणि ते वापरलं जात होतं. ब्रिटिश लोकांचे बँड इकडे तिकडे फिरत होते, हे विसरलं जातं. त्यामुळे उत्तर भारतातील संगीत मुसलमानांनी अशुद्ध केलं वगैरे समजुती मूर्खपणाच्या आहेत. दक्षिणेकडे मुसलमानी किंवा अरबी संगीत फार आधी आलेलं होतं. मुस्लीम धर्म स्वीकारण्यापूर्वीपासूनच अरबी व्यापारी दक्षिणेत येत होते...

**क्रमशः**

**(या लेखमालेअंतर्गत फेब्रुवारी २०२६ अंकात प्रकाशित टिपणामध्ये पं. भीमसेनांसोबत गुरुभगिनी धोंडूताई कुलकर्णी यासुद्धा शिकायला होत्या, असा अनावधाने उल्लेख राहून गेला. वस्तुतः भीमसेनांसोबत गंगुबाई हनगल या गुरुभगिनी शिकायला होत्या. धोंडूताई जयपूर अत्रौली घराण्याचे प्रतिनिधित्व करीत होत्या. संपादनाच्या पातळीवर राहून गेलेल्या या चुकीबद्दल दिलगीर आहोत- कार्यकारी संपादक.)**

**गणेश मनोहर कुलकर्णी प्रसिद्ध ललितलेखक, कला आस्वादक आहेत. त्यांच्या 'रूळानुबंध' या लेख संग्रहाला अलीकडेच राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.**
**संपर्क : ९८१९९५७८५२**

# दाम्पत्य स्वप्न



अनुवाद : सुमती जोशी

मूळ कथा: वनफूल

**बंग नाद**



**ल**घुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकाळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक-लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...

## एक

सुधीर आला होता. त्याच्या हातात गुलछडीच्या फुलांचा गुच्छ. चेहऱ्यावर हसरा भाव. पंख पसरून मन जणू उडू उडू पाहत होतं.

आल्याबरोबर सुधीर म्हणाला, ''हासी, आज एक खूशखबर आहे. काय देशील सांग. नाहीतर सांगणार नाही.''

हासी म्हणाली, ''सांगा ना प्लीज.''

''मला काय देशील ते आधी सांग.''

''मी आणखी काय देणार? तुमच्या रुमालावर छान कशिदा काढून देईन. मला एक सुरेख नमुना मिळालाय.''

''नाही, ते मला पसंत नाही.''

''मग काय हवंय तुम्हाला? चॉकलेट आहे. ते देऊ शकेन.''

''चॉकलेट घेऊन संतुष्ट व्हायला मी लहान बाळ आहे का?''

हासी हसू लागली. म्हणाली, ''मला ऐकायचं नाही. कशिदा काढून द्यायला तयार होते, चॉकलेट द्यायची इच्छा होती, त्यामुळे जर आपलं...''

सुधीर म्हणाला, ''आता मी निघतो.''

हासीनं पुन्हा विचारलं, ''सांगत का नाही?''

''एक वस्तू मिळाली तर सांगू शकेन. तीच, जी त्या दिवशी मागितली होती.'' असं म्हणून अर्थपूर्ण नजरेनं तो हासीकडे बघू लागला.

हासी लाजली पण तिने सावरून घेतलं. म्हणाली, ''आपल्याला सांगून ठेवतेय, ते जमणार नाही.''

सुधीरच्या चेहऱ्याकडे बघितल्यावर तिला भीती वाटली. सुधीर म्हणत होता, ''मला वाटलं होतं हसत हसत मी बातमी सांगेन. पण जमलं नाही. मला क्षमा कर. तुझं लग्न साँतरागाछीच्या त्या तरुणाशी ठरलंय.''

असं सांगून सुधीर निघून गेला.

हासीनं पुन्हा हाक मारली, ''सुधीरदा ऐकून जा.''

सुधीर परत आला नाही.

### दोन

अलका आलीय.

तीच अलका जिला भेटण्यासाठी अजय दिवसभर वाट बघत राही – केव्हा संध्याकाळ होईल आणि ती येईल!

अलका येऊन म्हणाली, ''अजयदा इंग्लिशमध्ये 'पेट' या नावाची एखादी कथा आहे का?''

अजय म्हणाला, ''आहे. पेट म्हणजे माथा.''

''खरं आहे का हे?''

''डिक्शनरी, काढून बघ. पेट म्हणजे माथा.''

''आमची वरुणादी बरोबर सांगतेय ना!''

अजय म्हणाला, ''ठीक, आहे, मुंडकं याला इंग्लिशमध्ये काय म्हणतात?''

अलका डोळे मिचकावत म्हणाली, ''हेड.''

''हेड म्हणजे माथा.''

''मुंडकं म्हणजेही माथा.''

अजय हसून म्हणाला, ''हेच का तुझं बांगला भाषेचं ज्ञान! माथा आणि मुंडकं म्हणजे एकच वस्तू!''

अलकानं हसून विचारलं, ''फरक काय?''

गंभीर होत अजय म्हणाला, ''तुझ्यात आणि पाँची धोपानी यांच्यात काही फरक आहे का सांग पाहू. दोघीही मुलीच आहेत.''

अलका विचारू लागली, ''पाँची धोपानी कोण?''

''तुझ्या गल्लीच्या वळणावर धोब्याची मुलगी आहे ना! लहान वयाची–तुझ्याच वयाची असेल.''

तिरकसपणे अलका म्हणाली, ''अलीकडे बघतेय अजयदा सगळ्याच गोष्टी बारकाईने बघू लागलेयत. धोब्याची मुलगीही सोडली नाही!''

अजय म्हणाला, ''हो ना! स्वत:ची वस्तू चांगली आहे याची खात्री करून घ्यायला नको का?''

''स्वत:ची वस्तू कोणती?''

''आहे एकजण.''

अलका अचानक अस्वस्थ होऊन जवळचं टेबल आवरू लागली.

काहीही कारण नसताना अजय खिडकीतून बाहेर बघत राहिला.

दोन स्वप्नं दोघांनी बघितली.

दोघं घनिष्ठ होत शेजारी शेजारी झोपलेयत.

हासीचा हात अजयच्या छातीवर.

हासी आणि अजय – नवरा–बायको.

# विधाता

वाघांचा फार त्रास होता. लोक अस्वस्थ झाले. गायीगुरं, माणसांपर्यंत सगळी वाघाच्या तावडीत सापडून मारली जाऊ लागली. तेव्हा सगळ्यांनी लाठ्याकाठ्या, बंदुका बाहेर काढून

वाघाला यमसदनाला पाठवलं. एक वाघ मेला पण दुसरा आला. शेवटी माणसाने विधात्यापाशी एक निवेदन सादर केलं, ''देवा, वाघांच्या तावडीतून आमचं रक्षण कर.''

विधाता म्हणाला, ''ठीक आहे.''

काही दिवसांनी विधात्याच्या दरबारात येऊन वाघांनी तक्रार नोंदवली, ''माणसांमुळे आमच्या जीवाला धोका निर्माण झालाय. जीव वाचवण्यासाठी एका जंगलातून दुसऱ्या जंगलात जावं लागतं. शिकारी आम्हाला शांतपणे जगू देत नाहीत. याचा काहीतरी बंदोबस्त करा.''

विधाता म्हणाला, ''ठीक आहे.''

तेवढ्यात नेडाच्या आईने विधात्यापाशी मागणं मागितलं, ''देवा, माझ्या नेडाला सुंदर बायको मिळवून दे. मी तुला पाच पैशांचे साखरफुटाणे देईन.''

विधाता म्हणाला, ''होय.''

हरिहर भट्टाचार्य खटला करायला निघाला होता. विधात्याला उद्देशून तो म्हणाला, ''आयुष्यभर तुझी पूजा करत आलोय. उपवास करून देह शिणवलाय. मेहुणा आणि भाच्याला मला धडा शिकवायचा आहे. तुम्ही मला मदत करा.''

विधाता म्हणाला, ''अवश्य करीन.''

सुशीलची परीक्षा होती. तो रोज विधात्याला म्हणत असे, ''देवा, मला पास कर.'' आज तो म्हणाला, ''देवा, मला जर स्कॉलरशिप मिळवून दिलीत तर पाच रुपये खर्च करून मी महाप्रसाद करीन.''

विधाता म्हणाला, ''चालेल.''

हरेनला कायस्थ डिस्ट्रिक्ट बोर्डाचं चेअरमन व्हायचं होतं. कालीच्या पुजाऱ्यांमार्फत त्यांनी विधात्याची मनधरणी केली, ''मला अकरा मतं मिळायला हवीत.'' काली पुरोहिताने भरपूर दक्षिणा वसूल करून संस्कृत मंत्र म्हणून विधात्याला भंडावून सोडलं. 'व्होटम् देही... व्होटम् देही...'

विधाता म्हणाला, ''मिळतील, मिळतील.''

शेतकरी हात जोडून म्हणाला, ''देवा, पाणी दे.''

विधाता म्हणाला, ''देतो.''

आजारी बालकाची माता देवाला म्हणाली, ''मला एकुलता एक मुलगा आहे. देवा, त्याला दीर्घायुषी कर.''

विधाता म्हणाला, ''ठीक आहे.''

शेजारी राहणारी म्हातारी आत्या वर नमूद केलेल्या मातेच्या संदर्भात म्हणाली, ''देवा, मागी फार मिजाशीत असते. रोज



*सर्व रेखाचित्रे : सागर शिंदे (७०३०९९००८१)*

नवनवीन दागिने घालून मिरवत असते. हे दयाघना, पोराचा घसा पकडलायत हे फार छान केलंयत. मागीला थोडी शिक्षा होऊ द्या.''

विधाता म्हणाला, ''करतो.''

तत्त्वज्ञ म्हणाला, ''हे देवा, तू कसा आहेस हे मला समजून घ्यायचंय.''

विधाता म्हणाला, ''ठीक आहे.''

चीन देशातून चित्कार ऐकू आला, ''देवा, या जपान्यांपासून वाचवा.''

विधाता म्हणाला, ''वाचवतो.''

बांगला देशातला एक तरुण धरणं धरून बसला, ''कोणताही संपादक माझं लेखन छापत नाही. 'प्रवासी' मासिकात माझं लेखन छापून यावं अशी माझी इच्छा आहे. रामानंदबाबूंना कृपा करायला सांगा.''

विधाता म्हणाला, ''ठीक आहे.''

जराशी सवड मिळाल्याबरोबर विधाता पाठीमागे उभ्या असलेल्या ब्रह्माला म्हणाला, ''आपल्या घरी सरसूचं शुद्ध तेल आहे का?''

ब्रह्मा म्हणाला, ''आहे. कशाला हवंय?''

विधाता म्हणाला, ''मला हवंय. द्याल का?''

ब्रह्मा म्हणाला, ''अवश्य, अवश्य.''

ब्रह्माच्या घरून सरसूचं शुद्ध तेल मिळालं. ताबडतोब त्या तेलाचे दोन थेंब नाकात घालून विधाता निद्राधीन झाला.

त्या गाढ झोपेतून तो अजूनही उठला नाही...

**वनफूल या विसाव्या शतकातल्या लेखकाने लिहिलेल्या बंगाली कथांचा हा भावानुवाद. अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

ईमेल : sumatijoshi154@gmail.com

# औषधेतर चिकित्सा योजना हेच आयुर्वेदाचे बलस्थान



डॉ. श्रीराम सावरीकर

आयु:रंग



**मा**गील लेखांत आपण शहरी जीवनातील आयुर्वेदाच्या उपयुक्ततेबद्दल माहिती घेतली. त्यात आपण आयुर्वेदोक्त जीवनशैली कालानुरूप कशा प्रकारे उपयोगात आणता येईल याचा विचार केला होता. वैद्यकीय व्यवसाय आणि औषधी उद्योगाच्या व्यापारीकरणाच्या परिणामी जगभरातील लोक अधिकाधिक औषधावलंबी बनत चालले आहेत. अशा परिस्थितीमध्ये औषधेतर चिकित्सा योजनेस प्राधान्य असलेली आयुर्वेद चिकित्सा पद्धती अत्यंत उपयुक्त सिद्ध होऊ शकते. याचे विवेचन करणारा आयु:रंग लेखमालेतील हा तिसरा लेख...

## मेडिकलायझेशन ऑफ लाइफ

काही दिवसांपूर्वी इव्हान इलिच या लेखकाचे 'मेडिकल नेमेसिस' हे पुस्तक माझ्या वाचण्यात आले. इव्हान इलिचने वैद्यकीय क्षेत्राच्या समाज जीवनावरील प्रभावाचे वर्णन करताना 'मेडिकलायझेशन ऑफ लाइफ' असा एक शब्दप्रयोग केला आहे. इथे इलिचच्या पुस्तकाच्या विषयासंदर्भात मेडिकलायझेशनचा अर्थ वैद्यकीय उपचारीकरण किंवा प्रामुख्याने औषधीकरण असा आहे. माणसाच्या आयुष्याचे आज औषधीकरण झाले आहे, असे इलिच म्हणतो. याचा अर्थ, शरीराला जरा काही झाले की त्यावर आम्ही लगेच औषधी उपचार शोधू लागतो. शरीराची बिघडलेली यंत्रणा नैसर्गिकरित्या रूळावर येण्यासाठी आम्ही वेळच देत नाही. त्यातच हल्ली वैद्यकीय क्षेत्रात दिवसागणिक नवीन नवीन औषधांचा जणू रतीबच घातला जात आहे. बरे, नवीन औषध येताच पूर्वीचे औषध लगेचच धोकादायक होते, असेही सांगितले जाते. म्हणजे, कालपर्यंत शरीरासाठी जे उपकारक होते, ते आज एकदम धोकादायक बनते. वैद्यकीय क्षेत्रातील या अशा घटनांमुळे लोकांची स्वयं स्वस्थीकरणाची जन्मजात क्षमता टिकण्यासाठीचे आवश्यक नैसर्गिक आणि सांस्कृतिक वातावरण धोक्यात आले आहे.

वैद्यकीय क्षेत्राच्या प्रगतीमुळे विषेशतः प्रतिजैविक औषधांच्या शोधामुळे क्षयरोग, कॉलरा, प्लेग, मलेरिया यासारख्या साथीच्या रोगांवर मात करून मानवाचे आयुर्मान वाढले आहे, असा दावा केला जातो. या दाव्याविषयी संशय घेण्याजागी परिस्थिती दुर्लक्षिण्यासारखी नाही. औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या काळात दोन पिढ्यापर्यंत क्षयरोगाचा कहर शिखरावर पोहोचलेला होता. सन १८१२ मध्ये न्यूयॉर्क शहरात क्षयरोगग्रस्त लोकांमध्ये मृत्यूचे प्रमाण ७०० प्रति १०,००० होते. १८१२ मध्ये रॉबर्ट कोचने क्षयरोगाच्या जंतूचा शोध लावला, तोपर्यंत हे प्रमाण ३७० प्रति १०,००० इतके खाली उतरले होते. पुढे १९१० मध्ये क्षयरोग्यांसाठीचे पहिले सॅनिटोरियम उघडले, तोपर्यंत ते प्रमाण १८० प्रति १०,००० पर्यंत नैसर्गिकरीत्या घटले होते. दुसऱ्या विश्वयुद्धानंतर प्रतिजैविकांचा शोध लागून त्याचा वापर सुरू होण्यापूर्वी हा क्षयरोग्यांचा मृत्यूदर ४८ प्रति १०,००० पर्यंत घटला होता.

हीच गोष्ट कॉलरा, अतिसार, टायफाइड यासारख्या सांसर्गिक रोगांच्या बाबतही दिसून येते. या रोगांची कारणे समजून त्यावर नेमके औषध मिळेपर्यंत या रोगांची तीव्रता व प्रादुर्भाव कमी होऊन त्यांचे सामाजिक महत्त्व लक्षणीयरीत्या कमी झाले होते. डिप्थेरिया, स्कारलेट फिवर, डांग्या खोकला, गोवर, कांजण्या या रोगाने होणाऱ्या बालमृत्यूंचे प्रमाण प्रतिजैविकांचा सामान्य वापर सुरू होण्यापूर्वीच आणि सार्वजनिक लसीकरण सुरू होण्यापूर्वी १८६० ते १९६५ या कालांत ९० टक्के कमी झाले होते. एकूणच राहणीमानातील सुधारणा, सूक्ष्म जीवाणू संसर्गाच्या तीव्रतेतील नैसर्गिक घट आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आहाराच्या पोषण मूल्याची वृद्धी या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामामुळे लोकांची वाढलेली रोगप्रतिकारक शक्ती सांसर्गिक रोगांमुळे होणाऱ्या मृत्यूदरांमध्ये लक्षणीय घट दर्शवू लागली होती. आजही प्रतिजैविकादी औषधांची विपुल उपलब्धता असूनही जगातील कुपोषणग्रस्त अविकसित देशामधील लोकांमध्ये अतिसार, न्युमोनिया आणि श्वासनलिकेचे संसर्गजन्य विकार इत्यादींचे प्रमाण अधिक असून, हे दीर्घकाळापर्यंत बरे होत नाहीत, तसेच त्यामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाणही खूप जास्त आहे, असे दिसून येते. याचाच अर्थ, औषधांमुळे नव्हे तर सुधारलेल्या राहणीमानामुळे सांसर्गिक रोगांचे प्रमाण कमी होऊन लोकांचे आयुर्मान वाढलेले आहे.

### *असांसर्गिक रोगांचा वाढता प्रादुर्भाव*

एकीकडे संसर्गजन्य रोगांचे प्रमाण आज जगभरांत कमी झालेले असताना दुसरीकडे मात्र डायबेटिस, उच्च रक्तदाब, हृदय रोग, लठ्ठपणा, कॅन्सर, सांधेदुखी, मानसिक नैराश्य यासारख्या असांसर्गिक रोगांनी साथीच्या रोगांच्या प्रादुर्भावाचे रूप धारण केले आहे. विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, हे रोग कोणत्याही औषधाने बरे होणारे नाहीत. तरीही वैद्यकीय जगत ते बरे करण्यासाठी लोकांवर रोज नवीन नवीन औषधांचा सातत्याने मारा करीत आहे. सांसर्गिक रोगांचा प्रादुर्भाव व तीव्रता कमी होण्याचे श्रेय जसे वैद्यक शास्त्राला देता येत नाही, तसेच आजच्या असांसर्गिक रोगांच्या चढत्या आलेखालाही वैद्यकीय क्षेत्र जबाबदार नाही. ही वाढ सार्वत्रिक यांत्रिकीकरणामुळे कमी झालेले शारीरिक कष्ट, वाढलेले आयुर्मान आणि पोषक द्रव्यांच्या असंतुलित सेवनामुळे झालेली आहे. यावर औषधी उपचार नव्हे, तर योग्य प्रकारचा व्यायाम आणि संतुलित आहार यावर आधारित उपचार आवश्यक आहेत. सामान्यतः व्यक्तिपरत्वे आवश्यक पोषक तत्त्वे आणि



*आयुर्वेद ही मूलतः औषध विरहित चिकित्सा पद्धती आहे. आहार-विहारातली शिस्त या चिकित्सापद्धतीत केंद्रस्थानी आहे...*

ठराविक कॅलरीयुक्त अन्न म्हणजे संतुलित आहार आणि ठराविक वेळ फारतर ठराविक कॅलरीज खर्च करणारी शारीरिक हालचाल म्हणजे, योग्य व्यायाम अशी धारणा असते. पण प्रत्यक्षात हे पुरेसे नाही. केवळ पोषक तत्त्वे व कॅलरी यांनी आवश्यक संतुलन साधता येत नाही. विशेषतः रोगनिर्माण व रोगावस्थेमध्ये त्याहूनही अधिक काही लागते. नेमके इथेच आयुर्वेदाचे कार्य सुरू होते.

***औषध विरहित उपचार प्रधान चिकित्सा पद्धती***

आयुर्वेद ही एक औषध विरहित उपचार प्रधान चिकित्सा पद्धती आहे. आयुर्वेद चिकित्सेमध्ये कोणत्याही रोगाच्या चिकित्सा योजनेमध्ये औषधी उपचारांना शेवटचे स्थान असते. निदान परिवर्जन म्हणजे रोगाच्या कारणांचे निराकरण आणि रोग विरोधी उपाय असे आयुर्वेद चिकित्सेचे दोन प्रकार आहेत. त्यांत निदान परिवर्जनाला म्हणजे निराकरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. रोगाचे कारण तसेच ठेऊन विशिष्ट रोग विरोधी औषधांचा उपयोग अनेकदा अयशस्वी तर काही वेळा क्षणिक उपयोगी ठरत असतो. म्हणूनच रोगाचे कारण शोधून ते नाहीसे करणे नेहमीच अत्यावश्यक ठरते. अपघात वगळता इतर वेळा बिघडलेला आहार आणि एकूणच बिघडलेली जीवनशैली हेच रोगाचे मूळ कारण असते. त्यामुळे आहार आणि जीवनशैली सुधारणे हीच खरी रोग चिकित्सा असते. पण औषधी उद्योगाच्या वैद्यक शास्त्रावरील अतिप्रभावामुळे डॉक्टर आणि रूग्ण दोघेही अति औषधावलंबी झालेले आहेत. त्यामुळे आयुर्वेदिक डॉक्टरनेही रोग बरा करण्यासाठी आधुनिक औषधाला पर्यायी आयुर्वेदिक औषध द्यावे, अशी रूग्ण अपेक्षा करीत असतात.

रूग्णाचे समाधान करण्यासाठी अनेकदा आयुर्वेद डॉक्टर असे औषध देतातही. औषध देताना आयुर्वेदिक डॉक्टर आहार आणि दैनंदिन व्यवहारात पाळावयाच्या आणि टाळावयाच्या काही गोष्टीही सांगत असतात. वास्तविक रोग बरा होण्यासाठी याच गोष्टी महत्त्वाच्या असतात. आहाराला तर आयुर्वेदाने महा औषध अशी संज्ञा दिलेली आहे. एकदाही औषध न घेता एखादी व्यक्ती पूर्ण आयुष्य व्यतीत करू शकते. पण आहार सेवन न करता कुणीही जगू शकत नाही. असे असले तरी रूग्णाची मानसिकताच अशी बनलेली असते, की हे तथ्य त्याच्या पचनी कधीच पडत नाही. औषध घेतल्याशिवाय रोग बरा होणारच नाही या भ्रमातच तो कायम राहत असतो. नव्हे वैद्यक व्यवसाय आणि औषधी उद्योगाच्या व्यापारीकरणाने त्याला तसे भ्रमात ठेवलेले असते. त्यामुळे आयुर्वेदिक डॉक्टरने सांगितलेल्या औषधेतर गोष्टीकडे रूग्ण पूर्ण दुर्लक्ष करीत असतो. परिणामी, त्याचा रोग केवळ औषधाने बरा होत नाही आणि त्याचा दोष आयुर्वेदाच्या माथी ठेवला जातो.

आयुर्वेद डॉक्टरने आहार आणि सामान्य व्यवहार या संबंधी रूग्णाला दिलेल्या सूचना या व्यवहार्य नसतात, असे सामान्यपणे म्हटले जाते. पण विशिष्ट परिस्थितीजन्य अनिवार्यतेचा अपवाद वगळता या समजुतीमध्ये फारसे तथ्य नाही. अशा अपवादात्मक परिस्थितीचा आयुर्वेदिक डॉक्टरने विचार करून रूग्णाला योग्य सल्ला देणे आवश्यक असते. बहुसंख्य प्रकरणात आरोग्यास हानी पोहोचवणाऱ्या अशा अनेक घातक सवयी रूग्णाच्या इतक्या अंगवळणी पडलेल्या असतात, की शक्य असूनही त्या मोडायला सांगणे त्याला अव्यवहार्य वाटू लागते. अगदी साधे उदाहरण द्यायचे, तर एखाद्याला चहा सोडायला सांगितले की त्याला ते अशक्य वाटते. चहा ही काही जीवनाला अत्यावश्यक गोष्ट नाही. पण चहा प्यायल्यामुळे स्वास्थ्य बिघडू शकते, या गोष्टीवर रूग्णाचा विश्वासच बसत नाही.

***दूध आणि चयापचयजन्य विकार***

दूध हा विषय तर आणखी गंभीर आहे. मधुमेह आणि अतिपोषण (ज्याला असंतुलित पोषण म्हणणे अधिक योग्य) जन्य विकार उदा. चयापचयजन्य विकार (मेटॅबॉलिक डिसऑर्डर) या रोगामध्ये दूध पिणे आरोग्यासाठी हानीकारक आहे. आयुर्वेद ग्रंथामध्ये दुधाचे नित्य सेवन हे मधुमेह आणि स्थौल्य अशा संतर्पणजन्य रोगांचे एक महत्त्वाचे कारण म्हणून नमूद केले आहे. आधुनिक वैद्यक शास्त्रानुसारही बाल्यावस्था

उलटल्यानंतर दूध पचण्यासाठी लागणारे लॅक्टोज या उत्प्रेरकाच्या (एन्झाइम) प्रमाणात ६० ते ७० प्रतिशत घट होत असते. मध्य वय आणि तदनंतर तर हे प्रमाण सातत्याने घटत जात असते. त्यामुळे मध्यवयीन आणि वयस्कर व्यक्तीमध्ये दूध अपाचित राहून (लॅक्टोज इन्टॉलरन्स) तज्जन्य विकार निर्माण होण्याचे प्रमाण खूप अधिक आहे. याच्याच परिणामी डायबेटिस, ओबेसिटी असे चयापचयजन्य विकार उत्पन्न होत असतात. पण आयुर्वेदिक डॉक्टरने दूध घेणे बंद करा, असे सांगितले की मी फार नाही केवळ चहामध्ये थोडेसे दूध घेतो, अशी स्वतःची समजूत करून घेऊन वैद्याच्या सल्ल्याकडे सर्रास दुर्लक्ष केले जाते. वास्तविक जे थोडे थोडे दूध रोज घेतले जात असते त्याचे अपाचित घटक शरीरांत साचत जाऊन ते हळूहळू पूर्ण पचनसंस्था बिघडवत असतात, हे कुणी लक्षात घेत नाही. आयुर्वेद डॉक्टर प्रत्येक रोगाच्या चिकित्सेमध्ये आहारामध्ये सेवन करावयाच्या आणि त्याहीपेक्षा टाळावयाच्या पदार्थांबद्दल सूचना देत असतो. त्यात टाळायच्या पदार्थांची संख्या जास्त असते.

***आहार सेवनाच्या पद्धती आणि चयापचयजन्य विकार***

आजच्या काळात आमच्या आहार सेवनाच्या पद्धती पूर्णपणे बदलून गेल्या आहेत. साधे उदाहरण म्हणजे, पूर्वी हॉटेलच्या खाद्य पदार्थांची जाहिरात 'खास घरच्या चवीचे जेवण' अशी केली जात असे. आता मसाल्यांची जाहिरात हॉटेलच्या जेवणाची चव घरात अनुभवा अशी केली जात आहे. हाय फ्लेमवर दीर्घकाल तळून तयार केलेले पदार्थ ज्यामध्ये ॲडव्हान्स्ड ग्लायसेशन अँड प्रॉडक्ट्स (ए जी ई), अक्रलॅमाइड, ट्रान्स फॅट्स हे आरोग्यास घातक पदार्थ असतात, ते नियमितपणे सेवन केले जात आहेत. आपले जेवणाचे ताटही आता, नको त्या पदार्थांनी भरले जात आहे. आम्ही पाश्चात्याची भोजनशैली अवलंबत आहोत. साधे उदाहरण म्हणजे, पाश्चात्यामध्ये गोड पदार्थ डेजर्ट म्हणून जेवण संपल्यानंतर सेवन केले जातात. भारतीय आहारात गोड पदार्थ जेवताना सुरूवातीसच किंवा अधून मधून सेवन केले जातात. त्याचे साधे वैज्ञानिक कारण गोड पदार्थ पचायला जड असतात. जेवणाच्या सुरुवातीस पोट रिकामे असते, तेव्हा पाचक रस तीव्रतेने स्रवत असतात. त्यामुळे सुरुवातीस सेवन केलेल्या गोड पदार्थांचे पचन सुलभ होते. जेवण संपल्यानंतर पोट भरलेले असते. पाचक स्राव कमी झालेले असतात. त्या भरलेल्या पोटात वर आपण पचायला जड असे गोड पदार्थ सेवन करतो. हे अपचनाला आणि पुढील दीर्घकालीन विकारांना आमंत्रण देणे नव्हे काय?

जेवताना पाणी प्यावयाच्या चुकीच्या सवयी हा एक असाच दीर्घकालीन दुष्परिणाम करणारा घटक होय. भारतीय जेवणामध्ये पाण्याने भरलेले भांडे जेवण करताना ताटाच्या बाजूस ठेवलेले असे. अन्न सेवन करताना अधूनमधून पाणी पिण्याची पद्धत होती. ज्यामुळे पोटात घन पदार्थ व द्रव पदार्थ यांचे योग्य मिश्रण होऊन योग्य वेळेत पोटातील अन्न पुढे सरकण्याची प्रक्रिया साधली जात असे. हल्ली जेवताना पाणी पिणे पूर्णपणे बंद झाले आहे. जेवताना पाण्याचे भांडे जवळ ठेवणे हल्ली दुर्मिळ झाले आहे. पाण्याचे भांडे जेवणाच्या टेबलपासून दूरवर कुठेतरी ठेवलेले असते. जेवण संपवून जमलेच तर, हात धुतल्यानंतर नाहीतर तसेच मुद्दाम जाऊन पिण्यासाठी पाणी घ्यावे लागते. अनेकदा तर ते प्यायलेच जात नाही. अशा वेळी सेवन केलेले अन्न पदार्थ दीर्घकाळ जठरात पडून राहून अन्न पचन बिघडणार नाही तर काय होणार?

***फलाहार आणि चयापचयजन्य विकार***

फलाहार हाही असाच एक संवेदनशील विषय आहे. औद्योगिक क्रांतीपूर्वी कुपोषणजन्य आजारांचे प्रमाण खूप अधिक होते. त्यातच 'क' जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे स्कर्वी या रोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण विशेषतः खलाशांमध्ये खूप अधिक होते. केवळ स्कर्वीमध्येच नव्हे तर जंतुसंसर्गजन्य आजारामध्येही व्हिटॅमिन्सची कमतरता आढळून येत असे. परिणामी, लोकांची रोगप्रतिकारशक्ती कमी झालेली असे. त्यामुळे आजारी माणसाची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी त्याला फळे देण्याची पद्धत सुरू झाली. म्हणूनच आजारी माणसाला भेटायला जाताना फळे घेऊन जाण्याची पद्धत सुरू झाली, जी आजही पाळली जाते. पण आज परिस्थिती बदलली आहे. कुपोषणाजन्य नव्हे तर असंतुलित पोषणजन्य आजार आता वाढले आहेत. अशा आजारी व्यक्तीला फळे देण्याची गरज उरलेली नाही. उलट फळांच्या सेवनामुळे नवीनच समस्या निर्माण होत आहेत. फळामध्ये फ्रुक्टोजच्या रूपांत साखर असते. वैद्यकीय व्यवसायात असे म्हटले जाते की एखादी व्यक्ती सातत्याने अंगदुखी, अस्वस्थ वाटणे, अपचन अशा तक्रारी करत असेल आणि त्या तक्रारींचे कोणतेही कारण डॉक्टरला सापडत नसेल, तर अशा ७० टक्के रूग्णामध्ये

फ्रुक्टोज इन्टॉलरन्स कारणीभूत आहे, असे समजावे. इतके हे प्रमाण वाढले आहे.

फलाहार ही चयापचयजन्य विकारा (मेटॅबॉलिक डिसऑर्डर)मध्ये तर अत्यंत प्रकृतिविघातक अशी गोष्ट आहे. याचे वैज्ञानिक कारणही आहे. फळामधील फ्रुक्टोज आणि इतर खाद्य पदार्थामधून मिळणाऱ्या सुक्रोज, ग्लुकोजच्या चयापचय (मेटॅबॉलिजम)मध्ये मूलभूत फरक आहे. फ्रुक्टोजच्या पचनासाठी इन्सुलिनची गरज नसते. फ्रुक्टोज सेवन केल्यानंतर ते आतड्यातून सरळ यकृतामध्ये जात असते. तिथून फ्रुक्टोजचे पचनोत्तर घटकांत परावर्तन होऊन ते घटक शरीरात पसरतात. त्यामुळे शरीरातील ट्रायग्लिसराइडचे प्रमाण वाढून ते अनेक प्रकारच्या चयापचयाच्या (मेटॅबॉलिक) विकारांना निमंत्रण देणारे ठरते. त्यामुळे फळांचे अधिक प्रमाणातील सेवन आरोग्यास हानीकारक आहे. विशेषतः डायबेटिस, ओबेसिटी व अन्य चयापचयाच्या (मेटॅबॉलिक) विकारामध्ये तर ते प्रकृतिघातक ठरू शकते.

***आहार विहाराधारित चिकित्सा योजना आयुर्वेदाचे बलस्थान***

आयुर्वेदिक डॉक्टर रूग्णांना त्याच्या आहार आणि अन्य सवयींबाबत सल्ला देताना अनेक गोष्टींचा विचार करीत असतो. त्याने दिलेला आहार विहार विषयक सल्ला न पाळता रूग्ण आजार बरा करण्यासाठी केवळ औषधे घेत राहिला, तर त्याचा आजार कधीच बरा होत नाही. उलट कोणतेही औषध न घेता केवळ आहार विहारांवर योग्य नियंत्रण ठेवल्यामुळे असे रोगी पूर्ण बरे झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. एक मात्र निश्चित, की ही आहारविहार विषयक बंधने आयुष्यभर पाळणे आवश्यक असते. कारण आजार होण्याआधीच्या आयुष्यात असंतुलित आहार नियमितपणे केलेला असतो. त्यामुळे पुढील आयुष्यात तसे न करणेही आयुष्यभर पाळले पाहिजे. नाहीतर आता मी पूर्ण बरा झालो, आता मी पूर्वीप्रमाणेच वागणार असे केल्यास आजारही तुमची पाठ आयुष्यभर सोडणार नाहीत हे निश्चित.

याच कारणासाठी आयुर्वेदाधारित रोग चिकित्सेमध्ये औषध योजनेला अत्यंत गौण स्थान आहे. औषध योजना ही मूळ चिकित्सा योजनेला पूरक आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. गरज नसताना औषध सेवनामुळे माणसाची रोगप्रतिकारशक्तीही क्षीण होत जात असते. कारण अशा औषध सेवनामुळे विशिष्ट रोगप्रतिकारशक्ती निर्माण होण्यास संधीच मिळत नाही. पण आज औषधाशिवाय रोगाच्या चिकित्सेची कल्पनाही लोक करीत नाहीत. किंबहुना त्यांना तसा विचारही करू दिला जात नाही. वैद्यक व्यवसाय आणि औषध उद्योगाच्या व्यापारीकरणाने तशी त्यांची मानसिकता तयार केलेली आहे. त्यामुळे लोक अधिकात अधिक औषधावलंबी बनत चालले आहेत. हल्ली तर डॉक्टरच्या सल्ल्याशिवाय स्वयं निर्देशित औषध सेवन करण्याचे प्रमाण चिंताजनक होऊ लागले आहे. आयुर्वेदाधारित रोगचिकित्सेमध्ये आहार विहाराधारित चिकित्सा योजनेला अनन्यसाधारण प्राधान्य आहे. खरे तर कोणतेही आयुर्वेदिक औषध हे आधुनिक औषधांना पर्याय म्हणून वापरले जाऊ शकत नाही. आयुर्वेदिक डॉक्टर, शिक्षण तज्ज्ञ व संशोधकांनी तसा प्रयत्न करणेही चुकीचे आहे. केवळ औषध योजना म्हणजे आयुर्वेदिक चिकित्सा करणे नव्हे. व्यक्तिपरत्वे रूग्णपूरक औषधेतर आहार विहार म्हणजेच जीवन शैली योजना, हीच खरी आयुर्वेदिक चिकित्सा होय आणि हेच आयुर्वेद चिकित्सेचे बलस्थान आहे. औषध हे त्यात पूरकाचे कार्य करत असते. आयुर्वेदिक डॉक्टर आणि त्याच्याकडे चिकित्सा घेणाऱ्या रूग्णाने हे कधीही विसरता कामा नये.

**डॉ. श्रीराम सावरीकर हे एम. डी. (आयु), पीएच. डी. असून, आयुर्वेद प्राध्यापक तसेच गुजरात आयुर्वेद विद्यापीठाचे माजी कुलगुरू, भारत सरकारचे माजी आयुर्वेद सल्लागार आणि भारत सरकारच्या आयुर्वेद फार्माकोपिया समितीचे माजी अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची रसचंडांशु – हिन्दी टीका, शारंगधर संहिता – इंग्रजी टीका – तीन खंड, अर्वाचीन आयुर्वेदायन, आयुर्वेद – फाउंडेशन ऑफ हेल्दी लाइफ, इंग्रजी, वैद्यकीय सांख्यिकी शास्त्र– हिंदी आदी साहित्य प्रकाशित झाले आहे.**

**संपर्क** : sssavrikar@gmail.com





# UMANG special school

For autistic and slow learners

## LOcations

**1 Kandivali**

umang intervention centre, bandar pakhadi road, kandivali west, mumbai-400067.
contact: +91 89762 87060

**2 Bhayander**

bungalow number 8, indralok phase III, gopal patil road, bhayander east, mumbai- 401105
contact: 7506002345

**3 Vasai**

samiranand, next to mary vila, besides ribbons and balloons cake shop, vasai road, vasai
contact: 9921580294
7506048663

## Facilities

- Remedial education
- Functional and skills training
- NIOS & OBE board education
- Speech & Language therapy
- Occupational therapy
- Social skills training
- Psycho -Educational assessment
- Guidance & Counselling
- Sports training
- Pre - vocational & vocational training

umang-trust.org

umangtrust2000@gmail.com

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
PRGI NO-MAHMAR/2023/86554

